भं. ग्रं. मं. ठाणें
विषय
सं. नं.

# पुणें शहराचें वर्णन.

१९०१–१९२०

लेखक

ह. र. भागवत.

अष्टेकर कंपनी.

पुणें.

REFBK-0001871
REFBK-0001871

ग्रंथ संग्रहालय
नं.
ग्रंथ संग्रहालय
ग्रंथ संग्रहालय
१८८९

# पुणें शहराचें वर्णन.

## १९०१–१९२०.

# संग्राह्य पुस्तकें.

—:o:—

संपादक—हरि रघुनाथ भागवत. बी. ए.

**सार्थ उपनिषत्संग्रह भाग चवथा**—कैवल्य, कौषीतकि, जाबाल, मैत्रायणीय आणि श्वेताश्वतर हीं पांच उपनिषदें मराठी भाषांतरासह. किंमत दीड रुपया.

**सार्थ उपनिषत्संग्रह भाग सहावा**—अमृतबिंदु, आरुणेयि, आत्मा, गर्भ, प्राणाग्निहोत्र, सर्वसार, परमहंस, आणि ब्रह्म हीं आठ उपनिषदें मराठी भाषांतरासह. किंमत बारा आणे.

**जातकबोध**—जातकशास्त्राचा अभ्यास करूं इच्छिणारांस उपयुक्त पुस्तक. आवृत्ति दुसरी. किंमत दीड रुपया.

**जातकचंद्रिका** अथवा लघुपाराशरी मराठी भाषांतर व स्पष्टीकरण यांसह—आवृत्ति दुसरी. किं. चार आणे.

**अष्टेकर कंपनी.**

सदाशिव पेठ, पुणें शहर.

---

# पुणें शहराचें वर्णन.

१९०१–१९२०.

लेखक

हरि रघुनाथ भागवत बी. ए.

REFBK 0001871
REFBK-0001871

शके १८४५ सन १९२४

अष्टेकर कंपनी. पुणें.

किंमत सव्वा रुपया.

Printed by Mr. G. K. Gokhale, Secretary "Shri Ganesh Printing Works" at 495 Shaniwar Peth, Poona city,

and

Published by Mr. H. R. Bhagavat, at 674 Sadashiva Peth, Poona city.

# प्रस्तावना.

१८०१ पासून १९२० पर्यंतच्या वीस वर्षांमध्यें मी बहुतेक सर्व काळ पुण्यांत राहिलों आहें. लहानपणचीं विद्यार्थी दशेंतलीं वर्षें दुसरीकडे गेलीं. परंतु लहानपणापासून वाचनाचा नाद असल्या-मुळें पुणें शहराविषयीं मला फार अभिमान वाटे. तेव्हांहि माझें पुण्यास दरसाल एकदां तरी येणें जाणें घडे, आणि तेव्हां पुणें पाहून मनाला आनंद होई आणि अभिमान जागृत होई. १९०३ च्या सुरवातीपासून १९०६च्या अखेरपर्यंत येथें मी कॉलेजांत विद्यार्थी होतों. त्यानंतर व्यवहारांत पडलों. हळूहळू समाजाचा अनुभव येऊं लागला. जसजसा अनुभव येऊं लागला तसतशी पुणें शहरांतल्या लोकांचें वर्णन पुस्तकरूपानें करण्याची इच्छा बळावत चालली. या इच्छे-चेंच फळ हें पुस्तक होय.

"पुणें शहराचें वर्णन" मागें कोणीं तरी लिहून छापल्याचें ऐकि-वांत आहे. सदर पुस्तक मिळविण्याचा मीं प्रयत्न केला. वाचण्यास मिळेल असें वाटलें, पण मिळालें नाहीं. पुण्याचें वर्णन लिहितांना पुण्याचें स्थलविषयक वर्णन लिहिण्याची माझी इच्छा नव्हती; तर चालत्या बोलत्या समाजाचें वर्णन लिहिण्याची इच्छा होती, 'सुशील यमुना' आणि 'पुण्यग्रामरहस्य' हीं दोन पुस्तकें माझ्या वाचण्यांत आलीं. दोन्ही पुस्तकांत कादंबरीच्या रूपानें पुण्यांतील १८८०च्या सुमाराच्या काळाचें वर्णन थोडेंफार आलें आहे. परंतु मला कादंबरी

लिहिणें पसंत पडेना. पुण्यांतील लोक जसे दिसतात तसें त्यांचें सरळ आणि स्पष्ट भाषेंत वर्णन करणें व पुण्यासंबंधाची माहिती सांगणें मला योग्य वाटलें, आणि १९२१ मध्यें हें पुस्तक लिहिण्याचा विचार कायम केला. दोन अडीच वर्षें हें काम माझ्या हातून झालें नाहीं.

हें वर्णन लिहितांना लोकांमध्यें जे गुण किंवा दोष असतील त्यांचा उल्लेख मीं ठिकठिकाणीं स्पष्ट भाषेंत केला आहे. आपल्यां-तले दोष दाखविलेले आमच्या समाजांत कोणाला खपत नाहींत. गुणांचें वर्णन अतिशयोक्तिपूर्ण केलें तर आनंद वाटतो, पण दोष दाखविणें किंचित् सुद्धां खपत नाहीं. अर्थात् हें पुस्तक प्रसिद्ध झाल्याबरोबर माझ्यावर मोठा गहजब उडेल, हें मीं जाणून आहें. मीं पुस्तक लिहितांना कोठें अतिशयोक्ति केली नाहीं, कोठें अल्पोक्ति केली नाहीं, किंवा अन्योक्ति केली नाहीं. स्पष्ट भाषेंत जें लिहिणें योग्य वाटलें तें लिहिलें आहे.

या पुस्तकांतलें वर्णन केवळ पुण्यालाच कां लागू करतां, पुण्या-बाहेरच्या लोकांना देखील तें लागू पडेल, असा कोणी आक्षेप घेतील. होय, कांहीं बाबतींत हा आक्षेप खरा आहे, पण तो पूर्णांशानें खरा नाहीं, खरेपणाचा कांहीं अंश त्यांत आहे; पुण्यांत लोकांचे गुण किंवा दोष जितक्या उत्कटत्वानें दिसतात तितक्या उत्कटत्वानें इत-त्र दिसत नाहींत. सर्व गुणदोषांना पुण्यामध्यें उत्कटता येते. पुण्याची परिस्थिति उत्कटतेला अनुकूल आहे. कांहीं वर्णन केवळ या वीस वर्षांपुरतें नसून अधिक कालालाहि लागू पडूं शकेल हेंहि खरें आहे.

या पुस्तकांतील विषयांसंबंधानें कोणीं कांहीं टीका, चर्चा किंवा सूचना लिहून प्रकाशित केल्यास लेखकांनीं मला कळविण्याची कृपा करावी. त्याबद्दल मी त्यांचा आभारी होईन.

पुणें, ६७४ सदाशिव पेठ,<br>रविवार १३ जानेवारी १९२४.

हरि रघुनाथ भागवत

# अनुक्रमणिका.

——:०:——


| भाग | विषय | पृष्ठ |
| --- | --- | --- |
| १ | स्थलवर्णन. .... .... .... | १— ११ |
| २ | सामाजिक वैशिष्ट्य व चालीरीती. | १२— ४७ |
| ३ | पुण्यांतल्या चळवळी. .... .... | ४८— ६९ |
| ४ | वर्तमानपत्रें, मासिकें आणि छापखाने. | ७०— ९५ |
| ५ | पुण्यांतल्या प्रसिद्ध व्यक्ति. .... .... | ९६—१४६ |
| ६ | पुण्यांतल्या संस्था. .... .... | १४७—१५१ |
| परिशिष्ट | पेशव्यांचा शनिवारवाडा ... | १५२—१६८ |

॥ श्री ॥

# पुणें शहराचें वर्णन.

## १९०१—१९२०.

## भाग पहिला—स्थलवर्णन.

पुणें शहराचें वर्णन म्हणजे मुख्यतः पुण्यांतील लोकांचें वर्णन मला करावयाचें आहे. पुणें शहराची स्थलविषयक रचना किंवा वैशिष्ट्य सांगण्याच्या उद्देशानें मीं हें पुस्तक लिहिण्यास घेतलें नाहीं. तरी येथील ज्या वीस वर्षांतल्या काळाचें लोकविषयक वर्णन मी लिहिणार आहें त्या काळांत पुण्याची रचना कशी होती याची माहिती वाचकांस थोडक्यांत तरी प्रथमतः सांगितली पाहिजे. अनेक कारणांनीं महाराष्ट्रांत पुणें शहराला अप्रतिम महत्त्व आहे. गेल्या दोनशें वर्षांत पुणें शहराचें हें महत्त्व सारखें वाढत आलें आहे, आणि ही वाढ अद्याप सारखी चालू आहे. यामुळें हें पुण्याचें वर्णन महाराष्ट्रांत सर्वत्र लोक वाचतील, ज्यांनीं पुणें कधीं पाहिलें नाहीं असेहि अनेक लोक वाचतील, व अशा लोकांकरितां पुण्याची स्थलविषयक माहिती प्रथमतः थोडक्यांत सांगणें जरूर आहे.

मुंबई इलाख्यांत महाराष्ट्राचे जे नऊ जिल्हे आहेत त्यांत पुणें जिल्हा हा मध्यस्थानीं आहे; व पुणें जिल्ह्यांत पुणें शहर हें मध्यस्थानीं आहे. म्हणजे सर्व महाराष्ट्राचें पुणें हें निसर्गानेंच मध्यवर्ती शहर झालेलें आहे. अर्थात् निसर्गाच्या नियमानें पुणें हें महाराष्ट्राचें राजधानीचें शहर आहे. येथून मुंबई, नाशिक, नगर, पंढरपूर, सातारा, महाड वगैरे सर्व दिशांकडील शहरांस जाणाऱ्या सडका होत्या. याच इंग्रजी अम-

दानींत कायम झालेल्या असून या सडकांवरून अद्याप रहदारी चांगली चालू आहे. शिवाय जी. आय. पी. रेलवे आणि सदर्न मराठा रेलवे या दोन रेलवेंचें येथें जंक्शन झाल्यामुळें पुणें शहराचें रेलवेच्या दृष्टीनेंहि मध्यवर्तित्व कायम आहे. लोकवस्तीच्या दृष्टीनें देखील मध्यवर्तित्वाचा मान पुणें शहरानें राखला आहे. कोंकणस्थ ब्राह्मण, देशस्थ ब्राह्मण, कऱ्हाडे ब्राह्मण, कायस्थ प्रभू, मऱ्हाटे, मारवाडी, गुजराथी, मुसलमान खिश्चन इत्यादि प्रमुख जाती आपापल्या परी आपलें वैशिष्ट्य व महत्त्व कायम राखून महाराष्ट्रांत कोठें एकत्र राहिल्या असतील तर त्या पुण्यांतच राहिल्या आहेत. अपवाद काय तो पारशी आणि लिंगायत यांचा. या दोन जाती पुण्यांत विशेष नाहींत. याचें कारण माझ्या मतें पुणें हें व्यापारी शहर नसून राजकीय शहर आहे हें होय. असो. पुण्याचें स्थल—विषयक मध्यवर्तित्व सांगतांना दुसरीकडे विषय चालला, तो तूर्त आवरला पाहिजे.

**हवापाणी**— आतां हवापाण्याच्या संबंधानें विचार करूं. महाराष्ट्रांतील प्रमुख शहरांची हवापाण्यासंबंधानें तुलना करूं लागल्यास पुण्यासच पहिला नंबर द्यावा लागेल. मुंबईच्या खारट आणि घामट हवेला चांगली म्हणणारा मुंबईच्या बाहेरचा कोणी मनुष्य भेटेल असें मला वाटत नाहीं. महाराष्ट्राच्या पूर्वेकडील भागांतल्या नागपूर, अमरावती वगैरे शहरांची हवा उन्हाळ्यांत अतिशय उष्ण व हिंवाळ्यांत अतिशय थंड म्हणून त्यांचा—म्हणजे वऱ्हाड मध्यप्रांताचा—पुण्यापुढें हवेच्या बाबतींत टिकाव लागत नाहीं. इंग्रजी महाराष्ट्राच्या पूर्वभागांतील धुळें, अहमदनगर, सोलापूर शहरांची हवा पुण्यापेक्षां अधिक उष्ण अतएव शक्ति क्षीण करणारी आहे. सातारा हें छोटें शहर डोंगराच्या फार लगत असल्यामुळें तेथें पाऊस व थंडी मनस्वी असतात. बेळगांव शहराची हवा पुण्यासारखी आहे. पण बेळगांवचें पीणा खराब

म्हणून तें पुण्याची बरोबरी करूं शकत नाहीं. उत्तरेस नाशिक मात्र हवेच्या बाबतींत पुण्याची बरोबरी करतें. हीं दोन्ही शहरें सह्याद्रीपासून चाळीस पन्नास मैल दूर असल्यानें पर्वतावरून येणाऱ्या स्वतंत्र वाऱ्याचा गुण जो तरतरीतपणा त्याचा फायदा लोकांना मिळतो आणि पर्वताच्या सान्निध्याचा अवगुण जो थंडपणा तो बाधत नाहीं. नाशिकनें जरी या बाबतींत पुण्याची बरोबरी केली तरी इतर अनेक गोष्टी पुण्याला अनुकूल असल्यानें पुण्याचा पहिला नंबर महाराष्ट्रांत कायम आहे. पुण्याचें पाणी उत्तम आहे. जसें उत्तम आहे तसें पाण्याचें वैपुल्यहि पुण्यांत आहे. किंबहुना पुण्यांत दिवसानुदिवस फाजील पाणी वाढत आहे असेंहि म्हणतां येईल. ज्या वीस वर्षांपुरती कालमर्यादा मीं या पुस्तकाला आंखून घेतली आहे, त्या वीस वर्षांच्या अवधींत पुणें शहराच्या जमीनींत पाण्याची वाढ होत आहे हें खास. पुण्यांत सदाशिव व शुक्रवार या दोन पेठा उंच भागीं आहेत; अर्थात् या पेठांतील विहिरींचें पाणी खोल असावयास पाहिजे. पण आतां या पेठांतल्या विहिरींना देखील पाणी भरपूर असतें. इतकें पाणी पूर्वीं म्हणजे तीस चाळीस वर्षांमागें नव्हतें असें रावबहादूर काशीनाथ नारायण साने यांचें म्हणणें असून पर्वतीचें तळें बुजविल्यापासून हें पाणी वाढलें असा त्यांचा अभिप्राय आहे. तसेंच याच वीस वर्षांच्या अवधींत पुण्याला मॅंडी नांवाच्या एका इंग्रज इंजिनियरानें ड्रेनेजचा जो कारभार केला तो शास्त्रीय दृष्ट्या चुकीचा केल्यामुळें त्याचेंहि प्रायश्चित्त विनाकारण पुण्याच्या लोकांना भोगावें लागत आहे. म्हणजे या ड्रेनेजच्या चुकीमुळें नदीकांठच्या पेठांतील जमीनींत पाणी मुरतें. ही गोष्ट रा. शंकर रामचंद्र भागवत यांनीं १९१९ सालीं सप्रमाण सिद्ध करून दाखविली होती. कारणें कांहींहि असोत, पुणें शहराखालची जमीन अधिकाधिक ओली होत आहे. साधारणपणें ज्या घरांत ओल नाहीं असें

घर पुण्यांत आढळावयाचें नाहीं असें म्हणण्यास मला हरकत वाटत नाहीं. याच कारणानें अलीकडच्या दहा वर्षांत पुण्यांत मलेरियाचा उर्फ हिंवतापाचा उपद्रव वाढत्या प्रमाणांत आहे. हा उपद्रव यापुढेंहि वाढत जाणार अशीं चिन्हें असून कालांतरानें हा पुण्याची नासाडी करणार असें वाटतें.

पुढें काय होईल तें होवो, अद्याप पुण्याची हवा ठीक आहे. यामुळेंच उन्हाळ्यांत जेव्हां सर्व कोर्टें, कचेऱ्या, शाळा, कालेजें बंद असतात तेव्हां महाराष्ट्राच्या इतर भागांतून पुष्कळ सुखवस्तु लोक पुण्यास येऊन थोडे दिवस तरी रहातात. मुंबईचे श्रीमंत लोक जरी उन्हाळ्यांत महाबळेश्वरास जात असले, तरी वऱ्हाडनागपूरच्या मानानें पुणें हें महाबळेश्वरच होय. तिकडच्या प्रांतांतले, इकडच्या इतर उष्ण प्रदेशांतले आणि खुद्द मुंबईचे देखील सामान्य लोक उन्हाळ्यांत पुण्यास येतात. शिवाय चैत्र वैशाख हे लग्नादि कार्याचे दिवस असल्यानें आणि हीं कार्यें उरकून घेण्याची सोय पुणें शहरासारखी मराठी मुलुखांत इतरत्र कोठेंहि नसल्यानें उन्हाळ्यांत याहि कार्याकरितां बाहेरची मंडळी येथें पुष्कळ येत असते. त्यांतून चतुर पुणेंकरांनीं आपलें ज्ञान पाहुण्यांना देण्याकरितां आणि पाहुण्यांचें ज्ञान आपण घेण्याकरितां दररोज संध्याकाळीं वसंतव्याख्यानमाला चालू ठेवल्यामुळें उन्हाळ्यांत पुण्यास मोठे मजेचे दिवस जातात. लग्नाच्या बाबतींत तर, आज लग्न ठरावें आणि उद्यां लग्न होऊन जेवणावळी व्यवस्थित रीतीनें चालू व्हाव्या ही एक नित्य परिपाठांतली गोष्ट झाली आहे. उन्हाळ्याचे दिवस असून पाणी मुबलक, भाजीपाला विपुल, हवा इतर ठिकाणांच्या मानानें थंड, आचारी पाणके पाहिजेत तितके, आणि भिक्षुकांची कमतरता नाहीं, इत्यादि कारणांनीं पुणें हें लग्नादि कार्यें उरकून घेण्याचें मुख्य ठिकाण बनलें आहे. इंदूरची नवरी व हैद्राबादचा नवरा, खानदेशांतली नवरी

व ग्वाल्हेरकडचा नवरा अशा प्रकारचीं लग्नें—ह्मणजे ज्यांचा पुण्याशीं कांहीं संबंध नाहीं अशीं लग्नें—पुणें शहरांत किती तरी होत असतात. इतकी मंगल कार्यांची झिम्मड चालू असतांहि पुण्यांत या कारणानें धान्य किंवा भाजीपाला नेहमींहून अधिक महाग झाला आहे असा प्रकार मात्र घडत नाहीं, हें लक्षांत ठेवलें पाहिजे. महाग काय होतें? तर टांगेवाले, बँडवाले आणि वाजंत्री. हे लोक मात्र आपले दर मनसोक्त वाढवितात. बाहेरचे पाहुणे शहरांत फार येत असले ह्मणजे नेहमीं कोणाची ना कोणाची तरी गैरसोय ही व्हावयाची; पण त्याचबरोबर असल्या बाहेरच्या कार्यांमुळें जिलब्यांच्या जेवणाची प्राप्ति मधून मधून होत असते ह्मणून पुण्यांतल्या लोकांना या पाहुण्यांच्या त्रासाबद्दल कुरकूर करतां येत नाहीं. फक्त एका गोष्टीबद्दल मात्र या उन्हाळ्याच्या दिवसांत पुण्यांत पुणेंकरांची आणि बाहेरून आलेल्या लोकांची कुरकूर चालू असते. ही कुरकूर ढेकणांबद्दल. पुण्यांत ढेकूण मनस्वी आहेत. उन्हाळ्यांत ते फारच वाढतात. मला वाटतें, पुण्याची हवा ढेकणांना अतिशय मानवते. कारण माझ्या माहितीप्रमाणें पुण्याइतकी ढेकणांची समृद्धि महाराष्ट्रांतल्या दुसऱ्या कोणत्याहि शहरीं नाहीं. ढेकूण हा प्राणी केवळ माणसांचें रक्त खाणारा. अर्थात जेथें माणसांची गर्दी तेथें ढेकणांची समृद्धि असावयास पाहिजे व अर्थात मुंबईसारखें शहर ढेकणांनीं व्यापलें असतें तर त्यांत आश्चर्य नव्हतें. परंतु मुंबईस पुण्याच्या मानानें ढेकणांची संख्या थोडी आहे. तेव्हां मुंबईची हवा त्यांना मानवत नाहीं, पुण्याचीच मानवते असें ह्मणावें लागतें. +

---

+ माझ्या ओळखीचे एक गृहस्थ एके वर्षी ढेकणांमुळें अगदीं काहावले होते. ते आपला दिवाणखाना झाडून स्वच्छ ठेवीत पण त्यांच्या स्वच्छतेला ढेकूण भीक घालीनात. अखेरीस त्यांनीं एक युक्ति योजली. एके दिवशीं रात्रीं ते आपल्या एका स्नेह्याकडे निजण्यास गेले व अशा प्रकारें त्यांनीं त्या दिवशीं

ढेकणांना पुण्याची हवा मानवते ही गोष्ट जरी खरी आहे, तरी त्यांच्या समृद्धीची सर्वच जबाबदारी हवेवर आणि स्वतः ढेकणांवर आहे असें मला वाटत नाहीं. माणसांवरहि जबाबदारी आहे. पुण्यातले लोक महाराष्ट्रांतल्या इतर ठिकाणच्या लोकांपेक्षां सामान्यतः अधिक हुशार आहेत. तथापि त्यांच्या घरांच्या देखाव्यावरून आणि रचनेवरून ते आपली हुशारी या कामीं खर्च करीत नाहींत असें म्हणावें लागतें. कदाचित् गलिच्छपणा त्यांना सोडवत नसेल; कदाचित् घर स्वच्छ ठेवण्याची त्यांना ऐपत नसेल; ऐपत असली तरी घरें स्वच्छ ठेवण्याचे कामीं त्या ऐपतीचा उपयोग करण्याची इच्छा नसेल. काय असेल तें असो; पुण्यांतलीं घरें गलिच्छ आहेत हें खरें. थोड्या जागेंत सामान यथास्थित कोंबलेलें सर्वत्र आढळलेंच पाहिजे. भिंती विटांनीं बांधलेल्या, पण त्यांत चुना मात्र नाहीं, चुना शोभेपुरता बाहेरच्या बाजूस. अर्थात् अशा भिंतींतली माती उकरून उंदरांनीं बिळें केलीं, तर त्याचा दोष उंदरांकडे कां बरें द्यावा? आणि उंदरांच्या समृद्धीमुळें पिसवा झाल्या, व त्या प्लेगाला कारण झाल्या, तर त्यांत आश्चर्य तें काय? १९०१, १९०२, १९०३, १९०४, १९०६, १९०७, १९०८, १९०९, १९११ १९१३, १९१४, १९१५, १९१६, आणि १९१७, या सालीं पुण्यास दोन चार महिने प्लेग ठाणें देत असे. त्यांत १९०६, १९०७ आणि १९१६ या तीन सालीं भयंकर प्राणहानि झाली. वीस वर्षांत

---

ढेकणांस पिसाळविलें; आणि दुसऱ्या दिवशीं रात्रीं आपल्या येथें गाण्याचा बेत ठरवून पांचपन्नास इष्टमित्रांना बोलावून घेतलें. जमलेल्या मंडळीवर ढेकणांनीं आपली मोहीम चालविली हें सांगावयास नकोच. जमलेल्या मंडळींनीं पुष्कळ ढेकूण आपापल्या घरीं नेल्यामुळें पुढें एक आठवडाभर या गृहस्थांना झोंप बरी मिळाली.

चौदा वर्षें प्लेग पुण्यांत आला याबद्दल मला आश्चर्य वाटत नाहीं. पुण्यांत मातीचीं घरें बांधण्याची पद्धत आणि थोड्या जागेंत गर्दी करून राहण्याची पद्धत, प्लेग येण्याला कारण आहेत.

आणखीहि दोन कारणें आहेत. पुणें शहर सपाट नाहीं, उंचीवरून खालीं होत आलेलें आहे व त्यामुळें पावसाळ्यांत पाणी लवकर वाहून जातें, ही गोष्ट जरी बरोबर आहे, तरी पुण्यांतलीं गटारें पाणी नेणारीं नाहींत, पाणी सांचवून घाण वाढविणारींच आहेत, हीहि गोष्ट खरी आहे. यामुळें झिमझिम पाऊस असतांना,—आणि तो तसा असतोच—गटारांतून अनेक ठिकाणीं पाणी व चिखल सांचून रहातो व त्यापासून घाण वाढते, डांस वगैरेंची उत्पत्ति होते, आणि या घाणींतच प्लेगाचें बीज होत असतें. कारण पुण्यांत प्लेग येण्याचा काळ देखील ठरल्यासारखाच आहे. प्लेग यावयाचा असला तर त्याला साधारपणें भाद्रपदांत सुरुवात होते. या गटारांच्या जवळच केर टाकण्याकरितां म्युनिसिपालिटीच्या केरांच्या पेट्या असतात; आणि पेट्यांच्या भोंवतीं भरपूर केर नेहमीं असल्यामुळें आणखी केर टाकावयाचा तो लोक पेट्यांच्या भोंवतींच टाकतात. या केराचीहि घाण वाढविण्याचे कामीं मदत होते.

चवथें कारण हाशी. पुण्यांत दुधाचा खप पुष्कळ वाढत्या प्रमाणावर आहे. ही दुधाची वाढ चहासाठीं. १९०१–१९२० या काळांत पुण्यांत चहापान यथेष्ट वाढलें आहे. १९०१ सालीं पुण्यांत साधारणतः पंचवीस-तीस-चाळीस रुपये दरमहा मिळविरांच्या घरांत चहा शिरलेला नव्हता आणि शहरांत हाटेलांची संख्या थोडी होती. १९२० सालापर्यंत पुण्यांतलीं शेंकडा ९० माणसें चहा पिऊं लागलीं. चहा पिण्याची ऐपत असो वा नसो, प्रत्येकाला चहा पाहिजेच असा प्रकार आतां चालू आहे. श्रीमंतापासून गरीबापर्यंत, बड्या पगारदारापासून स्वयंपाकाच्या बाईपर्यंत प्रत्येक माणसाला चहा हा पाहिजेच. दिवसांतून

एकदां घ्यावयाचा, कीं दोनदां, कीं तीनदां एवढाच प्रश्न. अर्थात त्या मानानें दुधाचा खप वाढला, आणि गांवांतल्या गवळ्यांचे हातून ही मागणी पुरी पडत नाहीं असें पाहून ठिकठिकाणीं म्हशी बाळगून दूध विकण्याचा धंदा बऱ्याच नवीन मंडळींनीं सुरू केला. हा धंदा वाढल्यानें म्हशींची संख्या वाढली; आणि म्हशी बाळगण्यासंबंधानें म्युनिसिपालिटीचे कांहीं नियम नसल्यामुळें व नियम असले तरी त्यांकडे कोणी लक्ष देत नसल्यामुळें म्हशींच्या अनुषंगानें येणारी घाण शहरांत वाढत आहे. ह्यांप्रमाणेंच घोड्यांमुळेंहि घाण वाढत आहे. याची जाणीव मात्र लोकांना नाहीं.

वर घरांच्या गलिच्छपणासंबंधानें लिहिलें. घरांचा हा गलिच्छपणा वीस वर्षांत वाढण्याला आणखी कारण आहे. वीस वर्षांतून चौदा वर्षें जरी पुण्यास प्लेगाचीं गेलीं, तरी पुणें शहराची वस्ती वाढण्याचें थांबलें नाहीं. वस्ती वाढत आहे, शहराची इतर दृष्टीनेंहि वाढ होत आहे. कांहीं ठिकाणचे रस्ते मोठाले करण्याकरितां बाजूचीं घरें पाडण्यांत आलीं. शाळा आणि लहान कारखाने यांनीं जागा अडविल्यामुळें आणि बाहेरगांवांहून येथें येणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या वाढल्यामुळें बाकीच्या घरांतून गर्दी होऊं लागली. १९०१ सालीं पुण्यास घरभाड्याचा दर साधारणपणें ब्राह्मणवस्तींत दरमहा दर खणीं पांचसहा आणे असा होता. तो १९२० सालीं सव्वा दीड रुपया खणापर्यंत चढला आहे. घरें पूर्वींचींच, पण भाड्यांत इतकी वाढ झाली आहे. भाड्याच्या दरांत ज्या मानानें वाढ झाली त्या मानानें घरांच्या संख्येंत वाढ झाली नाहीं. घरांची संख्या फार तर शेंकडा दहा वाढली असेल. १९०१ सालीं "जागा भाड्यानें देणें आहे," अशा अर्थाच्या पाट्या ठिकठिकाणीं दिसत, त्या आतां क्वचित् आढळतात. जागा मिळे-

नाश झाल्यानें घरवाले मस्त झाले आणि "जागा ही आहे अशी आहे, तुम्हांला पाहिजे तर रहा, अमुक भाडें पडेल, तुमच्याकरितां कांहीं आम्हीं वर नवीन बांधीत नाहीं" अशीं उत्तरें देऊं लागले. अर्थात् वीस वर्षांत घरांच्या किंमतीहि विलक्षण वाढल्या. १९०१ सालीं ज्या घराची किंमत एक हजार होती त्याच घराची १९२० सालीं पांचहजार किंमत झालेली आहे. हें प्रमाण बहुतेक घरांना लागू पडेल. कांहीं घरांच्या किंमतीची वाढ तर याहूनहि अधिक प्रमाणांत झालेली आहे. अगदीं आडवस्तीच्या ठिकाणीं प्रमाण कदाचित् थोडेसें कमी पडेल. तथापि किंमती आणि भाड्याचे दर वाढल्यामुळें घरांतून गर्दी वाढली: आणि घाणहि वाढली.

या काळांत शहराच्या बाह्य रचनेसंबंधानें एक विशेष गोष्ट झाली ती येथें सांगितली पाहिजे. १८९८ सालीं रा. रघुनाथ पुरुषोत्तम परांजपे केंब्रिज युनिव्हार्सिटींत सिनियर रँगलर झाले होते ते १९०१ सालीं परत इकडे आले आणि १९०२ च्या प्रारंभापासून फर्ग्यूसन कॉलेजचे प्रिन्सिपाल झाले. त्यांची ही कारकीर्द १९२० पर्यंत चालली व या कारकीर्दींत त्यांनीं फर्ग्यूसन कॉलेज विलक्षण भरभराटीस आणलें. साहजिकपणें कॉलेजाच्या इमारतींत भर पडली. शिवाय सर्वंट्स ऑफ इंडिया सोसायटी, भांडारकर रीसर्च इन्स्टिट्यूट, डेक्कन जिमखाना वगैरे संस्था तिकडच्याच प्रदेशांत स्थापन होऊन वाढीस लागल्या. यामुळें तिकडे वस्ती वाढत जाऊन लकडी पुलापलीकडे एक नवें पुणें निर्माण झालें.

आणखी एक महत्त्वाची गोष्ट म्हणजे पेशव्यांच्या शनिवार वाड्यासंबंधाची. या वाड्याच्या आवारांतील कांहीं जागा खणून पाहिल्यावर खालीं जुन्या वाड्याचा अवशेष चांगल्या स्थितींत आहे असें सरकारास आढळून आलें व नंतर तो जुना वाडा नीट

रीतीनें ठेवण्याचें ठरून काम चालू झालें. वाड्यांत दिवाणी कोर्टाची इमारत होती ती पाडून कोर्ट दुसरीकडे नेण्याचें ठरलें. त्याचप्रमाणें दिल्लीदरवाज्यापासून सरळ उत्तरेकडे एक मोठा रस्ता तयार करून तो नदीवर पूल बांधून नदीपलीकडे न्यावयाचा असाहि सरकारी ठराव होऊन त्याप्रमाणें वाटेंतल्या घरांची पाडा-पाड झाली आणि पुलाचें काम चालू झालें.

या काळांत कांहीं अरुंद रस्ते रुंद झाले म्हणून मागें उल्लेख केला आहे. तरी अद्यापि अरुंद रस्ते बरेच आहेत. शह-रांतल्या बखळी बहुतेक नाहींशा होऊन त्यांचे जागीं इमारती झाल्या. त्यांत दोन मोठ्या भव्य इमारतींचा उल्लेख करणें जरूर आहे. शनिवारवाड्याशेजारचा नाना फडणिसाचा वाडा डेक्कन एज्युकेशन सोसायटीला सरकारनें दिला होता. त्याचा पुढला दिवाणखाना शिल्लक ठेवून बाकीचा वाडा सोसायटीनें पाडला व त्या जागीं तीन मजली भव्य इमारत आपल्या न्यू इंग्लिश स्कूल करितां १९०६।०७ सालीं बांधली. याप्रमाणेंच महाराष्ट्रविद्याप्रसा-रक मंडळानें आनंदाश्रमाशेजारील खाजगीवाल्यांचा वाडा विकत घेऊन तेथें आपल्या इंग्रजी शाळेकरितां व कॉलेजकरितां मोठाल्या इमारती बांधल्या. हें काम १९१५।१६ सालीं झालें. शनिवार-वाड्याचे गणेश दरवाज्यासमोर अंबरखाना नांवाची एक पडकी जागा होती ती म्युनिसिपालिटीनें घेऊन तेथें एक बाग तयार केली. [या जागेंत पूर्वीं शिवाजीचा वाडा होता व तेथें शाहि-स्तेखान येऊन राहिला असतां शिवाजीनें आंत शिरून त्याचीं बोटें कापलीं]. नाना फडणीसाचे वाड्याशेजारीं अंताजी माणकेश्वराचा वाडा होता तो किर्लोस्कर संगीत नाटक मंडळीनें विकत घेऊन तेथें १९०८ सालीं किर्लोस्कर थिएटर बांधलें. १९०५ सालीं

लोकमान्य टिळकांनीं नारायण पेठेंतला गायकवाड सरकारचा वाडा विकत घेऊन तेथें जरूर ती दुरुस्ती व बांधकाम करून आपलें रहाण्याचें ठिकाण आणि केसरी ऑफिस त्या ठिकाणीं नेलें.× तेव्हांपासून सदर वाडा जाहिरसभांना व इतर सार्वजनिक कामांना एक चांगली जागा झाली. याच वर्षी म्हणजे १९०५ सालीं नामदार गोखले यांनीं सर्वंट्स ऑफ इंडिया सोसायटी स्थापली. तिच्याहि मोठाल्या इमारती फर्ग्यूसन कॉलेजाशेजारीं लवकरच बांधण्यांत आल्या.

पुणें शहरांत ट्राम येण्याची बोलवा या काळांत होती, पण त्याप्रमाणें कांहीं झालें नाहीं. १९२० सालीं विजेचे दिवे मात्र कांहीं रस्त्यांना सुरू झाले.

पुणें शहरच्या बाह्य रचनेंतल्या महत्वाच्या गोष्टी सांगितल्या. या वीस वर्षांत बाह्य रचनेंत आणखी म्हणण्यासारखा फरक पडलेला नाहीं. पुणें शहराखेरीज पुणें लष्कर किंवा कँप म्हणून जो पुण्याचा भाग आहे त्याचें वर्णन मी या पुस्तकांत करीत नसल्यामुळें त्याच्या संबंधानें कांहीं लिहीत नाहीं.

---

× लोकमान्य टिळकांना श्रीमंत सयाजीराव गायकवाडांनीं हा वाडा बक्षीस दिला अशी कांहीं अडाणी लोकांची समजूत आहे ती खोटी आहे. इंजिनियरां-कडून सयाजीरावांनीं वाड्याची किंमत करविली ती १७४०० रुपये झाली. त्यांत दोन हजार कमी करून सयाजीरावांनीं १५४०० रुपयांस लोकमान्यांना हा वाडा विकला. टिळक आपल्या थोरपणाला अनुसरून वाड्याला नेहमीं 'गायकवाड वाडा' हेच शब्द योजीत असत.

## भाग २ रा.
## सामाजिक वैशिष्ट्य व चालीरीती.

### ब्राह्मणी शहर.

पुणें शहराचें नांव हिंदुस्थानांतल्या इतर भागांतल्या कोणत्याहि मनुष्यानें ऐकलें कीं पुणें हें पेशव्यांचें शहर ही कल्पना त्याच्या डोळ्यापुढें उभी राहते. 'पुणें' म्हटल्याबरोबर पुण्याचा ब्राह्मण म्हणजे चित्पावन ब्राह्मण त्याच्या डोळ्यापुढें उभा रहातो. याचें कारण एकच; व तें हें कीं, पुणें हें चित्पावन ब्राह्मणांचें शहर होतें व अद्याप आहे. बाळाजी विश्वनाथापासून शंभर वर्षेंपर्यंत या शहरीं चित्पावन ब्राह्मण मराठी राज्याच्या उलाढाली करीत होते आणि हिंदुस्थानांतल्या इतर राज्यांच्याहि उलाढाली सवडीनुसार करीत होते. पेशवे गेल्यानंतर आतांपर्यंत शंभर वर्षें गेलीं. तथापि पेशवे गेले तरी पुण्याच्या चित्पावनांनीं म्हणजे कोकणस्थांनीं मराठी मुलुखावर राजकीयदृष्ट्या अद्याप वर्चस्व चालू ठेवलें आहे यांत शंका नाहीं. राज्य इंग्रजांचें आहे, तथापि इंग्रजी राज्यांत इंग्रजांच्या इंग्लंडांतील पद्धतीनेंच राजकीय चळवळ करून राजकीय सत्ता लोकांच्या हातीं घेण्याच्या चळवळीचें मराठी मुलुखापुरतें अग्रेसरत्व पुण्याच्या चित्पावनांनीं आपणांकडे राखलें आहे. हिंदुस्थानांतल्या इतर भागांत इंग्रज लोक भराभर राज्य आक्रमण करीत चालले होते, तरी जोंपर्यंत पेशव्यांचें राज्य होतें तोंपर्यंत आपण हिंदुस्थानांत कायम राज्य करणार याची खात्री त्यांना वाटत नव्हती; व याकरितां इंग्रजी शिक्षणाचा आणि इंग्रजी सुधारणेचा फैलाव इकडे त्यांनीं सुरू केला नव्हता. यावरून त्यांना पेशव्यांबद्दल काय वाटत होतें हें उघड दिसतें. अजूनहि त्यांना चित्पा-

वन ब्राह्मणाबद्दल विश्वास वाटतो असें म्हणतां येत नाहीं, आणि खरें पाहिल्यास वस्तुस्थितिहि तशीच आहे. पेशव्यांचें राज्य गेल्यानंतर इंग्रजांशीं साहसी मार्गानें भांडण करणारे नानासाहेब पेशवे, वासुदेव बळवंत फडके, चाफेकर बंधु, नाशिकच्या जॅकसनसाहेबांचा खून करणारा कान्हेरे, नाशिकच्या कटाचे सूत्रधार सावरकर कर्वे वगैरे हे सर्व चित्पावनच होते. साहसी कर्मे त्याज्य किंवा अशक्य म्हणून तीं सोडून कायदेशीर मार्गांनीं राजकीय चळवळ करणारां-पैकीं कै. महादेव गोविंद रानडे, कै. बाळ गंगाधर टिळक, नामदार गोखले हीं अग्रगण्य नावें चित्पावनांचींच आहेत. शिक्षण, ग्रंथकर्तृत्व, वर्तमानपत्रांचें संपादकत्व वगैरे बुद्धिमत्तेच्या उलाढालींत सुद्धां चित्पावनच प्रमुख आहेत. फार कशाला? सामाजिक बाबतींत क्रांतिकारक मतांचा फैलाव करणारे प्रो. आगरकर, प्रो. भाटे, डॉ. केतकर वगैरे मंडळी चित्पावनच आहेत्. ज्या वीस वर्षांपुरती कालमर्यादा मीं या पुस्तकाला आंखून घेतली आहे, त्या काळांत पुणें शहरांत राजकीय, सामाजिक, धार्मिक, बौद्धिक अनेक प्रकारच्या उलाढाली मोठ्या प्रमाणांत झाल्या व त्या सर्वांचें पुढारीपण चित्पावनांकडेच होतें. अर्थात् पुणें हें चित्पावनांचें शहर हा सिद्धांत अद्याप कायम आहे. या लोकांच्या अंगीं कांहीं विशिष्ट गुण असल्यानें ही परिस्थिति आणखी पुढें चालू रहाणार असें म्हणतां येतें. निदान हे गुण जोंपर्यंत दुसऱ्या कोणत्या जातींत उत्पन्न झाले नाहींत, आणि जोंपर्यंत चित्पावनांच्या अंगचे नष्ट झाले नाहींत, तोंपर्यंत तरी ही परिस्थिति रहाणार. बुद्धिमत्ता, चिकाटी, स्वार्थत्याग, आपला मुद्दा न सोडतां पण परिस्थितीला अनुसरून वागण्याचें कौशल्य व तयारी आणि स्वाभिमान हे गुण जोंपर्यंत यांच्या अंगीं आहेत तोंपर्यंत हे लोक मराठी समाजाचें

पुढारीपण कायम राखतील. हे गुण उत्तम तर खरेच आणि याच गुणांच्या जोरावर पेशव्यांनीं राज्य मिळविलें आणि चालविलें. पण या गुणांच्या बरोबरच मत्सर, अहंकार, द्वेष, दुष्टपणा आणि भांडणाची हौस हे दुर्गुण कोंकणस्थ ब्राह्मणांचे अंगीं कायमचे असल्यामुळें त्यांनीं राज्य घालविलें. सद्गुण व दुर्गुण यांच्या या अशा संयोगामुळें कोंकणस्थ ब्राह्मणांचे शत्रुहि कोंकणस्थच हा नियम ठरला आहे. इतर जातींमध्यें कोंकणस्थांचे हे दुर्गुण नाहींत. आपल्यांतला मनुष्य दुर्दैवानें संकटांत पडला तर त्याला मदत करणें हें मनुष्य जातीचें कर्तव्य; आपल्या पराक्रमानें आपल्यांतला कोणी मनुष्य मोठा झाला तर आनंद मानणें हें मनुष्याचें साहजिक कर्तव्य. हीं कर्तव्यें करणारे लोक जगांत आहेत; हिंदु समाजांत आहेत; कोंकणस्थांतहि थोडे आहेत; पण सामान्य नियमांप्रमाणें कोंकणस्थांत नाहींत. अपवाद सर्वत्र असावयाचेच व ते वगळले पाहिजेत; पण आपल्यांतला कोणी वर चढूं लागला तर त्याला खालीं ओढणें, कोणीं मोठेपणा मिळविला तर त्याला तुच्छ मानणें, कोणी संकटांत सांपडला तर त्याच्यावर लत्ताप्रहार करून त्याला आणखी संकटांत ढकलणें हे कोंकणस्थांच्या वर्तनाचे,—त्यांतल्या त्यांत पुण्यांत राहणाऱ्या किंवा राहिलेल्या कोंकणस्थांच्या वर्तनाचे— नियम आहेत. अशा वेळीं कोंकणस्थ ब्राह्मण प्रत्यक्ष भावाची ओळख ठेवणार नाहीं, मग दूरच्या नातलगांची किंवा मित्रांची कथा काय? आणखी एक दुर्गुण म्हणजे कृतघ्नपणाचा. पण तो सर्वच हिंदु समाजाचे अंगीं सारखेपणानें असल्यामुळें एकट्या कोंकणस्थांकडेच त्याचा दोष येत नाहीं. तथापि हिंदु समाजांतील इतर लोकांपेक्षां कोंकणस्थ बुद्धीनें तीव्र असल्याकारणानें कोंकणस्थ लोक कृतघ्नपणा करतात तो मोठ्या शिताफीनें करतात. इतर लोक उघडाउघड कृतघ्न असतात. असो. पुणें शहर

हें बकाली वस्तीचें शहर नाहीं, ब्राह्मणांचें शहर आहे व विशेषतः कोंकणस्थ ब्राह्मणांचें शहर आहे ही गोष्ट मीं वर सांगितली व त्यामुळें या कोंकणस्थांच्या अंगच्या गुणदुर्गुणांचें वर्णन करावें लागलें. हें पुस्तक लिहितांना जी गोष्ट जशी आहे तशी सांगणें हें मी माझें काम समजत असल्यामुळें मी कोणाची वृथा स्तुति करीत नाहीं व निंदाहि करीत नाहीं हें वाचकांनीं लक्षांत ठेवावें. मी स्वतःहि कोंकणस्थ ब्राह्मणच आहें हेंहि येथें ओघानें सांगतों.

जगांत शरीरसामर्थ्यापेक्षां बुद्धिसामर्थ्य श्रेष्ठ आहे. या नियमाला अनुसरून मीं हें पुणें ब्राह्मणांचें शहर असें वर लिहिलें. जरी पुणें शहरांत सर्व जातींचे लोक आहेत, तरी पुणें शहरांतल्या ब्राह्मणांकडे सर्व जातींचें पुढारीपण असल्यामुळें मीं वर अशी शब्दयोजना केली. म्हणजे याचा अर्थ कोणीं असा समजूं नये कीं, पुण्यांत इतर जातींना कांहीं महत्त्व नाहीं. सर्वांना आपापल्यापरी महत्त्व आहे. सर्व जाती आपापलें वैशिष्ट्य कायम राखून पुण्यांत राहिल्या आहेत असें तर मीं आरंभींच लिहिलें आहे. परंतु पुढारीपण घेण्याला जो स्वार्थत्याग लागतो तो इतर जातींत नसल्यामुळें त्या जाती पुढारीपण घेऊं शकत नाहींत. अधिक पैसे मिळविण्याची योग्यता असतांहि थोड्या पैशांत जन्मभर कष्ट करणारे पुण्यांतल्या शिक्षणसंस्थांचे सभासद आणि वर्तमानपत्रादि उद्योगांत असलेले सार्वजनिक लोक हेच पुढारीपण घेऊं शकतात व चालवूं शकतात. अर्थात् हीं कामें करणारे इतर जातींतले लोक देखील पुढारीच होत व कांहीं तसे आहेत. वरील गुण पुण्याच्या बाहेर प्रदेशीं अल्पांशानें असल्यामुळें सर्व मराठी मुलुखाचें पुढारीपण पुण्याकडे आलें आहे. वीस वर्षें ही परिस्थिति कायम होती व पुढेंहि रहाण्याचा संभव आहे.

बुद्धिसामर्थ्यानें जशी ब्राह्मणजात तशी शरीरसामर्थ्यानें मऱ्हाटे जात प्रसिद्ध आहे. ही जात पुणें शहरांत ब्राह्मणांच्या खालोखाल महत्वाची आहे. ब्राह्मणांची बुद्धि आणि मऱ्हाट्यांची शक्ति यांच्या आधारावर पेशवाईच्या काळांत मराठी साम्राज्याचा विस्तार झाला. पण या जातींतहि भांडखोरपणा हा गुण विलक्षण रीतीनें बद्धमूल झालेला असल्यानें यांच्या शक्तीचा भांडणाचे पायीं चुराडा झाला. माझ्या मतें मऱ्हाटे हे अस्सल क्षत्रिय आहेत. कौरव पांडवांचे आणि यादवांचे स्वजातीय आणि वंशज ते हेच. जसे कौरव पांडव एकमेकांत भांडले, किंवा जसे यादव एकमेकांत भांडले, आणि भांडणांत सर्वांचा निःपात झाला, तशीच स्थिति गेल्या शतकांत दीड शतकांत मऱ्हाट्यांची झाली. आज मित्तीला देखील एकाचें तोंड पूर्वेला तर एकाचें पश्चिमेला अशी स्थिति आहे. ब्राह्मणांत व मऱ्हाट्यांत भांडखोरपणासंबंधानें फरक एवढाच कीं, ब्राह्मण हे जितके दीर्घद्वेषी असतात तितके दीर्घद्वेषी मऱ्हाटे नसतात. मऱ्हाट्यांत दारूचें व्यसन वाढलेलें आहे या कारणानें, आणि द्रव्याचा संचय करण्याची संवय नाहीं या कारणानें मऱ्हाट्यांची जात वर येत नाहीं. लढवय्येपणाची हौस हा यांचा पिढीजात गुण. १९१४ सालापासून १९१८ सालापर्यंत चाललेल्या युरोपीय महायुद्धांत देखील मऱ्हाट्यांचा हा गुण कायम असल्याचें सरकारी रिपोर्टांत नमूद आहे. अलीकडे क्षत्रियत्व सोडून आपल्या जातींतल्या कांहींनीं आपल्यापुरतें भिक्षुक बनावें अशी हौस कांहीं मऱ्हाट्यांना उत्पन्न झाली आहे.

पुणें हें मुख्यतः ब्राह्मणी शहर आहे असें मागें सांगितलें. याचें मुख्य कारण पुणें हें शंभर वर्षें पेशव्यांचें राजधानीचें शहर होतें हें तर खरेंच; पण याहून अधिक महत्वाचें कारण, पेशव्यांचें राज्य इंग्रजांनीं खालसा केलें हें होय. राज्य खालसा झाल्यामुळें ब्राह्म-

णांचा व विशेषतः कोंकणस्थ ब्राह्मणांचा आधार तुटला आणि कांहीं वर्षें ते किंकर्तव्यमूढ झाले. परंतु थोड्या वर्षांनंतर त्यांच्या अंगचे गुण पुनः जोरांत येऊन त्यांनीं आपलें मराठी समाजावरील वर्चस्व पुनः कायम केलें. पेशव्यांचें राज्य खालसा करणें ही इंग्रजांच्या दृष्टीनें मोठी चूक झाली; अर्थातच ब्राह्मणांच्या दृष्टीनें मोठी फायद्याची गोष्ट झाली; १८१८ सालीं बाजीराव शरण आल्यावर त्याला पुणें शहरांत परत आणून त्याचें बाकीचें राज्य खालसा करून पुणें जिल्ह्यापुरतें एक संस्थान त्याजकडे व त्याच्या वंशजांकडे ठेवलें असतें, तर या वेळेपर्यंत पुण्याचे ब्राह्मण इंग्रजी राज्यांत राजकीय चळवळींत पुढें आले नसते. पुणें शहराचें सर्व महत्व नाहींसें झालें असतें; आणि एकंदरींत पुण्याच्या ब्राह्मणांवर सरकारचा कटाक्ष होण्याचें कांहीं कारण निघालें नसतें. म्हणजे मग पुण्यांत ब्राह्मणी राज्यांत "यन्तु न देवो वर्षन्तु पर्जन्याः" वगैरे मंत्र म्हणत भोजनें झोडण्यांत आणि पेशवे सरकाराच्या वाड्यांत नटून थटून सिंहासनावर बसलेल्या एका बाहुल्याचें दरबारी वैभव पहाण्यांतच ब्राह्मणांच्या कर्तृत्वाचा व्यय झाला असता. अर्थात् अशा परिस्थितींत ब्राह्मणांचा राजकीय, सामाजिक व बौद्धिक अधःपात झाला असता. सारांश, बाजीरावाला पेनशन देऊन ब्रह्मावर्ताला पाठविलें हा इंग्रजांचा आमच्यावर मोठा उपकार आहे. बरेच ब्राह्मण या माझ्या विचारांबद्दल माझ्यावर रागावतील हें मी जाणून आहें. पण कोण रागावणार आहेत व कोण लोभावणार आहेत इकडे लक्ष देऊन हें पुस्तक मी लिहीत नाहीं.×

× माझे वरील विचार सर्वांना पटणार नाहींत याचा एक प्रत्यक्ष पुरावा–पेशव्यांचें राज्य इंग्रजांनीं घेतल्यानंतर त्यांनीं जुन्या राज्यक्रांतींच्या प्रसंगांना अनुसरून पेशव्यांचे सरदार, जहागीरदार, इनामदार वगैरे दरबारी माणसांनाच

पुणें हें ब्राह्मणी शहर आहे हे शब्द दुसऱ्या तऱ्हेनें बोलावयाचे असल्यास ह्मणावें कीं, पुणें हें शाळा, कालेजें, वर्तमानपत्रें, छापखाने, सभा, व्याख्यानें यांचें शहर आहे. लोकवस्तीच्या मानानें पुण्याइतक्या शाळा, पुण्याइतकीं वर्तमानपत्रें, पुण्याइतके छापखाने, आणि पुण्याइतकीं लेक्चरें महाराष्ट्रांत दुसऱ्या कोणत्याहि शहरीं आढळणार नाहींत. १९०१ ते १९२० च्या दरम्यान या बाबी पुण्यास अतिशय वाढल्या आणि पुढेंहि या वाढण्याचाच रंग दिसत आहे. यांची तपशीलवार माहिती पुढील भागांतून येणार असल्यामुळें येथें संक्षेपानें उल्लेख करतों. हे धंदे पुण्यास जोरानें चालतात. अर्थात पुण्यास पर ठिकाणाहून येणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या मोठी आहे. पुणें शहरांतल्या छापखान्यांतून पुष्कळ पुस्तकें बाहेर पडतात, आणि पुण्यांतलीं वर्तमानपत्रें सर्व महाराष्ट्रभर खपतात, या गोष्टी वेगळ्या सांगण्यास नकोत. या कारणांनीं बाहेर प्रदेशांतून पुण्यास पैसा येत असतो व बाहेरचे अनेक लोक अनेक कारणांनीं पुण्यांत वारंवार येत जात

---

हातांशीं धरून राज्यकारभार चालवावयास पाहिजे होता, त्याऐवजीं इंग्रजांनीं इंग्रजी भाषा शिकणाऱ्या 'मधुकरी वर्गाला' नोकऱ्या दिल्या आणि या जुन्या खानदानी घराण्यांस मागें टाकल्यामुळें राज्यकारभाराचा जम बसला नाहीं, अशीं मतें प्रतिपादन करणारे, आणि खानदानी घराण्यांना प्रोत्साहनपर व 'मधुकरी वर्गाची' हेलना करणारे विचार महाराष्ट्रांतल्या प्रमुख केसरी पत्रांत मागें वरचेवर येत असत. 'मधुकरी वर्ग' हा निंदास्पद शब्दप्रयोग कोणाला? तर जे गरीब पण बुद्धिमान् लोक इंग्रजी विद्या शिकून इंग्रजी राज्यांत हुद्द्याच्या जागा मिळवून राज्यकारभार चालवूं लागले त्यांना! हें विचार मला पसंत नाहींत, पण हे विचार चुकीचे असल्याबद्दल कोठें चर्चा झाल्याचेंहि माझ्या पहाण्यांत नाहीं. मात्र हे विचार केसरींत येत असले तरी ते लोकमान्य टिळकांच्या लेखणींतून येत नसत हें मी सांगूं शकतों. हे विचार बहुधा रा. खाडिलकरांचे असावे.

असतात. पुण्याची लोकसंख्या सव्वा लक्षावर आहे; परंतु त्या प्रमाणानें पुणें शहरांत वरचेवर येणाऱ्या जाणाऱ्या लोकांची संख्या इतर सर्व शहरांतल्या ( मोठालीं क्षेत्रें वगळलीं असतां ) अशा संख्येच्या मानानें अधिक आहे. केवळ लोकमान्य टिळक ही एक व्यक्ति पुण्यांत हजारों लोकांना आकर्षण करून आणीत होती. पुण्यांत कायम वस्ती करून राहिलेल्या लोकांना देशाटन केल्याचें अनायासें श्रेय मिळतें. स्वतःच्या शहरामध्यें अनेक बुद्धिमान् लोक, त्यांच्या नानाप्रकारच्या उलाढाली, दररोज नानाप्रकारच्या ठिकाणांहून येणारे नानाप्रकारचे लोक आणि इतक्यांच्या सहवासाचा अनुभव घेण्यास जरूर जो वेळ तो मुबलक, अशा परिस्थितींत पुण्याचे लोक पक्के व्यवहारचतुर व्हावे यांत नवल तें कोणतें? मुंबईत पैसा मिळविण्याला जितके श्रम करावे लागतात तितके पुण्यांत करावे लागत नाहींत, व मुंबईत जितक्या पैशांची जरूर तितक्या पैशांची पुण्यास जरूरहि लागत नाहीं. म्हणून पुण्यांतल्या लोकांना रिकामपण अधिक सांपडतें व रिकामपणाच्या उठाठेवी त्यांना सुचतात. अर्थात पुण्यांत मनुष्याला व्यवहाराचें चातुर्य येतें, स्वभावतः साधा भोळा असतो तो पक्का बनतो, बुद्धि तीव्र होते, आपल्या मनांत जें असेल तें बाहेर न दाखविण्याची शैली त्याला येते, वायफळ बडबड करून आपलें काम कसें साधावें याची हातोटी त्याला येते. पुण्यामध्यें जो मुरला तो इतरत्र कोठेंहि फसणार नाहीं. याकरितां ज्याला म्हणून व्यवहारांत चतुर व्हावयाचें असेल त्यानें पुणें शहरांत येऊन वर्षभर तरी रहावें व त्या अवधींत सर्वकाळ पुण्याचें निरीक्षण करावें.

## लोकांची रहाणी.

पुणें शहराचें ज्यानें केवळ नांवच ऐकलें आहे पण हें शहर प्रत्यक्ष पाहिलें नाहीं, अशा मनुष्याची पुण्यांत आल्याबरोबर शह-

राच्या बाह्य देखाव्यानें निराशा होते. हें कसलें शहर ! हें एक खेडेंच आहे असें त्याला वाटतें. आठचार दिवस पुण्यांतल्या लोकांशीं बोलणें चालणें झाल्यावर त्याची समजूत पालटते ही गोष्ट वेगळी. पण पुण्यांत मोठाल्या इमारती नाहींत, विजेचे दिवे नाहींत इत्यादि गोष्टींनीं हें गांव अर्धवट खेडें अर्धवट शहर असें भासतें. गेल्या वीस वर्षांत ही परिस्थिति पालटत आहे. मोटारींचा सुळसुळाट पांचचार वर्षांत पुष्कळ झाला आणि १९२० सालीं विजेचे दिवे कांहीं रस्त्यांना सुरू झाले. पण रस्ते मोठाले करण्याचें म्युनिसिपालिटीचें काम पहिल्या पांच सात वर्षांत संपून दारिद्र्यामुळें बंद पडलें. लोकांची प्रवृत्ति आपलीं घरें स्वच्छ व नीटनेटकीं ठेवण्याकडे नाहीं, नवीन घरें देखील गचाळपणानेंच बांधलीं जात आहेत. मजबूत घरें बांधण्यास आणि तीं स्वच्छ ठेवण्यास जरूर तो पैसा लोकांचे जवळ नाहीं असें नव्हे, तर घरेंदारें नीटनेटकीं करण्यांत पैशाचा अपव्यय होतो अशी त्यांची समजूत दिसते. ऐपत असून थोड्या जागेंत गर्दी करून रहाणें येथील लोकांच्या अंगवळणीं पडलेलें आहे. आपण श्रीमंत आहों असें आपल्या घरावरून कोणाला वाटतां कामा नये अशीहि त्यांची समजूत असावी. अनेक कारणांनीं पुण्यांतल्या घरवाल्यांना अनायासें भाडेकरी पुष्कळ मिळूं लागल्याकारणानें भाडेकऱ्यांच्या जागा स्वच्छ करणें किंवा राखणें हीं आपलीं कामें नव्हेत असें घरवाले समजतात. उघडच आहे, गचाळ जागेला सुद्धां जर त्यांना भाडेकरी मिळतात, तर त्यांनीं त्यांच्याकरितां जागा स्वच्छ कां करावी ? पण यावरून घरवाल्यांच्या आणि बिऱ्हाडकरांच्या दोघांच्याहि रहाणीची कल्पना सहज होते. घर स्वच्छ ठेवावें, आणि आपल्या काय किंवा बिऱ्हाडकरांच्या काय, जागेमध्यें गर्दी होऊं

देऊं नये ही गोष्ट त्यांच्या डोक्यांत शिरत नाहीं. मुंबईत पुण्याहून अधिक गर्दी आहे, पण त्या गर्दीला अनुसरून मुंबईतील घरें पुण्यांतल्या घरांपेक्षां अनेक पटींनीं मजबूत आणि स्वच्छ बांधलेलीं असतात. पुण्यांतल्या घरवाल्यांना कांहीं बांधण्यास नको, रहाणारांची सोय करून देण्यास नको, दुरुस्ती करण्यास नको, मजबुती नको, स्वच्छता नको, बिन्हाडांतून हव्या तितक्या माणसांची गर्दी झाली तरी चालेल; गायी, म्हशी, घोडीं यांची घाण चालेल; कोणीकडून भाडें उकळतां आलें म्हणजे झालें. रेलवेसंबंधाच्या ज्या तक्रारी वर्तमानपत्रांतून येतात त्या तक्रारी पुण्यांतल्या घरवाल्यांसंबंधानें करतां येतील, पण त्या कोणी करीत नाहीं इतकेंच. पण यावरून घरवाले आणि बिन्हाडकरू या दोघांहि पुणेकरांच्या स्वभावाची व रहाणीची कल्पना होते. गचाळ जागेंत जें रहातात त्यांच्या घरांतहि गचाळपणाच दिसावा हें ओघानें प्राप्त होतें, व वस्तुस्थितीहि तशीच आहे. पुण्यांतल्या लोकांची रहाणी टापटिपीची व स्वच्छतेची आहे असें मीं एका लहान मुलांकरितां लिहिलेल्या पुस्तकांत वाचलें तेव्हां मला आश्चर्य वाटलें. आतां घरांतल्या रहाणीचा विचार सोडून शरीराच्या बाह्य देखाव्याकडे पाहिलें तर मात्र ही गोष्ट कांहीं अंशीं खरी म्हणतां येईल. रस्त्यांतून जातांना पुण्यांतल्या माणसांचा ड्रेस पाहिला तर तो साधारणपणें टापटिपीचा, छानछोकीचा व ऐटबाज दिसतो. क्वचित् प्रसंगीं नखरेबाजहि दिसतो. उलट कांहीं माणसांचा साधा पण स्वच्छ तर कांहींचा घाणेरडाहि दिसतो. पण एकंदरींत लत्त्याकपड्याकडे या वीस वर्षांच्या काळांत पुण्यांतल्या लोकांचें लक्ष अधिकाधिक वाढत चाललें आहे, तरुणांची प्रवृत्ति छानछोकीकडे होत आहे. पुण्यांतल्या पांढरपेशा माणसांच्या पोषाखाची पद्धत साधारणतः अशी—नेसण्यास धोतर, अंगांत सदरा

राच्या बाह्य देखाव्यानें निराशा होते. हें कसलें शहर! हें एक खेडेंच आहे असें त्याला वाटतें. आठचार दिवस पुण्यांतल्या लोकांशीं बोलणें चालणें झाल्यावर त्याची समजूत पालटते ही गोष्ट वेगळी. पण पुण्यांत मोठाल्या इमारती नाहींत, विजेचे दिवे नाहींत इत्यादि गोष्टींनीं हें गांव अर्धवट खेडें अर्धवट शहर असें भासतें. गेल्या वीस वर्षांत ही परिस्थिति पालटत आहे. मोटारींचा सुळसुळाट पांचचार वर्षांत पुष्कळ झाला आणि १९२० सालीं विजेचे दिवे कांहीं रस्त्यांना सुरू झाले. पण रस्ते मोठाले करण्याचें म्युनिसिपालिटीचें काम पहिल्या पांच सात वर्षांत संपून दारिद्र्यामुळें बंद पडलें. लोकांची प्रवृत्ति आपलीं घरें स्वच्छ व नीटनेटकीं ठेवण्याकडे नाहीं, नवीन घरें देखील गचाळपणानेंच बांधलीं जात आहेत. मजबूत घरें बांधण्यास आणि तीं स्वच्छ ठेवण्यास जरूर तो पैसा लोकांचे जवळ नाहीं असें नव्हे, तर घरेंदारें नीटनेटकीं करण्यांत पैशाचा अपव्यय होतो अशी त्यांची समजूत दिसते. ऐपत असून थोड्या जागेंत गर्दी करून रहाणें येथील लोकांच्या अंगवळणीं पडलेलें आहे. आपण श्रीमंत आहों असें आपल्या घरावरून कोणाला वाटतां कामा नये अशीहि त्यांची समजूत असावी. अनेक कारणांनीं पुण्यांतल्या घरवाल्यांना अनायासें भाडेकरी पुष्कळ मिळूं लागल्याकारणानें भाडेकऱ्यांच्या जागा स्वच्छ करणें किंवा राखणें हीं आपलीं कामें नव्हेत असें घरवाले समजतात. उघडच आहे, गचाळ जागेला सुद्धां जर त्यांना भाडेकरी मिळतात, तर त्यांनीं त्यांच्याकरितां जागा स्वच्छ कां करावी? पण यावरून घरवाल्यांच्या आणि बिऱ्हाडकरांच्या दोघांच्याहि रहाणीची कल्पना सहज होते. घर स्वच्छ ठेवावें, आणि आपल्या काय किंवा बिऱ्हाडकरांच्या काय, जागेमध्यें गर्दी होऊं

देऊं नये ही गोष्ट त्यांच्या डोक्यांत शिरत नाहीं. मुंबईत पुण्याहून अधिक गर्दी आहे, पण त्या गर्दीला अनुसरून मुंबईतील घरें पुण्यांतल्या घरांपेक्षां अनेक पटींनीं मजबूत आणि स्वच्छ बांधलेलीं असतात. पुण्यांतल्या घरवाल्यांना कांहीं बांधण्यास नको, रहाणारांची सोय करून देण्यास नको, दुरुस्ती करण्यास नको, मजबुती नको, स्वच्छता नको, बिऱ्हाडांतून हव्या तितक्या माणसांची गर्दी झाली तरी चालेल; गायी, म्हशी, घोडीं यांची घाण चालेल; कोणीकडून भाडें उकळतां आलें म्हणजे झालें. रेल्वेसंबंधाच्या ज्या तक्रारी वर्तमानपत्रांतून येतात त्या तक्रारी पुण्यांतल्या घरवाल्यांसंबंधानें करतां येतील, पण त्या कोणी करीत नाहीं इतकेंच. पण यावरून घरवाले आणि बिऱ्हाडकरू या दोघांहि पुणेकरांच्या स्वभावाची व रहाणीची कल्पना होते. गचाळ जागेंत जे रहातात त्यांच्या घरांतहि गचाळपणाच दिसावा हें ओघानें प्राप्त होतें, व वस्तुस्थितीहि तशीच आहे. पुण्यांतल्या लोकांची रहाणी टापटिपीची व स्वच्छतेची आहे असें मीं एका लहान मुलांकरितां लिहिलेल्या पुस्तकांत वाचलें तेव्हां मला आश्चर्य वाटलें. आतां घरांतल्या रहाणीचा विचार सोडून शरीराच्या बाह्य देखाव्याकडे पाहिलें तर मात्र ही गोष्ट कांहीं अंशीं खरी म्हणतां येईल. रस्त्यांतून जातांना पुण्यांतल्या माणसांचा ड्रेस पाहिला तर तो साधारणपणें टापटिपीचा, छानछोकीचा व ऐटबाज दिसतो. क्वचित् प्रसंगीं नखरेबाजहि दिसतो. उलट कांहीं माणसांचा साधा पण स्वच्छ तर कांहींचा घाणेरडाहि दिसतो. पण एकंदरींत लत्त्याकपड्याकडे या वीस वर्षांच्या काळांत पुण्यांतल्या लोकांचें लक्ष अधिकाधिक वाढत चाललें आहे, तरुणांची प्रवृत्ति छानछोकीकडे होत आहे. पुण्यांतल्या पांढरपेशा माणसांच्या पोषाखाची पद्धत साधारणतः अशी—नेसण्यास धोतर, अंगांत सदरा

राच्या बाह्य देखाव्यानें निराशा होते. हें कसलें शहर! हें एक खेडेंच आहे असें त्याला वाटतें. आठचार दिवस पुण्यांतल्या लोकांशीं बोलणें चालणें झाल्यावर त्याची समजूत पालटते ही गोष्ट वेगळी. पण पुण्यांत मोठाल्या इमारती नाहींत, विजेचे दिवे नाहींत इत्यादि गोष्टींनीं हें गांव अर्धवट खेडें अर्धवट शहर असें भासतें. गेल्या वीस वर्षांत ही परिस्थिति पालटत आहे. मोटारींचा सुळसुळाट पांचचार वर्षांत पुष्कळ झाला आणि १९२० सालीं विजेचे दिवे कांहीं रस्त्यांना सुरू झाले. पण रस्ते मोठाले करण्याचें म्युनिसिपालिटीचें काम पहिल्या पांच सात वर्षांत संपून दारिद्र्यामुळें बंद पडलें. लोकांची प्रवृत्ति आपलीं घरें स्वच्छ व नीटनेटकीं ठेवण्याकडे नाहीं, नवीन घरें देखील गचाळपणानेंच बांधलीं जात आहेत. मजबूत घरें बांधण्यास आणि तीं स्वच्छ ठेवण्यास जरूर तो पैसा लोकांचे जवळ नाहीं असें नव्हे, तर घरेंदारें नीटनेटकीं करण्यांत पैशाचा अपव्यय होतो अशी त्यांची समजूत दिसते. ऐपत असून थोड्या जागेंत गर्दी करून रहाणें येथील लोकांच्या अंगवळणीं पडलेलें आहे. आपण श्रीमंत आहों असें आपल्या घरावरून कोणाला वाटतां कामा नये अशीहि त्यांची समजूत असावी. अनेक कारणांनीं पुण्यांतल्या घरवाल्यांना अनायासें भाडेकरी पुष्कळ मिळूं लागल्याकारणानें भाडेकऱ्यांच्या जागा स्वच्छ करणें किंवा राखणें हीं आपलीं कामें नव्हेत असें घरवाले समजतात. उघडच आहे, गचाळ जागेला सुद्धां जर त्यांना भाडेकरी मिळतात, तर त्यांनीं त्यांच्याकरितां जागा स्वच्छ कां करावी? पण यावरून घरवाल्यांच्या आणि बिऱ्हाडकरांच्या दोघांच्याहि रहाणीची कल्पना सहज होते. घर स्वच्छ ठेवावें, आणि आपल्या काय किंवा बिऱ्हाडकरांच्या काय, जागेमध्यें गर्दी होऊं

देऊं नये ही गोष्ट त्यांच्या डोक्यांत शिरत नाहीं. मुंबईत पुण्याहून अधिक गर्दी आहे, पण त्या गर्दीला अनुसरून मुंबईतील घरें पुण्यांतल्या घरांपेक्षां अनेक पटींनीं मजबूत आणि स्वच्छ बांधलेलीं असतात. पुण्यांतल्या घरवाल्यांना कांहीं बांधण्यास नको, रहाणारांची सोय करून देण्यास नको, दुरुस्ती करण्यास नको, मजबुती नको, स्वच्छता नको, बिऱ्हाडांतून हव्या तितक्या माणसांची गर्दी झाली तरी चालेल; गायी, म्हशी, घोडी यांची घाण चालेल; कोणीकडून भाडें उकळतां आलें म्हणजे झालें. रेलवेसंबधाच्या ज्या तक्रारी वर्तमानपत्रांतून येतात त्या तक्रारी पुण्यांतल्या घरवाल्यांसंबंधानें करतां येतील, पण त्या कोणी करीत नाहीं इतकेंच. पण यावरून घरवाले आणि बिऱ्हाडकरू या दोघांहि पुणेंकरांच्या स्वभावाची व रहाणीची कल्पना होते. गचाळ जागेंत जे रहातात त्यांच्या घरांतहि गचाळपणाच दिसावा हें ओघानें प्राप्त होतें, व वस्तुस्थितीहि तशीच आहे. पुण्यांतल्या लोकांची रहाणी टापटिपीची व स्वच्छतेची आहे असें मीं एका लहान मुलांकरितां लिहिलेल्या पुस्तकांत वाचलें तेव्हां मला आश्चर्य वाटलें. आतां घरांतल्या रहाणीचा विचार सोडून शरीराच्या बाह्य देखाव्याकडे पाहिलें तर मात्र ही गोष्ट कांहीं अंशीं खरी म्हणतां येईल. रस्त्यांतून जातांना पुण्यांतल्या माणसांचा ड्रेस पाहिला तर तो साधारणपणें टापटिपीचा, छानछोकीचा व ऐटबाज दिसतो. क्वचित् प्रसंगीं नखरेबाजहि दिसतो. उलट कांहीं माणसांचा साधा पण स्वच्छ तर कांहींचा घाणेरडाहि दिसतो. पण एकंदरींत लत्त्याकपड्याकडे या वीस वर्षांच्या काळांत पुण्यांतल्या लोकांचें लक्ष अधिकाधिक वाढत चाललें आहे, तरुणांची प्रवृत्ति छानछोकीकडे होत आहे. पुण्यांतल्या पांढरपेशा माणसांच्या पोषाखाची पद्धत साधारणतः अशी—नेसण्यास धोतर, अंगांत सदरा

राच्या बाह्य देखाव्यानें निराशा होते. हें कसलें शहर! हें एक खेडेंच आहे असें त्याला वाटतें. आठचार दिवस पुण्यांतल्या लोकांशीं बोलणें चालणें झाल्यावर त्याची समजूत पालटते ही गोष्ट वेगळी. पण पुण्यांत मोठाल्या इमारती नाहींत, विजेचे दिवे नाहींत इत्यादि गोष्टींनीं हें गांव अर्धवट खेडें अर्धवट शहर असें भासतें. गेल्या वीस वर्षांत ही परिस्थिति पालटत आहे. मोटारींचा सुळसुळाट पांचचार वर्षांत पुष्कळ झाला आणि १९२० सालीं विजेचे दिवे कांहीं रस्त्यांना सुरू झाले. पण रस्ते मोठाले करण्याचें म्युनिसिपालिटीचें काम पहिल्या पांच सात वर्षांत संपून दारिद्र्यामुळें बंद पडलें. लोकांची प्रवृत्ति आपलीं घरें स्वच्छ व नीटनेटकीं ठेवण्याकडे नाहीं, नवीन घरें देखील गचाळपणानेंच बांधलीं जात आहेत. मजबूत घरें बांधण्यास आणि तीं स्वच्छ ठेवण्यास जरूर तो पैसा लोकांचे जवळ नाहीं असें नव्हे, तर घरेंदारें नीटनेटकीं करण्यांत पैशाचा अपव्यय होतो अशी त्यांची समजूत दिसते. ऐपत असून थोड्या जागेंत गर्दी करून रहाणें येथील लोकांच्या अंगवळणीं पडलेलें आहे. आपण श्रीमंत आहों असें आपल्या घरावरून कोणाला वाटतां कामा नये अशीहि त्यांची समजूत असावी. अनेक कारणांनीं पुण्यांतल्या घरवाल्यांना अनायासें भाडेकरी पुष्कळ मिळूं लागल्याकारणानें भाडेकऱ्यांच्या जागा स्वच्छ करणें किंवा राखणें हीं आपलीं कामें नव्हेत असें घरवाले समजतात. उघडच आहे, गचाळ जागेला सुद्धां जर त्यांना भाडेकरी मिळतात, तर त्यांनीं त्यांच्याकरितां जागा स्वच्छ कां करावी? पण यावरून घरवाल्यांच्या आणि बिऱ्हाडकरांच्या दोघांच्याहि रहाणीची कल्पना सहज होते. घर स्वच्छ ठेवावें, आणि आपल्या काय किंवा बिऱ्हाडकरांच्या काय, जागेमध्यें गर्दी होऊं

देऊं नये ही गोष्ट त्यांच्या डोक्यांत शिरत नाहीं. मुंबईत पुण्याहून अधिक गर्दी आहे, पण त्या गर्दीला अनुसरून मुंबईतील घरें पुण्यांतल्या घरांपेक्षां अनेक पटींनीं मजबूत आणि स्वच्छ बांधलेलीं असतात. पुण्यांतल्या घरवाल्यांना कांहीं बांधण्यास नको, रहाणारांची सोय करून देण्यास नको, दुरुस्ती करण्यास नको, मजबुती नको, स्वच्छता नको, बिन्हाडांतून हव्या तितक्या माणसांची गर्दी झाली तरी चालेल; गायी, म्हशी, घोडीं यांची घाण चालेल; कोणीकडून भाडें उकळतां आलें म्हणजे झालें. रेलवेसंबंधाच्या ज्या तक्रारी वर्तमानपत्रांतून येतात त्या तक्रारी पुण्यांतल्या घरवाल्यांसंबंधानें करतां येतील, पण त्या कोणी करीत नाहीं इतकेंच. पण यावरून घरवाले आणि बिन्हाडकरू या दोघांहि पुणेंकरांच्या स्वभावाची व रहाणीची कल्पना होते. गचाळ जागेंत जे रहातात त्यांच्या घरांतहि गचाळपणाच दिसावा हें ओघानें प्राप्त होतें, व वस्तुस्थितीहि तशीच आहे. पुण्यांतल्या लोकांची रहाणी टापटिपीची व स्वच्छतेची आहे असें मीं एका लहान मुलांकरितां लिहिलेल्या पुस्तकांत वाचलें तेव्हां मला आश्चर्य वाटलें. आतां घरांतल्या रहाणीचा विचार सोडून शरीराच्या बाह्य देखाव्याकडे पाहिलें तर मात्र ही गोष्ट कांहीं अंशीं खरी म्हणतां येईल. रस्त्यांतून जातांना पुण्यांतल्या माणसांचा ड्रेस पाहिला तर तो साधारणपणें टापटिपीचा, छानछोकीचा व ऐटबाज दिसतो. क्वचित् प्रसंगीं नखरेबाजहि दिसतो. उलट कांहीं माणसांचा साधा पण स्वच्छ तर कांहींचा घाणेरडाहि दिसतो. पण एकंदरींत लत्याकपड्याकडे या वीस वर्षांच्या काळांत पुण्यांतल्या लोकांचें लक्ष अधिकाधिक वाढत चाललें आहे, तरुणांची प्रवृत्ति छानछोकीकडे होत आहे. पुण्यांतल्या पांढरपेशा माणसांच्या पोषाखाची पद्धत साधारणतः अशी—नेसण्यास धोतर, अंगांत सदरा

किंवा शर्ट आणि त्यावर कोट; त्यावर उपरणें; डोक्यावर रुमाल किंवा पगडी; आणि पायांत जोडा. कोणी उपरणें कधींच घेत नाहींत. कोणी पायांत कधीं जोडा कधीं बूट घालतात. यामध्येंहि आणखी अनेक तऱ्हा आहेत हें सांगण्यास नकोच. धोतरांऐवजीं विजारींची संख्या थोड्या अंशानें वाढत आहे. साधारणपणें कालेजांतले प्रोफेसर, कोर्टांतले वकील आणि डॉक्टर यांच्यामध्यें आपल्या कामाच्या वेळीं विजारींचा प्रघात रूढ होत आहे. इतर वेळीं मात्र यांना देखील धोतराची अवश्यकता भासते. अंगरख्याऐवजीं कोट आणि पागोट्याऐवजीं पगडी हा फेरफार मात्र या वीस वर्षांत कायम झाला. लोकमान्य टिळक हे अखेरपर्यंत अंगरखा घालीत होते, पण आतां पांढरपेशा वर्गांत अंगरखे बंद झाले म्हणण्यास हरकत नाहीं. मऱ्हाटे जातींत मात्र समारंभाच्या प्रसंगीं अंगरखे घालण्याची वहिवाट अद्याप आहे, व ती आणखी कांहीं वर्षें चालू राहील. उपरण्यांची वहिवाट कमी होत आहे; पण उपरणीं जाणार नाहींत. या पुस्तकाच्या कालमर्यादेच्या प्रारंभीं उपरणें घेणें हें शिष्टपणाचें चिन्ह समजलें जात असे. लोकमान्य टिळक आणि नामदार गोखले या दोन्ही प्रसिद्ध व्यक्ति उपरणें वापरीत असत व यामुळें त्यांचे स्नेही व अनुयायी यांनाहि उपरणें वापरण्याची जरूर भासे. अधिक सूक्ष्मपणें अवलोकन केल्यास या दोन व्यक्तींची उपरणें घेण्याची तऱ्हा देखील त्यांच्या सहचरांनीं व अनुयायींनीं अंगीकारलेली आढळेल. डाव्या खांद्यावरून पाठीमागून उजवीकडे आणून उजव्या बाहूला वळसा घालून डाव्या खांद्यावरून उपरण्याचें दुसरें टोंक मागें सोडणें ही लोकमान्य टिळकांची रीत त्यांच्या अनुयायांमध्यें जशी दृष्टीस पडते,

तशी डाव्या खांद्यावरून पाठीमागून उजवीकडून गळ्याला वळसा घालून डाव्या खांद्यावरून उपरण्याचें दुसरें टोंक मागें सोडण्याची नामदार गोखल्यांची रीत त्यांच्या पक्षामध्यें आढळते. उदाहरणार्थ कै. अण्णासाहेब पटवर्धन, रा. न. चिं. केळकर, रा. खाडिलकर, रा. धोंडोपंत विद्वांस, रा. कृष्णशास्त्री कवडे, रा. दत्तोपंत आपटे, व (कांहीं प्रसंगीं) प्रो. शिवरामपंत परांजपे हे टिळकांप्रमाणें उपरणें घेत व घेतात; तर रँगलर परांजपे, प्रो. भाटे, प्रो. पटवर्धन हे नामदार गोखल्यांच्या पद्धतीनें घेत व घेतात. ही मंडळी ही साधी गोष्ट अशा विशिष्ट तऱ्हेनें मुद्दाम करतात असें नव्हे, तर सहज-गत्या त्यांना नकळत ही गोष्ट अशाच तऱ्हेनें त्यांचे हातून घडते. मनुष्यप्राणी अनुकरणप्रिय आहे याचें हें एक छोटेंसें उदाहरण होय. असो. उपरणें घेण्याची आणखी एक विशिष्ट तऱ्हा रा. सीताराम केशव दामले यांची आहे. डाव्या खांद्यावरून पाठीवरून उजव्या बगलेंतून पुढें आणून उजव्या खांद्यावरून मागें सोडण्याची पद्धत रा. दामल्यांची आहे. याखेरीज निराळी तऱ्हा म्हणजे मुळींच उपरणें न घेण्याची. या पद्धतीचे अध्वर्यु कै. हरि नारायण आपटे होत व ज्ञानप्रकाशाचे म्यानेजर रा. वामनराव पटवर्धन यांनीं ही पद्धत कायम ठेविली आहे. यापुढें उपरणें मुळींच न घेण्याची पद्धत आणि डोक्याला रुमाल किंवा पगडी न घालतां फक्त टोपी घालण्याची पद्धत वाढत जाणार असा रंग दिसत आहे. पोषाखाच्या वरील पद्धती मुख्यतः पांढरपेशांच्या आहेत व त्याच किंचित् फरकानें सर्व जातींत (अगदीं हलक्या व दरिद्री जाती खेरीज करून) रूढ होत चालल्या आहेत. मऱ्हाटे लोक समारंभाचे प्रसंगीं मऱ्हाटेशाही पागोटें, अंगरखा व उपरणें वापरतात, पण इतर प्रसंगीं कोट व टोपी या पांढरपेशी विद्यार्थी पोषाखानेंच वावरतात. पुण्यां-

तल्या गुजराथी लोकांनीं या दक्षिणी पोषाखाचाच स्वीकार केला आहे. शेंडी राखून बाकी डोक्याची हजामत करण्याची जुनी पद्धत कमी होत चालली असून डोक्यावर सर्वत्र केंस राखून फक्त दाढी करण्याची पद्धत सर्वत्र जोरानें रूढ होत आहे, आणि पुढील वीस वर्षांत ही पद्धत पूर्णपणें कायम होण्याचीं चिन्हें स्पष्ट दिसत आहेत. कै. अण्णासाहेब पटवर्धन हजामत मुळींच करवीत नसत, दाढीसुद्धां सर्व केंस वाढवीत असत. ही त्यांची पद्धत क्वचित् अनुसरली जात असे. उदाहरणार्थ रा. शंकर गणेश लवाटे, रा. शंकर गजानन पुरोहित, रा. काशीनाथ ठकूजी जाधव व कै. रामचंद्र बल्लाळ गोडबोले हे अण्णासाहेबांप्रमाणें दाढी वाढवीत असत व असतात. पायांत पुणेरी जोडा घालण्याऐवजीं बूट घालणें कांहीं जणांना श्रेष्ठ प्रतीचें वाटत असलें तरी जोडा हा धोतराप्रमाणेंच कायम रहाणार. चष्मे मात्र शिक्षितांत वाढत आहेत; कारण दृष्टिमांद्य हा शिक्षणाचा आणि बारीक टाइपांतलीं पुस्तकें रात्रीं बेरात्रीं वाचीत बसण्याचा परिणाम होय. लोकमान्य टिळकांची दृष्टि चांगली नव्हती, तरी त्यांनीं चष्मा लावण्याची संवय जडवून घेतली नाहीं.

येथें स्त्रियांच्या पोषाखासंबंधानें दोन शब्द लिहिणें अप्रासंगिक होणार नाहीं. आधीं मी पांढरपेशा वर्गांतल्या स्त्रियासंबंधानें लिहितों. यांचे सुवासिनी आणि विधवा असे दोन वर्ग होतात. सुवासिनी स्त्रियांचा जुना पोषाख— म्हणजे अंगांत चोळी आणि नेसण्यास साळा हाती लुगडें— कायम आहे. थंडीच्या दिवसांत मात्र चोळीवरून पोलका घालण्याची पद्धत या काळांत रूढ झाली. लुगड्याऐवजीं पातळें मधून मधून आढळूं लागलीं आहेत, तरी तीं अधिक रूढ होण्याचें चिन्ह दिसत नाहीं. डोक्यावरून पदर घेण्याची पद्धत सुवासिनी बायकांत पूर्वींच्या शतकांत होती असें

ऐकिवांत आहे, पण आतां गळ्या भोंवतीं खांद्यावरून पदर घेण्याची पद्धत कायम झाली आहे. तसेंच वेण्या घालणाऱ्या स्त्रियांचें प्रमाण कमी होत असून आपापल्या केसांचा अंबाडा स्वतःच बांधण्याचा प्रघात पुष्कळ वाढला आहे. शाळेंत जाणाऱ्या लहान मोठ्या मुली चोळीवरून किंवा चोळीविरहित पोलका घालतात. पायांत जोडा घालणें हें शाळेंत जाणाऱ्या मुलींमध्येंच रूढ आहे. त्याच मोठ्या झाल्यावर जोडा बहुधा घालीत नाहींत. शिकलेल्या काय, किंवा न शिकलेल्या काय, स्त्रियांची नखऱ्याची हौस या काळांत वाढत आहे. घरांत फाटकीं जुनीं लुगडीं नेसावयाचीं, पण घराबाहेर जातांना मात्र नवीं लुगडीं नेसावयाचीं हा प्रघात कांहीं स्त्रियांत दिसून येतो हें त्यांच्या नखरेबाजपणाचें द्योतक होय. असो. आतां विधवा स्त्रियांसंबंधानें. पतीच्या मृत्यूनंतर 'असें होण्याची' घाणेरडी चाल या काळांत कांहीं अंशानें पण खात्रीनें कमी होत चालली आहे. तरी ही घाणेरडी चाल आणखी बरींच वर्षें टिकाव धरील असें मोठ्या खेदानें ह्मणावें लागतें. कारण, स्त्रियांच्या शिक्षणाबरोबर स्त्रियांचा भोळसरपणा जो कमी व्हावयाचा तो उलटा वाढत आहे, असें मला वाटतें. सुधारकांचे घरीं काय, आणि सनातन धर्माभिमान्यांचे घरीं काय, दोन्हीकडे तऱ्हा एकच. ज्या स्त्रियांना पतीच्या जिवंतपणीं दुसऱ्या कोणा पुरुषाचा दुरून देखील स्पर्श होत नाहीं, त्या स्त्रियांना पतीच्या मृत्यूनंतर हलक्या जातीच्या इसमापुढें डोकें लवविण्याची चीड कशी येऊं नये मला समजत नाहीं. याचें कारण एकच. तें हें कीं, विधवा स्त्रीच्या मस्तकावर केंस राहिले तर तिच्या मेलेल्या नवऱ्याला स्वर्गाचें द्वार तेथले द्वारपाळ उघडीत नाहींत अशी मूर्खपणाची समजूत. ही समजूत आमच्या भटाभिक्षुकांनीं कायम राखली आहे. ज्या विधवा

स्त्रीनें केशपाश काढून टाकून तांबड्या लुगड्याचा स्वीकार केला नसेल, तिच्या हातचें अन्न खाण्याला किंवा पाणी पिण्याला नाकारणारे भिक्षुक पुण्यांत पुष्कळ आहेत, गृहस्थ आहेत, आणि सुवासिनी बायकाहि आहेत. धन्य या लोकांची आणि यांच्या समजुतींची. माझ्या मतें या चालीचें मूळ या समजुतीपेक्षां देखील सामाजिक निष्ठुरतेमध्यें आहे. ब्राह्मणांमध्यें सुवासिनी स्त्रियांना अलंकार घालण्याची पद्धत प्राचीन काळापासून चालत आलेली आहे. हे अलंकार ह्मणजे तिच्या मालकीचें धन होय, व या धनावर दुसऱ्या कोणाला हक्क सांगतां येत नाहीं, असें हिंदु कायद्यानेंहि ठरवलेलें आहे. परंतु पतीच्या मृत्यूनंतर एकदां त्याच्या पत्नीला विद्रूप करून टाकली ह्मणजे मग तिचे अलंकार ही एक घरांतली घरांतल्या माणसांच्या मालकीची बाब होऊन बसते व ती स्त्री फक्त अन्नवस्त्रापुरतीच धनीण रहाते. पूर्वी समाइक कुटुंबें अधिक असत; अर्थात् दोन चार भावांना एका घरांत रहावें लागत असे. अशा काळीं एक भाऊ मेला, तर त्याच्या बायकोचे अलंकार आपल्याला मिळावे, निदान तिला तरी त्या अलंकाराच्या जोरावर कांहीं अधिकार गाजवितां येऊं नये, अशा निष्ठुरतेच्या विचारांत या घाणेरड्या चालीचा उगम आहे असें मला वाटतें. सर्वांत आश्चर्याची गोष्ट ही कीं, पुण्यासारख्या शहरांत सुधारक ह्मणविणाऱ्या लोकांनीं देखील ही साधी सुधारणा घडवून आणलेली नाहीं, किंवा घडवून आणण्याचा ते प्रयत्न करतात एवढेंहि माझ्या ऐकिवांत नाहीं.

पांढरपेशा वर्गाखेरीज इतर जातींमधील स्त्रियांमध्यें शिक्षणाचा प्रसार होत नाहीं व होण्याचें चिन्हहि दिसत नाहीं. घरांतल्या कामाखेरीज इतर काम करून पैसा मिळविण्याची त्यांना जरूर नसली तरी त्या बाहेरचीं कामें करून पैसा मिळवितात. त्यामुळें त्यांचा भार नवऱ्यावर

नसतो. तरी त्यामुळें पोषाख नीटनेटका करणें किंवा शरीर स्वच्छ राखणें या गोष्टी त्यांच्या हातून होत नाहींत. डोक्यावर पदर घेण्याची चाल आणि अंगांतली चोळी हातांत कोंपराच्या खालपर्यंत आली पाहिजे ही चाल, या दोन चाली या स्त्रियांनीं मोठ्या कडकपणानें चालू ठेवल्या आहेत. ब्राह्मणांच्या विधवांप्रमाणें सोवळ्या होण्याची चाल ब्राह्मणांखेरिज इतर कोणत्याहि जातींत नाहीं.

## लोकांचा आचार.

मागें लिहिलेल्या वर्णनावरून पुण्यांत पोषाखाच्या बाबतींत पुरुषांमध्यें व स्त्रियांमध्यें नखरेबाजपणा वाढत आहे हें वाचकांच्या लक्षांत येईल. पोषाखाप्रमाणेंच इतर बाबतींतहि ही दर्शनी श्रीमंतीची हौस वाढत आहे, ही खेदाची गोष्ट होय. मनुष्य जसा असावा तसा वस्तुतः दिसावा. पण पुण्यांत ही पद्धत गेल्यासारखी आहे. एखाद्या माणसाच्या पोषाखावरून त्याची ऐपत कोणी ठरवूं लागेल तर तो खास चुकेल. उथळ पाण्याला खळखळाट फार या न्यायानें, विजार किंवा तलम सुताचें धोतर, बूट, स्टॉकिंग, भारी किंमतीचा कोट वगैरे झकपक पोषाख करणारा मनुष्य पाहिल्याबरोबर साधारणपणें हा यथातथा ऐपतीचाच असावा असें अनुमान काढल्यास तें शेंकडा ७५ टक्यांनीं खरें ठरेल; व विशेषतः अलीकडील आठ दहा वर्षांत तर खरें ठरेलच. कारण, अलीकडे युरोपियन महायुद्धाच्या प्रारंभापासून पैसा जिकडे तिकडे खेळूं लागला, शेंकडों " एम्. एफ्. " [मॅट्रिक फेल] पदवी मिळविलेल्या ग्रॅज्युएटांना सरकार भराभर नोकऱ्या देऊं लागलें आणि यामुळें जिकडे तिकडे पैसाच पैसा खेळूं लागला व चैनीला उत्तेजन मिळालें. नाटकें, सिनेमा, हाटेलें यांना ऊत आला. कांहीं काळ अशा प्रकारें चैनींत गेला, पण मागाहून संकटाचे दिवस आले. पैसा दुर्मिळ होऊं लागला आणि चैनीच्या जड-

लेल्या संवयी मात्र कायम झाल्या. त्यामुळें आतां सर्वत्र पैशाच्या नांवानें वखवख उडालेली आहे. ज्यांच्याजवळ आहे त्यांच्याजवळ गाजवीहून जास्त आहे व त्यांच्याजवळ नाहीं त्यांना खाण्याची देखील दिवसानुदिवस भ्रांत पडूं लागली आहे. याचा परिणाम पुढील काळांत काय होईल तो सांगतां येत नाहीं. पण आजमित्तीस तरी एक परिणाम स्पष्ट दिसत आहे तो हा कीं,—मनुष्याचा स्वभाव कडक व बेपर्वा बनत चालला आहे. कोणी कोणाला विचारीनासें झालें आहे. जवळ दोन पैसे असल्यास आपली श्रीमंती दाखवावी, पण कोणाच्या तिळमात्र उपयोगीं पडूं नये, अशी प्रवृत्ति लोकांमध्यें कायम झाली. त्यांतल्या त्यांत घरांत आपले खाण्यापिण्याचे हाल झाले तरी चालतील पण रस्त्यांत मात्र आपण श्रीमंत आहोंत असें जाणारा येणारांना वाटलें पाहिजे; घरीं बारा-महिने खाण्याचे हाल चालतील, पण एखादे दिवशीं लोकांना जेव-ण्यास बोलावून आपले उसनें वैभव दाखविलें पाहिजे; लग्नादि कार्यें करण्यासाठीं कर्ज काढलें तरी चालेल, पण बँड, वाद्यें व आत-षबाजी यांच्या देखाव्यांत कमी पडतां कामा नये. अशा बेसुमार वर्तनानें आपण स्वतःचेंच नुकसान करीत आहों ही जाणीव लोकांना नाहीं. नुकसान केवळ द्रव्याचेंच नव्हे, तर परोपकार, निःस्वार्थपणा, दया, समाधान इत्यादि मनुष्याला अवश्य अशा सात्त्विक मनोविकारांचा खून करून आपण नैतिकदृष्ट्या अधःपाताला चाललों आहोंत इकडे कोणाचें लक्ष जात नाहीं. आधींच महाराष्ट्रसमाज बेमुर्वत, त्यांत असल्या कारणांची भर पडल्यामुळें हा समाज अधिक बेमुर्वत व्हावा व तो तसा होत आहे यांत नवल तें कोणतें ? असो. लोकांच्या स्वभावाचें वर्णन पुढें वेगळें येणार आहे तेव्हां येथें इतकेंच पुरे. आचाराकडेच आपण वळूं.

सिनेमा, ह्मॉटेलें यांचा सुळसुळाट या वीस वर्षांत फार झाला. नाटकें पूर्वीपासूनच आहेत. विड्या किंवा किंवा सिगारेट ओढ-ण्याचें व्यसन पूर्वीपासून आहेच. एवढेंच कीं, मुंबईप्रमाणें रस्त्यां-तून चालतांना तोंडांतून फक् फक् धूर सोडण्याची चाल अद्याप रूढ झाली नाहीं. ती बहुधा पुढील वीस वर्षांत होईल. रस्त्यां-तून तरी विड्या ओढीत न जाणें हें शिष्टपणाचें लक्षण असें अद्याप बरेच लोक पुण्यांत समजतात. असो. सायकली पुण्यांत पुष्कळ आहेत. इतर शहरांच्या मानानें अधिकच आहेत. येथें विद्यार्थ्यांची संख्या लोकवस्तीच्या मानानें अधिक असल्यामुळें सायकलींची वाढ असावी. सायकली चालविणारे लोक रस्त्यांतून अपघातहि पुष्कळ करतात. रात्रीच्या वेळीं सायकलीला दिवा पाहिजे या नियमाला धाब्यावर बसवून प्रत्यहीं पुष्कळ सायकल-वाले पोलीसांच्या डोळ्यांदेखत रात्रीं रस्त्यांतून सायकली पळवीत जातात. कायदेभंग करण्याची ही पूर्वतयारी समजावयाची कीं काय?

आतां खाण्यापिण्याकडे वळूं. पुण्यांत सकाळ संध्याकाळ चहाचें प्राबल्य या काळांत पूर्णपणें कायम झाल्याचें मागें एके ठिकाणीं सांगितलें आहे. त्याखेरीज आहार पूर्वीच्या शतकांतलाच कायम आहे. आहाराचें प्रमाण मात्र लोकांच्या अशक्ततेमुळें आणि अनियमितपणामुळें कमी होत आहे. पुण्यांत भाजीपाला विपुल व यामुळें आहारांत भाजीपाला अधिक प्रमाणांत असतो. तितका भाजीपाला महाराष्ट्रांत इतरत्र नाहीं. पुणें हें कोंकणहि आहे व देशहि आहे यामुळें येथील आहारांत भातहि आहे व भाकरीहि आहे. भाकरी साधारणपणें बाजरीची. जोंधळ्याची भाकरी पुण्यास क्वचित् खातात. इंग्रजी शिक्षणांत वाढलेल्या बऱ्याच लोकांनीं भाकरी बंद करून गहूं चालू केले आहेत. खाण्यापिण्यावर शरीर

अवलंबून असतें हा सिद्धांत खरा आहे व हें प्रत्येक मनुष्य कबूल करतो. तथापि या विषयाची काळजी घेणारे मनुष्य पुण्यांत फार तर शेंकडा पांचच आढळतील. खाण्याचे पदार्थ अमुक पद्धतीनें तयार झाले असले पाहिजेत, ते करण्यास अमुक वेळ लागला पाहिजे, अमुक दिवसांत अमुक पदार्थ हितावह असतात व अमुक नसतात, खाल्लेल्या पदार्थांचें पचन होण्यास अमुक काळ लागतो, इत्यादि बाबींकडे कोणाचें लक्ष नाहीं. कसें तरी एकदांचें अन्न पानावर आलें कीं पोटांत कोंबावयाचें एवढाच विचार. तिकडे ऑफिसांत जाण्याची गर्दी आणि इकडे अर्धकच्चें अन्न पोटांत कोंबण्याची गर्दी, अशा परिस्थितींत पुण्यांतले लोक मजेनें दिवस काढीत आहेत. मोठ्या माणसांना काय किंवा लहान मुलांना काय, अशीच संवय लागलेली आहे. विशेषतः लहान मुलांवर या निष्काळजीपणाचा परिणाम अधिक होतो, आणि आईबापांच्या अशा निष्काळजीपणामुळेंच पुणें शहरांत तीन वर्षांच्या आंतील मुलांची मृत्युसंख्या प्रमाणाबाहेर वाढलेली आहे. असे हे लहान मुलांचे राजरोस खून चालले आहेत, तरी मोठ्या माणसांना त्याची दिक्कत वाटत नाहीं. असो; घरांतल्या अर्धकच्चया अन्नाखेरीज हॉटेलांतले आणि दुकानांतले घाणेरडे पदार्थ विकत घेऊन खाण्याचीहि खोड वाढत आहे. सर्व जातींच्या लोकांच्या तोंडांनीं उष्ट्या झालेल्या कपबशांतून दुकानांतला चहा पिण्यांत आपण आरोग्यशास्त्राच्या दृष्टीनें कांहीं चूक करीत आहों अशी कोणाला कल्पना येत नाहीं. पुण्यांतल्या खाणावळींत आठचार दिवस जेवणास गेलें असतां माझ्या विधानांची सत्यता अधिक पटेल. पुण्यांतल्या खाणावळींतलें अन्न खाण्याचा प्रसंग म्हणजे तुरुंगवासाचाच प्रसंग होय. रा. दत्तात्रय हरि भट हायकोर्ट वकील, पुणें, या गृहस्थांनीं १९१५ सालीं

ज्ञानप्रकाशांत पुण्यांतल्या खाणावळींचें तपशीलवार वर्णन लिहिलें होतें तें एकवार वाचण्यासारखें आहे.

## आचार.

या काळांत ब्राह्मणांचा संध्यावंदनाचा आचार नामशेष होत चालला आहे. पुढील वीस पंचवीस वर्षांत गृहस्थ ब्राह्मणांमध्यें संध्या पाठ येणारा मनुष्य क्वचित् सांपडेल. संध्या नको, पण मुंजीचा समारंभ पाहिजे. ह्मणजे समारंभाकरितांच मुंज पाहिजे. हें समारंभी धर्माचरण सर्व बाबतींत वाढत आहे. श्राद्ध, पक्ष, सत्यनारायणपूजा, नवस, गणपतीपूजन वगैरे समारंभी धर्माचरणाकडे लोकांची प्रवृत्ति वाढत आहे. कथाकीर्तनाकडे पुरुषांची प्रवृत्ति कमी झाली, बायकांची मात्र वाढत आहे. भुतेंखेतें, मंत्रतंत्र, ज्योतिष, प्रश्न, शकुन, अपशकुन इत्यादिकांवर पुरुष आणि बायका दोघांचाहि विश्वास वाढत आहे. इंग्रजी शिक्षणानें असल्या श्रद्धा मागें निघून जात असत, पण या वीस वर्षांत या श्रद्धांनीं उलट खाल्ली आहे. माझ्या मतें हें लक्षण आळसाचें, अज्ञानाचें व फाजिल चैनीचें आहे. पण हें असेंच वाढत जाणार समाधानवृत्ति अंगीं नाहीं, नियमित वागणूक नाहीं, चैनीची आणि समारंभी, देखाव्यांची हौस पण यांस लागणारा पैसा उधळून टाकण्याची संवय लागल्यामुळें जवळ शिल्लक नाहीं, आणि नेटानें उद्योग करण्याची तयारी नाहीं. अशी परिस्थिति असल्यानें स्वतःला दोष न देतां दैवाला दोष देण्याकडे प्रवृत्ति वाढलेली. पण आपण दैवाला दोष विनाकारण देत आहों हें न समजल्यानें संसार कटकटीचा होतो. अशा परिस्थितींत अज्ञानाची भर पडून,— व विशेषतः बायकांच्या अज्ञानाची भर पडून— भट, भिक्षुक, ज्योतिषी, भुतेंखेतें काढतों ह्मणणारीं माणसें, गंडेदोरे व ताईत देणारीं माणसें, पीर ताबूत यांचें माहात्म्य साहजिकपणें वाढतें व

तें तसें पुण्यांत वाढलेलें आहे. मुसलमानांच्या पीराला नवस करणारे ब्राह्मण—गृहस्थ व भिक्षुक—पुण्यांत आहेत. या धंद्यावर पुण्यांत चांगला योगक्षेम चालूं लागला आहे. ज्या बाईला पोटाकरितां स्वयंपाक करणें भाग, ती बाई मंत्र-तंत्र-अंगारे-दोरे करूं लागली म्हणजे थोडक्या काळांत द्रव्याचा संचय करूं शकते अशीं उदाहरणें पुण्यांत आहेत. भटांसंबंधानें तर बोलण्यासच नको. यांचा धंदा पुण्यांत उत्तम प्रकारें चालतो. पुण्यास रहाणारा भटजी दहा पांच वर्षांत इष्टेट करूं शकतो. यजमानांना लोकांचें डोईजड देणें झालेलें, आणि त्यांच्या घरच्या भटजींनीं मात्र—अर्थात् आपल्या धंद्याच्या जोरावर, उद्योगाच्या जोरावर, आणि यजमानांच्या अज्ञानी समजुतीच्या जोरावर—इष्टेटी केल्याचीं उदाहरणें पुण्यांत आहेत. पुण्याबाहेर ज्या भिक्षुकांचें नीट संधान बसलें नसेल त्यांनीं खुशाल पुण्यास येऊन रहावें. आणखी शेंदोनशें भिक्षुकांचा समावेश पुण्यांत सहज होऊं शकेल. मात्र येथें मी स्पष्ट सांगतों कीं, या प्रकाराबद्दल भिक्षुकांकडे बिलकुल दोष नाहीं. ते गरीबीनें रहातात, जेवण होईल तितकें परस्पर काढतात, जेवण ज्या दिवशीं इतरत्र नसेल त्या दिवशीं जमल्यास उपाशीं रहातात, पैशाचा संग्रह करतात; आणि गृहस्थ मात्र मिळविलेला पैसा फाजील खर्च करून उडवितात; यांत भिक्षुकांकडे मुळींच दोष नाहीं. असो; अशा प्रकारें अल्प कष्टानें योग्यतेहून अधिक पैसा मिळूं लागल्यानें भिक्षुक वर्गाच्या स्वभावांत आणि आचरणांत—विशेषतः त्याच्या स्त्रियांच्या स्वभावांत व आचरणांत—क्षुद्रपणा येत चालला आहे, हें मात्र येथें नमूद केलें पाहिजे. फुकटचें अन्न खाण्यास जिभा चटावल्यामुळें, एका घरची निंदा दुसऱ्या घरीं, दुसऱ्या घरची निंदा तिसऱ्या घरीं, अशा प्रकारें खाळघा

घरचे वांसे मोजण्यांत भिक्षुकांच्या स्त्रिया, आणि जरा कमी प्रमाणांत भिक्षुक, आपला रिकामा वेळ घालवितात. नैतिकदृष्ट्याहि त्यांची वृद्धि खालावल्याचीं उदाहरणें आढळतात. मला प्रत्यक्ष माहीत असलेलीं दोन उदाहरणें येथें सांगतों— पहिलें उदाहरण एका वेदमूर्तींच्या पत्नीचें. या बाईचे भ्रतार एकदां परगांवीं गेले होते. पण अशा वेळीं दंपत्यपूजनाचें आमंत्रण आलें व त्यांत बरीच प्राप्ति व्हावयाची होती. तेव्हां बाईनें वेलाशक आमंत्रण स्वीकारलें, आणि ओळखीच्या एका माणसाला बरोबर घेऊन तोच आपला भ्रतार असें सांगून दोघांनीं दंपत्यपूजनाचा स्वीकार केला! दुसरें उदाहरण दुसऱ्या एका वेदमूर्तींचें. या भटजींची पत्नी परगांवीं गेली असतांना त्यांना एका ब्राह्मणेतराकडे सत्यनारायणाचें व मेहुणाचें आमंत्रण आलें. भटजींनीं आपल्या गृहस्थ मेहुण्याच्या बायकोला या आमंत्रणाचा बरोबर थांग न लागूं देतां नुसतें सुवासिनीचें आमंत्रण आहे असें सांगून स्वयंपाक करण्यास तेथें नेलें. तेथील बायकांकडून मात्र आपण मेहुण ह्मणून आलों आहोंत अशी तिला हकीकत कळली, तेव्हां ती फार खजील झाली. असो. घाण उकरीत बसण्याचा धंदा तुह्मांला कोणीं सांगितला आहे असें कांहीं भिक्षुक मला ह्मणतील. पण त्यांना असें समजत नाहीं कीं, सुजाण वैद्य रोग्याच्या पोटांतली घाण अगोदर काढून टाकतो व नंतर त्याला औषध सुरू करतो. ब्राह्मण जातींतले दोष नाहींसे व्हावे ह्मणून मी हें लिहीत आहें. ब्राह्मण जातीविषयीं व सदाचारसंपन्न ब्राह्मणांविषयीं मला आदर आहे व या आदरामुळेंच तुमच्यांतल्या ब्राह्मणब्रुवांचे दोष मी इतक्या ढळढळीतपणानें लोकांपुढें मांडीत आहें. उदरंभरणाकरितां हलकटपणाचा स्वीकार करण्यानें आपण

आपल्या तोंडाला काळोखी फासीत आहों.

ब्राह्मणांखेरीज इतर जातींमध्यें एक बाब वगळली असतां आचारांत फेरबदल झालेला नाहीं. ती बाब ह्मणजे दारू. इतर जातींतून दारूचें व्यसन भयंकर वाढत आहे. येथें इतर जाती ह्मणजे "ब्राह्मणांखेरीज इतर जाती" असा अर्थ समजूं नये. कांहीं जातींमध्यें हें व्यसन नाहीं. पण ज्या जातींत तें आहे त्या जातींमध्यें तें वाढत्या प्रमाणावर आहे. या व्यसनामुळें त्या जातींची उन्नति होण्याची आशा दुरावत आहे. त्या त्या जातींतील शहाण्या माणसांनीं याचा विचार करावा.

## लोकांचा स्वभाव.

पुण्यांतील लोकांच्या स्वभावाचें वर्णन दोन शब्दांनीं सांगावयाचें झाल्यास 'पाणीदार' आणि 'तापट' या दोन शब्दांनीं सांगावें. महाराष्ट्रांत व हिंदुस्थानांत कांहीं ठिकाणीं मीं प्रवास केला आहे आणि बऱ्याच ठिकाणच्या लोकांचें निरीक्षण केलें आहे. त्यावरून पुण्यांतले लोक पाणीदार आहेत असें मी म्हणूं शकतों. पुण्याचे लोक क्रूर नाहींत व राक्षसासारखे दिसतहि नाहींत. पण त्यांचें पाणी मात्र कांहीं निराळें आहे. पुणें शहरच्या ब्राह्मणांतच नव्हे तर सर्व जातींत हा विशेष दिसतो. पुणें शहर पेशव्यांनीं भरभराटीस आणलें; आणि पुण्यांत पेशव्यांची म्हणजे कोंकणस्थांची जात सर्वांत महत्त्वाची आहे. अर्थात् कोंकणस्थांनीं पुण्यांतल्या इतर लोकांवर आपल्या स्वभावाची छाप बसवून सर्वांना पाणीदार केलें असें म्हणण्यास हरकत नाहीं. कारण पाणीदारपणा हा विशिष्ट गुण पुण्यांतल्या कोंकणस्थांप्रमाणें कोंकणांतल्या कोंकणस्थांत बीजरूपानें आढळतो. कोंकणस्थ ब्राह्मण भिकार कोंकणांतून पुण्यास आले म्हणजे त्यांचें दारिद्र्य नाहीसें होतें. अर्थात् दारिद्र्यामुळें ज्या

पाणीदारपणाला कोंकणांत तेज चढत नाहीं, तो पाणीदारपणा येथील सुख-वस्तुत्वामुळें तेजस्वी होतो. या पाणीदारपणाचाच कडक उपयोग किंवा दुरुपयोग केला ह्मणजे त्याला तापटपणा ह्मणतात. पाणीदारपणाचाच भाऊ तापटपणा व हे दोन्ही गुण पुण्यांतील कोकणस्थांमध्यें पूर्णत्वानें वसत आहेत. कोकणस्थांच्या संगतीनें पुण्यांतल्या इतर सर्व लोकांत वसत आहेत. येथें असें सांगितलें पाहिजे कीं, हे गुण 'केवळ' कोकण-स्थांचे नाहींत; तर 'मुख्यत:' कोकणस्थांचे आहेत. हे गुण कांहीं प्रमाणानें मऱ्हाटे जातीचेंहि आहेत. त्यांच्या उगमाशीं म्हणजे रजपूत जातींतहि याचें वास्तव्य आहे. तथापि लढवय्या जातींमध्यें हा गुण असल्यास त्यांत आश्चर्य नाहीं. मात्र ब्राह्मणांमध्यें असण्यांत वैशिष्ट्य आहे. कोंकणांतून पुण्यास येऊन देशावरच्या उलाढाली पाहिल्यावर हे ब्राह्मण कोणालाहि भीतनासे होतात. मग ते हिंदुस्थानांतल्या कोठ-ल्याहि परमुलुखात गेले तरी त्यांचा पाणीदारपणा इतरांच्या नजरेस आल्यावांचून रहात नाहीं. असेंच पुण्यांतल्या सर्व माणसांसंबंधानें कमी अधिक प्रमाणानें ह्मणतां येईल.

या गुणाबरोबर पुण्यांत गर्व, मत्सर आणि द्वेष यांचें वास्तव्य आहे. थोड्याशा संपत्तीनें मदांध होऊन जाणारे पुण्यांतले लोक अस-तात.* याला कोणी स्वाभिमान असें गोंडस नांव देतील. पण स्वाभि-मानाचा अंतर्भाव वरील पाणीदारपणांत झाला आहे. याला मदांधता किंवा वृथा अभिमान असेंच नांव दिलें पाहिजे. अर्थात् याचे योगानें माणसाच्या अंगीं गर्वाची समृद्धि होते, मत्सराची वाढ होते आणि

* माझ्या या विधानाला रा. चिंतामण विनायक वैद्य या विद्वानांचा अनुकूल अभिप्राय आहे. "संपत्तीनें मदांध होणारे ब्राह्मणांसारखे दुसरे कोणी लोक नाहींत" अशा अर्थाचें विधान त्यांनीं "दुर्दैवी रंगू" नांवाच्या कादंबरींत केलेलें आहे.

द्वेषाचें प्राबल्य माजतें. मत्सर आणि द्वेष या दुर्गुणांचे योगानें पुणें-करांच्या नांवाला कमीपणा आलेला आहे. तरी याची कोणाला जाणीव नाहीं व असली तरी त्याबद्दल कोणी फिकीर करीत नाहीं. या दुर्गुणांच्याच सान्निध्यानें उर्मटपणा किंवा बेमुर्वतपणा वाढतो. हे दुर्गुण पूर्वीच्या काळीं इतक्या वाईट प्रकारानें दिसून येत नव्हते. कारण, तेव्हां देशांत शांतता नसल्यानें आणि त्यामुळें कोणाची कोणाला केव्हां गरज लागेल याचा नेम नसल्यानें इतका मदांधपणा किंवा बेमुर्वतपणा दाखविण्याची सोय नव्हती. पण आतां इंग्रजी राज्य पूर्णपणें प्रस्थापित झालेलें असल्यामुळें कोणाची कोणाला जरूर उरली नाहीं व कोणी कोणाचें वाकडें करूं शकत नाहीं. यामुळें देवाण घेवाण या न्यायानें सर्वत्र बेमुर्वतपणा वाढला आहे. मी माझ्यापुरतें पहाणार, माझ्याखेरीज जगांत दुसऱ्या कोणाचें मी कांहीं लागत नाहीं, अशा प्रकारें पुणेंकरांची सामान्यतः वर्तणूक असते.

वरील वर्णनाला अनुसरून पुणेंकरांचा स्वभाव खोडकरहि आहे. अनोळखी किंवा बिनमाहीतगार मनुष्यानें अमुक ठिकाण कोठें आहे, अथवा अमुक मनुष्य कोठें रहातो, असें विचारल्यास सरळ उत्तर देणें हें त्याचें एक सामाजिक कर्तव्य आहे. परंतु खोड्कर स्वभावा-मुळें पुण्यांतले बरेच लोक हें कर्तव्य बजावीत नाहींत. हें कर्तव्य न बजावणारे इसम शेंकडा पन्नास असतील असें मला वाटतें. कोणी म्हणतो मला माहीत नाहीं, कोणी म्हणतो मला वेळ नाहीं, कोणी माहिती असून सांगत नाहीं, आणि कोणी बरोबर माहिती असतां भलतीच माहिती सांगतात. संभावित समजल्या जाणाऱ्या लोकांच्या खोडकरपणाचे हे प्रकार झाले. हलकट माणसांच्या खोड्या असतात त्यांच्या वर्णनानें माझी लेखणी मी विटाळवूं इच्छीत नाहीं. पण त्या देखील पुण्यांत आहेत एवढें लिहितों. संभावित समजल्या

जाणाऱ्या माणसांच्या खोड्यांचीं एक दोन उदाहरणें दिल्यास गैरवाजवी होणार नाहीं. पहिलें उदाहरण— पुण्यास १९०८ व १९०९ सालीं 'वंदेमातरम्' नांवाचें एक वर्तमानपत्र निघत असे. १९०९ सालीं हें पत्र बंद झाल्यानंतर थोड्या दिवसांनीं सदर पत्राच्या संपादकाकडे वऱ्हाडांतले एक गृहस्थ आले. त्यांना घर माहीत नव्हतें, पण ते शोध काढीत काढीत घराजवळ आले. तेथें रस्त्यावर आणखी एका सभ्य दिसणाऱ्या गृहस्थाला त्यांनीं माहिती विचारली तेव्हां त्यांना उत्तर मिळालें कीं, सदर संपादक, छापखाना वर्तमानपत्र वगैरे बंद करून विलायतेस निघून गेले! दुसरें उदाहरण— पुण्यांत सुधारक वर्तमानपत्राचे संपादक व प्रकाशक रा. रामचंद्र विष्णु फडतरे हे वारल्याची बातमी १९१५ सालीं येथून कोणी इसमानें नागपूरच्या 'महाराष्ट्र' वर्तमानपत्राकडे पाठविली व ती त्या पत्रांत प्रसिद्ध झाली! रा. फडतरे अद्याप हयात आहेत! तिसरें उदाहरण— १९०५।०६ सालीं हिंदुस्थानांत व विशेषतः बंगाल्यांत वंदेमातरम् शब्दांचा कांहीं अधिकाऱ्यांना बाऊ वाटत असे. १९०६ सालच्या फाल्गुनाच्या महिन्यांत पुण्यांतल्या कांहीं खोडकर लोकांनीं एकत्र विचार ठरवून एका रात्रींत पुण्यांतल्या दोन चार पेठांतल्या बहुधा प्रत्येक घराच्या भिंतीवर किंवा दारावर 'वंदेमातरम्' अशीं मोठालीं अक्षरें डामरानें लिहिलीं! जाहीरसभांतून व वसंतव्याख्यानमालेंतील सभांतून एखाद्या वक्त्याचें अप्रिय भाषण बंद पाडून त्याला खालीं बसविण्याची पुण्यांतील श्रोत्यांची खोडी तर महाराष्ट्रांत इतरत्र आढळत नाहीं. कधीं कधीं नागपुरास व मुंबईस आढळते. तथापि ही खोडी इतरत्र सुरू करण्याचें श्रेय पुणेंकरांचेंच आहे. सुरतेच्या कांग्रेसमध्यें डा. राशविहारी घोस भाषण करण्यास उभे राहिले असतां त्यांच्यावर जोडा फेकणारा पाजी मनुष्य पुण्याचाच होता हेंहि विसरतां येत नाहीं.

"पुणें शहराची आम्ही एवढी कीर्ति ऐकतों, पुण्यांत एवढे विद्वान् आहेत, पुढारी आहेत असें आह्मी पहातों, आणि तुह्मी पुणेंकरांना एवढीं नांवें कशीं ठेवतां ?" असा प्रश्न कोणी परठिकाणचा गृहस्थ मला करील. त्याला माझें उत्तर असें आहे कीं, होय, पुण्यांत इतर ठिकाणांपेक्षां अनेक चांगल्या गोष्टी आहेत यांत कांहीं शंका नाहीं. पण तेवढ्यावरून सामान्यतः सर्वच पुणें देशभक्तीनें, समंजसपणानें आणि विद्वत्तेनें भरलेलें आहे असें समजणें बरोबर नाहीं. सर्व आहे खरें, पण त्यांत दिखाऊपणाचा अंश अधिक आहे. "जें सारें नुसतें चकाकित दिसे तें सर्व सोनें नसे" हा नियम कोणींहि विसरूं नये. अपवाद अर्थातच वगळले पाहिजेत. पण सामान्यतः पुण्यांतील लोकांत कळकळ नाहीं, देखावा आहे. पुण्याची सर्व प्रकारची परिस्थिति देशभक्तीला आणि राजकीय चळवळीला अनुकूल आहे यामुळें येथून देशभक्तीचा प्रकाश महाराष्ट्रांत सर्वत्र पसरतो. परंतु या देशभक्तिरूप अग्नीला इंधन किंवा दिव्याला तेल इतर ठिकाणांहून येतें. या इंधनाच्या किंवा तेलाच्या साहाय्यानें देशभक्तीचा प्रकाश सर्वत्र फांकतो. लोकमान्य टिळक, नामदार गोखले, रँगलर परांजपे, किंवा प्रोफेसर शिवरामपंत परांजपे जरी पुण्यांत शिकले आणि जरी त्यांनीं पुढें पुण्यांत वास्तव्य केलें तरी ते मूळचे पुण्याचे रहिवासी नव्हेत. कै. विष्णुशास्त्री चिपळूकरांस मात्र पुण्याचे रहिवासी म्हणतां येईल; तरी पण त्यांनीं सुरू केलेल्या कार्याचा भार कै. टिळक, आगरकर व आपटे या परस्थांनींच घेतला. लोकमान्य टिळकांनीं अनेक वेळां आपल्या व्याख्यानांतून पुण्यांतील तरुणांस उद्देशून म्हणावें कीं, "माझी सर्व भिस्त तरुण पिढीवर आहे." पण खेदाची गोष्ट ही कीं, टिळकांच्या व्याख्यानांना टाळ्या पिटणारे पुण्यांतले तरुण वीस पंचवीस वर्षांत त्यांच्या हांकेला धांवून आलेले

मला म्हणण्यासारखे आढळत नाहींत. सार्वजनिक कार्यांत कळ-कळीनें, शारीरिक आणि आर्थिक नुकसान सोसून पडणाऱ्या मंडळींत मला पुणेंकरांपैकीं दोनच माणसें दिसतात; एक कै. जनार्दन विनायक ओक आणि दुसरे रा. कृष्णशास्त्री कवडे. दुसरे कांहीं पुण्याचे रहिवासी सार्वजनिक कामांत आढळतात, पण स्वार्थ नीट संभाळून जितकें कांहीं करतां येईल तितकेंच ते करतात. ते देखील कांहीं न करणाऱ्या लोकांपेक्षां पुष्कळ बरे हें खरें. पण ज्यांनीं लोकमान्य टिळकांचें किंवा नामदार गोखल्यांचें कार्य नेटानें चालविलें आहे, अशा माणसांत परस्थच लोक अधिक आहेत. रा. नरसोपंत केळकर, रा. खाडिलकर, कै. दत्तोपंत लिमये, रा. ज. स. करंदीकर, रा. वामनराव जोशी, रा. दा. वि. गोखले, वामनराव पटवर्धन, रा. नारायण मल्हार जोशी, डॉ. देव, रा. पांडुरंग महादेव बापट, डा. नरहर रामचंद्र ऊर्फ बाबासाहेब परांजपे, कै. रावबहादुर ग. व्यं. जोशी ही मंडळी बाहेरून पुण्यास येऊन राहिलेली आहे. लोकमान्य टिळकांविषयीं किंवा त्यांच्या चळवळीविषयीं इतरत्र जितका आदर व अभिमान आहे, तितका खुद्द पुण्यांत नाहीं. याचें कारण कळकळीचा अभाव. किंवा 'अतिपरिचयादवज्ञा' असेंहि ह्मणतां येईल. १८९७ सालीं लोकमान्यांनीं रा. केळकरांस साताऱ्यास पत्र लिहिल्याबरोबर ते येऊन दाखल झाले व किरकोळ मतभेद संभाळून लोकमान्यांचें कार्य त्यांनीं चिकाटीनें व तत्परतेनें चालविलें. रा. केळकर येण्याच्या अगोदर आणि नंतरहि लोकमान्यांनीं पुण्यांतल्या कांहीं जणांना बोलावून त्यांचा अंदाज पाहिला नाहीं असें नव्हे; पण त्यांच्यापैकीं कोणी पुढें आला नाहीं. पुण्यांत अनेक व्याख्यानें होतात व तीं लहान मोठे अनेक लोक ऐकतात. परंतु व्याख्यान देणारे आणि व्याख्यान ऐकणारे या दोघांचीहि कळकळ तितपतच असते. कांहीं

तरुण विद्यार्थी— आणि विशेषत: पुण्याखेरीज इतर ठिकाणांहून पुण्यास अभ्यासाकरितां आलेले विद्यार्थी— असल्या व्याख्यानांतील आणि लेखांतील विचारांना, आपल्या अंगच्या स्वदेशविषयक स्वाभाविक कळकळीमुळें बळी पडले व संकटांत सांपडले. व्याख्यानें आणि लेख हे देखाव्याकरितां असतात हा पुणेंकरांचा व्यावहारिक शहाणपणा त्यांना असता तर त्यांचा आयुष्यक्रम निराळ्या प्रकारचा झाला असता.

## मराठी भाषा.

मराठी भाषेला आदर्शभूत स्वरूप पुण्यांत मिळालें आहे ही जुनी गोष्ट या वीस वर्षांच्या वर्णनांत देखील सांगणें जरूर आहे. मराठी मुलूख गोव्यापासून ग्वाल्हेरीपर्यंत आणि बडोद्यापासून हैद्राबादेपर्यंत पसरलेला असल्यानें दूरच्या दोन टोकांस रहाणाऱ्या दोन माणसांची भाषा एकमेकांस समजणें दुरापास्त झालें असतें. परंतु पुण्यानें मराठी भाषेला सुंदर स्वरूप दिलें आहे; आणि या शहराहून आज चाळीस वर्षें दर मंगळवारीं शुद्ध आणि आदर्शभूत भाषेमध्यें लिहिलेलें केसरी वर्तमानपत्र लोकमान्यांच्या तपश्चर्येमुळें मराठी जाणणाऱ्या लोकांत देशाच्या कोनाकोपऱ्यापर्यंत जात असल्याकारणानें मराठी भाषेच्या स्थैर्याला आणि शुद्धतेला मोठी मदत झाली आहे व होत आहे. अवांतर कारणांनीं मराठी भाषेची वाढ जरी खुंटत आहे, तरी वरील विधानाला बाध येत नाहीं. १९०९ सालापासून हैद्राबाद संस्थानांतला मराठी मुलूख निजाम सरकारच्या हुकुमावरून केसरीला आंचवला व त्यामुळें त्या मुलुखांतील मराठी भाषेचें स्वरूपहि कालांतरानें खालच्या प्रतीचें होईल.

पुण्यांतील भाषेसंबंधानें व बोलीसंबंधानें लिहितांना एका उद्वेगकारक गोष्टीचा उल्लेख केल्यावांचून रहावत नाहीं. पुण्यांतले शिक्षित

लोक शुद्ध भाषा लिहितात व बोलतात, परंतु अशिक्षित, हलक्या दर्जाचे व हलक्या जातींचे लोक जी भाषा बोलतात ती हलक्या दर्जाची असते. पुण्यासारख्या शहरांत शिक्षित काय किंवा अशिक्षित काय, सर्वांची भाषा नेहमीं सभ्यपणाची असावयास पाहिजे होती. परंतु हलक्या जातींचे लोक आपापल्या घरांतून आणि रस्त्यांतून भांडतांना आणि सहजपणें बोलतांना देखील शिव्या देत बोलतात हें उद्वेगकारक आहे. त्यांच्या तोंडचे हे अभद्र शब्द वरिष्ठ जातींतील मुलांच्या कानावर पडतात आणि ते त्यांच्या उन्नतीला विघातक होतात. सर्वांची बोली सभ्यपणाची असावी अशासाठीं कधीं कोणीं प्रयत्न केल्याचें माझ्या पहाण्यांत किंवा ऐकण्यांत नाहीं.

## इंग्रजी भाषा.

पुण्यांत इंग्रजी शाळा व कॉलेजें वरींच आहेत, अर्थात इंग्रजी शिक्षणाचा प्रसार पुष्कळ झालेला आहे. तथापि इतर प्रांतांतले लोक इंग्रजी भाषा जशी मातृभाषेप्रमाणें सफाईनें बोलतात तशी पुण्यांतल्या लोकांना—व सामान्यपणें मराठी लोकांना—बोलतां किंवा लिहितां येत नाहीं. कलकत्ता व मद्रास या शहरीं इंग्रजींत दैनिक वर्तमानपत्रें बंगाली व मद्रासी लोक चांगल्या प्रकारें चालवितात. तसा प्रकार पुण्यास घडावयास हरकत नव्हती. पण आमच्या इकडील लोकांचें इंग्रजी भाषेकडे लक्ष नाहीं. यामुळें कॉंग्रेसमध्यें किंवा कौन्सिलांत किंवा जाहिरसभांतून इंग्रजींत बोलण्याचा प्रसंग पुण्याच्या लोकांवर आला म्हणजे त्यांचें वैगुण्य ठळकपणानें नजरेस येतें. कै. महादेव मोरेश्वर कुंटे इंग्रजी चांगलें बोलत असत असें ह्मणतात. अलीकडे मराठी समाजांत इंग्रजी चांगलें बोलणारे फक्त नामदार गोखले होऊन गेले. हल्लीं मुंबईचे बॅरिस्टर जयकरहि बरे बोलतात. पण यांखेरीज कोणाहि पुढाऱ्याला इंग्रजी चांगलें बोलतां येत नाहीं.

परिस्थितीवर जय मिळविणें असेल तर आधीं आपल्यामध्यें परि-
तीला अनुसरून फरक करावा लागतो, म्हणजेच हा जय मिळतो.
याला इंग्रजींत adaptability म्हणतात. हा गुण सर्व बाबतींत
आमच्या ब्राह्मणसमाजांत कांहीं तरी आढळतो; पण इंग्रजी भाषेच्या
बाबतींत मात्र याचा अत्यंताभाव कां हें एक गूढ आहे. "आह्मांला
मराठी भाषेचा अभिमान आहे" असें कोणी उत्तर देऊं पाह-
तील. परंतु हें उत्तर द्राक्षें हातास येत नाहींत ह्मणून तीं आंबट
ह्मणण्यापैकींच आहे. कारण बंगाली लोकांनीं इंग्रजी आपलीशी
करून घेतली आहे, तरी त्यांनीं आपला बंगालीचाहि अभिमान सिद्ध
करून दाखविला आहे; आणि आमच्या लोकांना इंग्रजी तर येत
नाहींच, पण मराठीच्या अभिमानाचे काय दिग्विजय केले आहेत
तेहि कोठें दिसत नाहींत. नांव घेण्याजोगीं पुस्तकें मराठींत दर-
साल दहा तरी निघतात कीं नाहीं मला शंका वाटते.

## धंदे व व्यवहार.

प्रत्येक मोठ्या शहरीं सर्व तऱ्हेचे धंदे चालतात त्याप्रमाणें ते पुण्यां-
तहि चालतात. माझा उद्देश सामाजिक वैशिष्ट्य सांगण्याचा असल्या-
मुळें पुण्यांत कोणते धंदे चांगले चालतात एवढेंच येथें सांगतों.
पुण्यांत चार धंदे उत्तम प्रकारें चालतात, ह्मणजे चांगली किफायत देतात.
ते धंदे डॉक्टरी, वैद्यकी, भिक्षुकी आणि हॉटेल ऊर्फ फराळाचें
दुकान. पैकीं फराळाचीं दुकानें सर्वत्रच चांगलीं चालतात. पुण्यांतलें
हवापाणी दिवसानुदिवस बिघडत असल्यामुळें ह्मणा, किंवा पुण्यांतील
लोक खाण्यापिण्यांत अनियमित होत असल्यामुळें ह्मणा, डॉक्टरी आणि
वैद्यकी हे दोन धंदे येथें अलीकडे चांगली किफायत देतात. भिक्षुकी
उत्तम प्रकारें चालते हें मागें सांगितलेंच आहे. तथापि डॉक्टराची
किंवा वैद्याची बरोबरी भिक्षुक करूं शकत नाहीं हें लक्षांत ठेवावें.

पुण्यांत वकीलीचा धंदा नीट चालत नाहीं. सहा महिन्यांच्या वकीलींत पंचवीस रुपये देखील मिळाले नाहींत असें पाहून येथून दुसरीकडे नशीबाची परीक्षा पहाण्यास गेलेले वकील आहेत. वकीलांची संख्या प्रमाणाबाहेर वाढल्यामुळें बहुधा असें होत असेल. व्यवहार सर्व तऱ्हेचे व चांगल्या वाईट सर्व तऱ्हांनीं चालतात. त्यांत पुण्यानें प्रौढी मिरविण्यासारखें कांहीं नाहीं.

## किरकोळ गोष्टी.

(१) पुणें शहर हें स्वदेशी—बहिष्काराच्या चळवळीचें महाराष्ट्रांतलें केंद्र आहे असें समजतात. स्वदेशी गिरण्यांत तयार झालेलें कापड येथील लोक बऱ्याच प्रमाणानें वापरतात याखेरीज वरील समजुतींत तथ्य कांहीं नाहीं. साखरेच्या बाबतींत पुण्याचे लोक कडक असतील अशी कोणाची समजूत असल्यास ती चुकीची आहे. परदेशी साखर प्रत्यहीं चहांत घालणारे आणि खाणारे यांची संख्या यथास्थित आहे. स्वदेशी साखर खाण्याची शपथ घेतलेल्या लोकांनींहि आपली शपथ सोडून दिली आहे. परदेशी साखर निग्रहानें न खाणारा मनुष्य शोधण्यास प्रयासच पडेल.

(२) हुंडा घेऊं नये ह्मणणारे आपल्या मुलाच्या लग्नाचे वेळेस हुंडा घेतात. सुधारक ह्मणविणारे घेतात, न ह्मणविणारे घेतात. एखादें उदाहरण प्रत्यक्ष हुंडा न घेणारें आढळलें तर तेथें अप्रत्यक्ष रीतीनें हुंडा उकळला आहे असें समजावें.

(३) बधितला जिन्नस मागण्याकडे सामान्यतः पुण्यांत प्रवृत्ति आहे. आपल्याला ज्या जिनसाची जरूर आहे तो जिन्नस कोणाचे घरीं आहे हें त्यांच्या लक्षांत असतें, आणि जरूर लागली कीं तो त्याजवळ मागण्यास ते कमी करीत नाहींत. मागाहून तो जसा होता तसा परत येणें कठिण असतें. मोडून, तोडून, नासून, फाडून अशा तऱ्हेनें

परत मिळावयाचा. मागितल्याशिवाय बहुधा परत मिळावयाचा नाहीं हें तर ठरलेलेंच.

(४) पुस्तकें वाचण्याची पुष्कळांना गोडी आहे. पण पुस्तकें विकत घेऊन वाचण्याची संवय नाहीं. पुस्तकें वाचण्याकरितां उसनीं मागण्यांत कमीपणा कोणाला वाटत नाहीं. अशीं उसनीं घेतलेलीं पुस्तकें बहुधा हरवतात आणि मूळच्या मालकानें पुस्तक परत मागितल्यावर तें हरवलें असें सांगण्यांतहि कमीपणा वाटत नाहीं. लायब्रऱ्यांतील पुस्तकें वाचण्यास नेऊन त्यांतलीं चित्रें आणि पानें फाडण्याकडेहि प्रवृत्ति आहे. यावरून पुस्तकांना कांहीं किंमत आहे असें लोकांना वाटत नाहीं असें अनुमान होतें. श्रीमंत लोक गरीब मनुष्याजवळ पुस्तकें फुकट मागतात; पण उलटपक्षीं त्यांच्याजवळ कोणीं पांच रुपये उसने मागितले तर देत नाहींत. दिलेच तर व्याजाखेरीज देत नाहींत.

## पुण्यांतील स्त्रिया.

पुण्यांतील पुरुषांसंबंधानें आतांपर्यंत माहिती सांगितली. आतां स्त्रियांसंबंधानें कांहीं तरी लिहिणें अवश्य आहे. आधीं ब्राह्मण स्त्रियांसंबंधानें लिहितों. सुधारकांच्या पूर्वींच्या परिश्रमानें या वीस वर्षांच्या काळांत पुण्यांत स्त्रीशिक्षणाचें पाऊल पुढें पडलें. साधारणतः ब्राह्मणाची मुलगी लग्न होईपर्यंत शाळेंत जात असते असें समजावें. परंतु या शिक्षणाचा कांहीं परिणाम पुढें त्यांच्या वर्तनांत झाल्याचें दिसत नाहीं. कारण शिक्षण ह्मणजे चार अक्षरें लिहितां वाचतां येणें एवढाच अर्थ होय. स्त्रीसमाज जितका धर्मभोळा आणि जितका वेडगळ होता तितका अद्याप आहे. किंबहुना अधिक वेडगळ झाला आहे असें मला वाटतें. अलीकडे घरांतलीं कामें करण्याची प्रवृत्ति कमी होत आहे व यामुळें बायकांना रिकामा वेळ मुबलक सांपडतो, व या

वेळाचा उपयोग जगाच्या उठाठेवी करण्यांत जातो. अमकी बाई अशी आहे, अमकी तशी आहे, आणि मी मात्र चांगली असें ऐकणारणींच्या मनावर बिंबविण्यांत या काळाचा व्यय होतो. नवरा मेलेल्या बायका, आणि नवरा मेल्यामुळें माहेरीं परत येऊन राहिलेल्या बायका यांना या उठाठेवी अधिक सुचतात. बातम्यांचा प्रसार करण्याच्या कामांत बायका बिनतारी तारायंत्रावरहि ताण करतात. पुरुषांच्या स्वभावांत जोंपर्यंत सुधारणा होत नाहीं, तोंपर्यंत बायकांना तरी दोष काय ह्मणून द्यावा ?

पुण्यांतल्या ब्राह्मणी बायकांत स्वयंपाकाच्या बायका हा एक स्वतंत्र वर्ग होऊं पहात आहे. याचें कारण घरांतल्या बायकांचा आळस. १००।१२५ रुपये दरमहा पगार असला कीं घरांत स्वयंपाकाला बाई पाहिजेच. आणि अशा बायकांची जरूर जास्त झाल्यामुळें त्यांचें माहात्म्य या काळांत पुष्कळ वाढलें. त्या मागतील तो पगार आणि ह्मणतील त्या अटी पतकरून वाढतील तसें अन्न खावें आणि नासतील तितकें अन्न नासू द्यावें असा प्रकार सहन करावा लागतो.

## पुण्यांतील मुलें आणि विद्यार्थी.

लहान मोठ्या मुलांना पुण्यांत मोठ्या माणसांचा सहवास अधिक घडतो. हीं मोठीं माणसें कोणी शहाणपणांत, कोणी विद्वत्तेंत, कोणी हुशारींत, कोणी व्यवहारचातुर्यांत, कोणी मूर्खपणांत, कोणी लबाडींत, कोणी दुष्टपणांत आणि कोणी हलकटपणांत तरबेज असतात. अशीं अनेक माणसें मुलांच्या पहाण्यांत व परिचयांत येतात आणि यामुळें मुलांना लहान वयांत मोठेपणच्या गोष्टी कळूं लागतात. त्यांत चांगल्या गोष्टींपेक्षां वाईट गोष्टी लवकर मनावर बिंबतात, व यामुळें मोठ्या माणसांविषयीं त्यांना आदर वाटेनासा होतो आणि मुलें उच्छृंखल व चटोर बनतात लहान मुलें हेच राष्ट्राचे भावी आधारस्तंभ होत. त्यांना वळण चांगलें

लागावें याकरितां त्यांच्या पालकांनीं आणि एकंदर समाजानें काळजी घेणें जरूर आहे. जोंपर्यंत राष्ट्र शीलसंपन्न, सदाचारसंपन्न आणि निःस्वार्थ झालें नाहीं, तोंपर्यंत राजकीय चळवळ म्हणजे नुसती बडबड आणि देखावा होय, त्याचा कांहीं उपयोग होणार नाहीं. आज ज्यांचें वय मोठें झालेलें आहे त्यांचा विचार बाजूला राहूं द्या. पण ज्यांचें वय आणि अंतःकरण अद्याप कोमळ आहे त्यांना तरी शीलसंपन्न बनविण्याविषयीं प्रयत्न करावयास पाहिजे. आमच्या लोकांना सध्यां कोणत्याहि सामाजिक कर्तव्याची जाणीव भासत नाहीं हें दुर्दैव होय. अर्थात् मुलांना नैतिक शिक्षण देण्याविषयीं कोणीच विचार करीत नाहीं. पुण्यामध्यें मुलांना जें अनिष्ट वळण लागत आहे तें न लागण्यास प्रथमतः पुढील उपाय माझ्या मतें अवश्य अंमलांत आणले पाहिजेत—

१ प्रत्येक शाळेंत प्रत्येक वर्गाला नैतिक शिक्षण हा स्वतंत्र विषय नेमून तो शिकविला पाहिजे.

२ नाटक, सिनेमा आणि व्याख्यान यांपैकीं कोठेंहि सोळा वर्षांच्या आंतील मुलांस जाण्याची बंदी केली पाहिजे.

३ फाल्गुनांतल्या सार्वजनिक होळ्या आणि दुसऱ्या दिवसाची धुळवड हीं कायद्यानें बंद करून बंदीची सक्त बजावणी केली पाहिजे.

४ सार्वजनिक ठिकाणीं म्हणजे रस्त्यावर शिवीगाळ करणें हा फौजदारी गुन्हा होय असें कायद्यानें ठरवून घेतलें पाहिजे.

५ रस्त्यामध्यें कोणत्याहि माणसाच्या तोंडांतून शिवीगाळीचा उच्चार न होऊं देण्यासाठीं आणि झाल्यास तो करणाराला धरून कोर्टापुढें नेण्यासाठीं एका स्वतंत्र स्वयंसेवक संघाची स्थापना झाली पाहिजे.

६ जातीजातीच्या पुढाऱ्यांनीं आपापल्या जातीच्या सभा वेळो-

वेळीं भरवून सदाचरण, अपशब्द न उच्चारणें, दारू न पिणें वगैरे बाबींचें महत्त्व लोकांच्या मनावर बिंबविलें पाहिजे.

---

## भाग ३ रा.

# पुण्यांतल्या चळवळी.

महाराष्ट्रांतील बहुतेक चळवळींचा उगम पुण्यास होतो आणि त्या चळवळींचें पुणें हेंच केंद्र बनतें. मराठी समाजांत आर्थिक, व्यापारविषयक आणि औद्योगिक या चळवळी झालेल्या नाहींत; कारण हे विषय मराठी लोकांचे नव्हेत. राजकीय, सामाजिक, शैक्षणिक आणि धार्मिक चळवळी मराठी लोक करतात व त्या चळवळींत अग्रेसरत्वाचा मान पुणें शहरानें राखला आहे. हा मान सुमारें १८६० सालापासून आजतागायत पुण्याकडे अव्याहत-पणें चालू आहे. कै. महादेव गोविंद रानडे, कै. विष्णुशास्त्री चिपळूणकर, प्रि. आगरकर, लोकमान्य टिळक, नामदार गोखले, प्रो. कर्वे, रँगलर परांजपे प्रो. परांजपे, आणि रा. नरसोपंत केळकर या प्रसिद्ध व्यक्तींनीं या काळांत ह्मणजे १८६० पासून १९२० पर्यंत पुण्यांत या चळवळी आपापल्या काळांत नेटानें चालविल्या. पुणें शहराचा हा मान जिंकून घेण्यास नजीकच्या भविष्य काळांत देखील दुसरीं शहरें समर्थ होतील असें वाटत नाहीं. मुंबई व नागपूर येथील मराठी समाज पुण्यासारखा सुसंबद्ध नाहीं. या दोन शहरीं पुण्याच्या खालोखाल चळवळी चालतात. तथापि डॉ. केतकरांना ज्ञानकोशाचें काम नागपुराहून पुण्यास आणावें लागलें या एका उदाहरणावरूनच वरील चळवळींना अनुकूल वातावरण पुण्यासच आहे असें सिद्ध होतें. यांमध्यें राजकीय चळवळ सर्वांत महत्त्वाची आहे. वीस वर्षांत राजकीय चळवळ पुण्यास कशी काय झाली याचें प्रथमतः विवेचन करूं.

## राजकीय चळवळ.

या काळांत १९०१ पासून १९०४।०५ पर्यंत राजकीय चळवळ सामान्यतः कांग्रेसच्या जुन्या पद्धतीनें चालू होती. ह्मणजे लोकांचीं गाऱ्हाणीं लोकांनीं कांग्रेसच्या आणि प्रांतिक सभांच्या द्वारें सरकारापुढें मांडावीं, आणि सरकारनें कृपाळूपणानें तीं दूर करण्याविषयीं सरकाराला विनंती करावी, अर्जे वगैरे करावे, अशी पद्धत होती. सरकार ही संस्था देशांतील लोकांच्याच आधारावर उभी असली पाहिजे ही कल्पना पुढाऱ्यांच्या डोक्यांत असली तरी ती व्यवहारांत आणण्याच्या धोरणानें त्यांची चळवळ नव्हती. इंग्रज सरकारचें सामर्थ्य विलायतेंतील जनतेवर अवलंबून आहे, हिंदुस्थानांतल्या जनतेवर नाहीं, हा सिद्धांत त्यांनीं ठाम ठरविला होता. १९०५ सालीं बंगालची फाळणी झाल्याबरोबर कांहीं बंगाली पुढाऱ्यांनीं जुनी पद्धत त्याज्य ठरवून नव्या पक्षाची उभारणी केली. या नव्या पक्षाचें अध्वर्युत्व बाबू बिपिनचंद्र पाल, अरविंद घोस आणि श्यामसुंदर चक्रवर्ती यांचेकडे होतें. सदर चळवळ ही राष्ट्रकार्याला पोषक होईल असें पाहून लोकमान्य टिळकांनीं तत्काल तिचा स्वीकार केला, आणि महाराष्ट्रांत या नव्या पक्षाचें पुढारीपण त्यांचेकडे आलें. १९०५ पासून केसरी या नव्या राष्ट्रीय चळवळीचा पुरस्कर्ता बनला. बंगालच्या स्वदेशीबहिष्कार चळवळीला पाठिंबा देण्याला पुण्याचे मोठ्या वयाचे लोक कांकूं करीत असतां पुण्यांतल्या विद्यार्थ्यांची बिनीची फौज रा. विनायक दामोदर सावरकर यांनीं उभारून विद्यार्थ्यांच्या एक, दोन, तीन, सभा भरविल्या. या सभांस लो. टिळक आणि प्रो. शिवराम महादेव परांजपे यांचें साहाय्य असे. त्या सालीं दसऱ्याच्या दिवशीं पुण्यास विलायती कापडाची होळी करण्यांत आली. या होळीचा आग्रह रा. साव-

करांनीं धरला. रा. सावरकर हे त्या वेळेस फर्ग्यूसन कॉलेजांत सीनियर बी. ए. च्या वर्गांत होते व कॉलेजच्या विद्यार्थी–वसति-गृहांत रहात होते. लो. टिळक प्रथमतः होळीच्या कल्पनेला अनुकूल नव्हते व होळीच्या प्रसंगीं हजर रहाण्यास तयार नव्हते. रा. सावरकर लोकमान्यांना मान देत असत; परंतु टिळक हे तत्पूर्वीच्या जुन्या काळाला योग्य पुढारी होत, या काळाला त्यांचा उपयोग नाहीं, अशी सावरकरांची समजूत त्या वेळीं होती. पुढें सावरकरांचा जो आयुष्यक्रम झाला त्या आयुष्यक्रमाला अनुरूप अशी ही समजूत होती. तथापि टिळकांच्याच छत्राखालीं आपणांला चळवळ करणें जरूर आहे हें ज्ञान सावरकरांना होतें आणि याकरितां त्यांनीं स्वत: टिळकांकडे येऊन त्यांच्याशीं वादविवाद करून विलायती कापडाच्या होळीच्या ठिकाणीं टिळकांना घेऊन ते दाखल झाले. याच सालीं शिवाजीच्या राज्यारोहणोत्सवांत सावरकरांनीं एक निबंध वाचला होता. अशा प्रकारें राजकीय चळवळींत इतक्या ठळकपणानें पडणें फर्ग्यूसन कॉलेजचे प्रिन्सिपाल रँगलर परांजपे यांना पसंत पडलें नाहीं. दुसऱ्याच्या होळीनंतर अशा मनुष्यास विद्यार्थी–वसति-गृहांत राहूं न देण्याचें रँगलर परांजपे यांनीं ठरवून सावरकरांस वसतिगृहांतून दुसरीकडे जाण्याचा हुकूम दिला. सावरकरांना युनिव्हर्सिटीच्या परीक्षेला बसण्याची त्यांनीं कांहीं मनाई केली नाहीं. त्याच सालीं नोवेंबरांत बी. ए. च्या परीक्षेला बसून सावरकर पास झाले. पुढील सालीं ते पं. श्यामजी कृष्णवर्मा यांची स्कॉलरशिप मिळवून विलायतेला गेले, वगैरे पुढील हकीकत येथें अप्रस्तुत असल्यामुळें अधिक सांगत नाहीं.

१९०६ सालीं लोकमान्य टिळकांनीं रायगडावर जाऊन शिवाजीचा जन्मोत्सव केला. रायगडावर दरसाल मोठ्या प्रमाणांत उत्सव होत

 दा. क्र. [illegible]

[illegible] १९०० सालीं असा उत्सव [illegible] [illegible] [illegible] याने राजकीय चळवळीला अधिक जोर आला. बंगाल्यांतल्या [illegible]-त्सव झाल्यानंतर ज्येष्ठांत राज्यारोहणोत्सव कलकत्त्यासहि झाला व तेथें लोकमान्य टिळक व रा. गणेश श्रीकृष्ण खापर्डे यांना मुद्दाम बंगाली लोकांनीं बोलावून नेलें. बंगाल्यांत या वेळीं बहिष्काराची चळवळ ऐन जोरांत होती. बारीसाल शहरीं नुकतीच प्रांतिक परिषद भरली होती व त्या वेळीं मिरवणुकीसंबंधीं तंट्यावरून ना. सुरेंद्रनाथ बानर्जी यांनाहि कांहीं काळ अटक झालेली होती. कलकत्त्यास टिळकांचा अपूर्व सन्मान झाला, आणि ना. सुरेंद्रनाथ बानर्जींच्या अध्यक्षतेखालीं त्यांचें व्याख्यान झालें. या सालीं डिसेंबरांत कांग्रेसची बैठक कलकत्त्यास व्हावयाची होती. कांग्रेसचीं सूत्रें जुन्या लोकांच्याच हातांत होतीं, आणि हे जुने लोक टिळकांना कांग्रेसमध्यें मान देत नसत. याचें कारण टिळकांना मान देणें ह्मणजे सरकारचा रोष करून घेणें अशी समजूत होय. परंतु कांग्रेसमध्यें आपल्या पक्षाचें प्राबल्य करूं इच्छिणाऱ्या बिपिनचंद्र पाल प्रभृति बंगाली लोकांनीं १९०६ च्या कांग्रेसचें अध्यक्षस्थान टिळकांना द्यावें या उद्देशानें लोकमत जाहीर करण्याकरितां बंगालप्रांतभर सपटेंबर आक्टोबरांत ठिकठिकाणीं सभा भरविल्या, तेव्हां सुरेंद्रनाथ प्रभृतींचें धाबें दणाणलें आणि त्यांनीं विलायतेस दादाभाई नवरोजींना तारेनें अध्यक्षस्थान स्वीकारण्याची विनंती केली. ती त्यांनीं मान्य केली. दादाभाईंना इरेस घातल्याबरोबर टिळकांनीं आपली पूर्ण संमति जाहीर करून स्वतःच्या अध्यक्षपदासंबंधीचा खटा-टोप बंद करविला. 'स्वराज्य' हें आमचें अंतिम ध्येय आहे असें दादाभाईंनीं कलकत्त्यास सांगितलें व अशा प्रकारें दादाभाईंसारख्या सर्वमान्य पुढाऱ्याकडून, टिळकांना अध्यक्ष केलें असतां ते जें सांग-णार, किंवा त्यांनींहि जें सांगितलें नसतें, त्याचा उच्चार झाल्यामुळें तो

करांनीं भरला. रा. सावरकर हे त्या वेळेस फर्ग्यूसन कॉलेजांत सीनियर बी. ए. च्या वर्गांत होते व कॉलेजच्या विद्यार्थी–वसतिगृहांत रहात होते. लो. टिळक प्रथमतः होळीच्या कल्पनेला अनुकूल नव्हते व होळीच्या प्रसंगीं हजर रहाण्यास तयार नव्हते. रा. सावरकर लोकमान्यांना मान देत असत; परंतु टिळक हे तत्पूर्वीच्या जुन्या काळाला योग्य पुढारी होत, या काळाला त्यांचा उपयोग नाहीं, अशी सावरकरांची समजूत त्या वेळीं होती. पुढें सावरकरांचा जो आयुष्यक्रम झाला त्या आयुष्यक्रमाला अनुरूप अशी ही समजूत होती. तथापि टिळकांच्याच छत्राखालीं आपणांला चळवळ करणें जरूर आहे हें ज्ञान सावरकरांना होतें आणि याकरितां त्यांनीं स्वतः टिळकांकडे येऊन त्यांच्याशीं वादविवाद करून विलायती कापडाच्या होळीच्या ठिकाणीं टिळकांना घेऊन ते दाखल झाले. याच सालीं शिवाजीच्या राज्यारोहणोत्सवांत सावरकरांनीं एक निबंध वाचला होता. अशा प्रकारें राजकीय चळवळींत इतक्या ठळकपणानें पडणें फर्ग्यूसन कॉलेजचे प्रिन्सिपाल रँगलर परांजपे यांना पसंत पडलें नाहीं. दुसऱ्याच्या होळीनंतर अशा मनुष्यास विद्यार्थी–वसति-गृहांत राहूं न देण्याचें रँगलर परांजपे यांनीं ठरवून सावरकरांस वसतिगृहांतून दुसरीकडे जाण्याचा हुकूम दिला. सावरकरांना युनिव्हर्सिटीच्या परीक्षेला बसण्याची त्यांनीं कांहीं मनाई केली नाहीं. त्याच सालीं नोवेंबरांत बी. ए. च्या परीक्षेला बसून सावरकर पास झाले. पुढील सालीं ते पं. श्यामजी कृष्णवर्मा यांची स्कॉलरशिप मिळवून विलायतेला गेले, वगैरे पुढील हकीकत येथें अप्रस्तुत असल्यामुळें अधिक सांगत नाहीं.

१९०६ सालीं लोकमान्य टिळकांनीं रायगडावर जाऊन शिवाजीचा जन्मोत्सव केला. रायगडावर दरसाल मोठ्या प्रमाणांत उत्सव होत

नवे. १९०० सालीं असा उत्सव झाला होता. १९०६च्या उत्सवानें राजकीय चळवळीला अधिक जोर आला. वैशाखांतल्या जन्मोत्सव झाल्यानंतर ज्येष्ठांत राज्यारोहणोत्सव कलकत्त्यासहि झाला व तेथें लोकमान्य टिळक व रा. गणेश श्रीकृष्ण खापर्डे यांना मुद्दाम बंगाली लोकांनीं बोलावून नेलें. बंगाल्यांत या वेळीं बहिष्काराची चळवळ ऐन जोरांत होती. बारीसाल शहरीं नुकतीच प्रांतिक परिषद भरली होती व त्या वेळीं मिरवणुकीसंबंधीं तंट्यावरून ना. सुरेंद्रनाथ बानर्जी यांनाहि कांहीं काळ अटक झालेली होती. कलकत्त्यास टिळकांचा अपूर्व सन्मान झाला, आणि ना. सुरेंद्रनाथ बानर्जींच्या अध्यक्षतेखालीं त्यांचें व्याख्यान झालें. या सालीं डिसेंबरांत कांग्रेसची बैठक कलकत्त्यास व्हावयाची होती. कांग्रेसचीं सूत्रें जुन्या लोकांच्याच हातांत होतीं, आणि हे जुने लोक टिळकांना कांग्रेसमध्यें मान देत नसत. याचें कारण टिळकांना मान देणें ह्मणजे सरकारचा रोष करून घेणें अशी समजूत होय. परंतु कांग्रेसमध्यें आपल्या पक्षाचें प्राबल्य करूं इच्छिणाऱ्या विपिनचंद्र पाल प्रभृति बंगाली लोकांनीं १९०६ च्या कांग्रेसचें अध्यक्षस्थान टिळकांना द्यावें या उद्देशानें लोकमत जाहीर करण्याकरितां बंगालप्रांतभर सपटेंबर आक्टोबरांत ठिकठिकाणीं सभा भरविल्या, तेव्हां सुरेंद्रनाथ प्रभृतींचें धाबें दणाणलें आणि त्यांनीं विलायतेस दादाभाई नवरोजींना तारेनें अध्यक्षस्थान स्वीकारण्याची विनंती केली. ती त्यांनीं मान्य केली. दादाभाईंना इरेस घातल्याबरोबर टिळकांनीं आपली पूर्ण संमति जाहीर करून स्वतःच्या अध्यक्षपदासंबंधींचा खटाटोप बंद करविला. 'स्वराज्य' हें आमचें अंतिम ध्येय आहे असें दादाभाईंनीं कलकत्त्यास सांगितलें व अशा प्रकारें दादाभाईसारख्या सर्वमान्य पुढाऱ्याकडून, टिळकांना अध्यक्ष केलें असतां ते जें सांगणार, किंवा त्यांनींहि जें सांगितलें नसतें, त्याचा उच्चार झाल्यामुळें तो

एक विलक्षण फायदा झाला. दादाभाईंनीं 'स्वराज्य' शब्द संदिग्ध भाषेंत उच्चारला होता; ह्मणजे त्याचा अर्थ वाटेल तसा करतां येई व त्याप्रमाणें निरनिराळे लोक करीतहि. तथापि या कांग्रेसमध्यें विलायती मालाच्या बहिष्काराची बंगालनें सुरू केलेली चळवळ कायदेशीर आहे व तिला कांग्रेसचा पाठिंबा आहे असा ठराव पास होऊन नव्या राष्ट्रीय पक्षाच्या तंत्रानें राजकीय चळवळ चालणार असें निश्चित झालें. १९०५।०६ सालापर्यंत टिळक हे महाराष्ट्राचे पुढारी होते ते आतां हिंदुस्थानाचे पुढारी झाले. १९०४ सालच्या मुंबईच्या कांग्रेस-मध्यें टिळकांना नेमस्त पुढाऱ्यांनीं कमीपणा दिला होता, तो मनु बदलला आणि टिळक राष्ट्राचे पुढारी झाले.

१९०७ सालीं कॉंग्रेस नागपुरास भरावयाची होती. तेथील राष्ट्रीय पक्षानें तर टिळकांना अध्यक्षस्थान देण्याचा विडाच उचलला आणि त्या धोरणानें त्यांनीं प्रयत्न चालविले. नेमस्त पक्षाला तर टिळक नको होते व कलकत्त्याचे ठरावहि मागें ओढून दादाभाईंच्या संदिग्ध 'स्वराज्य' शब्दाला "ब्रिटिश साम्राज्यांतर्गत स्वराज्य" हा स्पष्ट अर्थ द्यावयाचा होता. नागपुरास हे उद्देश सिद्धीस जाण्याचा जेव्हां त्यांना संभव दिसेना तेव्हां आयत्या वेळीं सुर-तेस कॉंग्रेस भरविण्याचें त्यांनीं ठरविलें. या सालच्या उन्हाळ्यांत पंजाबांतील देशभक्त लाला लजपतराय यांना सरकारनें हद्दपार करून मंडालेस नेऊन ठेवलें होतें ते नोवेंबरमध्यें सुटले. त्यांना अटक करण्यांत राष्ट्राचा जो अपमान झाला तो धुवून टाकण्या-साठीं त्यांना सुरतेच्या कॉंग्रेसचें अध्यक्षस्थान द्यावें अशी खटपट टिळकांनीं चालविली. परंतु खुद्द लालाजींनीं याला विरोध केला. तेव्हां आपल्या पक्षाचे शक्य तितके अधिक लोक घेऊन सुरतेस येण्याविषयीं टिळकांनीं राष्ट्रीय पक्षाला जाहीर आग्रह केला. त्याप्रमाणें

राष्ट्रीय पक्ष सुरतेस जमला. प्रतिनिधींचें संख्याबळ पाहिल्यास सुमारें अर्धे प्रतिनिधी नेमस्त पक्षाचे व अर्धे राष्ट्रीय पक्षाचे होते. परंतु, राष्ट्रीय पक्षांत लोकमान्य टिळक, बाबू अरविंद घोस, रा. खापर्डे आणि बॅरिस्टर चतरजी यांचेखेरीज बाकीचीं माणसें पुढाऱ्यांत मोडलीं जात नसत. लाला लजपतराय, बाबू मोतीलाल घोस आणि बाबू अश्विनीकुमार दत्त हे पुढारी दोन पक्षांची दिलजमाई करण्यास झटत होते आणि बाकीचे सर्व जुने कॉंग्रेसचे पुढारी कॉंग्रेसचा जुना मार्ग बदलूं नये आणि आपलें पुढारीपण जाऊं नये म्हणून खटपट करीत होते. राष्ट्रीय पक्षाच्या कांहीं सभा कॉंग्रेसमध्यें काय धोरण ठेवावें या संबंधानें विचार करण्याकरितां बाबू अरविंद घोस यांचे अध्यक्षतेखालीं सुरतेस झाल्या. या सभांतून लो. टिळक हेच प्रमुख होते. अर्थात् या प्रसंगानें राष्ट्रीय पक्षाचें त्यांचें पुढारीपण कायम झालें. या लौकिकाला साजेल असें त्यांनीं कॉंग्रेसमध्यें वर्तन केलें. संकटाच्या वेळीं आपल्या हाताखालच्या लोकांना पुढें करून स्वतः मागें रहाणारा तो पुढारी नव्हे. तर संकटाचे प्रसंगीं जो स्वतः उडी घालतो तो पुढारी. टिळकांनीं छातीवर हातांत हात बांधून डॉ. राशबिहारी घोस यांच्या अध्यक्षपदास विरोध केला. या प्रसंगीं झालेल्या खुर्च्यांच्या फेंकाफेंकींत आणि लाठ्यांच्या मारामारींत त्यांना शारीरिक दुखापत झाली असती; परंतु प्रसंगाचा अंदाज ताडून रावळपिंडीचे बॅरिस्टर भगत, नागपूरचे डॉ. गद्रे आणि इतर मंडळी यांनीं तत्काल पुढें होऊन त्यांचें संरक्षण केलें. सुरतेस असतांना कांहीं बंगाली तरुण गुप्तपणें टिळकांना भेटले व अत्याचारी चळवळीला त्यांची संमति मागूं लागले. ही संमति टिळकांनीं दिली नाहीं.

सुरत कॉंग्रेस मोडल्यानंतर नेमस्त पक्षानें अलाहाबादेस जमून

एप्रिलमध्यें कॉंग्रेसकरितां नवी घटना तयार केली. इकडे टिळकांनीं मे महिन्यांत धुळयास प्रांतिक सभा भरवून कॉंग्रेसची घडी पूर्ववत चालू ठेवण्याचा घाट घातला. इतक्यांत बंगालमध्यें मुझफरपूर (आतां मुझफरपूर बहारमध्यें आहे) येथें बांबचा अत्याचार झाला व त्याबरोबर सरकारनें उग्र स्वरूप धारण केलें. असले अत्याचार झाल्याबरोबर पुढाऱ्यांवर राजद्रोहाचे खटले होतात हें टिळकांना पूर्वीच्या अनुभवावरून माहीत होतें. त्याप्रमाणें "देशाचें दुर्दैव" आणि "हे उपाय टिकाऊ नव्हेत" या केसरींतल्या दोन लेखांबद्दल खटला उभारून टिळकांस १९०८ च्या जून महिन्यांत मुंबईस अटक झाली. हे दोन्ही लेख मुझफरपूरच्या बांबसंबंधानें होते. केसरीवर प्रकाशक या नात्यानें टिळकांचेंच नांव असल्यामुळें दोन्ही लेखांची कायद्याप्रमाणें जबाबदारी त्यांचेकडेच होती. तथापि पहिला लेख खुद्द त्यांचा होता व तेवढ्यावरूनच आरंभीं वारंट बजावलें असल्यामुळें हायकोर्टांत तेवढ्यावरून शिक्षा ठोठावणें अशक्य नाहीं तरी कठिण पडेल असें टिळकांस वाटत होतें. सरकारचीहि समजूत अशीच असावी. कारण थोड्या दिवसांनीं टिळक अटकेंत असतांच दुसऱ्या लेखाबद्दल वारंट बजावण्यांत आलें. दोन्ही गुन्ह्यांची एकत्र चवकशी हायकोर्टांत जस्टिस दावर आणि नऊ जणांची स्पेशल ज्यूरी यांचेपुढें चालली. टिळकांनीं या वेळीं आपला डिफेन्स बॅरिस्टरामार्फत न चालवितां स्वतः चालविला. हा डिफेन्स ह्मणजे राजद्रोहाच्या कलमावर एक विस्तृत ग्रंथच होय, व यांत टिळकांनीं आपलें बुद्धिसर्वस्व खर्च करून कायदेपंडितांस आश्चर्य करून ठेवलें आहे. या डिफेन्सचा कांहीं उपयोग न होतां ज्यूरींतील नऊ इसमांपैकीं सात इसमांनीं "गुन्हा शाबीत" असें मत दिलें व तें न्यायाधीशांनीं ग्राह्य समजून

लोकमान्यांना सहा वर्षांची सक्त मजुरीची शिक्षा ठोठावली.

टिळकांनीं दिलेल्या डिफेन्सचा मला येथें विस्तार करावयाचा नाहीं. त्यांतलें वैशिष्टय मात्र सांगतों. "राजद्रोहाचें कलम अमुक प्रकारचें आहे, आणि त्याचा असा असा अर्थ केला असतां मी गुन्हेगार ठरत नाहीं, मीं जें लिहिलें तें लिहिण्याचा मला कायदेशीर रीतीनें हक्क आहे, तें राजद्रोहाच्या कलमाखालीं येऊं शकत नाहीं. लोकहितासाठीं राजकीय विषयावर लिहिणें माझें कर्तव्य आहे, पण हें कर्तव्य करीत असतां राजद्रोहाच्या कलमाचें उल्लंघन मी करीत नाहीं," हा टिळकांचा मुद्दा आहे. आतां महात्मा गांधींनीं चळवळीला वेगळें वळण लावलें आहे व त्यामुळें टिळकांची पद्धत जुनी झाली आहे. "तुमचें राजद्रोहाचें कलम मी मानीत नाहीं; माझ्या देशाच्या हिताच्या दृष्टीनें मला जें योग्य वाटतें तें मीं केलें आणि करणार; तुमच्या कायद्याप्रमाणें माझें कृत्य गुन्हा होत असेल तर तो गुन्हा मीं केला, पण हा करणें माझें कर्तव्य असें मी समजत असल्यामुळें मी तो करणार" ही गांधी पद्धत. अशा प्रकारें एका मोठ्या जगड्व्याळ राज्ययंत्राला गांधींनीं जोराचा धक्का दिला व डिफेन्स देण्याची पद्धत बंद पाडली. अर्थात् यापुढें राजद्रोहाचे कितीहि खटले झाले तरी टिळकांच्या पद्धतीनें—ह्मणजे सरकार आणि कायदा यांना मानण्याच्या पद्धतीनें—यापुढें कोणी डिफेन्स देईल असें वाटत नाहीं.

टिळकांच्या खटल्याचें विस्तृत वर्णन इंग्रजींत रा. नरसोपंत केळकरांनीं तयार करून छापलें होतें व त्याचीं मराठींत दोन भाषांतरेंहि झालीं. हीं तिन्ही पुस्तकें लार्ड सिडेनहॅम यांच्या कारकीर्दींत १९१० सालच्या प्रेस ॲक्टाप्रमाणें सरकारजमा झालीं. यामुळें आतां हा डिफेन्स वाचण्यास मिळणें देखील मुष्किलीचें झालें आहे. फक्त लॉ रिपोर्टांतून कांहीं वाचावयास मिळेल.

न्यायाधीशानें शिक्षा सांगितल्याबरोबर टिळकांनीं जे उद्गार काढले त्यांत त्यांनीं ईश्वरी इच्छेचा उल्लेख केला. टिळक हे राजकीय चळवळींत ईश्वराचें नांव कधीं आणीत नसत. त्यांनीं तें या उद्गारांत आणलें, पण त्याप्रमाणें पुढें त्यांच्या गैरहजेरींत कांहीं घडून आलें नाहीं. आपल्या मागें आपली चळवळ मोठ्या नेटानें लोक चालू ठेवतील अशी त्यांची कल्पना होती ती निखालस खोटी ठरली. "जो मनुष्य जसा असतो तसे त्याला इतर लोक दिसत असतात" हा नियम व्यवहारचतुर मनुष्यांना लागू नसतो. टिळकांच्या बाबतींत हा नियम लागू पडूं नये, पण तो या वेळीं लागू पडला. इतर लोकहि आपल्या प्रमाणेंच धैर्यशील, चिकाटीचे, देशभक्त, स्वार्थत्यागी, बुद्धिमान आणि भाग्यशाली असतील असें टिळकांना वाटलें. पण हा त्यांचा समज खोटा ठरला आणि सहा वर्षांच्या त्यांच्या गैरहजेरींत महाराष्ट्रांतील राजकीय चळवळ नष्टप्राय झाली.

लोकमान्य टिळकांना शिक्षा रात्रीं साडे नऊ वाजतां सांगण्यांत आली व लगेच तयार ठेवलेल्या स्पेशल ट्रेननें त्यांना अहमदाबादच्या शेजारच्या साबरमती जेलमध्यें नेण्यांत आलें. दुसऱ्या दिवशीं मुंबईस सर्वच लहान मोठे बाजार बंद पडून टिळकांवरील लोकांचें प्रेम अपूर्व प्रकारें व्यक्त झालें. पांढरपेशा जातींपेक्षां इतर जातींचें अधिक व्यक्त झालें आणि दोन तीन दिवस सर्व बाजार, ट्राम, गिरण्या वगैरे बंद पडून मजूर वर्गाकडून सरकारी नोकरांस सरकारी कामावर जाण्याचा देखील अडथळा झाला. याची अखेर दंग्यांत झाली, परंतु अखेरीस सरकारनें जाहीरपत्रक काढून, टिळकांची शिक्षा साध्या कैदेची केली असल्याबद्दल, लिहिण्यावाचण्यास त्यांना खुर्ची टेबल पुस्तकें वगैरे सामान दिलें असल्याबद्दल, आणि स्वयंपाक करण्यास एक स्वतंत्र ब्राह्मण व खाण्यास चपाती तूप दूध वगैरे

पदार्थ देत असल्याबद्दल लोकांस कळविलें. नंतर दंगा शांत झाला. टिळकांना साबरमतीहून पुन: स्पेशल ट्रेननें मुंबईस आणून एका स्वतंत्र आगबोटींतून ब्रह्मदेशांत रंगूनास पोंचविलें व तेथून स्पेशल ट्रेनीनें मंडालेच्या किल्ल्यांतील तुरुंगांत ठेवण्यांत आलें.

लो. टिळकांच्या खटल्याच्या सुमारासच पुण्यांतील काळ पत्राचे संपादक प्रो. शिवराम महादेव परांजपे यांचेवर राजद्रोहाचा खटला चालून त्यांना १९ महिन्यांची सक्त मजूरीची शिक्षा झाली व साबरमतीस ठेवण्यांत आलें.

लोकमान्य टिळकांना शिक्षा झाल्यानंतर कांहीं दिवस पुणें शहरांत व इतरत्र राजकीय चळवळ स्तंभित झाली होती. त्या सालीं कन्व्हेन्शनच्या नियमांना अनुसरून कांग्रेसचें क्रीड "साम्राज्यांतलि स्वराज्य हें आमचें ध्येय" असें ठरविण्यांत आलें होतें व प्रत्येक प्रतिनिधीनें त्यावर सही केली पाहिजे असा नियम झाला होता. ही कांग्रेस मद्रासेस भरली. कांग्रेसच्या पूर्वीच्या नियमांना अनुसरून ही कांग्रेसची बैठक नसल्यामुळें आपण पूर्वीच्या पद्धतीनें कांग्रेसची बैठक भरवावी कीं काय याची वाटाघाट पुण्यास व नागपूरास चालू झाली. या सालीं ता. १ नोवेंबर रोजीं राणीच्या जाहीरनाम्याची ज्युबिली होती व पुढें लवकरच मोर्लेमिंटोच्या सुधारणांचा खलीता प्रसिद्ध होऊन नवीं कौन्सिलें व्हावयाचीं होतीं. टिळकांच्या गैरहजेरींत राजकीय चळवळ एकाच ह्मणजे मवाळ पक्षाच्या हातांत जाण्याची भीति वाटत होती. ह्मणून या कामीं कै. रा. ब. गणेश व्यंकटेश जोशी यांनीं आणि रा. चिंतामण विनायक वैद्य यांनीं प्रयत्न करून राष्ट्रीय पक्षाच्या मंडळींच्या खाजगी बैठकी पुणें व मुंबई येथें भरविल्या व स्वतंत्र रीतीनें पूर्वीप्रमाणें कांग्रेस भरवावी असें ठरलें. नागपूरची मंडळी कांग्रेस भरविण्यास

तयार झाली, व त्यांनीं तयारी चालू केली; परंतु नागपूरसरकारनें ही कांग्रेस भरूं दिली नाहीं व तेव्हांपासून १९१६ सालापर्यंत राष्ट्रीय पक्ष मवाळांच्या कांग्रेसपासून अलिप्त राहिला.

१९१० सालच्या फेब्रुवारी महिन्यांत वरिष्ठ कौन्सिलांत प्रेस ॲक्ट पास झाला. या आक्टाखालीं पुण्यास काळ पत्रावर नोटीस निघून तें पत्र बंद पडलें आणि १९१२ सालीं केसरीवरहि नोटीस निघून त्यांना ५००० रुपये डिपाझिट ठेवावे लागले. आणखी दुसरी नोटीस निघती तर पत्र बंद ठेवण्याची पाळी आली असती, कारण तिसऱ्या नोटीशीबरोबर छापखाना जप्त होण्याची भीति असे. पण त्यांतून केसरी निभावला. 'कसा निभावला' याचें उत्तर शोधूं गेल्यास "टिळकांचें सुदैव" याखेरीज दुसरें उत्तर नाहीं. १९०८ च्या जूनपासून १९०९ च्या अखेरीपर्यंत रा. खाडिलकरांच्या नांवावर केसरी निघत होता. १९१० चा जानेवारीपासून तो रा. केळकरांच्या ताब्यांत आला व तेव्हांपासून आजतागायत त्यांचेकडेच चालू आहे. प्रेस ॲक्टाच्या नोटीशींतून केसरीला निभावण्यांत रा. केळकरांचें कौशल्य खर्ची पडलें, आणि त्यांनाहि जरी शाश्वती वाटत नव्हती, तरी टिळक परत येईपर्यंत केसरीला जिवंत ठेवण्याच्या कामगिरींत त्यांना यश मिळालें. १९१४ च्या जूनमध्यें लोकमान्य टिळकांना मंडालेहून आणून त्यांचे घरीं पोंचविण्यांत आलें.

१९०६ सालच्या कांग्रेसनंतर नेमस्त ऊर्फ मवाळ पक्ष चिडला. लोकमत आपल्या बाजूला करून घेण्यासाठीं नामदार गोखल्यांनीं मार्च एप्रिलमध्यें पंजाब प्रांतांत व्याख्यानांचा दौरा काढला. तों इकडे बाबू बिपिनचंद्र पाल यांनीं आपला दौरा मद्रासेपर्यंत नेला. १९०७ च्या कांग्रेसमध्यें लोकमत कसें आहे तें दिसलें. त्यानंतर बंगाल्यांत पबना आणि महाराष्ट्रांत धुळें येथेंहि प्रांतिक

सभांतून दिसलें. परंतु टिळक कारागृहांत गेल्यापासून आणि बंगाल्यांतील नव्या पक्षाचे पुढारी बांबच्या खटल्यांत गुंतल्यापासून "निर्वीर्यमुर्वीतलं" अशी मवाळांना स्थिति झाली आणि ना. गोखले यांच्याच नेतृत्वाखालीं त्यांची राजकीय चळवळ चालू राहिली. १९१४ सालीं लो० टिळक कारागृहांतून परत येण्याच्या पूर्वी कांहीं सौम्य वृत्तीच्या मंडळींनीं सातान्यास प्रांतिक सभा भरवून दोन्ही पक्षांत ऐक्य घडविण्याचा प्रयत्न केला. परंतु मवाळ पुढाऱ्यांस तो नापसंत होता. या बाबतींत १९१५ सालीं नामदार गोखले व बाबू भूपेंद्रनाथ बसु यांचा कांहीं पत्रव्यवहार झाला व त्या बाबतींत टिळकांनींहि जाहीर चर्चा केली. इतक्यांत १९१५ च्या फेब्रुवारींत गोखले वारले. १९१५ च्या मे महिन्यांत पूर्वीच्या पद्धतीनें मुंबई इलाख्याची प्रांतिक परिषद बॅ. बॅपटिस्टा यांचे अध्यक्षतेखालीं लो. टिळकांनीं भरविली. ही परिषद आणि पुढील सालीं अशीच बेळगांव येथें भरलेली परिषद या दोन परिषदा यशस्वी झाल्या व त्यामुळें कांग्रेसमध्यें दोन्ही पक्षांस जाण्यास मार्ग मोकळा झाला. या वेळीं यूरोप खंडांत महायुद्ध चाललें होतें त्याचाहि हिंदुस्थानांत ऐक्य घडवून आणण्याचे कामीं उपयोग झाला. तथापि या दोन्ही परिषदांचें श्रेय मुख्यतः टिळकांकडे आहे. मवाळांनीं १९१५ सालीं पुण्यास वेगळी परिषद भरविली. परंतु या परिषदेला गवर्नर साहेबांस बोलावून आणल्यामुळें मवाळ पक्षाचें धोरण लोकांच्या तंत्रानें वागण्याचें नसून सरकारच्या तंत्रानें वागण्याचें आहे अशी जनतेची समजूत होते हें मवाळांच्या लक्षांत येत नाहीं. १९१६ च्या अखेरीस लखनौ कांग्रेसमध्यें दोन्ही पक्ष एकत्र जमले व अशा प्रकारें लोकमान्य टिळकांनीं कांग्रेस पुनः काबीज केली असें ह्मणण्यास हरकत नाहीं.

१९१६ सालीं बेळगांवास प्रांतिक परिषदेच्या प्रसंगीं "होमरूल लीग—स्वराज्यसंघ" स्थापन करून टिळकांनीं संघाचें ऑफिस पुण्यास उघडलें. हिंदुस्थानाला होमरूल मिळवून देण्यासंबंधाचें बिल पार्लमेंटांत आणून तें पास करविण्याचा या लीगचा उद्देश होता. होमरूलवर टिळकांनीं बेळगांवास व अहमदनगरास केलेल्या भाषणांबद्दल त्यांच्यावर १०८ कलमाप्रमाणें नोटीस निघाली, पण हायकोर्टाला केलेल्या अपीलांत ते निर्दोषी ठरले. याच सालीं ह्मणजे १९१६ सालीं ता. १ आगष्ट रोजीं टिळकांना ६१ वें वर्ष लागलें. या प्रसंगीं त्यांच्या देशसेवेबद्दल कृतज्ञता ह्मणून देशानें त्यांना एक लाख रुपये नजर केले. हे रुपये "माझी फुलाची पाकळी त्यांत भर घालून देशाच्या कामीं मी लावीन" असें टिळकांनीं आपल्या थोरपणाला अनुसरून त्याच प्रसंगीं जाहीर केलें. १९१७ सालीं वऱ्हाड नागपुरापर्यंत होमरूल फंडाकरितां दौरा काढला. तिकडे युरोपांत महायुद्ध नेटास लागलें होतें. अशा वेळीं हिंदुस्थानाला स्वराज्याचे कांहीं तरी हक्क दिले पाहिजेत असें स्टेट सेक्रेटरी मि. मांटेग्यू यांनीं पार्लमेंटांत जाहीर केलें व त्याप्रमाणें त्याच सालीं त्यांनीं स्वत: इकडे येऊन अनेक पुढाऱ्यांच्या गांठी घेतल्या. १९१८ सालीं टिळक होमरूलचें डेप्युटेशन घेऊन कोलंबो मार्गानें विलायतेस निघाले पण कोलंबोस पोंचल्यानंतर त्यांना विलायत सरकारच्या हुकुमावरून परत यावें लागलें. तथापि या वेळेला टिळकरूपी तारा राजकीय आकाशांत तेजस्वीपणानें चमकत होता. कोलंबोस जाण्यापूर्वीं पुण्याच्या म्युनिसिपालिटीचे त्या वेळचे अध्यक्ष रा. हरि नारायण आपटे यांनीं पुणेंकरांच्या तर्फें त्यांना मानपत्र अर्पण केलें. असो. पुढें कांहीं दिवसांनीं दोस्त राष्ट्रांकडे जयाचें पारडें झुकूं लागल्याबरोबर टिळकांना चिरोल केसकरितां विलायतेस

जाण्याची परवानगी मिळाली व त्याप्रमाणें ते गेले. त्या सालच्या दिल्ली कांग्रेसकरितां सर्व प्रांतांनीं त्यांनाच अध्यक्ष निवडलें होतें. पण त्यांच्या गैरहजेरीमुळें पं. मदनमोहन यांनीं तें काम केलें. १९१९ च्या एप्रिलांत चिरोलकेसचा प्रतिकूल निकाल झाला व टिळकांचे तीन लाख रुपये त्यासाठीं खर्ची पडले. टिळक १९१९ च्या नोवेंबरांत परत आले. विलायतेस असतांना पार्लमेंटरी कमिटीपुढें कांग्रेसच्या वतीनें साक्ष देण्याचेंहि काम त्यांनीं केलें.

इकडे देशांतील लोकांनीं त्यांच्याकरितां तीन लक्ष रुपये गोळा करून ठेवले होते ते टिळक परत आल्यानंतर त्यांना समारंभानें देण्यांत आले. हा समारंभ १९२० च्या मे महिन्यांत झाला. पुढें लवकरच ता. १ आगष्ट रोजीं मुंबईस या पुण्य पुरुषाचें देहावसान झालें व येथपर्यंतच पुण्यांतली राजकीय चळवळ मला येथें सांगावयाची होती. महात्मा गांधींची असहकारितेची चळवळ आणि मुळशी पेट्याची सत्याग्रहाची चळवळ यांचें तोंड पुण्यास १९२० नंतर नेटानें लागलें; ह्मणून मी त्यांविषयीं या पुस्तकांत कांहीं लिहीत नाहीं. १९२० मध्यें सपटेंबरांत कलकत्त्यास लाला लजपतराय यांचे अध्यक्षतेखालीं स्पेशल कांग्रेस भरली व त्याच कांग्रेसमध्यें असहकारितेचा ठराव पास झाला. ह्मणजे कौन्सिलें, शाळा व न्यायकोर्टें यांजवर बहिष्कार घालण्याचा ठराव पास झाला. विषयनियामक कमिटींत या ठरावाला पुण्यामुंबईच्या व वऱ्हाडनागपूरच्या कांहीं मंडळींनीं विरोध केला. परंतु भरसभेंत हा विरोध करण्यास ते धजावले नाहींत, आणि बहुमताप्रमाणें वागण्यास कबूल झाले. यामुळें पुढील सालच्या कौन्सिल निवडणुकीस रा. खापर्ड्यांशिवाय कोणीहि कांग्रेसचा प्रतिनिधि उभा राहिला नाहीं. असल्या अव्यवहार्य ठरावाला लोकमान्य टिळकांनीं भर सभेंत विरोध केला असता,

## सामाजिक चळवळ.

"सामाजिक चळवळ" या शब्दांना मराठींत एक चमत्कारिक अर्थ प्राप्त झाला आहे. "व्यक्ति हा समाजाचा एक घटकावयव आहे; ह्मणून त्याजकडे जें सामाजिक कर्तव्य येतें तें त्याला शिकविणें आणि त्याचे जे सामाजिक हक्क आहेत ते त्याला देणें" याला वस्तुतः सामाजिक चळवळ ह्मणावयास पाहिजे. पण हल्लीं रूढ झालेला अर्थ हा नव्हे. आपला समाज ज्या कांहीं त्याज्य रूढींनीं बांधलेला आहे त्या रूढींपासून त्याला मुक्त करण्याच्या चळवळीला सामाजिक चळवळ ह्मणण्याचा प्रघात पडला आहे. विधवांना [ह्मणजे ब्राह्मण विधवांना] पुनः लग्न करण्यास प्रोत्साहन देणें, विधवांच्या केशवपनाचा निषेध करणें, जातिभेद न मानणें, अस्पृश्यता काढून टाकणें, वेगळाल्या जातींत विवाहसंबंध घडविणें, इत्यादिकांसच मुख्यतः सामाजिक चळवळ ह्मणतात; आणि या गोष्टी करणारे ते समाजसुधारक! वस्तुतः या चळवळीला व्यक्तिस्वातंत्र्याची चळवळ असें नांव दिलें पाहिजे. ही चळवळ करणारांना समाजसुधारक ह्मणणें माझ्या मतें चुकीचें आहे. समाजाला अधोगतीला नेण्याला ज्या ज्या गोष्टी कारणीभूत होतात त्यांपासून समाजाला परावृत्त करणारे ते समाजसुधारक होत. या नियमाप्रमाणें पाहिल्यास सामाजिक चळवळींत असा प्रयत्न करणारे लोक थोडे आहेत. मद्यपाननिषेध, मुरळ्यांची चाल, जरठकुमारीविवाह असे कांहीं ठराव सामाजिक परिषदांमधून असतात खरे, पण त्यांवर विशेष जोर नसतो. ही व्यक्तिस्वातंत्र्याची चळवळ मुख्यतः १९ व्या शतकाच्या अखेरच्या पंचवीस वर्षांत पुण्यांत झाली. या पुस्तकाच्या काळांत ही चळवळ ह्मणण्यासारखी झाली नाहीं. किंबहुना या चळवळीचें फारसें कारणच उरलें नाहीं. स्त्रियांना शिक्षण, विधवांना पुनर्विवाहाची मोकळीक,

इच्छेप्रमाणें खाण्यापिण्याची मुभा, वगैरे व्यक्तिस्वातंत्र्याच्या बाबी ब्राह्मणी समाजानें या काळांत मान्य केल्या. ब्राह्मणी समाजाखेरीज इतरांना पुरुषांचेंच शिक्षण नको तर स्त्रियांचें कशाला पाहिजे? विधवाविवाहाला तर इतर जातींत आडकाठी नव्हतीच आणि खाण्यापिण्यालाहि प्रतिबंध नव्हता एकंदरींत फक्त ब्राह्मणजातींत व्यक्तिस्वातंत्र्याला जो समाजाचा प्रतिबंध होता तो आमच्या ब्राह्मण सुधारकांना दूर करावयाचा होता व त्याप्रमाणें तो दूर झाला. ज्या इंग्रजी समाजांत हें स्वातंत्र्य आहे त्या समाजाचें ह्मणजे इंग्रजांचें राज्य आमच्यावर असल्यामुळें आमच्या समाजांत हें व्यक्तिस्वातंत्र्य नाकारण्याचें सामर्थ्य उरलेलें नाहीं. अर्थात् आतां हें स्वातंत्र्य अंगवळणीं पडलें आहे. आतां समाज कोणावरहि बहिष्कार घालीत नाहीं; कारण बहिष्कार घालणें त्याला शक्यच नाहीं. मात्र या परिस्थितीनें विधवांचे विवाह जारीनें होऊं लागले आहेत, किंवा वेगळाल्या जातींमध्यें विवाहसंबंध होऊं लागले आहेत, असा प्रकार नाहीं. विवाह हेंच एक तऱ्हेचें बंधन आहे, अर्थात् व्यक्तिस्वातंत्र्याची चळवळ विधवांना पुनः लग्न करण्याची आडकाठी जशी काढूं शकते, तसें पुनः लग्न करण्याचें बंधनहि ती घालूं शकत नाहीं हें उघड आहे, ह्मणून सुधारक ह्मणविणाऱ्या विधवा देखील सामान्यतः वैवाहिक बंधनांत पडूं इच्छीत नाहींत. विवाह करण्याला प्रतिबंध होता तो दूर झाला एवढ्यांतच त्या संतुष्ट आहेत. विधवाविवाहाला अनुकूल असणारे पुरुष देखील स्वतः विधवेशीं लग्न लावण्यास तयार नसतात. त्याचप्रमाणें एखाद्या विधवेनें पुनः विवाह केला तरी तिजवर आणि तिच्या नवऱ्यावर सामाजिक बहिष्कार आतां कोणी घालीत नाहीं. सारांश, सामाजिक बंधनें आतां शिथिल झालीं आहेत. मुलींच्या लग्नाचीहि वयोमर्यादा आतां सामान्यपणें पंधरा

वर्षांपर्यंत येऊन ठेपली आहे. ज्यांची इष्टेट वाडवडिलार्जित असते ते लोक सामान्यत: जुन्या धार्मिक आचारांचे पुरस्कर्ते असतात व त्यांना ईश्वराची फार भीति वाटत असते; कारण स्वतःच्या अकलेनें द्रव्य संपादन करण्याची धमक त्यांच्या अंगीं नसल्यामुळें आपलें वडिलार्जित धन देवानें जाऊं देऊं नये अशासाठीं ते जुन्या आचारयुक्त धर्माचें आचरण करीत असतात; हा एक समाजशास्त्रांतला नियम आहे. असे लोक पुण्यांत आहेत. तथापि कालाच्या ओघानें त्यांच्या घरांत देखील मुलींच्या लग्नाची वयो-मर्यादा १५ च्या पलीकडे गेलेली बरेच ठिकाणीं आढळते. श्राद्धें, पक्ष, व्रतें, उद्यापनें, एकादश्या, सत्यनारायण वगैरे गोष्टी यथासांग करणाऱ्या लोकांमध्यें देखील आतां सामाजिक बंधन उरलेलें नाहीं. खुद्द भिक्षुकांमध्यें देखील धर्माचरणाचे जुने आचार आणि विचार शिथिल झाले आहेत. हा परिणाम सुधारकांच्या कर्तबगारीचा नव्हे, राजसत्तेचा आहे.

विधवापुनर्विवाहासंबंधीं जिला चळवळ ह्मणतां येईल अशी एकच गोष्ट या काळांत पुण्यास घडून आली. वऱ्हाडांतले रा. घारपुरे नांवाचे एक गृहस्थ नुकतेच आय. सी. एस. झालेले असून त्यांचा विवाह नागपूरच्या रा. ब. वामनराव कोल्हट-करांच्या पौनर्भव कन्येशीं पुण्यास १९०३ सालीं झाला. या विवाह-समारंभाला पुण्यांतले सर्व सुधारक जमले होते; आणि या समारंभाची अक्षत इतर विवाहांप्रमाणें कसब्याच्या गणपतीला नेण्याचा त्यांनीं घाट घातला. इतर विवाहांप्रमाणें या विवाहाला ब्राह्मण समाजाकडून मान्यता मिळविण्याची ही एक युक्ति होती. समाजाशीं तुसडेपणानें वागण्याचें पूर्वीचें धोरण टाकून हें नवीन धोरण स्वीकारण्यांत त्यांनीं शहाणपणा दाखविला. कसब्याच्या गण-

पर्तीच्या देवळाचा ज्यांच्याकडे अधिकार होता त्या माणसांनीं देवळाचे दरवाजे बंद केले आणि या लोकांस आंत येऊं दिलें नाहीं. अक्षतसमारंभ परत फिरला. समारंभ करणारांना याचें शुभाशुभ कांहीं नव्हतेंच; तथापि आपला हक्क शाबीत करण्याकरितां त्यांनीं हा उद्योग येथपर्यंत केला. त्याची तड वास्तविक कोर्टांत जाऊन लावून घेणें जरूर होतें. पण सुधारक झाले तरी त्यांचा उपजत स्वभाव त्यांना कसा सोडणार? "आरंभशूराः खलु दाक्षिणात्याः" म्हणतात तें कांहीं उगीच नव्हे. असो, आतां जर पुनः असा समारंभाचा प्रयत्न झाला तर देवळाचे दरवाजे बंद होतील असें वाटत नाहीं. विधवाविवाहासंबंधानें दरसाल एक व्याख्यान विधवाविवाहाच्या कायद्याच्या वाढदिवशीं पुण्यांत होत असतें. तें ऐकण्याला आतां शेंकडों लोक गंमतीखातर जाऊं लागले आहेत.

पोटजातींमध्यें विवाहसंबंध घडवून आणण्याची एक लहानशी चळवळ क्वचित ऐकूं येते. विशेषतः कोंकणस्थ, देशस्थ व कऱ्हाडे ब्राह्मणांमध्यें परस्पर विवाहसंबंध व्हावे अशाकरितां ही चळवळ आहे. मागें साताऱ्च्या कांहीं मंडळींनीं संकेश्वरच्या शंकराचार्यांकडे अर्ज करून पाहिला. असे विवाहसंबंध घडण्यास शास्त्राची आडकाठी नाहीं, तेव्हां लोकमत अनुकूल असल्यास असे विवाह आम्हांस मान्य आहेत असें श्रींनीं आज्ञापत्र दिलें. लोकमान्य टिळक अशा विवाहांना अनुकूल होते. पण "अनुकूल होते" याचा अर्थ "प्रतिकूल नव्हते" इतकाच समजावयाचा. कारण असे विवाह देशाच्या उत्कर्षाला अवश्य आहेत असें त्यांचें मत असल्याचें दिसत नाहीं. शास्त्राची आडकाठी नाहीं हें सर्वजण कबूल करतात. तरी असे विवाह देखील क्वचित् घडतात. रा. नरसोपंत

वर्षांपर्यंत येऊन ठेपली आहे. ज्यांची इष्टेट वाडवडिलार्जित असते ते लोक सामान्यत: जुन्या धार्मिक आचारांचे पुरस्कर्ते असतात व त्यांना ईश्वराची फार भीति वाटत असते; कारण स्वतःच्या अकलेनें द्रव्य संपादन करण्याची धमक त्यांच्या अंगीं नसल्यामुळें आपलें वडिलार्जित धन देवानें जाऊं देऊं नये अशासाठीं ते जुन्या आचारयुक्त धर्माचें आचरण करीत असतात; हा एक समाजशास्त्रांतला नियम आहे. असे लोक पुण्यांत आहेत. तथापि कालाच्या ओघानें त्यांच्या घरांत देखील मुलींच्या लग्नाची वयो-मर्यादा १५ च्या पलीकडे गेलेली बरेच ठिकाणीं आढळते. श्राद्धें, पक्ष, व्रतें, उद्यापनें, एकादश्या, सत्यनारायण वगैरे गोष्टी यथासांग करणाऱ्या लोकांमध्यें देखील आतां सामाजिक बंधन उरलेलें नाहीं. खुद्द भिक्षुकांमध्यें देखील धर्माचरणाचे जुने आचार आणि विचार शिथिल झाले आहेत. हा परिणाम सुधारकांच्या कर्तबगारीचा नव्हे, राजसत्तेचा आहे.

विधवापुनर्विवाहासंबंधीं जिला चळवळ ह्मणतां येईल अशी एकच गोष्ट या काळांत पुण्यास घडून आली. वऱ्हाडांतले रा. घारपुरे नांवाचे एक गृहस्थ नुकतेच आय. सी. एस. झालेले असून त्यांचा विवाह नागपूरच्या रा. ब. वामनराव कोल्हट-करांच्या पौनर्भव कन्येशीं पुण्यास १९०३ सालीं झाला. या विवाह-समारंभाला पुण्यांतले सर्व सुधारक जमले होते; आणि या समारंभाची अक्षत इतर विवाहांप्रमाणें कसब्याच्या गणपतीला नेण्याचा त्यांनीं घाट घातला. इतर विवाहांप्रमाणें या विवाहाला ब्राह्मण समाजाकडून मान्यता मिळविण्याची ही एक युक्ति होती. समाजाशीं तुसडेपणानें वागण्याचें पूर्वीचें धोरण टाकून हें नवीन धोरण स्वीकारण्यांत त्यांनीं शहाणपणा दाखविला. कसब्याच्या गण-

पतीच्या देवळाचा ज्यांच्याकडे अधिकार होता त्या माणसांनीं देवळाचे दरवाजे बंद केले आणि या लोकांस आंत येऊं दिलें नाहीं. अक्षतसमारंभ परत फिरला. समारंभ करणारांना याचें शुभाशुभ कांहीं नव्हतेंच; तथापि आपला हक्क शाबीत करण्याकरितां त्यांनीं हा उद्योग येथपर्यंत केला. त्याची तड वास्तविक कोर्टांत जाऊन लावून घेणें जरूर होतें. पण सुधारक झाले तरी त्यांचा उपजत स्वभाव त्यांना कसा सोडणार? "आरंभशूराः खलु दाक्षिणात्याः" म्हणतात तें कांहीं उगीच नव्हे. असो, आतां जर पुनः असा समारंभाचा प्रयत्न झाला तर देवळाचें दरवाजे बंद होतील असें वाटत नाहीं. विधवाविवाहासंबंधानें दरसाल एक व्याख्यान विधवाविवाहाच्या कायद्याच्या वाढदिवशीं पुण्यांत होत असतें. तें ऐकण्याला आतां शेंकडों लोक गंमतीखातर जाऊं लागले आहेत.

पोटजातींमध्यें विवाहसंबंध घडवून आणण्याची एक लहानशी चळवळ क्वचित ऐकूं येते. विशेषतः कोंकणस्थ, देशस्थ व कऱ्हाडे ब्राह्मणांमध्यें परस्पर विवाहसंबंध व्हावे अशाकरितां ही चळवळ आहे. मागें साताऱ्च्या कांहीं मंडळींनीं संकेश्वरच्या शंकराचार्यांकडे अर्ज करून पाहिला. असे विवाहसंबंध घडण्यास शास्त्राची आडकाठी नाहीं, तेव्हां लोकमत अनुकूल असल्यास असे विवाह आम्हांस मान्य आहेत असें श्रींनीं आज्ञापत्र दिलें. लोकमान्य टिळक अशा विवाहांना अनुकूल होते. पण "अनुकूल होते" याचा अर्थ "प्रतिकूल नव्हते" इतकाच समजावयाचा. कारण असे विवाह देशाच्या उत्कर्षाला अवश्य आहेत असें त्यांचें मत असल्याचें दिसत नाहीं. शास्त्राची आडकाठी नाहीं हें सर्वजण कबूल करतात. तरी असे विवाह देखील क्वचित् घडतात. रा. नरसोपंत

केळकरांनीं आपली एक मुलगी सातारच्या देशस्थ घराण्यांत दिली एवढें एकच अशा विवाहाचें प्रसिद्ध उदाहरण आहे. बाकीचीं किरकोळ होत. असले विवाह देखील पुढील काळांत अधिक प्रमाणावर होतील असें मला वाटत नाहीं. याचें कारण, या तीन पोट-जातींमध्यें बुद्धीचें आणि चालीरीतीचें कांहीं वैशिष्ट्य आहे व हें वैशिष्ट्य चिवट आहे. आपलें वैशिष्ट्य सुटावें अशी कोणत्याहि पोटजातीची इच्छा दिसत नाहीं.

## नैतिक चळवळ.

नैतिक चळवळीलाच वस्तुतः सामाजिक चळवळ म्हणावयास पाहिजे. समाजांत नीतीची वाढ होणें सर्व उत्कर्षास अवश्य आहे असें वाटणारे लोक माझ्या मतें पुण्यास अगदीं थोडे आहेत. आपला समाज नीतीच्या दृष्टीनें बिघडलेला आहे अशी ज्याची खात्री पटली आहे. आणि खात्री पटली असली तरी तो सुधारावा अशी ज्याला इच्छा व जरूर भासत आहे, त्यालाच नैतिक चळवळीचें महत्त्व वाटेल. आमच्या शाळांतून धर्मशिक्षण नको एवढें आपलें मत रँगलर परांजपे यांनीं १९०४ सालीं "ईस्ट अँड वेस्ट" नांवाच्या मुंबईच्या इंग्रजी मासिकांत एक निबंध लिहून जाहीर केलें होतें. धर्माचा व नीतीचा संबंध नाहीं असें त्यांचें मत असावें. तें मान्य केलें तरी नीतीचें शिक्षण मुलांना आणि समाजाला पाहिजे अशी जाणीव त्यांना असल्याचें त्यांनीं आपल्या कारकीर्दींत दाखविलें नाहीं. लोकमान्य टिळक किंवा नामदार गोखले यांनाहि नैतिक सुधारणेची जरूर भासलेली दिसत नाहीं. आमच्या लोकांच्या नीतिमत्तेवर देशाचा उत्कर्ष अवलंबून नाहीं असें त्यांचें मत असावें. व्यवहारांत खरें बोलावें, प्रामाणिकपणानें वागावें, नोकरी किंवा जबाबदारी पतकरली असेल ती प्रामाणिक-

पणानें आणि चुकारपणा न करतां पार पाडावी, सामुदायिक व्यवहार काळजीनें करावे, दुसऱ्याला उपद्रव देऊं नये, कोणाचा द्वेष करूं नये, कोणाचा नाश चिंतूं नये, कोणाच्या नाशांत आनंद मानूं नये, दुसऱ्याची वस्तु चोरूं नये, द्रव्य न्यायानें मिळवावें, अन्यायाचा तिटकारा असावा, दुसऱ्याचा उसना घेतलेला जिन्नस जशाचा तसा आणि जितका असेल तितका त्याला मागण्याचें कारण न पडतां परत द्यावा, दुसरा मनुष्य संकटांत असेल तर आपल्या हातून शक्य असेल तर त्याला साहाय्य करावें, निदान त्याच्या संकटानें आपण हर्षयुक्त तरी होऊं नये, आपल्यावर ज्यानें उपकार केला त्याच्याशीं कृतघ्न होऊं नये, इत्यादि किती तरी गोष्टी आपल्या समाजाला शिकविण्याची जरूर आहे. परंतु अशा प्रकारें नीतीचे शिक्षण देण्याची कळकळ या काळांत कोणींहि दाखविलेली माझ्या पहाण्यांत नाहीं. अशा प्रकारें नीति शिकविण्याची जरूर कोणाला भासत नसावी; किंवा नीति शिकविण्यांत अर्थ नाहीं अशी कल्पना असावी; किंवा लोकांचे व्यवहार लोकांनीं वाटेल त्या प्रकारें करावे अशीहि समजूत असावी. अलीकडे महात्मा गांधींना मात्र स्वराज्याच्या अगोदर नैतिक सुधारणेची ह्मणजे आत्मशुद्धीची अवश्यकता भासते. परंतु गांधींच्या चळवळीसंबंधानें लिहिणें या पुस्तकाच्या मर्यादेच्या बाहेर असल्यानें येथें एवढ्या उल्लेखावरच भागविणें प्राप्त आहे.

ज्यांचा अंतर्भाव नैतिक चळवळींत होऊं शकेल असे फक्त दोन किरकोळ प्रयत्न या काळांत झाले. एक मद्यपाननिषेधक चळवळीचा. हा विषय रा. शंकर गणेश लवाटे यांनीं प्रमुखत्वानें हातीं घेतला होता. या विषयाला जोरदार स्वरूप आणण्याचा प्रयत्न १९०८ सालीं झाला. पण हें स्वरूप सरकारनें जोरदारपणें लव-

करच मोडलें. मग पुनः हा सौम्य स्वरूपांत आला. रा. लवाट्यांचा हा उद्योग ह्मणजे टिटवीनें समुद्र शोषण्याचाच प्रयत्न होय. कारण कायद्यानें दारूची विक्री बंद झाल्याशिवाय या चळवळीचा ह्मणण्यासारखा उपयोग होणार नाहीं; किंवा जनतेपैकीं निदान शेंकडा ७५ लोकांनीं तरी दारू बंद करण्याचा नेट धरला पाहिजे. पण दारू पिण्याला मुभा असावी अशा मताचे लोक अधिक असल्यानें आणि त्यांना त्या मार्गापासून परावृत्त करण्याची चिकाटी इतरांत नसल्यानें ही चळवळ मंदगतीनें चालते. दुसरा प्रयत्न शिमग्यांतल्या धुळवडीसंबंधाचा. होळीच्या दुसऱ्या दिवशीं सकाळपासून बारा एक वाजेपर्यंत लोक रस्त्यांतून जो धिंगाणा घालतात त्यामध्यें निदान शाळेंत जाणारे विद्यार्थी तरी नसावे अशा हेतूनें पुण्यांतल्या सर्व शाळांतील अधिकाऱ्यांनीं विचार ठरवून धुळवडीच्या दिवशीं प्रत्येक मुलानें सकाळीं शाळेंत अवश्य आलें पाहिजे असा कडक नियम १९११ सालच्या शिमग्यापासून अमलांत आणला. या दिवशीं गैरहजर असणाऱ्या मुलांना नेहमींपेक्षां अधिक शासन करण्यांत येतें. ही सुधारणा चांगली आहे. पण हा प्रकार आणि होळीच्या दिवसांत रापशब्द उच्चारण्याचा प्रकार अजीबात बंद करण्याचा उद्योग होणें जरूर आहे.

## शिक्षणविषयक चळवळ.

सर्व महाराष्ट्रांत पुणें हें शिक्षणाच्या चळवळीचें मुख्य स्थान आहे. शाळा, कॉलेजें, वर्तमानपत्रें, लायब्ऱ्या, व्याख्यानें इत्यादि विविध प्रकारांनीं समाजांत शिक्षणाचा ह्मणजे साक्षरतेचा आणि ज्ञानाचा प्रसार करण्याचें कार्य या शहरीं या काळांत जारीनें चालू होतें. ही चळवळ ज्या संस्थांच्या द्वारें झाली, त्या संस्थांचें वेगळें वर्णन

पुढें दोन भागांत मी देत असल्यामुळें येथें नुसता उल्लेखच करतों. या चळवळींत पुण्याचें सर्व महत्त्व आहे.

प्राथमिक शिक्षण सक्तीचें करण्याबद्दल १९१९ सालीं पुण्यास जी चर्चा झाली तिच्या संबंधानें दोन शब्द येथें लिहिणें अवश्य आहे. पुण्याच्या म्युनिसिपालिटीनें सक्तीचें प्राथमिक शिक्षण हातीं घ्यावें अशाबद्दल ही चळवळ होती. एक पक्ष ह्मणे, मुलग्यांचें शिक्षण सक्तीचें करावें आणि नंतर मुलींचें करावें. दुसरा पक्ष ह्मणे, मुलगे आणि मुली दोघांचेंहि एकदमच हातीं घ्यावें. या वादावर पक्षभेदानुरूप विनाकारण तंटे झाले. दुसऱ्या बाजूचे पुढारी रँगलर परांजपे, प्रो. कानिटकर, रा. ल. र. गोखले वगैरे ज्ञानप्रकाश पक्षाची मंडळी होती. पहिल्या बाजूचे पुढारी केसरी पक्षाचे लोक होते. मी या वादांत येथें शिरूं इच्छीत नाहीं. तथापि एवढें लिहितों कीं, डेक्कन एज्युकेशन सोसायटीनें लगेच मुलींच्या शाळा—अर्थात् फी घेऊन शिकविणाऱ्या—जर स्वतः काढल्या असत्या तर त्यांच्या पक्षाला बळकटी आली असती. आपण तेवढ्या मुलग्यांच्याच शाळा चालवावयाच्या, आणि म्युनिसिपालिटीनें मात्र मुलगे व मुली दोघांचें शिक्षण एकदम चालविलें पाहिजे असा आग्रह धरावयाचा, या वर्तनानें वादाच्या हौसेकरितांच वाद केला असा दोष त्यांच्याकडे येतो.

## भाग चवथा.

## वर्तमानपत्रें, आणि छापखाने.

केसरी—हें वर्तमानपत्र या काळांत लोकमान्य टिळकांच्या मालकीचें होतें. हें प्रारंभापासून ह्मणजे १८८१ च्या जानेवारीपासून दर मंगळवारीं नियमितपणें निघत आहे. १९०१ सालीं याचीं सुपररायल आकाराचीं चार पानें निघत असत, पैकीं दोन पानें मजकूर आणि दोन पानें जाहिराती. लोकमान्य टिळकांच्या हातांत केसरी आल्यापासून मजकुराची जी पद्धत त्यांनीं ठरविली तीच अद्यापपर्यंत कायम आहे. दुसऱ्या व तिसऱ्या पानांत दहा कालम मजकूर असावयाचा. आरंभीं एक किंवा दोन कालम मुंबईचें बातमीपत्र, कोणा प्रसिद्ध व्यक्तीच्या व्याख्यानाचा सारांश, महत्त्वाचा पत्रव्यवहार किंवा बाहेरील व्यक्तीचा एखाद्या विषयावरील लेख यांपैकीं कांहीं तरी असावयाचें आणि त्याच्यापुढें "केसरी" या शिक्क्याखालीं एक संपादकीय अग्रलेख असावयाचा. दोन किंवा अडीच कालम ही साधारणपणें या अग्रलेखाची मर्यादा असे. रा. खाडिलकर किंवा रा. केळकर यांनीं अग्रलेख लिहिला ह्मणजे ही मर्यादा संभाळली जात असे. लोकमान्य स्वतःहि अडीच कालमीच अग्रलेख सामान्यतः लिहीत असत; तथापि विषयाच्या मानानें दोन कालमांपासून पांच कालमांपर्यंतहि अग्रलेखाची मर्यादा ते कमी जास्ती करीत असत. अग्रलेख हा आठवड्यांतल्या सर्वांत महत्त्वाच्या चळवळीसंबंधानें असावयाचा. जेव्हां कोठें कांहीं महत्त्वाची चळवळ नसेल तेव्हां इतिहासविषयक किंवा वाङ्मयात्मक लेख येई. अग्रलेखाच्या पुढें "पत्रकर्त्यांच्या स्फुट सूचना" या मथळ्याखालीं आठवड्यांत लोकांपुढें प्रमुखपणें आलेल्या विष-

यासंबंधानें पत्रकर्त्यांचे विचार मांडले जात. स्फुट सूचनांच्या नंतर इहवृत्त आणि नंतर एखादा लहानसा पत्रव्यवहार किंवा महत्त्वाचा मजकूर जागा असेल त्या मानानें घेतला जाई. केसरीचा टाईप या काळांत पायका होता व तोच अद्याप कायम आहे. अशा बारीक टाईपाचे भरगच्च दहा कालम मजकूर त्या वेळीं वर्गणी-दारांस एक रुपया वर्गणींत वर्षभर मिळे. अशा बुद्धिमान व विद्वान् संपादकांनीं लिहिलेले विचार पुण्यांत वर्षाचा एक रुपया आणि बाहेरगांवीं एक रुपया तेरा आणे खर्चांत मिळण्याची सोय होती, तरी त्या काळीं केसरीचे वर्गणीदार सात हजारांहून अधिक नव्हते. एक अंक एकानें घेतला तरी तो वाचणारे पांचसात लोक असत. १९०२ सालीं केसरी दुप्पट निघूं लागला, ह्मणजे चार पानें मजकूर आणि चार पानें जाहिराती अशी व्यवस्था झाली. पूर्वीं जो मजकूर २ व ३ या पानांत येत असे तो आतां ४ व ५ पानांत येऊं लागला; आणि पान २ व ७ यांमध्यें आठवड्यांतील चळवळींची संगतवार हकीकत, इतर स्वतंत्र विषयांवर एक दोन लेख, पत्रव्यवहार, पत्रांचा सारांश, बुद्धिबळाचे डाव, व्यापारी बातम्या, पुस्तकांवर अभिप्राय आणि अखेरीस वर्तमानसार अशी पद्धत सुरू झाली. वाचकांच्या वाढत्या संख्येला केसरीच्या मोठ्या आकाराची जरूर होती. वर्गणी एक रुपया होती ती दीड रुपया करण्यांत आली. तथापि दुप्पट आकार केल्याबरोबर वर्गणीदारहि सात हजार होते ते बारा हजार झाले. या काळीं टिळक, खाडिलकर, केळकर आणि दत्तोपंत लिमये इतकी मंडळी केसरी लिहीत असत. कोण काय लिही हें जाहीर रीतीनें सांगण्याचा काळ अद्याप देखील आला आहे असें मला वाटत नाहीं. पण कोणाच्या लेखांत काय वैशिष्ट्य होतें हें सांग-ण्यास हरकत नाहीं. लोकमान्यांचे लेख मुद्देसूद, सडेतोड, स्पष्ट आणि

निर्भीड भाषेंत, आणि कायद्याच्या दृष्टीनें वकीलीचे नव्हेत तर न्यायाधीशाच्या जजमेंटच्या स्वरूपाचे असत. खाडिलकरांचे लेख अलंकारिक पण क्लिष्ट भाषेंत असत. टिळकांना अलंकारिक भाषा माहीत नव्हती. केळकरांचे लेख सरळ आणि नीटस भाषेंत सौम्य स्वरूपाचे असत. टिळक व खाडिलकर यांच्या भाषेंत जितका कडकपणा असे जितका केळकरांच्या भाषेंत नसे. केळकरांच्या भाषेला पार्लमेंटरी भाषा ह्मणतां येईल. टिळकांचे लेख प्रतिपक्षाला चूप करणारे असत, खाडिलकरांचे लेख चीड आणणारे असत, आणि केळकरांचें लेख प्रतिपक्षाला सुद्धां मजेदार वाटणारे असत. केसरीचें व ज्ञानप्रकाशाचें कधींच पटलें नाहीं; तरी ज्ञान-प्रकाशाला खाडिलकरांच्या लिहिण्याची जशी चीड येई तशी टिळकांच्या व केळकरांच्या लिहिण्याची येत नसे. रा. केळकरांकडे या वेळीं 'मराठा' पत्रांत इंग्रजी लिहिण्याचें काम असे, यामुळें ते केसरींत कमी लिहीत असत. तरी यांची हौस मराठी लिहिण्याकडेच होती. केसरी-मराठा पत्रांच्या प्रारंभीं प्रथमतः टिळक मराठ्याचे एडिटर होते ते हळू हळू मराठा बाजूस ठेवून केसरींत अधिक लिहूं लागले. तोच प्रकार केळकरांचा झाला. ते आरंभीं मराठ्याचे एडिटर ह्मणून आले, पण १९१० पासून त्यांनीं केसरी कायमचा हातीं घेतला. असो. केसरीचीं २ व ७ पानें कै. दत्तोपंत लिमये हे संभाळीत असत आणि आंतल्या बाजूसहि कांहीं स्फुट सूचना लिहीत. हे गृहस्थ अत्यंत शांत स्वभावाचे आणि कष्टाळू होते. वर्णनें लिहिण्याची यांची शैली अप्रतिम होती. रूसो-जपानी युद्ध, स्वदेशी-बहिष्काराची चळवळ आणि युरोप खंडांतील महायुद्ध यांची हकीकत केसरींत जितक्या सुसंबद्ध आणि मनोरंजक रीतीनें येत असे तशी इतर कोणत्याहि मराठी

पत्रांत येत नसे. १९०८ सालीं टिळकांना शिक्षा झाल्यानंतर १९०९ च्या अखेरीपर्यंत केसरींत खाडिलकरांचें वर्चस्व असे. पुढें १९१० च्या सुरुवातीपासून लो. टिळकांनीं मंडालेस भेटीचे वेळीं सांगितल्यावरून हें वर्चस्व केळकरांकडे आलें. १९११ मध्यें रा. ज० स० करंदीकर तळेगांवाहून पुण्यास आल्यावर केसरींत मदत करूं लागले. १९१५ सालीं रा. दत्तोपंत लिमये वारल्यानंतर त्यांचे जागीं रा. करंदीकरांची कायम नेमणूक झाली व ते हेंच काम अद्याप पहात आहेत.

१९०८ सालीं लोकमान्यांच्या खटल्याचे वेळीं केसरीच्या ग्राहकांची संख्या पंचवीस हजारांपर्यंत गेली होती. त्यानंतर माल दडपशाहीचा जोर होऊन जिकडे तिकडे राजकीय चळवळ स्तंभित होत चालली. १९०९ मध्यें ग्वाल्हेर आणि इंदूर या संस्थानांतील प्रजाजनांस केसरी घेण्याची त्या त्या दरबारांनीं बंदी केली; आणि १९१० मध्यें निझाम सरकारानें आपल्या संस्थानांत कोणींहि केसरी घेतां कामा नये असा मनाईहुकूम काढला. या एका हुकुमानें केसरीच्या तीन हजार प्रती बंद झाल्या. वरील तीन संस्थानांपैकीं फक्त इंदूर दरबारनें ही बंदी काढून घेतली आहे. या सुमारास श्रीमंत सयाजीराव गायकवाडांनाहि आपल्या संस्थानांत केसरी बंद करण्याची सल्ला मिळाली होती असें ह्मणतात. पण ब्रिटिश मुलुखांत केसरी चालू असेपर्यंत आमची बंद करण्याची इच्छा नाहीं अशा तऱ्हेचा जबाब त्यांनीं दिल्याचें ऐकिवांत आहे. अशा बातम्या ऐकीव असतात आणि ह्मणून त्यांच्या खरेखोटेपणाची जबाबदारी कोणाला घेतां येत नाहीं. या काळांत कोल्हापुर संस्थानात केसरीला कशी बंदी झाली नाहीं हें मात्र एक आश्चर्य आहे. असो. ब्रिटिश मुलुखांतहि या काळांत केस-

गीचा खप कमी होत होता. १९१४ सालापर्यंत हा खप पंधरा हजारांच्या सुमारास आला. परंतु युरोपांत महायुद्ध सुरू झाल्या बरोबर केसरीचा खप पुनः पंचवीस हजारांच्या वर गेला तो अद्याप तसाच आहे. महायुद्धामुळें कागदाची किंमत वाढूं लागली तेव्हां १९१६ मध्यें केसरीची वर्गणी दोन रुपये करण्यांत आली व लवकरच पुढील सालीं तीन रुपये करण्यांत आली. आतां कागदाचे चढलेले भाव कांहीं कमी झाले आहेत. त्याबद्दल वर्गणी कमी न करतां आणखी दोन पानें म्हणजे दहा कालम मजकूर वाचकांस अधिक मिळूं लागला आहे.

१९०६ सालापर्यंत केसरी आर्यभूषण छापखान्यांत छापत होता. १९०२ मध्यें विलायतेहून एक मोठें छापण्याचें यंत्र आणविलें होतें, तरी तें यंत्र आर्यभूषणमध्यें ठेवून मजकूर जुळविण्याचें व छापण्याचें काम आर्यभूषणकडेच होतें. १९०५ सालीं मजकूर जुळविण्यासाठीं टाइप व टाइप पाडण्याचें यंत्र (फाउंडरी) आणवून टिळकांनीं स्वतःचा छापखाना उभारला आणि आर्यभूषणमध्यें ठेवलेलें यंत्र १९०७ सालीं आपल्या घरीं आणलें. १९१९ सालीं टिळक स्वतः विलायतेस गेले असतां त्यांनीं एक रोटरी मशीन खरेदी केलें व त्यावर आतां केसरी निघूं लागला आहे.

केसरी हें पत्र राजकीय चळवळीकरितांच आहे; अर्थात राजकीय चळवळीचाच उहापोह यामध्यें मुख्यत्वें येतो. समाजाच्या नैतिक सुधारणेकडे केसरीचें लक्ष नाहीं, राजकीय सुधारणेमध्येंच सर्वस्व आहे अशा धोरणानें केसरी चाललेला आहे; किंबहुना मराठींतलीं सर्वच पत्रें चाललेलीं आहेत. इतर विषय म्हणजे वाङ्मय, तत्त्वज्ञान, इतिहास, वर्णन, माहिती, निबंध, राजनीतिशास्त्र वगैरे विषयांकडे केसरीचें लक्ष आहे, परंतु असल्या विषयांवरील लेख

सामान्यतः बाहेरून आले तर केसरींत घेतले जातात. आफि-सांतल्या माणसांनीं असले विषय लिहिण्याची पद्धत नाहीं. राजकीय चळवळ जोरांत नसेल तेव्हां ऐतिहासिक किंवा वाङ्मयात्मक लेख संपादकांनीं संपादकीय मजकुरांत लिहिण्याचा प्रघात आहे. हिंदु-स्थानाबाहेरच्या घडामोडी रा. खाडिलकर जराशा अधिक लिहीत असत. पण आतां या कमी झाल्या आहेत. अभिप्रायाकरितां पाठविलेल्या पुस्तकांवर अभिप्राय खात्रीनें मिळेलच असा भरंवसा नाहीं. अभिप्राय जसा द्यावयाचा असेल तसा द्यावा, पण लेखक आपलीं पुस्तकें अभिप्रायासाठीं पाठवीत असतात हें लक्षांत घेऊन केसरीची कांहीं जागा त्याकरितां राखून ठेवण्याची व तें काम एका संपादकाकडे नेमण्याची पद्धत चालू करावी अशी माझी सूचना आहे. मराठी किंवा इंग्रजी वाङ्मयांत एखादें नवीन पुस्तक महत्वाचें निघाल्यास आणि त्याची माहिती वाच-कांस उपयुक्त आहे असें वाटल्यास अशी माहिती आणि त्यासं-बंधानें आपले विचार मुद्दाम देत जावे असेंहि मला वाटतें. मग तें पुस्तक अभिप्रायाकरितां आलेलें असो वा नसो. वाङ्मयाच्या बाबतींत केसरींमध्यें पक्षपात नसावा आणि वशिल्याची गरज पडूं नये.

केसरीचें राजकीय धोरण काय आहे याची माहिती सर्वांना आहे, तें मी येथें सांगण्याची जरूर नाहीं. परंतु काल-महिमा असा आहे कीं, ज्यांना कधीं केसरी वाचण्यास मिळत नाहीं असेहि कांहीं वाचक या पुस्तकाला मिळतील; ह्मणून केसरीचें राजकीय धोरण येथें एक दोन वाक्यांत सांगतों. आपल्या देशाला सरकारनें जितके हक्क दिलेले आहेत त्या सर्वांचा करतां येईल तितका उपयोग करून आणखी हक्क त्यांच्याच पद्धतीनें

मांडून मिळविणें आणि अशा प्रकारें अखेरीस स्वराज्य ह्मणजे हिंदी लोकांच्या सत्तेचें राज्य येथें मिळविणें हें केसरीचें धोरण आहे. या झगड्यांत कोणाची भीड मुर्वत धरावयाची नाहीं; आणि सरकारी अधिकाऱ्यांच्या मर्जीचा कल पाहून आपलीं मतें प्रतिपादन करावयाचीं नाहींत. तसेंच लोकांना या झगड्याचें स्वरूप समजावून देऊन त्यांना या कार्यासाठीं तयार करावयाचें. अशा धोरणानें केसरी चाळीस वर्षें चालला आहे. नेमस्त पक्षाचें धोरण हेंच, परंतु अधिकाऱ्यांच्या मर्जीचा कल पाहून ते आपली वागणूक ठेवतात हा दोन पक्षांमध्यें फरक आहे. या फरकामुळेंच केसरी पक्षावर अधिकाऱ्यांचा रोष व मवाळ पक्षावर अधिकाऱ्यांची मर्जी असे प्रकार वरचेवर दिसून येतात. दोन पक्षांच्या या धोरणाकडे अधिक सूक्ष्म दृष्टीनें पाहिल्यास असें नजरेस येतें कीं, नेमस्त पक्षाला सरकारचे गुण अधिक दिसतात आणि लोकांचे दोष अधिक दिसतात; आणि केसरी पक्षाला सरकारचे दोष अधिक दिसतात, लोकांचे दोष दिसत नाहींत.

'स्वराज्य' हें आमचें अंतिम ध्येय असें दादाभाईनीं कलकत्त्यास सांगितलें व तेव्हांपासून तें कायम ठरवून आमची चळवळ चालली आहे, असें केसरी व इतर सर्व पत्रें लिहीत असतात. या 'स्वराज्य' शब्दाचा अर्थ 'लोकसत्ताक राज्य' असा आहे व हा अर्थ सर्वांनीं कबूल केलेला आहे. भविष्य काळच्या स्वराज्यासंबंधानें हा अर्थ मान्य आहे, पण भूतकालच्या आमच्या राज्यांना आणि वर्तमान नेटिव संस्थानांना 'स्वराज्य' म्हणण्यांत केसरी, काळ, ज्ञानप्रकाश वगैरे सर्व मराठी वर्तमानपत्रें चूक करीत असतात. शिवाजीनें स्थापलेल्या राज्याला, किंवा पेशव्यांच्या राज्याला किंवा आजच्या संस्थानांना ज्या अर्थानें स्वराज्य ह्मणतां येईल

त्या अर्थाचें स्वराज्य हें आतां आमचें ध्येय नाहीं. जें स्वराज्य आम्हीं घालविलें तसें स्वराज्य आतां आम्हांला नको आहे. अर्थात् जेव्हां ब्रिटिश मुलुखांतल्या लोकांना स्वराज्य म्हणजे प्रजासत्ताक राज्य मिळेल तेव्हां संस्थानें हल्लींच्या स्वरूपांत राहाणार नाहींत ही गोष्ट स्पष्ट आहे. परंतु ही गोष्ट स्पष्टपणें सांगण्यास आमचीं वर्तमानपत्रें भितात. केसरीमध्यें देखील नेटिव संस्थानांना नेहमीं प्रेमाची भाषा वापरलेली असते. आज उगीच संस्थानिकांचीं मनें कां दुखवा असा यांत उद्देश असेल. तरी अशा लिहिण्यानें विसंगतपणा पदरीं येतो. खालसा मुलुखांत लोकांना स्वराज्याचा जितका अंश मिळाला आहे तितका संस्थानांत नाहीं. आम्हांला जें स्वातंत्र्य आहे तें संस्थानी प्रजेला नाहीं. संस्थानिकांना कर्तुमकर्तुमन्यथाकर्तुं अधिकार आहेत. जे अधिकार ब्रिटिश मुलुखांत प्रत्यक्ष गवर्नर किंवा गवर्नरजनरल देखील गाजवूं शकत नाहीं ते अधिकार संस्थानिक गाजवितात. बॅरिस्टर जिना यांना हैद्राबाद संस्थानाच्या हद्दींतून आणि नामदार शास्त्री यांना म्हैसूर संस्थानच्या हद्दींतून चोवीस तासांत निघून जाण्याच्या नोटीसा एकवार मिळालेल्या आहेत. खालसा मुलुखांत वर्तमानपत्रांच्या जोरावर राजकीय चळवळ चालू आहे. परंतु संस्थानी मुलुखांत एक देखील वर्तमानपत्र जोरदार बाण्यानें चालूं शकत नाहीं. अशा परिस्थितींत केसरीसारख्या वर्तमानपत्रानें संस्थानिकांची तरफदारी केली किंवा संस्थानिकांना प्रेमळ गोष्टी सांगितल्या म्हणजे हंसूं येतें. संस्थानांना स्वराज्य समजणें ही चूक आहे. संस्थानांत स्वराज्य नाहीं. दोन आणे चार आणे काय स्वराज्य असेल तें ब्रिटिश हद्दींतच आम्हांला आहे. शिवाजीच्या किंवा पेशव्यांच्या राज्यांत प्रजेला जें स्वातंत्र्य नव्हतें तें स्वातंत्र्य आज शंभर वर्षें आम्ही उपभोगीत आहोंत. तेव्हां

अशा राज्याला परकी राज्य ह्मणणे आणि संस्थानांना स्वराज्य ह्मणणें ह्मणजे लोकांची दिशाभूल करणें होय. संस्थानीं प्रजा हे आपलेच भाऊबंद आहेत हें खालसांतील प्रजेनें विसरूं नये. तसेंच संस्थानिक जर आह्मांला आपले समजत नाहींत तर आपणहि त्यांना आपले समजतां कामा नये. केसरी हें महाराष्ट्रांतलें प्रमुख पत्र आहे व त्यानें आजपर्यंत केलेली कामगिरी अलौकिक आहे. अशा पत्रांत संस्थांनी चर्चेसंबंधानें जी विसंगतता दिसून येते ती दूर व्हावी अशा इच्छेनें हे विचार येथें नमूद केले आहेत.

केसरींत येणाऱ्या जाहिरातींसंबंधानें मला येथें एक सूचना करावीशी वाटते. सर्व प्रकारच्या जाहिरातींना सरसकट एक दर ठरलेला असतो. रेलवे कंपन्या, गिरण्या, कारखाने यांच्या जाहिरातींना जो दर तोच दर चहा, काफी, गंडे, ताईत, औषधें, मदनामृतसंजीवनी वगैरे जाहिरातींना; आणि तोच दर पुस्तकें, वर्तमानपत्रे, मासिकें वगैरेंच्या जाहिरातींना. ही पद्धत सोयीची असली तरी यांत कांहीं तरी दोष आहे असें मला वाटतें. ज्या विषयांसंबंधानें केसरीला सहानुभूति वाटते त्या विषयासंबंधाच्या जाहिरातींना इतर जाहिरातींपेक्षां कांहीं तरी सवलत असावी.

**काळ**—या अवधींत केसरीच्या खालोखाल पुण्यांत काळ पत्राचें महत्त्व होतें. हे पत्र १८९८ सालीं पाडव्याच्या दिवशीं निघालें. याचे संपादक प्रो. शिवराम महादेव परांजपे हे होते. फक्त स्वतःचे विचार लोकांपुढें मांडून त्यांना ते शिकविण्याकरितां 'काळ' होता. ह्मणून बातम्यांच्या दृष्टीनें हें पत्र उपयोगी पडत नसे. तथापि जाज्वल्य देशभक्तीनें भरलेले विचार या पत्रांत वाचावयास मिळत असल्यानें त्या वेळच्या तरुण पिढीमध्ये हें पत्र अत्यंत लोकप्रिय झालेलें होतें व याचा खप वाढत्या प्रमाणावर होता. १९०२ च्या

सुमारास याचा खप सुमारें तीन हजार होता तो १९०८ सालीं झालेल्या राजद्रोहाच्या खटल्याचे वेळेस सहा हजारांवर गेला होता. केसरीपेक्षां देखील काळावर सरकारचा रोष अधिक होता. १९०५ सालीं या पत्रांतील कांहीं लेखांचें मुद्दाम भाषांतर करवून मुंबईच्या टाइम्स ऑफ इंडियानें तें प्रसिद्ध केलें होतें व अशा पत्रावर खटला करण्याविषयीं सरकारास सुचविलें होतें. त्या वेळीं विलायतेंतल्या 'जास्टिस' पत्रांतले लेख तोडीस तोड ह्मणून लोकमान्य टिळकांनीं केसरींत छापून काळाची बाजू सांवरून धरली. या वेळीं काळावर खटला झाला नाहीं तो पुढें १९०८ सालीं झाला. त्यानंतर रा. पुरुषोत्तम बापूजी खरे बी. ए. यांनीं कांहीं दिवस काळाच्या संपादकाचें काम केलें. त्यांचेवरहि १९०९ मध्यें खटला झाल्यावर रा. सदाशिव लक्ष्मण सोमण हे याचे संपादक झाले. १९१० च्या फेब्रुवारींत प्रेस ॲक्ट पास झाल्याबरोबर त्या ॲक्टाअन्वयें या पत्रावर नोटीसा निघाल्या आणि त्यामुळें पत्र बंद झालें. काळांतले निवडक निबंध पुस्तकरूपानें निघाले होते तेहि सिडेनहॅमी कारकीर्दींत सरकारजमा ठरविण्यांत आले.

**भाला**—हें वर्तमानपत्र रा. भास्कर बळवंत भोपटकर यांनीं १९०५ मध्यें काढलें. याचे लेख कांहींसे काळाच्या धर्तीवर असत. १९०५ च्या अखेरीस या पत्रावर राजद्रोहाचा खटला झाल्यानंतर रा. लक्ष्मणराव भोपटकर यांनीं तें कांहीं दिवस चालविलें. पुढें रा. भास्करराव परत आल्यावर ते पुनः संपादक झाले. हें पत्र १९१० मध्यें संपादकांनीं बंद केलें. हें पत्र महिन्यांतून तीन वेळां निघत असे.

**वंदे मातरम्**—हें साप्ताहिक वर्तमानपत्र रा. हरि रघुनाथ भागवत यांनीं १९०८ च्या जानेवारींत सुरु केलें. त्या वेळीं कलकत्त्यास बाबू अरविंद घोस यांच्या संपादकत्वानें वंदे मातरम् नांवाचें जें

इंग्रजी दैनिक निघत असे त्या दैनिकांतल्या निवडक लेखांचें मराठी भाषांतर देण्यासाठीं मुख्यतः हें वर्तमानपत्र निघालें होतें. टिळक, बिपिन बाबू, अरविंद बाबू वगैरेंचीं कांहीं व्याख्यानें व लेख पुस्तकरूपानें इंग्रजींत व मराठींत छापण्याचें काम चालू असतां तीं पुस्तकें सरकारजमा झाल्यामुळें जें आर्थिक संकट आलें तें असह्य होऊन हें वर्तमानपत्र १९०९ मध्यें बंद करणें भाग पडलें.

**मुमुक्षु**—हें साप्ताहिक वर्तमानपत्र १९०७ मध्यें धुळ्यास रा. लक्ष्मणराव पांगारकर यांनीं सुरू केलें. परंतु तें त्याच सालीं त्यांनीं पुण्यास आणलें. १९०८ मध्यें पुण्यांतील पुढाऱ्यांवर खटले होईपर्यंत या पत्रांत राजकीय व धार्मिक दोन्ही विषयांवर लेख येत असत. विशेषतः लो. टिळकांच्या सर्व व्याख्यानांचा गोषवारा यामध्यें नियमितपणें येई. परंतु नंतर राजकीय विषय अजीबात बंद करून धार्मिक विषयच संपादकांनीं चालू ठेवला. १९१७ पर्यंत हें पत्र नियमितपणें निघत असे. पण त्या सुमारास रा. पांगारकरांनीं पुणें कांहीं काळ सोडल्यामुळें पत्र बंद ठेवलें तें पुनः १९१९ मध्यें सुरू केलें. अलीकडे याचें मासिक पुस्तकांत रूपांतर झालें आहे. मुमुक्षूंतील धर्मसंबंधीं चर्चा ह्मणजे भजनी धर्माची चर्चा होय. ह्मणजे हें पत्र भाविक लोकांकरितां आहे. तात्त्विक किंवा शास्त्रीय धर्माची चर्चा यांत क्वचित येते.

**बाण**—हें साप्ताहिक वर्तमानपत्र १९०६।०७ मध्यें रा. दत्तु मारुती नन्नवरे प्रकाशित करीत असत. संपादकाचें यावर नांव नसे, तथापि पत्र बरें होतें. १९०७ मध्यें प्रकाशकांनीं हें बंद केलें.

**ज्ञानप्रकाश**—हें पुण्यांतलें अत्यंत जुनें साप्ताहिक वर्तमानपत्र आहे. हें पत्र जास्त नेटानें लिहिलें जावें व चालविलें जावें अशा उद्देशानें १९०२ किंवा १९०३ मध्यें कै. हरि नारायण आपटे यांनीं

आपल्या स्नेही मंडळीच्या विचारानें आपल्या हातांत घेतलें. पुढें १९०४ मध्यें रूसो-जपानी युद्ध सुरू झालें तेव्हां ज्ञानप्रकाश दररोज काढण्याचा आरंभ चालकांनीं केला. आरंभीं रा. वासुदेव गोविंद आपटे बी. ए. यांना संपादक नेमण्यांत आलें होतें. तेव्हांपासून आतांपर्यंत ज्ञानप्रकाश दैनिक आणि साप्ताहिक असा नेमानें निघत आहे. १९-०५ सालीं नामदार गोखले यांनीं सर्वंट्स ऑफ इंडिया सोसायटी स्थापली आणि त्या सोसायटीनें लवकरच ज्ञानप्रकाश आणि आर्यभूषण हे दोन्ही छापखाने आणि ज्ञानप्रकाश वर्तमानपत्र हीं विकत घेतलीं. अर्थात् ज्ञानप्रकाश पत्र नामदार गोखल्यांच्या ह्मणजे नेमस्त पक्षाचें आहे हें सांगण्यास नकोच. ज्ञानप्रकाश आतांपर्यंत सोसायटीनें नुकसानींत चालविला आहे. यांत ज्ञानप्रकाशाचें राजकीय धोरण मराठी लोकांना पसंत नाहीं असा जरी अर्थ आहे, तरी नेमस्त पक्षाची चिकाटी—किंवा सर्वंट्स ऑफ इंडिया सोसायटीची चिकाटी असें ह्मणणें जास्त शोभेल—यावरून दिसून येते. आणि चिकाटी हा गुण सामान्य नव्हे. ज्ञानप्रकाशाच्या चालकांनीं संपादकवर्ग आहे यापेक्षां जर सरस केला, आणि आपलीं मतें कायम ठेवण्याकरितां राजकीय बाबी हल्लींप्रमाणें मांडून इतर बाबींत जरी आपल्या पत्राची सुधारणा केली तरी ज्ञानप्रकाशाचा दर्जा वाढेल आणि नामदार गोखल्यांच्या नांवाला हें पत्र शोभेल. हल्लींच्या स्थितींत ना. गोखल्यांच्या नांवाला हें पत्र शोभत नाहीं. ज्ञानप्रकाशाच्या साप्ताहिक आवृत्तीला वर्गणीदार सुमारें दोन हजार आहेत.

**सुधारक**—हें कै. आगरकरांचें साप्ताहिक वर्तमानपत्र या पुस्तकाच्या काळांत १९१० पर्यंत रा. विनायक रामचंद्र जोशी बी. ए. यांनीं स्वतःच्या जबाबदारीवर चालविलें. पत्राचें धोरण जरी निश्चित ठरलेलें होतें आणि जरी तें नेमस्त पक्षाचें ह्मणून चाललें होतें

तरी संपादक नफानुकसानींत कोणाचे मिंधे नसल्यामुळें त्यांनीं कांहींसें स्वतंत्र बाण्यानें चालविलें होतें. अखेरीस द्रव्याभावामुळें पत्र चालविणें अशक्य झालें आणि पत्र बंद करण्यावांचून रा. जोशी यांस दुसरा मार्ग उरला नाहीं. या वेळीं सुधारणेची आस्था बाळगणाऱ्या श्रीमंत सुधारकांनीं पैशाची मदत करणें जरूर होतें. पण ती गोष्ट घडली नाहीं. पुढें कांहीं दिवस रा. हरिभाऊ आपटे यांनीं आपणांवर जबाबदारी घेतली पण ती त्यांनाहि रेटेना. तेव्हां कांहीं काळ पत्र बंद पडलें. मग १९१५ मध्यें रा. रामचंद्र विष्णु फडतरे पुढें आले. त्यांनींहि पुष्कळ नुकसान सोसून अखेरीस १९१७ मध्यें पत्र बंद केलें.

**राजकारण**—हें राष्ट्रीय पक्षाचें साप्ताहिक वर्तमानपत्र १९१८ सालीं पाडव्याला रा. सीताराम केशव दामले आणि रा. रामचंद्र विष्णु फडतरे यांनीं सुरू केलें. रा. दामले यांची लिहिण्याची शैली महाराष्ट्रास आवडते हें पूर्वीं मुंबईच्या राष्ट्रमतावरून सिद्ध झालें होतें. त्याप्रमाणें हें पत्रहि लवकरच भरभराटीस येऊन ग्राहकांची संख्या तीन हजारांवर गेली. १९२२ पर्यंत हें पत्र चालू होतें.

**राष्ट्रहितैषी**—हें साप्ताहिक वर्तमानपत्र कै. पांडुरंग नरसिंह पटवर्धन, रा. रामचंद्र विष्णु फडतरे व आणखी कांहीं स्नेही मंडळी यांनीं मिळून १९१९ मध्यें एप्रिलांत सुरू केलें. जरी याचा ओढा राष्ट्रीय पक्षाकडे होता, तरी कोणत्याहि एका पक्षाला चिकटून रहावयाचें नाहीं, असें याचें धोरण ठरविण्यांत आलें होतें. यांत राजकीय विषयाइतका वाङ्मयात्मक विषय विस्तारानें येत असून शिवाय आठवड्याची बातमी दुसऱ्या कोणत्याहि साप्ताहिक पत्राहून अधिक विस्तृतपणें देण्याची याची पद्धत होती. मोठें कार्य शिरावर घेऊन चालविण्यास चालकांत जी चिकाटी लागते ती याच्या

सर्व चालकमंडळींत असती तर हें पत्र चांगलें नांवारूपास आलें असतें. १९२० मध्यें हें बंद पडलें.

**मराठा**—हें इंग्रजी साप्ताहिक वर्तमानपत्र लोकमान्य टिळ-कांच्या मालकीचें आहे व अर्थात् नियमानें निघत आहे. केसरी-इतक्या मुद्देसूद रीतीनें, धिटाईनें आणि विस्तारानें यांत लो. टिळकांचे विचार नसत, तरी ते विचार सारांशरूपानें महाराष्ट्राबाहेर कळण्यास या पत्राचा उपयोग होई. टिळकांनीं जितकें लक्ष केस-रीकडे दिलें तितकें मराठ्याकडे दिलें नाहीं व ही गोष्ट त्यांनीं स्वतःच एकदां एका जाहीर मुलाखतींत कबूल केली होती. या पुस्तकाच्या काळांत या पत्राचे मुख्य संपादक रा. न. चिं. केळकर असून पुढील मंडळी थोडा थोडा काळ मदतीस होती— रा. कृ. प्र. खाडिलकर, डी. वी. जोशी एम्. ए., वामन मल्हार जोशी एम्. ए. पांडुरंग महादेव बापट, विष्णु महादेव भट आणि दा. वि. गोखले.

**सर्वंट ऑफ इंडिया**—हें साप्ताहिक इंग्रजी वर्तमानपत्र १९१८ मध्यें निघूं लागलें. सर्वंट्स आफ इंडिया सोसायटीचें हें इंग्रजी मुख आहे हें याच्या नांवावरूनच समजण्यासारखें आहे. सदर सोसायटीचे अध्यक्ष ना. व्ही. एस्. श्रीनिवास शास्त्री हे याचे मुख्य संपादक असून सोसायटींतील इतर सभासद उपसंपादकांचें काम करतात. मराठी ज्ञानप्रकाशापेक्षां हें इंग्रजी पत्र बरें चाल-विलें आहे.

**लोकसंग्रह**—हें राष्ट्रीय पक्षाचें मराठी दैनिक वर्तमानपत्र रा. रा. द. पराडकर या गृहस्थांनीं आपल्या हिंमतीवर १९१९ मध्यें सुरू केलें. पत्राचे संपादक ह्मणून त्यांनीं स्वतःचेंच नांव जाहीर केलें होतें, परंतु संपादकीय कामाकरितां कांहीं पदवीधरांना

आणलें होतें. तथापि योग्यता, द्रव्य आणि चिकाटी यांच्या अभावीं रा. पराडकरांची ही सामर्थ्याबाहेर घेतलेली उडी फसली. तेव्हां हें पत्र त्यांनीं एका लिमिटेड कंपनीच्या स्वाधीन केलें. नंतर रा. लक्ष्मणराव भोपटकर आणि पुढें रा. शंकर गणेश लवाटे यांच्या संपादकत्वानें कांहीं काळ पत्र चालून १९२३ मध्यें बंद झालें.

**करमणूक**—कादंबऱ्या, गोष्टी, चुटके वगैरेंच्या द्वारें मनोरंजन करणारें आणि संपादकाचे विचार पसरविणारें हें साप्ताहिक वर्तमानपत्र कै. हरि नारायण आपटे काढीत असत. जोंपर्यंत रा. आपटे यांचें लक्ष राजकारण, पुणें म्युनिसिपालिटी वगैरे अवांतर गोष्टींकडे जारीनें वळलें नव्हतें, तोंपर्यंत हें पत्र वेळच्या वेळीं नीटपणें निघत असल्यामुळें लोकप्रिय होतें. रा. आपट्यांच्या सर्व कादंबऱ्या या पत्रांतून प्रकरणशः प्रसिद्ध झालेल्या आहेत. हें पत्र १९१२ मध्यें बंद झालें.

**जगद्धितेच्छु**—हें मराठी साप्ताहिक वर्तमानपत्र जगद्धितेच्छु छापखान्याचे मालक कै. रावजी श्रीधर गोंधळेकर यांनीं कांहीं वर्षें चालविलें होतें. केसरी जोंपर्यंत चार पानांचा निघत होता तोंपर्यंत केसरीवरून बातम्या फारशा समजत नसत. अशा काळीं वाचकांना भरपूर बातम्या देण्याचें काम जगद्धितेच्छु चांगलें करीत असे व त्यामुळें त्याचा खपहि केसरीच्या बरोबरीनें होता. १९०२ पासून केसरीनें विचार सांगण्याबरोबर बातम्या पुरविण्याचें काम अंगावर घेतल्यापासून जगद्धितेच्छूला उतरती कळा लागली, आणि दोन तीन वर्षांनीं हें पत्र आपोआप बंद झालें.

**आचार्य**—हें मराठी पाक्षिक वर्तमानपत्र धर्मासंबंधीं विषयाची चर्चा कर याकरितां वेदशास्त्रसंपन्न विष्णु वामनशास्त्री बापट यांनीं

१९१३ मध्यें सुरू केलें व तें पांच सात वर्षें चालविलें. या पत्रांत धर्मासंबंधाची, आचारासंबंधाची, आणि वेदान्तासंबंधाची शास्त्रीय चर्चा निःस्पृहपणें येत असे. आचार्य पत्र विद्वानांकरितां होतें, मुमुक्षू-प्रमाणें भाविक लोकांकरितां नव्हतें. आपले विचार आचार्याच्या द्वारें लोकांपुढें मांडतांना रा. बापट यांनीं "निःस्पृहस्य तृणं जगत्" हें सुभाषित सार्थ करून दाखविलें, याबद्दल ते स्तुतीस व आदरास पात्र आहेत. लोकमान्य टिळक, डॉ. कुर्तकोटी (कोल्हापूरचे शंकराचार्य), सयाजीराव गायकवाड, कोल्हापुरचे नरेंद्र वगैरे मंडळी-वरहि बापटशास्त्री निर्भीडपणानें टीका करीत. असें पत्र बंद होणें हें समाजाचें दुर्दैव होय. लो. टिळकांवर टीका करण्याचें कारण फक्त त्यांचें 'गीतारहस्य.' गीतेचा अर्थ शंकराचार्यांच्या अर्थाविरुद्ध लावण्यांत टिळक चुकले याच मुद्द्यावर बापटशास्त्री त्यांच्यावर नाखुष होते. बाकी देशभक्त या नात्यानें टिळकांना ते थोर मानीत असत. तथापि गीतारहस्यावर टीका करतांना देखील बापटशास्त्री कित्येक प्रसंगीं आचार्यामध्यें अयोग्य शब्दयोजना करीत असत, एवढ्या वैगुण्याचा येथें उल्लेख केला पाहिजे.

**जागरूक**—हें साप्ताहिक वर्तमानपत्र १९१७ सालीं रा. वालचंद कोठारी यांनीं सुरू केलें. सुरुवातीला हें कोल्हापुरी ब्राह्मणेतर पक्षाच्या—ह्मणजे जे स्वतःला सत्यशोधक ह्मणवितात त्या लोकांच्या—धोरणाप्रमाणें निघत असे. सुमारें तीन चार वर्षें अशा तऱ्हेनें निघाल्यानंतर रा. कोठारी स्वराज्य पक्षाला मिळाले. हें पत्र अलीकडे बंद झालें आहे.

**वैद्यकपत्रिका**—आयुर्वेदासंबंधी चर्चा करण्याकरितां हें साप्ताहिक पत्र रा. महादेव सखाराम दाते खेडकर वैद्य यांनीं कांहीं वर्षें नुकसान सोसून चालविलें. लोकाश्रयाच्या अभावीं बंद करणें भाग पडलें.

वरील पत्रांखेरीज ज्ञानचक्षु, व्यापारी, विजयी मराठा, विद्यार्थी, दुनिया, पुणेंसमाचार वगैरे वर्तमानपत्रें पुण्यांत या काळांत कांहीं दिवस निघत असत. पैकीं ज्ञानचक्षु आणि व्यापारी यांनीं बातम्या देण्याचें काम कांहीं वर्षे सामान्यपणें केलें. बाकीच्यांचें कांहीं महत्त्व सांगण्यासारखें नाहीं.

## मासिक पुस्तकें.

पुण्यांत जशीं वर्तमानपत्रें अनेक निघतात आणि कांहीं दिवस चालून बंद होतात तशीच मासिक पुस्तकांचीहि स्थिति आहे. पुण्यांत वर्तमानपत्रांना कांहीं तरी प्राप्ति होते; मासिकांना तशी नाहीं, यामुळें मासिकें कोणी चिकाटीनें चालवीत नाहीं. फक्त चित्रमय जगत् एवढा अपवाद आहे.

**चित्रमय जगत्**—हें मोठ्या आकाराचें सचित्र मासिक पुस्तक १९१० च्या जानेवारीपासून चित्रशाळा छापखान्यानें सुरू केलें. जरी हें मासिक अमुक एका पक्षाचें ह्मणून जाहीर करण्यांत आलें नाहीं, तरी सामान्यतः लोकमान्य टिळकांच्या राष्ट्रीय पक्षाला पोषक असेंच याचें धोरण मालकांनीं ठेवलें होतें. विविध विषयांवर विद्वानांचे लेख, प्रवासवर्णनें, कादंबऱ्या, गोष्टी वगैरे भरपूर चित्रांसह यामध्यें असतात. युरोपांतलें महायुद्ध सुरू झाल्यापासून तें संपेपर्यंत दर महिन्यास युद्धाची संकलित माहिती आपल्या विचारांसह व पुढील अंदाजासह रा. कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर या मासिकांत देत असत. त्यांचे या विषयावरील लेख वाचण्याची महाराष्ट्राला फार उत्सुकता वाटे. यामुळें चित्रमय जगताचा खपहि दहा हजारांपर्यंत वाढला. मराठी चित्रमय जगताची एक हिंदी आवृत्ति कांहीं लेख कमी जास्त करून चित्रशाळा काढीत असते. चित्रमय जगताच्या पूर्वी मुंबईतल्या मासिक मनोरंजनानें

वर्गणीदारांच्या संख्येच्या मानानें मराठी मासिकांत पहिला नंबर मारला होता, व पुढें नवयुगानेंहि संख्येच्या व विशेषत: योग्यतेच्या मानानें मासिक मनोरंजनावरहि ताण केली होती. परंतु दोन्ही बाबतींत मराठी मासिकांतला पहिला नंबर मुंबईपासून हिसकावून घेण्याचें काम चित्रमय जगतानें केलें.

**लोकशिक्षण**—भारदस्त विषयांस वाहिलेलें हें मासिक पुस्तक कै. प्रो. जनार्दन विनायक ओक यांनीं १९१२ सालीं सुरू केलें, तें त्यांच्या मृत्यूपर्यंत ह्मणजे १९१८ पर्यंत चालू होतें. असल्या मासिकांचा खप बेताचा असतो हें विविधज्ञानविस्तारावरून लोकांना माहीत आहेच. तथापि तिकडे लक्ष न देतां प्रो. ओक यांनीं हें मासिक नेटानें चालविलें.

**आनंद**—लहान मुलांनीं वाचण्याकरितां हें मासिक पुस्तक रा. वासुदेव गोविंद आपटे यांनीं १९०६ मध्यें चालू केलें तें अद्यापनियमितपणें चाललें आहे. वर्गणीदारांची संख्या चार हजारांवर आहे. रा. आपटे यांचें कौशल्य व चिकाटी या मासिकावरून दिसून येतात.

**राष्ट्रोदय**—हें मासिक पुस्तक रा. सिताराम केशव दामले यांनीं १९०६ सालीं सुरू केलें होतें. लेख भारदस्त व बाणेदार असत. यांचे सहा अंक निघाले.

**राष्ट्रबोध**—मुंबईच्या बालबोधाच्या धर्तीवर हें मासिक रा. ह. र. भागवत यांनीं १९०९ सालीं सुरू केलें. याचे दहा अंक निघाले.

**भगिनीसमाचार**—रा. कृष्णाजी रघुनाथ खिस्ती यांनीं हें मासिक कांहीं लेखकांच्या व लेखिकांच्या साहाय्यानें १९१२पासून १९१६ पर्यंत चालविलें. स्त्रियांच्या उपयोगाचे विषय यामध्यें येत असत.

**राष्ट्रोद्धार**—पुण्यांतल्या राजकीय पक्षभेदांना टाकून स्वतंत्र रीतीनें चालविण्यासाठीं रा. रामकृष्ण सदाशिव पिंपुटकर यांनीं हें मासिक १९१६ पासून १९१९ पर्यंत सुमारें तीन वर्षें नीट-पणें चालविलें.

**केरळकोकिळ**—रा. कृष्णाजी नारायण आठल्ये यांच्या संपादकत्वानें हें मूळचें मुंबईस निघणारें मासिक पुस्तक पुण्यास १९११ मध्यें त्यांच्याच संपादकत्वानें रा. अच्युत चिंतामण भट प्रकाशित करूं लागले. त्यांनीं सुमारें तीन वर्षें चालविल्यावर कांहीं काळ रा. आठल्ये व नाथमाधव या दोघांच्या संपादक-त्वानें हिंद एजन्सी पुण्यास हें प्रकाशित करीत होती. पूर्वींच्या काळांत हें एक प्रसिद्ध मासिक असे. पण तें या वेळीं इतकें प्रसिद्धीस आलें नाहीं.

**बालोद्यान**—हें मोठ्या टाइपाचें मोठ्या आकाराचें सचित्र मासिक रा. शंकर बळवंत सहस्त्रबुद्धे बी. ए. यांनीं १९१७ मध्यें सुरू केलें. यांतले विषय लहान मुलांकरितां असतात. यांत चित्रें पुष्कळ असतात.

**धर्मनिबंधमाला**—हें वाईचें 'धर्म' मासिक पुस्तक 'धर्मनि-बंधमाला' या नांवानें पुण्यास १९१५ सालीं कै. काशीनाथ वामन ऊर्फ भाऊशास्त्री लेले यांनीं सुरू करून वर्षभर चालविलें. धर्मशास्त्र, वेदान्त व तत्सम विषयांचें हें मासिक विद्वान् वाचकां-करितां होतें. या मासिकांतहि भाऊशास्त्री यांची लेखणी नेहमींप्रमाणें निःस्पृह आणि प्रखर होती.

**धर्मजागृति**—थिऑसॉफिकल सोसायटीच्या पुणें येथील सभासदांनीं आपले धर्मविषयक विचार सांगण्याकरितां हें मासिक रा. विष्णु रघुनाथ करंदीकर यांच्या संपादकत्वानें सुमारें चार पांच

वर्षे चांगल्या प्रकारें चालविलें.

यांखेरीज पुढील मासिकें पुण्यांत निघत असत—

**ब्रह्मविद्याग्रंथरत्नमाला**—यांत उपनिषदादि वेदान्तग्रंथांचें भाषांतर रा. बापटशास्त्री देत असत. **शालापत्रक**– शाळामास्तरांच्या उपयोगाकरितां; प्रकाशक चित्रशाळा प्रेस. **रंगभूमि**– प्रकाशक किर्लोस्कर मंडळी. **शिक्षक**—शाळामास्तरांच्या उपयोगाकरितां सरकारी शाळाखात्यानें चालविलेलें मासिक. **ज्ञानमित्र**– किरकोळ विषय; संपादक ना. बा. चव्हाण, **आर्यमित्र**--किरकोळ विषय; संपादक रा. म. स. दाते खेडकर वैद्य. **वैद्यकपूनापंच**–वैद्यक विषय; संपादक रा. महाजन वैद्य. **शेत, शेतकी व शेतकरी**–सरकारच्या शेतकीखात्यानें चालविलें मासिक. **ज्योतिर्भूषण**–संपादक. र. मो. पटवर्धन.

## इंग्रजी मासिकें.

**सार्वजनिक सभा कार्टर्ली**—हें त्रैमासिक एक दोन वर्षे सार्वजानिक सभेच्या मार्फत इंग्रजींत निघत असे. सभेच्या सभासदांनीं फुकट लेख लिहावे आणि सभेच्या खर्चानें त्रैमासिक छापावें अशी याची योजना होती. पगारी संपादक कोणी नव्हता. आरंभीं कांहीं प्रसिद्ध व्यक्तींनीं अशा मासिकाला लेख दिले तथापि धंद्याच्या दृष्टीनें असें मासिक कधींच टिकाऊ होत नाहीं. त्याप्रमाणें हें लवकरच बंद पडलें. याला पूर्णपणें मासिकाचें स्वरूप देऊन पगारी संपादक वर्गाकडून आपल्या पक्षाचें एक इंग्रजी मुखपत्र ह्मणून जर हें चालविलें असतें तर यानें नांव काढलें असतें.

**डेक्कन कॉलेज कार्टर्ली** आणि **फर्ग्युसन कॉलेज कार्टर्ली** हीं दोन इंग्रजी–मराठी त्रैमासिकें त्या त्या कॉलेजांतील विद्यार्थ्यांकरितांच असल्यानें त्यांचा येथें फक्त उल्लेखच करतों.

## छापखाने.

**आर्यभूषण आणि ज्ञानप्रकाश**--हे प्रथमतः दोन वेगळे छापखाने होते. ते आतां सर्वंट्स आफ इंडिया सोसायटीनें विकत घेऊन चालविले आहेत. टाइप पाडण्याची फाउंडरी पुण्यांत प्रथमतः आर्यभूषण प्रेसनें सुरू केली. हा छापखाना पुण्यांत सर्वांत मोठा आहे. दैनिक व साप्ताहिक ज्ञानप्रकाश आणि सर्वंट आफ इंडिया हीं स्वतःचीं वर्तमानपत्रें आणि यांखेरीज कांहीं काळ केसरी, करमणूक, सुधारक, मुमुक्षु हीं वर्तमानपत्रें आणि लोकशिक्षण, नाशिकचा भारतसेवक, धर्मजागृति वगैरे मासिकें या छापखान्यांत निघत होतीं. याशिवाय फर्ग्यूसन कॉलेज, न्यू इंग्लिश स्कूल, अनाथबालिकाश्रम, नूतन मराठी विद्यालय, डेक्कन व्हर्न्याक्युलर ट्रान्स्लेशन सोसायटी, भारत इतिहास संशोधक मंडळ, भांडारकर रीसर्च इन्स्टिटयूट, डेक्कन सभा, वगैरे मोठाल्या संस्थांचीं छपाईचीं सर्व कामें, पुण्यांतल्या ब्ऱ्याच प्रोफेसरांचीं व शिक्षकांचीं शालोपयोगी पुस्तकें, कै. ह. ना. आपटे यांच्या कादंबऱ्या वगैरे कामें हटकून आर्यभूषणकडेच यावयाचीं अशी पद्धत असल्यानें हा छापखाना उत्तम तऱ्हेनें चालू आहे. अर्थात् यांचें गिऱ्हाईक असें भरपूर असल्यानें यांना इतर किरकोळ गिऱ्हाइकांचीं कामें छापण्यास सवड नसते, ह्मणजे जरूर नसते. इंग्रजी टाइप याच छापखान्यांत भरपूर आहे आणि लांगप्रायमर, बर्जेस वगैरे बारीक टाइपहि आर्यभूषणजवळ जितका आहे तितका पुण्यांत दुसरीकडे नाहीं. ह्मणून डिक्शनऱ्यांसारखीं बारीक कामें आर्यभूषणखेरीज इतरत्र जात नाहींत. येथील कांहीं मराठी टाइपांचें वळण निर्णयसागरी वळणाहून भिन्न असल्यामुळें कांहीं लोकांना नापसंत असें आहे.

**जगद्धितेच्छु**—हा छापखाना कै. रावजी श्रीधर गोंधळेकर यांनीं उभारला व उत्तम प्रकारें भरभराटीस आणला. हा छाप-

खाना पुण्यांतला निर्णयसागर होय. या छापखान्यांतल्या कामाइतकें सुबक काम पुण्यांत दुसरीकडे निघत नाहीं अशी याची अद्याप-पर्यंत ख्याति आहे. आर्यभूषणपेक्षां देखील याची छपाई सरस असते, तथापि आर्यभूषण इतकी साधनसामग्री येथें नसल्यानें बारीक टाइपाचीं मराठी व इंग्रजी कामें येथें निघणें शक्य नसतें.

**चित्रशाळा**—साधनसामग्रीच्या दृष्टीनें पाहिल्यास आर्यभूषण-च्या खालीं चित्रशाळेचा नंबर लागतो. येथेंहि छपाईचें काम चांगल्यापैकीं होतें. आर्यभूषण हा जसा गोखले पक्षाचा छापखाना तसा चित्रशाळा हा टिळक पक्षाचा छापखाना असें ह्मणण्यास हरकत नाहीं. १९१० सालीं लोकमान्य टिळकांना भेटण्यास चित्रशाळेचे मालक रा. वासुदेवराव जोशी मंडालेस गेले होते, तेव्हांपासून पुढें कांहीं वर्षें चित्रशाळेमध्यें छापलेलीं पुस्तकें शाळांतून चालविण्याकरितां मंजूर होईनाशीं झालीं. त्यामुळें अशीं पुस्तकें चित्रशाळेंतून निघून दुसरीकडे गेलीं. ही गोष्ट टिळकांना परत आल्यावर कळली आणि त्यांनीं तावडतोब आपल्या हिंदी व मराठी गीतारहस्याचें काम चित्रशाळेंत छापण्यास दिलें. येथें टाईपांच्या कामाप्रमाणेंच चित्रांचें कामहि मोठ्या प्रमाणांत चालतें.

**आर्यविजय**—हा छापखाना शिराळकर बुकसेलरांच्या माल-कीचा होता. मागें कै. प्रिन्सिपाल वामन शिवराम आपटे आणि कै. लक्ष्मण रामचंद्र वैद्य या दोन विद्वानांनीं एकाच काळीं आप-आपले संस्कृत-इंग्रजी कोश तयार करून छापण्याचें काम सुरू केलें. आपला कोश अगोदर निघावा अशी दोघांचीहि झटापट चालू झाली. रा. वैद्यांच्या कोशाचें काम आर्यभूषणनें घेतलें ह्मणून प्रि. आपट्यांच्या कोशाकरितां आर्यविजय छापखाना शिराळकरांनीं उभारला. या झटापटींत दोघांनींहि आगाऊ ग्राहकांकरितां आपल्या

कोशांच्या किंमती अत्यंत कमी केल्या; त्या इतक्या कीं, प्रत्येक कोश अवघ्या एक रुपयास आगाऊ ग्राहकांस मिळाला ! पुढें आर्य-विजय छापखान्यांत कोशासारखीं बारीक टाइपाचीं कामें बरींच निघत असत. शिराळकर कंपनीचे मूळ मालक वारल्यानंतर हा छापखाना विकला गेला व पुढें कांहीं काळानें दुकानहि बंद झालें.

**इंदिरा**—हा छापखाना रा. त्र्यंबक हरि आवटे यांनीं काढला. कै. गणेश विष्णु चिपळूणकरांनीं भागवत, रामायण, भारत वगैरे मोठालीं कामें या छापखान्यांत सुरू केलीं व त्यामुळें या छापखान्याची भरभराट झाली. लोकमान्य टिळक "मराठा" वर्तमानपत्र स्वतःच्या छापखान्यांत कंपोज करवून कांहीं काळ इंदिरा प्रेसमध्यें छापण्याकरितां पाठवीत असत. या छापखान्यांत ज्ञानेश्वरी, गाथापंचक वगैरे साधूंचे ग्रंथ रा. आवटे स्वतः छापवितात. अशीं स्वतःचीं कामें बरींच असल्यामुळें बाहेरचीं कामें घेण्याकडे या छापखान्याची विशेष प्रवृत्ति नाहीं.

**लॉ प्रिंटिंग प्रेस**—याचे मालक रा. दत्तात्रय गणेश खांडेकर. यांचीं स्वतःचीं कायद्यासंबंधाचीं बरींच इंग्रजी पुस्तकें आहेत. तीं छापण्याचें काम चालवून बाहेरचीं पुस्तकें छापण्याचेंहि काम येथें होत असतें. पुण्यांतल्या सर्व छापखानेवाल्यांमध्यें रा. खांडेकर यांचा स्वभाव अत्यंत मनमिळाऊ आणि गरीब आहे.

**मनोहर**—हा छापखाना आपल्या 'काळ' वर्तमानपत्रासाठीं प्रो. शिवराम महादेव परांजपे यांनीं काढला. हाहि एक मोठा छापखाना आहे. हल्लीं यांत त्यांचें 'स्वराज्य' पत्र निघत असतें व याचें हल्लींचें नांव 'गोवर्धन' आहे.

**शारदा व यशवंत**—हा छापखाना मूळ रा. महादेव नारायण कवडे यांनीं काढला. रा. भा. ब. भोपटकर यांचें 'भाला' वर्तमान-

पत्र येथें निघूं लागलें व तेव्हांपासून याची भरभराट झाली. पुढें रा. कवडे यांनीं हा छापखाना 'यशवंत' नांवानें चालवून कांहीं काळानें रा. अच्युत चिंतामण भट यांस विकला. हल्लीं रा. भट मालक आहेत.

**केसरी**—हा छापखाना १९०५ मध्यें लोकमान्य टिळकांनीं आपल्या केसरी व मराठा वर्तमानपत्रांकारितां उभारला. या छापखान्यांत केसरी–मराठ्याच्या कामाखेरीज इतर कोणतेंहि काम छापीत नाहींत.

**ज्ञानचक्षु**—रा. भाऊ गोविंद सापकर यांचा हा छापखाना एक दोन पिढ्या पुण्यांत चालू होता. रा. सापकरांच्या मृत्यूनंतर हा बंद झाला.

**वैद्यकपत्रिका**—आपल्या वैद्यकपत्रिका पत्रासाठीं व इतर कामें छापण्यासाठीं हा छापखाना रा. महादेव सखाराम दाते खेडकर वैद्य यांनीं उभारला. हा एक मोठ्यापैकीं छापखाना होता. पण अलीकडे (१९२३ मध्यें) हा बंद झाला. येथें बरींच मोठालीं पुस्तकें छापण्यांत आलीं.

**भारतभूषण**—कै. रा. श्री. गोंधळेकर यांचे पुतणे रा. गंगाधर गोविंद गोंधळेकर यांनीं चुलत्यापासून विभक्त झाल्यानंतर हा छापखाना सुरू केला. येथें मराठी कामें बरींच निघालीं. हा १९१६ मध्यें विकला गेला.

**सुधारक**—हा छापखाना रा. रामचंद्र विष्णु फडतरे यांनीं स्वतःच्या व इतर कामाकारितां मोठ्या प्रमाणावर उभारला होता. १९२० सालीं हा विकला गेला.

**डेक्कन प्रिंटिंग वर्क्स**—हा छापखाना चित्रांकरितां, शिळेवरील कामाकारितां आणि कार्डें, हँडबिलें वगैरे किरकोळ कामाकरितां आहे. पुस्तकांचीं कामें येथें निघत नाहींत.

**आनंदाश्रम**—आनंदाश्रम संस्थेच्या संस्कृत ग्रंथावलीकरितांच हा छापखाना आहे. येथें इतर कोणतेंहि काम छापीत नाहींत.

**हनुमान**—हा छापखाना रा. लक्ष्मण भाऊ कोकाटे यांनीं बाहेरचीं कामें छापण्याकरितां १९१८ मध्यें सुरू केला. येथें बरींच पुस्तकें छापण्यांत येतात.

**रघुवीर**—रा. बापू श्रीकृष्ण महाजन यांनीं स्वतःच्या हिंमतीनें हा छापखाना १९१५ मध्यें लहान प्रमाणांत सुरू करून त्याला आतां मोठें स्वरूप आणलें आहे.

**बालोद्यान**—रा. शंकर बळवंत सहस्रबुद्धे बी. ए. यांनीं हा छापखाना १९१७ सालीं सुरू केला. चित्रांचीं कामें, शिळेवरील कामें आणि टाइपाचीं लहान कामें येथें होतात.

यांखेरीज व्यापारी, शेतकरी, सिद्धिविनायक, ज्ञानमित्र, शिवशंकर, वंदेमातरं, प्रभाकर, महाराष्ट्र वगैरे लहान छापखाने या काळांत पुण्यास होते व यांपैकीं कांहीं चालू आहेत.

पुणें शहरांतल्या सर्व छापखान्यांना लागू पडतील असे सामान्य दोन शब्द येथें लिहितों. पुणें हें छापखान्याच्या धंद्याला सोयीचें शहर आहे, आणि छापखान्याचा धंदा हा दिवसानुदिवस वाढणारा धंदा आहे. अर्थातच छपाईचें काम पुण्यांतल्या छापखान्यांत मनस्वी वाढलें आहे. याच कारणामुळें पुण्यांत कामाची किंमत नाहींशी होत आहे. आपल्या छापखान्यांत छपाई उत्तम व्हावी, काम कमी झालें तरी चालेल, अशी पूर्वीं छापखानेवाल्यांची इच्छा असे. अलीकडे गिऱ्हाइक फार वाढल्यामुळें ही परिस्थिति पालटून कामें वाईट निघालीं तरी चालतील पण भराभर कामें निघालीं पाहिजेत अशी पद्धत रूढ होत चालली आहे. छपाईचा दर अधिक मागावा पण काम उत्तम द्यावें अशी इच्छा छापखानेवाल्यांना नाहीं,

त्याचप्रमाणें दोन पैसे अधिक द्यावे पण काम चांगलें मागावें अशी गिऱ्हाईकांना इच्छा नाहीं. यामुळें पुस्तकांतून अशुद्धें अतिशय वाढूं लागलीं आहेत, छपाई वाईट होऊं लागली आहे आणि बांधणी करण्यापूर्वी पुस्तकांचीं पानें नीट तपासलीं जात नसल्यामुळें मागचीं पानें पुढें, पुढचीं मागें किंवा कांहीं पानें मुळींच नाहींत, असा प्रकार होऊं लागला आहे. गिऱ्हाईकांची अभिरुचि बिघडत चालली आहे हेंहि याचें कारण आहे. मराठी पुस्तकें विकत घेऊन वाचण्याकडे लोकांची प्रवृत्ति नाहीं, नाटकें किंवा सिनेमा किंवा चहा यांच्या पायीं सामान्यतः शिक्षित माणसाचा जितका पैसा खर्च होतो त्याचा चवथा हिस्सा देखील पुस्तकें विकत घेण्याकडे खर्च होत नाहीं. असो. गिऱ्हाइकांची प्रवृत्ति सर्वत्र सारखी आहे. पण त्या प्रवृत्तीकडे बोट दाखवून पुण्यांतल्या छापखानेवाल्यांनीं स्वस्थ बसूं नये किंवा आपलें कर्तव्य टाकूं नयें. मुंबईतल्या छापखान्यांत सामान्यतः पुण्यांतल्या छापखान्यांपेक्षां चांगलीं कामें निघतात. चांगल्या छपाईचीं व शुद्ध कामें काढण्याचा नियम केल्यास छापखान्याचें नांव होईल आणि गिऱ्हाइकहि कमी पडणार नाहीं.

## भाग पांचवा.

# पुण्यांतल्या प्रसिद्ध व्यक्ति.

१९०१ पासून १९२० दरम्यानच्या काळांत ज्या प्रसिद्ध व्यक्ति पुण्यांत वावरल्या-ह्मणजे ज्यांचा आयुष्यक्रम थोडाबहुत तरी सार्वजनिक ह्मणतां येईल—अशा व्यक्तींसंबंधाची थोडथोडी माहिती या भागांत देत आहें. ज्यांचें आयुष्य केवळ स्वार्थामध्यें गेलें अशा व्यक्तींसंबंधानें येथें मी कांहीं लिहीत नाहीं. तथापि ज्यांचीं नांवें यांत दिसणार नाहींत अशाहि कांहीं व्यक्ति चुकून राहिल्या असण्याचा संभव आहे. पण तसें असल्यास मला त्यांची माहिती नाहीं हा माझा दोष समजावा. ज्या व्यक्तींचा पुढें उल्लेख केला आहे त्यांच्यासंबंधानें तरी मी केवळ सार्वजनिक दृष्टीनेंच लिहीत आहें. त्यांच्या आयुष्यांतील सर्वच गोष्टी देण्याचा माझा उद्देश नाहीं.

**लोकमान्य बाळ गंगाधर टिळक**—अलौकिक बुद्धिमत्ता, निःस्वार्थपणा, देशभक्ति, धैर्य, चिकाटी, व्यवहारचातुर्य, मुत्सद्दीपणा, नीतिमत्ता, सदाचरण, निरहंकार, शांतवृत्ति, थोर स्वभाव वगैरे सद्गुण लोकमान्यांचे अंगीं उत्कटत्वानें वास करीत होते. या वीस वर्षांत लोकमान्यांनीं आपला देह व आपलें मन अखंड देशाच्या कामीं लावलें. परंतु खुद्द त्यांना स्वतःला हा काळ अति संकटाचा गेला. त्यांच्या सार्वजनिक आयुष्याला १८८० पासून प्रारंभ झाला. १९०० सालापर्यंत त्यांच्यावर दोन कारागृहवासांखेरीज दुसरीं संकटें आलीं नव्हतीं; तीं या काळांत आलीं. ताई-महाराज खटल्यानें १९०२ सालापासून १९१५ पर्यंत त्यांचा पिच्छा पुरविला, पांसष्ट हजार रुपये तोंपर्यंत त्यांना स्वतः

खर्च करावे लागले, आणि प्रिव्ही कौन्सिलच्या १९१५ मधल्या निकालानंतरहि त्यांना या खटल्याबाबत कांहीं त्रास झालाच. याखेरीज १९०३ मध्यें त्यांचा सुमारें वीस वर्षे वयाचा थोरला मुलगा कालवश झाला; यामुळें त्यांच्या उतारवयांत त्यांना या मुलाकडून जी मदत झाली असती त्या मदतीला ते मुकले. १९०६, १९०७ व १९०८ सालांत क्षणोक्षणीं राजद्रोहाचा खटला होण्याची भीति होती. याच सुमारास त्यांना मधुमेह या दुर्धर रोगानें पछाडलें आणि तेव्हांपासून अखेरपर्यंत सातूच्या पिठाचे पदार्थ, दहीं, दूध, संत्रीं केळीं वगैरे फळें आणि साखरेऐवजीं सॅकरिन घालून केलेला चहा एवढ्या आहारावर राहावें लागलें ! ही गोष्ट लिहिण्यास सोपी आहे, पण आचरण्यास कशी आहे हें त्यांच्यासारख्या परिस्थितींत असतील त्यांनाच माहीत. पुढें १९०८ पासून १९१४ पर्यंत पक्कीं सहा वर्षे मंडालेच्या तुरुंगांत गेलीं. या अवधींत त्यांच्या पत्नी इहलोक सोडून गेल्या, आणि १९१४ सालीं गृहिणीहीन अशा कांतारामध्यें ते परत आले. त्यानंतरच्या सहा वर्षांत क्षीण शरीरप्रकृतींत सार्वजनिक दगदग अतिशय झाली. अशा संकटांत अंगीकृत कार्य त्यांनीं नेटानें चालविलें. त्यांचें हें आचरण पाहून

"किं शेषस्य भरव्यथा न वपुषि क्ष्मां न क्षिपत्येष यत्
किं वा नास्ति परिश्रमो दिनपतेरास्ते न यन्निश्चलः ।
किंत्वंगीकृतमुत्सृजन्कृपणवच्छ्लाघ्यो जनो लज्जते
निर्वाहः प्रतिपन्नवस्तुषु सतामेतद्धि गोत्रव्रतम् ॥

या विशाखदत्ताच्या उक्तीची आठवण झाल्याशिवाय रहात नाहीं. मनुष्याच्या अंगच्या गुणांचा प्रभाव संकटांच्या काळांतच विशेष प्रकट होत असतो, त्याप्रमाणें याच काळांत टिळकांचें तेज विशेष फांकलें. टिळकांचें चरित्र सर्वश्रुत आहे, त्यांचीं नवीन

चरित्रेंहि तयार झालीं आहेत व होत आहेत. पुण्यांतली राजकीय चळवळ सांगतांना टिळकांचा उल्लेख वरचेवर आलेला आहे; आतां येथें त्यांच्या स्वभावासंबंधानें थोड्या गोष्टींचा उल्लेख करतों.

टिळक हे पहिल्या प्रतीचे मुत्सद्दी होते. मुत्सद्दीपणा हा त्यांच्या अंगचा सर्वांत महत्वाचा गुण होय. नाना फडणीसाच्या काळांत टिळकांनीं जन्म घेतला असता तर नाना फडणीसानें जशी अखेरीच्या पांच वर्षांत भागुबाईपणाची शिकस्त केली आणि बाजीरावास पेशवाई दिल्यामुळें जसें राज्य गेलें, तसा प्रकार झाला नसता, त्या काळीं देखील नाना फडणीसासारख्या मुत्सद्द्याला त्यांनीं दूर सारून राज्यकारभाराचीं सूत्रें आपल्या हातीं घेतलीं असतीं आणि आपल्या मागें निदान एक पिढी तरी आपलें धोरण चालू राहील अशी व्यवस्था केली असती. योग्य काम योग्य वेळीं योग्य माणसाकडून करवून घेण्याचें कौशल्य टिळकांचें अंगीं होतें. शिवाय संकटाचे वेळीं घाबरणारे ते नव्हते. यामुळें त्यांना अपयश केव्हांच आलें नाहीं, आतां एवढें खरें कीं, पेशवाई गेल्याचा दोष जसा एकट्या नानाकडे येत नाहीं तसेंच त्या वेळीं टिळक असते तर पेशवाईचें किंवा मराठी राज्याचें कायम रक्षण झालें असतें असेंहि ह्मणतां येणार नाहीं. देशांतील लोकांच्या अंगीं जे गुण नाहींत ते आणण्याकडे मुत्सद्दी आपली बुद्धि व शक्ति खर्चीत नाहीं; तर देशांतील लोकांचे अंगीं जे गुण असतात त्यांचा पूर्णपणें उपयोग करून त्या वेळेपुरता देशाचा उत्कर्ष करणें हें मुत्सद्द्याचें काम असतें. अशा कामानें देशाचा थोडाबहुत उत्कर्ष होत असतो ही गोष्ट वेगळी. पण तो कायमचा होईल किंवा नाहीं हें अखेरीस लोकांवरच अवलंबून रहातें. टिळक त्या वेळीं असते तरी मागून दोन पिढ्यांनीं राज्य गेलेंच असतें. लोकांमध्यें शील, सदाचार, स्वाभि-

मान, निःस्वार्थवृत्ति वगैरे गुण टिळक उत्पन्न करूं शकले नाहींत; तर ज्यांच्या अंगीं या गुणांचा अंकुर होता अशा लोकांना त्यांनीं प्रोत्साहन देऊन त्यांच्याकडून देशकार्य करविलें. ह्मणूनच टिळक मुत्सद्दी होते असें मीं ह्मटलें आहे. टिळक स्वतः साधु-वृत्तीचे होते, पण त्यांनीं इतरांना साधु करण्याचा उद्योग केला नाहीं. कारण मुत्सद्दी इतरांना साधु करण्याचा उद्योग करीत नसतात. यामुळें टिळकांचे शत्रु त्यांना opportunist ह्मणून नांवें ठेवतात. पण नांवें ठेवणारे स्वतः opportunist असतात ह्मणून ठीक आहे. एखाद्या साधूनें टिळकांना opportunist ह्मटलें तर शोभेल. मुत्सद्दी हा नेहमीं opportunist च असतो. परंतु त्याचें सर्व कार्य एका धोरणानें चालत असतें, व तसें टिळकांनीं चालविलें.

टिळक हे सवंग लोकप्रियतेला हापापलेले होते असा एक आरोप मवाळ पक्षाचे लोक करीत असतात. त्याला उत्तर थोडक्यांत आहे. लोकप्रियता सवंग नाहीं. लोकप्रियता फार महाग आहे, मोठ्या कष्टाची आहे. सवंग असती तर आरोप करणारांनीं सहज थोडीबहुत मिळविली असती. सवंग आहे राजप्रियता. लोकांना राज्यकारभारांत अधिकाधिक हक्क मिळविण्यासाठीं सरकारशीं भांड-णारांनीं सरकारच्या रोषास पात्र व्हावें, आणि त्यांच्या प्रयत्नांनीं मिळालेल्या हक्कांचा उपभोग त्यांना नांवें ठेवणारांनीं घ्यावा अशी राज्यपद्धतीची परंपरा आहे, आणि असा उपभोग घेत असतांना त्या लोकांविषयीं कृतज्ञता बाळगूं नये हीहि परंपराच आहे.

टिळकांच्या अंतःकरणांत इंग्रजांविषयीं द्वेष hatred वसत असे असाहि त्यांचेवर एक आरोप आहे. हा आरोप सर्वस्वीं खोटा आहे असें मी अनुभवानें ह्मणू शकतों. टिळकांच्या मनांत

इंग्रजांविषयीं द्वेष असूं शकेल अशी माझी पूर्वी कल्पना होती, 'पूर्वी' म्हणजे जोंपर्यंत मी त्यांच्यापासून दूर होतों तोंपर्यंत. परंतु त्यांच्या सहवासाचा लाभ कांहीं काळ मला मिळाला, थोडे दिवस निकट सहवासाचा मिळाला; आणि अशा वेळीं इंग्रजांनीं आमचें राज्य घेतलें म्हणून इंग्रजांविषयीं टिळक द्वेषबुद्धि बाळगतात कीं काय याचें मी बारकाईनें निरीक्षण केलें. पण अशा द्वेषबुद्धीचा लवलेश मला त्यांचे ठिकाणीं दिसला नाहीं. इतकेंच नव्हे तर, लॉर्ड सँढर्स्ट, लॉर्ड सिडेनहॅम, सर व्हॅलेंटाइन चिरोल किंवा सर जॉन स्ट्राची यांच्या संबंधानेंहि टिळकांच्या अंतःकरणांत द्वेष बिलकूल नव्हता. तसेंच प्रो. आगरकर, नामदार गोखले, जस्टिस दावर किंवा कोल्हापूर-नरेश यांच्याबद्दलहि टिळकांच्या अंतःकरणांत द्वेषाचें वास्तव्य नव्हतें. त्यांचे व्यवहार ते करीत आहेत, माझे व्यवहार मला केले पाहिजेत अशा पद्धतीनें टिळक वागत असत. अशा तऱ्हेचा थोर-पणा असामान्य आहे.

टिळक हे जगताचे मित्र होते. आपल्या खाजगी अडचणी आणि संकटें टिळकांना सांगावीं आणि त्यांच्या सल्ल्यानें त्यांतून पार पडावें अशीं उदाहरणें अनेक घडलीं आहेत. कोणींहि विश्वासानें सांगितलेली गुप्त गोष्ट त्यांनीं दुसऱ्याजवळ कधीं फोडली नाहीं. जे लोक टिळकांकडे येणें संभवनीय नाहीं असे लोक देखील टिळकांच्या अंगच्या या गुणामुळें त्यांजकडे येऊन जात, आणि सर्वांना ते निरपेक्षपणें योग्य तो सल्ला देत असत. शिवाय मी आतां कामांत आहें, मला वेळ नाहीं, दुसऱ्या कोणाला विचारा वगैरे सबबी सांगून ते कधीं कोणाला टाळीत नसत. त्यांचा वाडा ह्मणजे एक मुक्तद्वार होतें. कोणींहि तेथें जावें आणि

खुद्द त्यांना भेटावें असा परिपाठ होता. त्यांनीं कोणी प्रायव्हेट सेक्रेटरी ठेवला नाहीं किंवा भेट घेण्याकरितां आगाऊ सूचना नसल्यामुळें त्यांनीं कोणाची भेट घेण्याचें नाकारलें नाहीं. एकदां ज्याला आपला ह्मटलें त्याला त्यांनीं कधीं दूर सारलें नाहीं. विशेषत: संकटकाळीं मदत करण्यांत त्यांना आनंद वाटे. ‘कठिणसमय येतां कोण कामास येतो ?’ हा जगाचा नियम आहे. पण टिळक हे असामान्य पुरुष असल्यामुळें कठिण समयींच हे मनुष्याला साहाय्य करीत.+

टिळक हे केव्हांहि विकारवश होत नसत. त्यांचें आयुष्य संकटांनीं व्यापलेलें होतें, पण कोणत्याहि संकटाचे प्रसंगीं ते कधीं डगमगले नाहींत, किंवा त्यांचें चित्त अस्थिर झालें नाहीं. तसेंच कोणत्याहि आनंदाचे प्रसंगीं ते हर्षोत्फुल्ल झाले नाहींत. न्यायाधीशानें शिक्षा सांगितल्यावर त्यांच्या चेहऱ्यावर जी शांतता दिसे तीच शांतता तुरुंगांतून सुटल्यावर दिसे. ते नेहमीं मोठ्या आवाजानें बोलत असत व त्यामुळें अपरिचित मनुष्याला हे रागावले आहेत असें वाटे. परंतु रागाचा लवलेश त्यांच्या अंत:करणांत नसे. टिळकांच्या आयुष्यक्रमामुळें त्यांना शत्रु समजणारे कांहीं लोक होते व ते लोक त्यांच्यावर मनसोक्त तोंडसुख व लेखणीसुख घेत. पण तें ऐकून किंवा वाचून टिळकांच्या वृत्तींत कधींच चलबिचल झाली नाहीं. आपल्याला अमुक मनुष्यानें नांवें ठेवलीं किंवा अमुक मनुष्यानें आपल्याविरुद्ध लिहिलें असें नामदार गोखल्यांना कळलें कीं

---

\+ नेमस्त पक्षांतले एक गृहस्थ बरेच वेळां आपल्या मंडळींत पुढील उद्गार काढीत होते असें मला माहित आहे:— "Mr. Gokhale is a friend in prosperity; Mr. Tilak is a friend in adversity."

त्यांच्या वृत्तींत चलबिचल होत असे व कांहीं प्रसंगीं त्यांना झोंप देखील येत नसे. पण टिळकांची वृत्ति अशा प्रसंगीं खंबीर असे.

टिळकांच्या प्रास्ताविक आयुष्यांतील दोन गोष्टींचा येथें उल्लेख करणें मला जरूर वाटतें. पहिली गोष्ट फर्ग्यूसन कालेजांतील प्रोफेसरीचा राजीनामा. या राजीनाम्याची —ह्मणजे टिळकांनीं फर्ग्यूसन कॉलेज कां सोडलें यासंबंधाची— माहिती मागेंच सर्वश्रुत झालेली आहे, ह्मणून मी त्याची चर्चा येथें करीत नाहीं. पण या प्रकरणानें त्यांच्या स्वभावाला एक वेगळें वळण लागलें. फर्ग्यूसन कॉलेजांतील सर्वच प्रोफेसरांशीं त्यांचें त्या वेळीं पटत नव्हतें असें नाहीं; व त्यांनीं राजीनामा दिलाच पाहिजे अशी त्यांच्यावर त्या वेळीं कोणी सक्ति करूं शकला नसता. किंबहुना कै. माधवराव रानड्यांच्या मनांत टिळकांनीं राजीनामा देऊं नये अशी इच्छा होती, व याकरितां राजीनाम्याच्या दिवशीं टिळकांचे घरीं ते स्वतः येऊनहि गेले. परंतु आपण येथें नको अशी कांहीं जणांची जर इच्छा आहे, तर त्यांच्यामध्येंच राहून त्यांच्याशीं भांडत बसण्यापेक्षां आपण दूर जाणें बरें अशा विचारानें त्यांनीं राजीनामा दिला. परंतु त्यानंतर आपल्या वागणुकीची ही दिशा त्यांनीं पूर्णपणें बदलली. आपण कोठेंहि गेलों तरी तेथून पुनः कधीं परत फिरावयाचें नाहीं हा वर्तनक्रम त्यांनीं पुढें कायमचा अंमलांत आणला. कौन्सिलांत जा किंवा कॉंग्रेसमध्यें जा, आणि आपल्या विचारांची छाप तेथील लोकांवर बसविण्याकरितां तेथेंच राहून भांडा आणि त्या संस्था काबीज करा, अशा प्रकारचें धोरण त्यांनीं स्वीकारलें. सुरत शहरीं कॉंग्रेस मोडल्यानंतर सहा महिन्यांनीं टिळक तुरुंगांत गेले. परंतु त्या सहा महिन्यांत त्या सालची कॉंग्रेस नेमस्त व राष्ट्रीय दोन्ही पक्षांची मिळून भरविण्याचा त्यांचा खटा-

टोप होता. कांग्रेसचें क्रीड ठरवून मवाळ पक्षानें मद्रासला १९०८ सालीं कॉंग्रेस भरविली. त्या वेळीं राष्ट्रीय पक्षाचा नागपुरास कॉंग्रेस भरविण्याचा घाट होता. परंतु टिळक मोकळे असते तर त्यांनीं निराळी कांग्रेस भरविण्याचा विचार बाजूला सारून ते मद्रासलाच गेले असते, आणि तेथें कांग्रेसमध्येंच शिरले असते. जरूर तर क्रीडवर सही करून देखील शिरले असते आणि पुढें दोन तीन वर्षांच्या अवधींत पुनः कांग्रेसवर त्यांनीं आपली छाप बसविली असती. सहा वर्षांत राष्ट्रिय पक्षाचा एकहि मनुष्य कांग्रेसला गेला नाहीं. यामुळें १९१५ आणि १९१६ सालीं टिळकांनीं मुंबई इलाख्याच्या दोन स्वतंत्र परिषदा पुणें व बेळगांव येथें भरविल्या. पण त्या परिषदा कांग्रेसपासून अलग होण्याकरितां भरविल्या नाहींत, कांग्रेसला जवळ ओढण्याकरितांच भरविल्या आणि १९१६ सालचीच कॉंग्रेस त्यांनीं काबीज केली. १९२० सालीं कलकत्त्याच्या स्पेशल कॉंग्रेसला जर टिळक हयात असते तर त्यांनीं कौन्सिलांच्या, कोर्टांच्या व शाळांच्या अव्यावहारिक बहिष्काराला बिलकूल संमति दिली नसती. तेथल्या तेथें भर कॉंग्रेसमध्यें ठरावाला विरोध केला असता. कौन्सिलासारख्या विशाळ राज्ययंत्रावर आपण जर बहिष्कार घातला, तर तो बहिष्कार आपल्यावर होतो, कौन्सिलावर होत नाहीं, याकरितां तेथें जाऊन तें यंत्र आपल्या हातांत घेण्याचेंच धोरण त्यांनीं ठरविलें असतें. आपण कौन्सिलांत गेल्यास आपणांस कौन्सिल काबीज करील अशी भीति त्यांच्या मनाला शिवली नाहीं, आपणच कालांतरानें कौन्सिलाला काबीज करूं अशी त्यांची खात्री होती. अर्थात् सरकाराला 'सैतानी सरकार' ह्मणून सरकारवर त्यांनीं कधीं बोटें मोडलीं नाहींत. मुत्सद्दी आणि साधु यांच्यामध्यें फरक हाच आहे. जगांत जी परिस्थिति आहे ती जमेस धरून

त्या परिस्थितींत आपल्याला काय करतां येईल तें करणें हें मुत्सद्द्याचें धोरण. साधु असतो तो जगाची परिस्थिति लक्षांत घेत नाहीं. असल्या जगाशीं आपण संबंध ठेवूं नये असा विचार करून तो अरण्यांत जातो. येथें वाचकांनीं लक्षांत ठेवलें पाहिजे कीं, मला टिळकांच्या स्वभावाचें दिग्दर्शन करावयाचें आहे; अर्थात् त्यांचा स्वभाव होता तसा मी सांगतों. टिळक चांगले किंवा गांधी चांगले याबद्दल कांहीं लिहिण्याचा माझा विचार नाहीं. कोणता मार्ग चांगला हें ज्यानें त्यानें आपल्या बुद्धीप्रमाणें ठरवावें. येथें फक्त टिळकांच्या स्वभावाचें वर्णन मी करीत आहें.

दुसरी महत्वाची गोष्ट म्हणजे लॉ क्लास. फर्ग्यूसन कॉलेज सोडल्यानंतर टिळक स्वस्थ बसणें तर शक्यच नव्हतें. त्यांनीं लगेच अडचणीच्या प्रसंगांत देखील केसरी व मराठा पत्रें सर्व हक्कांसुद्धां विकत घेतलीं, व त्यांच्या द्वारें लोकमत वळविण्याचा उद्योग चालविला. तरी एवढ्यानें काम भागणार नाहीं असें जाणून वकीलीचा अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांकरितां लॉ क्लास काढला. त्याच्या योगानें टिळकाना थोडे पण निवडक शिष्य मिळाले आणि हेच पुढें वकील झाले आणि ठिकठिकाणीं वजनदार पुढारी होऊन त्यांची टिळकांच्या राजकीय धोरणाला अखेरपर्यंत मदत झाली. यावरून त्यांची मुत्सद्दी दूरदृष्टि दिसून येते.

टिळकांच्या अंगीं कांहीं दोष होते काय ? असा प्रश्न कोणाच्या मनांत उद्भवेल. त्यासंबंधानें माझे विचार येथें सांगतों. टिळक हे असामान्य पुरुष होते असें मागें सांगितलें आहेच; अर्थात् अशा थोर पुरुषाचे दोष दाखविण्याची माझी योग्यता नाहीं हें प्रथम सांगतों. योग्यता नसली तरी त्यांच्या स्वभावाचें वर्णन करतांना त्यांच्या स्वभावांत कांहीं दोष आहेत असें मला

वाटलें तर तें नमूद करणें जर माझें कर्तव्य आहे, आणि याकरितांच मी माझे विचार येथें सांगतों.

मुत्सद्दीपणा हा टिळकांचा सर्वांत महत्वाचा गुण. पण मुत्सद्दी हा कधीं सर्वगुणसंपन्न नसतो. अर्थात् मुत्सद्द्याच्या अंगीं कांहीं दोष असणें अपरिहार्य असतें. ज्याला मुत्सद्दी ह्मणून नांव मिळवावयाचें असेल त्यानें मुत्सद्दीपणाला जरूर ते गुण आणि जरूर ते दोष जवळ बाळगिले पाहिजेत, त्यांशिवाय मुत्सद्दीपणांत तो यशस्वी होणार नाहीं. समाजाला हाताशीं धरून राजकीय बाबतींत उत्कर्ष करणें हें मुत्सद्द्याचें काम; आणि ह्मणूनच टिळकांनीं फक्त राजकीय चळवळ हातीं घेतली. राजकीय चळचळ हेंच सर्वस्व आहे अशा धोरणानें त्यांनीं आमरण उद्योग चालविला. यामुळें राजकीय चळवळींत सर्वांत मोठ्या पदाला ते चढले. ते वारल्यानंतर एक महिन्यानें स्पेशल कांग्रेस भरावयाची होती आणि त्या कांग्रेसचे अध्यक्ष लाला लजपतराय नियोजित झालेले होते. हे अध्यक्ष —ह्मणजे देशांतल्या सर्वांत मोठ्या राजकीय संस्थेचे अध्यक्ष— टिळकांच्या अखेरच्या दर्शनासाठीं पंजाबांतून आले आणि त्यांच्या मृत देहाला लालाजींनीं साष्टांग नमस्कार घातला. अशा तऱ्हेनें राजकीय चळवळींतला असामान्य सन्मान टिळकांनीं मिळविला याबद्दल मतभेद नाहीं. परंतु जगाच्या व्यवहारांत राजकीय चळवळ हेंच सर्वस्व आहे काय ? मला वाटतें, नाहीं. राजकीय उत्कर्ष हें समाजाचें अंतिम ध्येय नव्हे. राजकीय उत्कर्ष ज्यांचा झाला ते समाज सर्व प्रकारें आदर्शभूत होते किंवा आहेत असें ह्मणतां येत नाहीं. ज्या समाजांत नीतिमत्ता कमी प्रतीची आहे, ज्या समाजांत स्वार्थवृत्ति बोकाळली आहे, ज्या समाजांतील व्यक्तींमध्यें अहंकाराचें प्राबल्य आहे, जो समाज इतरांचा नाश, इतरांचे हाल आणि इतरांचीं दुःखें पहाण्यांत व

आपल्या मजेकरितां इतरांचा छळ करण्यांत आनंद मानतो, असा समाज राजकीयदृष्ट्या कांहीं काळ जरी उन्नतीला पोंचला तरी ती उन्नति नव्हे, ती अधोगति होय. समाजाला सद्‌गुणी करण्यासाठीं जे देह झिजवितात, ते मुत्सद्द्यांपेक्षां थोर होत. अशा थोर पुरुषाला समाजाकडून अपमान सोसून घ्यावा लागतो, कारण तो समाजाचे दोष दाखवीत असतो, व ते दोष जाण्याच्या इच्छेनें समाजाच्या पाठीवर कोरडे ओढीत असतो हें लोकांना आवडत नाहीं. मुत्सद्दी पुरुष आपल्या लोकांना कधींच नांवें ठेवीत नाहीं. आमचे लोक सर्वगुणसंपन्न आहेत आणि आमच्या उन्नतीच्या आड परकी लोक आहेत, ते आमची उन्नति होऊं देत नाहींत, अशा कल्पनेच्या पायावर मुत्सद्द्याच्या चळवळींची उभारणी असते. हा भ्रम आहे. आमचा देश कांहीं सृष्टीच्या आरंभापासून इंग्रजांच्या अंमलाखालीं नव्हता. आह्मी आपण होऊन त्यांच्या ताब्यांत राज्य दिलें. त्यांना नांवें ठेवण्यानें आमची उन्नति कशी होणार ? त्यांनीं ज्या गुणांच्या जोरावर राज्य मिळविलें ते गुण त्यांच्या पेक्षां अधिक पटीनें आमच्या अंगीं येतील त्या दिवशीं राज्य आमचेंच होणार आहे. जे लोक ज्या राज्यपद्धतीला लायक असतात त्या पद्धतीचेंच राज्य त्यांना मिळत असतें. ह्मणून नालायक लोकांमध्यें राजकीय चळवळ करून त्यांना राज्यकारभारांत हक्क मिळवून दिले तरी ते टिकत नाहींत. आह्मी स्वराज्याला लायक आहोंत अशा समजुतीवर कोणी स्वराज्याला लायक होत नाहीं. आमचे लोक सर्वगुणसंपन्न आहेत असें समजण्यांत चूक आहे. याकरितां राजकीय चळवळीबरोबरच नैतिक सुधारणेचा उद्योग चालविला पाहिजे. मोंगलांचें राज्य खालावलें तेव्हां शिवाजीसारख्या सामान्य माणसानें आपलें राज्य स्थापलें व तें मोंगलांच्या खालावलेल्या काळांत मराठी लोकांनीं वाढविलें. पण

त्यांना टिकवितां आलें नाहीं. तसेंच युरोपांतल्या महायुद्धामुळें जगांत जी बिकट परिस्थिति उत्पन्न झाली त्या परिस्थितीमुळें आह्मांला थोडेंबहुत स्वराज्य मिळण्याचा जरी संभव असला तरी त्याचे योगानें आमच्या लोकांच्या हाडींमांसीं खिळलेले दुर्गुण नष्ट होणार नाहींत, आणि त्यामुळें अखेरीस तें स्वराज्य फुकटच होणार.

टिळकांचे अंगीं सिंहाचें शौर्य होतें. हत्तीला पाहिल्याबरोबर सिंह बेधडक चाल करून जातो. आपल्या मागून आपल्या मदतीला कोणी येत आहे कीं नाहीं इकडे सिंह लक्ष देत नाहीं. सिंहाच्या दृष्टीनें हा गुण आहे, पण यांतच सिंहाचा दोषहि दिसतो. टिळकांनीं एका ठराविक धोरणानें आपली राजकीय चळवळ चालविली पण आपल्या मागें ती चळवळ आपल्या धोरणानें पद्धतशीर चालू राहील अशी व्यवस्था जितकी करावयास पाहिजे होती तितकी केली नाहीं. जीं माणसें त्यांना मिळालीं तीं चांगलीं मिळालीं; परंतु जीं व जितकीं माणसें त्यांना सहज मिळवितां आलीं असतीं त्यांना एकत्र करून आपली चळवळ पुढेंहि सुसंघटित रीतीनें चालू राहील अशी व्यवस्था त्यांच्या हातून झाली नाहीं. या कारणानें १९०८ सालीं टिळकांना शिक्षा झाल्यानंतर त्यांचे अनुयायी कांहींसे विस्कळित झाले आणि त्यांच्या मृत्यूनंतर तर हा विस्कळितपणा चांगलाच दिसून आला. टिळक ज्या मराठी समाजांत जन्मास आले त्या मराठी समाजाचाच हा दोष आहे, व याबद्दल टिळकांकडे जबाबदारी सर्वस्वीं येत नाहीं. कारण मराठी समाज हा बाजारबुणग्यांचा समाज. लूट मिळण्याची संधी असेल तेव्हां सर्व एकत्र, आणि मार खाण्याचा प्रसंग आला कीं ज्याला जिकडे वाट फुटेल तिकडे त्यानें पळावें. असो. नामदार गोख-

त्यांचें राजकारण कोणाला आवडो वा न आवडो, त्यांनीं आपलें राजकारण आपल्या मागें चालू रहाण्याची व्यवस्था टिळकांपेक्षां चांगली केली यांत शंका नाहीं.

टिळकांनीं शिवाजीचें प्रस्थ वाजवीपेक्षां अधिक वाढविलें असेंहि मला वाटतें. हें बहुधा त्यांनीं जाणून बुजून केलें असेल; कदाचित् नकळत त्यांच्या हातून झालें असेल. कारण, क्षत्रियांचें प्रस्थ वाढविण्याचा ब्राह्मणांचा स्वभाव वेदकालापासून आहे; लढाया करून आर्यांच्या समाजाला विजय मिळवून देणाऱ्या लढवय्या क्षत्रियांना देव करण्याची ब्राह्मणांची परंपरा जुनी आहे. जाणून-बुजून असो, किंवा नकळत असो, टिळकांमुळें शिवाजीचें माहात्म्य फार वाढलें आणि आरंभीं कांहीं वर्षें, तरुणांनीं शिवाजीचे मार्ग अनुसरावे अशी टिळकांची इच्छा असावी अशी बऱ्याच तरुणांची समजूत झाली.

वरील दोन तीन दोष मीं टिळकांचे ह्मणून दाखविले. तथापि असामान्य व्यक्तींच्या अंगीं कांहीं दोष असणें अपरिहार्य असतें, ते दोष त्या व्यक्तींचे नव्हेत, त्यांच्या असामान्यत्वाचे असतात, हें वाचकांनीं लक्षांत ठेवावें. केवळ याच विचारानें मीं त्यांचा उल्लेख केला आहे.

**रा. धोंडो वासुदेव विद्वांस**— हे लोकमान्य टिळकांचे भाचे. टिळकांचे घरीं हे लहानपणीं कोंकणांतून विद्याभ्यासाकरितां आले. मॅट्रिकची परीक्षा पास झाल्यापासून हे टिळकांच्या केसरी आफीसच्या म्यानेजरचें काम करीत आहेत. हें मोठ्या जबाबदारीचें काम यांनीं आरंभापासून आतांपर्यंत अति दक्षतेनें चालविलें. शिवाय साधारण टिळकांच्या प्रायव्हेट सेक्रेटरीचें काम यांनींच केलें. टिळकांसारख्या असामान्य माणसाच्या हाताखालीं वागण्यास रा. धोंडोपंतांसारखा

मदतगार नसता तर टिळकांचीं कामें अनेक प्रसंगीं अडून राहिलीं असतीं. तीस वर्षे केसरी पत्र ठरलेल्या दिवशीं काढण्याचें काम तर यांनीं बजावलेंच, पण आज अमुक ठिकाणीं जा, उद्यां तमुक ठिकाणीं जा, रात्र-दिवस जेवण-उपास कशाचीहि पर्वा न करतां काम फत्ते करून येणें हें ब्रीद धोंडोपंतांनीं संभाळलें. हीं कामें लोकांपुढें येत नाहींत व यामुळें असल्या कामांची माहिती लोकांस नसते. टिळक स्वतः कामें करणारे खंबीर होते; अर्थात् त्यांच्या हाताखालीं खंबीर मदतगारच पाहिजे होता. रा. धोंडोपंतांखेरीज दुसऱ्या कोणाहि माणसाच्या हातून टिळकांचीं कामें झालीं नसतीं आणि ह्मणून टिळकांच्या यशाचे वांटेकरी रा. धोंडोपंत आहेत. सर्वसाधारण लोकांना जाहीर नसलेली माहिती येथें अवश्यं सांगितली पाहिजे.

**रा. नरसिंह चिंतामण केळकर** बी. ए. एल एल.बी — १८९७ च्या खटल्याचे सुमारास रा. केळकर स्वयंस्फूर्तीनें टिळकांना केसरी—मराठा पत्रांच्या संपादकाचे कामीं मदत करण्यास आले व हें मोठें कार्य त्यांनीं अद्यापपर्यंत कळकळीनें आणि हौसेनें चालविलें आहे. रा. केळकरांनीं पुण्यांतलीं इतरहि सार्वजनिक कामें पुष्कळ केलीं आहेत व ते अद्याप करीत आहेत. रा. केळकर हे अत्यंत सरळ स्वभावाचे गृहस्थ आहेत. कोणतीहि बाब असो, नीट सल्ला देतील, कधीं कोणावर रागावणार नाहींत, असे हे गृहस्थ आहेत. लेखन, वाचन आणि सार्वजनिक कामें, यांमध्यें यांचा सर्व वेळ जातो; यामुळें यांना विश्रांति किंवा आळस यांची माहिती देखील नाहीं.

**प्रो. शिवराम महादेव परांजपे** एम्. ए.— हे 'काळ' पत्राचे सर्वश्रुत संपादक. पुण्याच्या महाराष्ट्र कालेजामध्यें हे मागें

प्रोफेसर होते. हे अप्रतिम लेखक आणि वक्ते ह्मणून प्रसिद्ध आहेत. अलीकडे यांनीं 'स्वराज्य' पत्र चालविलें आहे.

**रा. कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर** बी. ए.— हे १८९५ च्या सुमारास केसरीचे दुय्यम संपादक झाले. हें काम त्यांनीं १९०९ च्या अखेरपर्यंत नियमानें केलें. पुढेंहि क्वचित केसरींत लिहिण्याचें कारण पडल्यास लिहीत असत. १९१९ मध्यें रा. केळकर विलायतेस गेले होते तेव्हां हेच केसरीचे संपादक होते. ट्रान्सवालांतल्या बोअर युद्धानंतर केसरींत 'गनिमी काव्याची लढाई' ह्मणून जी लेखमाला प्रसिद्ध झाली होती ती यांचीच. चित्रमय जगतांतले युद्धविषयक लेख आणि कांचनगडची मोहना, कीचकवध, सवाई-माधवरावाचा मृत्यू, भाऊबंदकी, मानापमान, सत्वपरीक्षा, रुक्मिणी-स्वयंवर, वगैरे नाटकें यांचे लेखक ह्मणून यांचें नांव महाराष्ट्रांत प्रसिद्ध आहे. मुंबईच्या लोकमान्य पत्राचे हे कांहीं दिवस संपादक होते, आतां 'नवा काळ' पत्राचे संपादक आहेत.

**कै. अण्णासाहेब पटवर्धन**— यांचें संपूर्ण नांव विनायक रामचंद्र पटवर्धन बी. ए. एल. एल. बी. हे कायद्याचा अभ्यास करून एल. एल. बी झाले; आणि त्याच सुमारास डाक्टरीचा अभ्यास करीत होते पण अखेरच्या परीक्षेला बसले नाहींत. त्यानंतर आयुर्वेदाचाहि अभ्यास यांनीं केला. आयुर्वेदांत हे निष्णात होते आणि हजारों लोकांस तपासून औषध कोणतें व कसें घ्यावें हें सांगत असत. पुस्तकाविषयक काळांत हे केवळ आपल्या घरीं विरक्त वृत्तीनें राहून औषधी सल्ला फुकट देत असत. यांच्या अनेक गुणांमुळें हे पुण्यांत सर्व जातींच्या आबालवृद्धांस पूज्य होते. यांची देशभक्ति बाणेदारपणाची होती. लोकमान्य टिळकांच्या सर्व चळवळींना यांची पूर्ण संमति असे, आणि आपलीं दुसरीं कामें

बाजूला सारून हे अशा प्रसंगीं हजर रहात असत. हे सार्वजनिक सभेचे चेअरमन व नंतर अध्यक्ष होते. लोकमान्य टिळकांशीं यांची वृत्ति एकजीव असल्यामुळें कांहीं मवाळ मंडळींस हे अप्रिय होते, तरी ते सुद्धां यांना कांहींसे वचकत असत. यांची सनातन वैदिक धर्मावर अढळ श्रद्धा असून यांचें आचरण जुन्या काळच्या योग्या-प्रमाणें किंवा साधूप्रमाणें होतें. १९१७ सालीं हे कैलासवासी झाले.

**कै. प्रो. श्रीधर गणेश जिन्सीवाले एम्. ए.**— हे विद्वान् आणि बाणेदार गृहस्थ मुंबईच्या विल्सन कॉलेजांत पूर्वी प्रोफेसर होते. युरोपियन व हिंदी लोकांच्या नीतिमत्तेसंबंधीं यांनीं काढलेले उद्गार यांच्या वरिष्ठांस झोंबले व ते उद्गार परत घेण्याविषयीं यांना सांगण्यांत आलें. तें यांनीं नाकारलें व आपल्या नोकरीचा राजीनामा दिला. त्यानंतर हे पुण्यास येऊन राहिले. यांचें बहु-तेक चरित्र आमच्या पुस्तकविषयक काळाच्या आधींचें होतें. वेद हे ईश्वरप्रणीत आहेत असें यांचें मत असून तें सिद्ध करण्याक-रितां हे जाहीर सभांतून चर्चा करीत. जाहीर व्याख्यानांच्या द्वारें यांनीं आपल्या विद्वत्तेचा लाभ पुणेकरांस पुष्कळ दिला; तसा आतां कोणी देत नाहीं. हे १९०३ सालीं निवर्तले. लोकमान्य टिळकांचे हे एक मित्र होते. आपली लहान पण निवडक ग्रंथांची बहुमोल लायब्ररी यांनीं आपल्या पश्चात् टिळकांना बक्षीस द्यावी असें लिहून ठेवलें व त्याप्रमाणें ती मिळाली. अशा तऱ्हेनें यांनीं आपलें मित्रत्व खरें करून दाखविलें. लोकमान्य व जिन्सीवाले एकमेकांच्या घरीं जाऊन वेदांसंबंधानें वरचेवर चर्चा करीत असत.

**कै. बळवंत रामचंद्र नातु**—सरदार बाळासाहेब नातु हे निर्भीड वृत्तीनें टिळकांच्या चळवळीला मदत करीत असत.

आपल्या सरदार घराण्याची भीति न बाळगतां हे अखेरपर्यंत टिळकांचे मित्र होते. यांच्या उमेदीचीं वर्षें १९०१ च्या पूर्वींच गेलीं. १८९७ सालीं यांना सरकारनें विन चवकशीनें पकडून सुमारें तीन वर्षें अटकेंत ठेवलें होतें. सनातन धर्माचे कट्टे अभिमानी आणि व्यवहारचतुर असे हे पुरुष होते. यांच्या धर्मभक्तीमुळें यांना पुण्यांतले 'डेप्युटी शंकराचार्य' असें लोक थट्टेनें ह्मणत असत. राजकीय चळवळीच्या कडक काळांत सुद्धां टिळकांच्या राजकारणाशीं प्रत्यक्ष संबंध ठेवण्यास हे सदा पुढें असत. हे १९१४ सालीं वारले.

**कै. रावबहादुर गणेश व्यंकटेश जोशी बी. ए.**—हे विद्वान् गृहस्थ सोलापूर, सातारा, पुणें वगैरे शहरीं सरकारी हायस्कुलांत हेडमास्तराचें काम करून पेन्शन घेतल्यावर पुण्यांत येऊन राहिले. राजकारणाचा यांचा व्यासंग दांडगा होता, आणि तत्संबंधींच्या आंकडेशास्त्रांत हे निष्णात होते. यांचे अनेक लेख मुंबईच्या टाइम्स आफ इंडिया पत्रांत 'जे' या सहीनें प्रसिद्ध झालेले आहेत; तथापि सरकारी नोकरींत असतांना यांना उघडपणें राजकारणांत पडणें अशक्य होतें. पेनशन घेतल्यानंतर यांनीं टिळकांच्या पक्षाला पाठिंबा दिला. सुरतेच्या कांग्रेसनंतर पुणें जिल्हासभा आणि धुळ्याची प्रांतिक सभा यांच्या अध्यक्षाचे जागीं रा. ब. जोशी यांची योजना झाल्यामुळें या सभांना विशेष महत्व प्राप्त झालें. टिळकांच्या गैरहजेरींत टिळकांच्या पक्षाचें पुढारीपण घेण्यास विद्वत्ता, वय, अनुभव वगैरे गुणांनीं हे योग्य होते व त्याप्रमाणें त्या कठिण काळांत हें काम यांनीं केलें. १९०९ सालीं मुंबई इलाख्याच्या कायदेकौन्सिलांत हे निवडून आले. पण पुढें लवकरच १९०९ सालीं हे वारले.

**रा. वासुदेव गणेश जोशी**— हे चित्रशाळा छापखान्याचे मालक आणि लोकमान्यांचे स्नेही. "टिळकांचा उजवा हात" असें यांना एकदां नामदार गोखल्यांनीं ह्मटलें होतें. लोकमान्यांना जुरूरीच्या प्रसंगीं आपणांकडून होईल ती मदत हे हौसेनें करीत असत. टिळकांचे बरोबर हे विलायतेसहि जाऊन आले.

**रा. शंकर नरहर जोशी**— रा. वासुदेवराव जोशी यांचे हे पुतणे व चित्रशाळेचे म्यानेजर. हेहि रा. वासुदेवरावांप्रमाणेंच टिळक पक्षाचे कट्टे अभिमानी आहेत व टिळकपक्षाला शक्य ती मदत करीत असतात.

**रा. शंकर गणेश लवाटे** बी. ए.— न्यू प्रिपरेटरी क्लासेस या शाळेच्या मूळ उत्पादकांपैकीं हे एक आहेत. १९०४ मध्यें ही शाळा रा. भास्कर बळवंत भोपटकर यांचे स्वाधीन यांनीं केली व आपण दुसऱ्या चळवळींत पडले. केसरी आफीसांत दुय्यम संपादक, पैसाफंडाचे प्रचारक, सार्वजनिक सभेचे एक सेक्रेटरी वगैरे कामें यांनीं कांहीं दिवस केलीं; पण यांचें हौसेचें काम ह्मणजे मद्यपाननिषेधाची चळवळ. दारूचें व्यसन देशांतून नाहींसें झालें पाहिजे हें यांचें ध्येय. सरकारच्या मदतीखेरीज आणि लोकांच्या साहाय्यानें हें ध्येय आपण साध्य करूं अशी यांची समजूत होती. विद्यार्थ्यांकरितां यांनीं कांहीं दिवस एक बोर्डिंग चालविलें आणि अलीकडे लोकसंग्रहाच्या संपादकाचें काम केलें.

**रा भास्कर बळवंत भोपटकर** बी. ए. एल. एल. बी.— न्यू प्रिपरेटरी क्लासेसला महाराष्ट्रविद्यालय असें नांव देऊन यांनीं तें कांहीं दिवस चालविलें. भाला वर्तमानपत्राचे संपादक आणि वकील ह्मणून हे प्रसिद्ध आहेत. हिंदुधर्मांतील अस्पृश्य मानलेल्या जातींची अस्पृश्यता काढून टाकावी आणि वरिष्ठ जातींतील लोकांनीं त्यांच्याशीं

यांनीं बाणेदारपणानें केलें. राष्ट्रमताच्या भरभराटीचें श्रेय दामल्यांचेंच आहे. परंतु 'राष्ट्रमत' पत्राची व्यवस्था आरंभापासूनच चुकीची झाली असल्यामुळें रा. दामले एक महिन्याची रजा घेऊन पुण्यास येतात तों चालकांनीं तिकडे दुसरें डिक्लेरेशन केलें. हें पाहून रा. दामले परत मुंबईस गेले नाहींत. त्यांनीं कांहीं वर्षें पुण्यास वकीली चालविली. चित्रमय जगतांत हे नेहमीं लेख देत असत. १९१८ मध्यें यांनीं 'राजकारण' वर्तमानपत्र चालू केलें.

**रा. कृष्णाजी नारायण कवडे** बी. ए.— हे पूना नेटिव इन्स्टिटयूशनमध्यें शिक्षक असतांना यांनीं टिळकांच्या खटल्याचें मराठी भाषांतर लिहिलें ह्मणून यांना ती नोकरी सोडणें भाग पडलें. नंतर कांहीं दिवस हे महाराष्ट्रविद्यालयाचे सुपरिंटेंडंट होते. तें विद्यालय बंद झाल्यावर यांनीं आयुर्वेदाचा अभ्यास करून वैद्यकीचा धंदा सुरू केला. तेव्हां यांना लोक कृष्णशास्त्री कवडे असें ह्मणूं लागले. हे टिळक पक्षाचे कट्टे अभिमानी आहेत आणि तन्निमित्त करावे लागणारे उद्योग हौसेनें आणि चुकारपणा न करता करतात.

**कै. प्रो. जनार्दन विनायक ओक** एम्. ए.— तीन वर्षें फर्ग्यूसन कालेजांत प्रोफेसरीचें काम केल्यावर नागपूरच्या नील सिटी हायस्कूलच्या हेडमास्तरची जागा यांना मिळाली. १९०७ सालीं विद्यार्थ्यांसंबंधानें निघालेल्या रिस्ले सर्क्युलरच्या बाबतींत मतभेद झाल्यामुळें त्या जागेचा राजीनामा देऊन हे तळेगांवच्या समर्थ विद्यालयास मिळाले. तें विद्यालय समितीच्या कायद्याअन्वयें बंद झाल्यानंतर यांनीं पुस्तकलेखनाचा व्यवसाय चालवून लोकशिक्षण नांवाचें मासिक काढलें. १९१८ सालीं हे वारले.

**कै. वासुदेव शंकर गांधी** बी. ए. एल. एल. बी.— हे

पुण्यांतले एक सुखवस्तु गृहस्थ होते. १९०७।०८ सालीं हे टिळकपक्षाशीं तादात्म्य पावले होते. हे लवकरच लोकमान्यांच्या विश्वासास पात्र झाले. १९०९ च्या प्रारंभास प्लेगनें यांचा अंत झाला.

**कै. दत्तात्रय गणेश बेहरे**— हे एक पुण्यांतले सुखवस्तु सावकार टिळकांना वडील भाऊ मानणारे होते. ऱ्याच सार्वजनिक कामांत हे असत ह्मणून यांचा येथें उल्लेख केला आहे.

**कै. दत्तात्रय गोपाळ लिमये** बी. ए.— हे मूळचे विटें (जि. सातारा) येथें राहणारे, मुकाट्यानें पण जबर मेहनत करणारे सुस्वभावी गृहस्थ प्रथमतः कांहीं दिवस 'काळ' पत्राचे मदत संपादक होते व नंतर सुमारें पंधरा वर्षें केसरीचे मदतसंपादक होते. केसरीवर यांचें नांव नसल्यामुळें यांची माहिती बाहेरच्या लोकांस नाहीं; तथापि यांच्या निरलस कामाची किंमत केसरी आफिसांतील मंडळी जाणतात. हे १९१५ सालीं प्लेगनें वारले. 'भारतीय युद्ध' व 'भारतीय उपकथा' हीं यांचीं पुस्तकें प्रसिद्ध आहेत.

रा. **गणेश सदाशिव मराठे** एम्. ए.— हे एक श्रीमंत आणि व्यवहारी गृहस्थ मुंबईची एम्. ए. ची परीक्षा झाल्यानंतर विलायतेस जाऊन ॲक्चुअरी झाले. हे सार्वजनिक कामांत पडतात. विनोदी लेखक ह्मणून हे लोकांस माहीत आहेत.

रा. **दत्तात्रय विष्णु आपटे** बी. ए.— हे प्रारंभीं यवतमाळच्या राष्ट्रीय शाळेचे हेडमास्तर होते. ती शाळा बंद झाल्यानंतर कांहीं दिवस हे मुंबईच्या राष्ट्रमताचे संपादक झाले. त्यानंतर कांहीं दिवस गोव्यांत पोर्तुगीज हद्दींत एका शाळेच्या प्रिन्सिपालाचें काम केल्यावर हे पुण्यास येऊन राहिले. इतिहास–संशोधन हा यांचा आवडता विषय आहे. या विषयासंबंधीं लेखन वाचन आणि चित्रमय जगत् मासिकाचें संपादकत्व हीं कामें यांनीं चालविलीं आहेत.

भेटीव्यवहार जरूर सुरू करावा अशा विचारांचा यांनीं आपल्या वर्तमानपत्राच्या द्वारें नेटानें पुरस्कार केला.

**रा. लक्ष्मण बळवंत भोपटकर** एम्. ए. एल. एल. बी.— हे रा. भास्करराव भोपटकरांचे कनिष्ठ बंधु. यांनीं वडील बंधूच्या गैरहजेरींत भाला पत्र चालविलें. नंतर महाराष्ट्र विद्यालयाच्या सुपरिंटेंडंटचें काम केलें. नंतर एल. एल. बी. ची परीक्षा देऊन हे वकीली करूं लागले व धंद्यांत यांनीं नांव मिळविलें. 'सार्वजनिक सभेचे' हे सेक्रेटरी असून सार्वजनिक कामांत हौसेनें आणि बाणेदारपणानें पडणारे हे गृहस्थ आहेत. १९२० सालीं यांनीं 'लोकसंग्रह' पत्राचें संपादकत्व शिरावर घेतलें आणि एक वर्षापुरती आपली वकीली असहकारितेकरितां सोडली. तथापि पुढें असल्या असहकारितेविरुद्ध यांनीं नेटानें मोहीम चालविली; वगैरे हकीकत १९२० नंतरची आहे. अस्पृश्यतानिवारणाचा पुरस्कार हेहि नेटानें करीत असतात.

**रा. लक्ष्मण रामचंद्र पांगारकर** बी. ए.— हे एक प्रसिद्ध मराठी वक्ते, लेखक आणि पंढरपूरच्या विठोबाचे भक्त व महाराष्ट्र साधुसंतांचे अभिमानी म्हणून लोकांना माहित आहेत. यांचा ओढा धर्माकडे आणि टिळक पक्षाकडे होता. धार्मिक बाबींखेरीज इतर बाबतींत टिळकांना हे गुरुस्थानीं मानीत असत. १९०७ सालीं तर आपल्या मुमुक्षु पत्रामध्यें टिळकांचीं एकूण एक व्याख्यानें छापण्याचें यांनीं ब्रीद ठरविलें होतें. पुढें १९०८ सालानंतर यांचे विचार पालटले. राजकीय विषयांवर लिहावयाचें नाहीं असें ठरवूनच हे स्वस्थ बसले नाहींत, तर टिळकांनीं वाडे बांधले असा त्यांचा उपहास करण्यासहि हे धजावले. जणूं काय टिळक संन्यासाश्रमाचेच पुरस्कर्ते होते! या एका गोष्टीवरून

पांगारकर जुने ऋणानुबंध कसे तोडतात तें दिसून येतें. पांगारकर देशस्थ ब्राह्मण आहेत, तथापि हा कोकणस्थांचा सामान्य गुण त्यांनीं उचलला असें दिसतें. असो. पांगारकर हे वारकरी पंथाचे अभिमानी. परंतु वारकरी पंथ रामदासस्वामींना मान्यता देत नव्हता, तसे पांगारकर नव्हेत. हे रामदासांचे अभिमानी आहेत; आणि वारकरी लोकांच्या परंपरेला बाजूस सारून त्यांच्या साधु मंडळींत रामदासाचा समावेश करण्याचें श्रेय पांगारकरांकडे आहे. पांगारकरांचा धर्म ह्मणजे भक्तिमार्ग आणि रूढींचें आचरण. इंदूर दरबारानें पांगारकरांना एक मोठी मानमरातबाची नोकरी दिली होती व तेव्हां दोन तीन वर्षें ते तिकडे जाऊन राहिले. परंतु इंग्रजी हद्दींत स्वतंत्र वातावरणांत वावरलेल्या पांगारकरांचें संस्थानी हद्दींत जमणें शक्यच नव्हतें आणि त्याप्रमाणें परत येऊन त्यांनीं पुनः मुमुक्षु चालू केला. यांनीं साधुसंतांचीं चरित्रें बऱ्याच परिश्रमानें लिहून प्रकाशित केलीं आहेत.

**रा. सीताराम केशव दामले** बी. ए., एलएल. बी— हे एक टिळक पक्षांतले प्रसिद्ध पुढारी आहेत. यांच्या सार्वजनिक आयुष्याला १९०६ मध्यें प्रारंभ झाला. हे वर्षभर फर्ग्यूसन कॉलेजांत प्रोफेसर होते. परंतु या प्रोफेसरीचा यांना अभिमान नव्हता. कारण " There are as many professors in Poona as there are generals in the Salvation Army " हें मुंबईच्या एका पत्रानें लिहिलेलें वाक्य हे विनोदानें उच्चारीत असत. असो. नंतर १९०७ सालीं हे ज्ञानप्रकाशाचे संपादक झाले. सरकारनें लाला लजपतरायांना हद्दपार केल्यापासून यांनीं मवाळ पक्ष सोडला. थोडे दिवस हे 'मराठा' पत्राचे संपादक होते. नंतर १९०८ सालीं मुंबईच्या 'राष्ट्रमत' दैनिकाच्या संपादकाचें काम

यांनीं बाणेदारपणानें केलें. राष्ट्रमताच्या भरभराटीचें श्रेय दामल्यांचेंच आहे. परंतु 'राष्ट्रमत' पत्राची व्यवस्था आरंभापासूनच चुकीची झाली असल्यामुळें रा. दामले एक महिन्याची रजा घेऊन पुण्यास येतात तों चालकांनीं तिकडे दुसरें डिक्लेरेशन केलें. हें पाहून रा. दामले परत मुंबईस गेले नाहींत. त्यांनीं कांहीं वर्षें पुण्यास वकीली चालविली. चित्रमय जगतांत हे नेहमीं लेख देत असत. १९१८ मध्यें यांनीं 'राजकारण' वर्तमानपत्र चालू केलें.

**रा. कृष्णाजी नारायण कवडे** बी. ए.— हे पूना नेटिव इन्स्टिटयूशनमध्यें शिक्षक असतांना यांनीं टिळकांच्या खटल्याचें मराठी भाषांतर लिहिलें ह्मणून यांना ती नोकरी सोडणें भाग पडलें. नंतर कांहीं दिवस हे महाराष्ट्रविद्यालयाचे सुपरिंटेंडंट होते. तें विद्यालय बंद झाल्यावर यांनीं आयुर्वेदाचा अभ्यास करून वैद्यकीचा धंदा सुरू केला. तेव्हां यांना लोक कृष्णशास्त्री कवडे असें ह्मणूं लागले. हे टिळक पक्षाचे कट्टे अभिमानी आहेत आणि तन्निमित्त करावे लागणारे उद्योग हौसेनें आणि चुकारपणा न करता करतात.

**कै. प्रो. जनार्दन विनायक ओक** एम्. ए.— तीन वर्षें फर्ग्यूसन कालेजांत प्रोफेसरीचें काम केल्यावर नागपूरच्या नील सिटी हायस्कूलच्या हेडमास्तरची जागा यांना मिळाली. १९०७ सालीं विद्यार्थ्यांसंबंधानें निघालेल्या रिस्ले सर्क्युलरच्या बाबतींत मतभेद झाल्यामुळें त्या जागेचा राजीनामा देऊन हे तळेगांवच्या समर्थ विद्यालयास मिळाले. तें विद्यालय समितीच्या कायद्याअन्वयें बंद झाल्यानंतर यांनीं पुस्तकलेखनाचा व्यवसाय चालवून लोकशिक्षण नांवाचें मासिक काढलें. १९१८ सालीं हे वारले.

**कै. वासुदेव शंकर गांधी** बी. ए. एल. एल. बी.— हे

पुण्यांतले एक सुखवस्तु गृहस्थ होते. १९०७।०८ सालीं हे टिळकपक्षाशीं तादात्म्य पावले होते. हे लवकरच लोकमान्यांच्या विश्वासास पात्र झाले. १९०९ च्या प्रारंभास प्लेगनें यांचा अंत झाला.

**कै. दत्तात्रय गणेश बेहरे**— हे एक पुण्यांतले सुखवस्तु सावकार टिळकांना वडील भाऊ मानणारे होते. बऱ्याच सार्वजनिक कामांत हे असत ह्मणून यांचा येथें उल्लेख केला आहे.

**कै. दत्तात्रय गोपाळ लिमये** बी. ए.— हे मूळचे विटें (जि. सातारा) येथें राहणारे, मुकाट्यानें पण जबर मेहनत करणारे सुस्वभावी गृहस्थ प्रथमतः कांहीं दिवस 'काळ' पत्राचे मदत संपादक होते व नंतर सुमारें पंधरा वर्षें केसरीचे मदतसंपादक होते. केसरीवर यांचें नांव नसल्यामुळें यांची माहिती बाहेरच्या लोकांस नाहीं; तथापि यांच्या निरलस कामाची किंमत केसरी आफिसांतील मंडळी जाणतात. हे १९१५ सालीं प्लेगनें वारले. 'भारतीय युद्ध' व 'भारतीय उपकथा' हीं यांचीं पुस्तकें प्रसिद्ध आहेत.

रा. **गणेश सदाशिव मराठे** एम्. ए.— हे एक श्रीमंत आणि व्यवहारी गृहस्थ मुंबईची एम्. ए. ची परीक्षा झाल्यानंतर विलायतेस जाऊन ॲक्चुअरी झाले. हे सार्वजनिक कामांत पडतात. विनोदी लेखक ह्मणून हे लोकांस माहीत आहेत.

रा. **दत्तात्रय विष्णु आपटे** बी. ए.— हे प्रारंभीं यवतमाळच्या राष्ट्रीय शाळेचे हेडमास्तर होते. ती शाळा बंद झाल्यानंतर कांहीं दिवस हे मुंबईच्या राष्ट्रमताचे संपादक झाले. त्यानंतर कांहीं दिवस गोव्यांत पोर्तुगीज हद्दींत एका शाळेच्या प्रिन्सिपालाचें काम केल्यावर हे पुण्यास येऊन राहिले. इतिहास–संशोधन हा यांचा आवडता विषय आहे. या विषयासंबंधीं लेखन वाचन आणि चित्रमय जगत् मासिकाचें संपादकत्व हीं कामें यांनीं चालविलीं आहेत.

**कै. सदाशिव कृष्ण भावे**— हे एक होतकरू गृहस्थ केसरी, चित्रमय जगत्, रंगभूमि वगैरेमध्यें लेखक होते. हे अकालीं मरण पावले.

**रा. जनार्दन सखाराम करंदीकर** बी. ए. एल. एल बी—हे तळेगांवच्या समर्थविद्यालयांत शिक्षक होते. सदर विद्यालय बंद झाल्यानंतर हे पुण्यास येऊन राहिले. हल्लीं हे केसरीचे मदत संपादक आहेत. प्राच्यविद्यासंशोधन, इतिहास, ज्योतिष वगैरे विषयांमध्येंहि यांची गति बरीच आहे.

**रा. शंकर गजानन पुरोहित** बी. ए., एलएल बी— हे गृहस्थ कांहीं दिवस पुण्याचे रहिवासी होते. हे कै. अण्णासाहेबांचे शिष्य ह्मणवीत असत. कांहीं सिद्ध पुरुषांच्या कृपेनें हिंदुस्थानाला पांच सात वर्षांत स्वराज्य मिळणार आहे अशी यांनीं १९०८।०९ सालीं पुण्यांतल्या सुशिक्षितांमध्यें हूल उठविली होती व त्यामुळें यांना कांहीं लोक भाळले होते. १९११ सालीं मंडालेच्या तुरुंगांत लोकमान्य टिळकांना एका सिद्ध पुरुषानें दर्शन दिलें आणि त्यामुळें टिळकांना धीर आला अशीहि आणखी एक हूल यांनीं उठविली होती. 'टिळकांचा जयजयकार' नांवाचें पुस्तक यांनींच लिहिलें होतें.

**डा. नरहर शिवराम ऊर्फ बाबा परांजपे**— हे मूळचे यवतमाळचे रहिवासी, आणि वऱ्हाडांतले राष्ट्रीय पक्षाचे एक आधारस्तंभ. १९०८ सालापासून हे पुण्यांस येऊन राहिले आणि येथेंहि यांनीं टिळक पक्षाच्या सर्व चळवळींस साहाय्य केलें. स्वार्थ सोडून देऊन राष्ट्रकार्याला आपलें सर्वस्व यांनीं अर्पण केलेलें आहे. बेळगांवास रा. गंगाधरराव देशपांडे यांचेवर एक खटला चालला होता व त्यांच्या तर्फेनें बॅ. नॉर्टन काम चालविण्यास

आले होते. त्या वेळीं डा. परांजपे यांच्या कुशाग्र बुद्धीनें जळलेलीं हाडें आणि पुरलेलीं हाडें यांतला भेद बॅ. नार्टन यांच्या नजरेस आणून दिला आणि यामुळें रा. गंगाधररावांवरचें अरिष्ट टळलें.

रा. दामोदर विश्वनाथ ऊर्फ बाबूराव गोखले बी. ए. एल एल. बी.— हे मूळचे कोल्हापूरचे रहिवासी, १९११ च्या सुमारास पुण्यांत येऊन राहिले, आणि टिळक पक्षाच्या चळवळींत पुढाकार घेऊं लागले. स्वराज्यसंघ, सार्वजनिक सभा, डि. कां. कमिटी वगैरे संस्थांचे सेक्रेटरी झाले. 'मराठा' पत्राचे हल्लीं हे संपादक आहेत.

रा. रामकृष्ण दत्तात्रेय पराडकर— हे वाईचे रहाणारे, मोरोपंत कवीचे वंशज. यांनीं मोरोपंत कवीचे समग्र ग्रंथ छापण्याचें काम हातीं घेतलें. यांनीं पुण्यास 'लोकसंग्रह' नांवाचें राष्ट्रीय पक्षाचें दैनिक वर्तमानपत्र स्वतःच्या हिंमतीनें सुरू करून वर्ष दीड वर्ष चालविलें. 'प्रिंटिंग एजन्सी' नांवानें यांनीं कांहीं पुस्तकें प्रकाशित केलीं आहेत.

डॉ. गोपाळराव पळसुले— हे होमिओपाथिक डाक्टर. यांनीं पुण्यास स्वयंसेवक मंडळाची उभारणी केली. या स्वयंसेवकाचा राष्ट्रीय पक्षाच्या सर्व सभा, परिषदा, गणपतीउत्सव, शिवाजीउत्सव वगैरे प्रसंगीं चांगला उपयोग होतो.

रा. वामन मल्हार जोशी एम्. ए.— हे तळेगांवच्या समर्थ विद्यालयांत शिक्षक होते. 'विश्ववृत्त' मासिकाचे संपादक असल्यामुळें त्यांतल्या एका लेखावर झालेल्या खटल्यांत यांना साडेतीन वर्षें तुरुंगवास भोगावा लागला. नंतर कांहीं दिवस हे 'मराठा' वर्तमानपत्राचे मदतसंपादक होते. अलीकडे हे हिंगणें येथील स्त्रियांच्या युनिव्हर्सिटीमध्यें प्रोफेसर आहेत. हे एक नांवाजलेले ग्रंथकार आहेत. विशेषतः यांची 'रागिणी' कादंबरी लोकप्रिय झालेली आहे.

रा. पांडुरंग महादेव बापट बी. ए.— हे नगर जिल्ह्यां-

तील पारनेर गांवचे रहाणारे. यांचें चरित्र कादंबरीपेक्षांहि अद्भुत आहे. बी. ए. ची परिक्षा पास झाल्यावर मुंबई युनिव्हर्सिटीची मंगळदास नथूबाई फेलोशिप मिळवून हे १९०४ सालीं विलायतेस गेले. तेथें स्काटलंडांत लेबर पक्षाच्या एका सभेंत यांनीं एक व्याख्यान दिलें व तें छापून काढलें. त्यामुळें यांची फेलोशिप बंद झाली. तेव्हां पं. श्यामजी कृष्णवर्मा या गृहस्थांनीं यांचा कांहीं खर्च चालविला. विलायतेस कांहीं बंगाली अराजकांची व यांची गांठ पडली. पुढें हे फ्रान्स व जर्मनीमध्यें जाऊन परत हिंदुस्थानांत आले. ते प्रथमतः कलकत्त्यास उतरून नंतर पुण्यास आले. १९०८ मध्यें अलीपूर बॉंबच्या खटल्यांत माफी साक्षीदार नरेंद्रनाथ गोस्वामी यानें आपल्या गुप्त मंडळींच्या एका बैठकींत बापट हजर होते असें साक्षींत सांगितलें. ही बातमी पुण्यांत असतांना बापट यांस वाचावयास मिळाली. तेव्हां आतां आपणांस धरणार हें जाणून ते गुप्त झाले. ते १९१२ पर्यंत गुप्त होते. या अवधींत गुप्तपोलीस खात्यानें यांचा तपास पुष्कळ चालविला होता. हे इराणांत व रशियांत गेल्याचीहि अफवा होती. परंतु ती सर्व खोटी होती. बापट हे मध्य हिंदुस्थानांतल्या एका संस्थानांत दुसऱ्या नांवानें व दुसऱ्या वेषानें रहात होते. हे साधारण ठेंगणे असल्यामुळें पोरवयाचेच दिसत होते. हे तेथें हायस्कुलांत मॅट्रिकच्या वर्गांत बसून अलाहाबाद युनिव्हर्सिटीच्या मॅट्रिकच्या परीक्षेला बसले, पास झाले आणि त्याच शाळेंत मास्तर ह्मणून राहिले. एकदोन वर्षांनीं यांची माहिती असलेल्या एका माणसानें यांची बातमी पोलीस खात्याकडे दिली आणि यांना इंदूरच्या स्टेशनावर पकडून मुंबईच्या पोलीस कमिशनरकडे पाठविण्यांत आलें. अटकेमध्यें असतांना यांची जी चवकशी

करण्यांत आली तीमध्यें यांनीं सर्व प्रश्नांचीं सरळ उत्तरें दिलीं. शिवाय यांनीं प्रत्यक्ष गुन्हा असा कोणताच केलेला नव्हता. त्यावरून हे गृहस्थ विलक्षण असले तरी गुन्हेगार नाहींत अशी पोलीस कमिशनर मि. व्हिन्सेंट यांची खात्री पटून यांना एक दोन नातलगांच्या जामीनकीवर सोडून देण्यांत आलें. नंतर हे पारनेर गांवीं आपल्या घरीं जाऊन राहिले. लोकमान्य टिळक सुटून आल्यानंतर हे पुण्यास आले व टिळकांनीं यांना कांहीं दिवस 'मराठा' पत्राचे मदत संपादक नेमलें. पुढें ज्ञानकोशमंडळांत कांहीं दिवस हे पगारी काम करीत होते. १९२० सालीं मुळशी पेट्याच्या चळवळीला यांनीं स्वतःला वाहून घेतलें.

**कै. पांडुरंग नरसिंह पटवर्धन**— इतिहास-संशोधन हा यांचा आवडता विषय, आणि विशेषतः बारीक गोष्टींचा शोध करण्यांत यांची बुद्धि प्रवीण होती. यांनीं लावलेल्या बारीक शोधांचा फायदा घेऊन बडे इतिहाससंशोधक यश मिळवीत असत आणि हे बिचारे मागेंच पडत. भोळसर व भिडस्त स्वभावाचा हा परिणाम असावा. असो. राजकीय बाबतींत हे टिळकांचे कट्टे अभिमानी होते. राष्ट्रहितैषी पत्राच्या संपादक मंडळांत हे असून पत्रावर संपादक ह्मणून यांचेंच नांव जाहिर झालेलें होतें. हे १९२१ मध्यें अकालीं कालवश झाले. केसरींत प्रसिद्ध झालेल्या मृत्युलेखांत यांना "वंदेमातरं व राष्ट्रहितैषी या दोन्ही पत्रांचे संपादक" असें लिहिलें होतें. पण 'वंदेमातरं' पत्राशीं यांचा संबंध नव्हता.

**कै. डॉ. रामचंद्र गोविंद वझे**— हे एक होतकरू तरुण गृहस्थ कलकत्त्याच्या नॅशनल मेडिकल कॉलेजांतून डॉक्टर होऊन पुण्यास आले व टिळक पक्षाच्या चळवळींत उत्साहानें सामील झाले.

स्वराज्यसंघ, आरोग्यमंडळ वगैरे संस्थांच्या सेक्रेटरीचें काम यांनीं केलें. १९१६ च्या प्लेगमध्यें हे अकालीं मृत्युमुखीं पडले.

**डॉ. रामचंद्र भीमराव नाईक**— हे मूळचे बेळगांवचे रहणारे. पुण्यांत सार्वजनिक कामें करण्याच्या हौसेनें हे १९१६ सालीं पुण्यास येऊन राहिले. आरोग्यमंडळ, गोरक्षण वगैरे चळवळींत यांनीं कामें केलीं.

रा. **नारायणराव गुंजाळ**— हे मऱ्हाटे जातीचे वाणेदार देशभक्त आहेत. मराठी समाजांत ब्राह्मण आणि ब्राह्मणेतर अशी फूट पाडण्याचा जो कांहीं उपद्व्याप चालू आहे तो दूर करण्याचा हे मनोभावानें प्रयत्न करीत असतात.

**रा. त्र्यंबक हरी आवटे**— रा. नारायणराव गुंजाळ यांचे-प्रमाणेंच हेहि गृहस्थ मऱ्हाटे जातीचे असून महाराष्ट्र साधुसंतांच्या भागवत धर्माच्या शिकवणीप्रमाणें समाजानें वागावें आणि कलह करूं नये अशासाठीं प्रयत्न करीत असतात.

**रा. काशीनाथ ठकूजी जाधव**— हे कै. अण्णासाहेब पटवर्ध-नांचे शिष्य. यांचीहि टिळकपक्षाला बऱ्याच सार्वजनिक कामांत मदत झालेली आहे.

**कै. श्रीपती रघुनाथबोवा भिंगारकर**— हे एक वारकरी मंड-ळींतले पुढारी व कै. टिळकांचे स्नेही आणि अभिमानी होते. ज्ञानेश्वर एक कीं दोन यासंबंधानें यांचे लेख केसरींत प्रसिद्ध झालेले आहेत.

**कै. विष्णुबोवा जोग**— वारकरी समाजाचे पुढारी, ज्ञानेश्वरी-मध्यें निष्णात तज्ज्ञ, ब्रह्मचारी आणि साधुवृत्तीचे पुरुष होते. राजकीय बाबतींत हे पूर्णपणें लो. टिळकांच्या पक्षाचे होते.

**रा. भाऊसाहेब गोखले**— लोकमान्य टिळकांवर ज्यांचें अकृ-

त्रिम आणि निःसीम प्रेम होतें आणि त्यांच्याकरितां कोणताहि स्वार्थत्याग करण्यास जे सदा तयार असत अशा कांहीं व्यक्ति पुण्यांत होत्या व आहेत. अशांपैकीं भाऊसाहेब गोखले हे एक आहेत.

**रा. यशवंत गणेश कुळकर्णी**— हेहि लोकमान्यांचे एक निःसीम भक्त आहेत. ताईमहाराज खटल्यामध्यें अथपासून इतिपर्यंत लोकमान्यांना यांचें अमोल साहाय्य झालें.

**कै. शंकर पांडुरंग महाजन**— महाराष्ट्र विद्यालयांतील शिक्षक आणि सन्मित्रसमाज मेळ्याच्या चालकांपैकीं एक प्रमुख गृहस्थ म्हणून हे प्रसिद्ध होते.

**रा. नीलकंठ वामन भिडे** बी. ए., एलएल. बी— सन्मित्र-समाज मेळ्याचीं कांहीं पदें हे करीत असत. १९०९ सालीं नामदार गोखल्यांनीं कांहीं पदांबद्दल यांचेवर अब्रुनुकसानीची फिर्याद केली व थोडे दिवस खटला चालल्यावर रा. भिडे यांचें माफीपत्र स्वीकारून ती काढून घेतली.

**रा. वामन मोरेश्वर पोतदार** बी. ए., एलएल बी.— हे सार्वजनिक सभेचे सभासद असून टिळक पक्षाच्या चळवळींना यांची मदत असते.

**रा. केशव बळवंत नाईक** बी. ए. वकील— हेहि सार्वजनिक सभेचे सभासद पूर्वींपासून आहेत व टिळक पक्षाच्या चळवळींना यांची मदत झालेली आहे.

**रा. वामन दामोदर तळवलकर** वकील— हे बरींच वर्षें शिवाजीच्या राज्यारोहणोत्सवाचे सेक्रेटरी आहेत.

**पैसाफंड रानडे**— जाहीर सभा, व्याख्यानें, नाटकें वगैरे ठिकाणीं पैसाफंड गोळा करण्याकरितां नेहमीं पेटी फिरवून यांनीं पैसाफंडाला चांगली मदत केली. दरसाल मुलांमुलींचा पैसाफंड

मेळा अलीकडे हे काढीत असतात.

**रा. का. के. आठवले**— हे एक चांगले इंग्रजी लेखक आहेत. मुंबईच्या 'चँपियन' पत्रांत कांहीं दिवस यांनीं काम केलें होतें. १९०५ सालीं लाहोरास 'पंजाबी' पत्राला संपादकाची जरूरी होती ह्मणून लो. टिळकांनीं यांची शिफारस केली व हे तिकडे गेले. १९०७ मध्यें सदर पत्राचे संपादक ह्मणून यांना लाहोरास राजद्रोहानिमित्त सहा महिन्यांची शिक्षा झाली होती.

**डॉ. लोहोकरे**— हे गृहस्थ अलीकडे स्वराज्य पक्षाचे कट्टे अभिमानी झाले आहेत.

आतांपर्यंत पुण्यांतल्या टिळक पक्षांतल्या प्रमुख व्यक्तींसंबंधानें माहिती सांगितली. आतां गोखले पक्षाच्या मंडळीसंबंधानें सांगतों.

**डॉ. रामकृष्ण गोपाळ भांडारकर** सी. आय. ई.— हे वयोवृद्ध व ज्ञानवृद्ध गृहस्थ सर्वांच्या आदरास पात्र आहेत. कै. न्या. रानडे यांचेबरोबर प्रार्थनासमाजाची स्थापना यांनीं केली. युनिव्हर्सिटीमध्यें यांनीं केलेली शिक्षणसेवा सर्वश्रुत आहे. इंग्रजी शिक्षणक्रमांत मुंबई इलाख्यांत संस्कृत भाषेचें वर्चस्व वाढविण्याचें बरेचसें श्रेय यांचेकडे आहे. संस्कृत भाषा कठिण ह्मणून जे मराठीचा अभिमान धरतात असे कांहीं लोक डॉ. भांडारकरांस याबद्दल नांवें ठेवतात. यांच्या आयुष्यांतील उमेदीचा काळ १९०० पूर्वींच होऊन गेला. प्राच्यविद्याविशारद ह्मणून यांचें नांव जगभर प्रसिद्ध आहे. यांच्या नांवानें यांच्या शिष्यमंडळींनीं १९१९ मध्यें 'भांडारकर रीसर्च इन्स्टिट्यूट' नांवाची संस्था पुण्यास स्थापन केली. राजकीय चळवळींत हे विशेष पडत नाहींत. तरी राजकीयदृष्ट्या हे नेमस्त पक्षाशीं एकरूप आहेत. व्यक्तिस्वातंत्र्याच्या चळवळींत यांनीं पुढाकार घेतलेला आहे.

**कै. नामदार गोपाळ कृष्ण गोखले बी. ए.**— नेमस्त पक्षाचे अध्वर्यू ह्मणून हे प्रसिद्ध होते. नामदार गोखले हे लोकमान्य टिळकांपेक्षां चार पांच वर्षांनीं लहान. बी. ए. झाल्याबरोबर हे डेक्कन एज्युकेशन सोसायटीला येऊन मिळाले. टिळक जसे पुण्यांतल्या आणि महाराष्ट्रांतल्या एका पक्षाचे अध्वर्यू तसे गोखले हे दुसऱ्या पक्षाचें अध्वर्यू. अर्थात् गोखल्यांच्या संबंधानें लिहूं लागल्यास त्यांची टिळकांचे बरोबर तुलना केल्यावांचून लिहिणें शक्यच नाहीं. गोखले बुद्धिमत्तेमध्यें टिळकांपेक्षां कमी ठरतील तथापि हातीं घेतलेल्या विषयाला तत्परतेनें वाहून घेण्याची यांची पद्धत असल्यामुळें बुद्धिमत्तेमधला कमीपणा लोपून जात असे. टिळकांची बुद्धि जशी सर्वांगीण होती तशी गोखल्यांची नव्हती. दोघांनाहि प्रतिपक्षाशीं झगडण्याची हौस. परंतु टिळक हे सिंहाप्रमाणें प्रतिपक्षाशीं दोन हात करीत, गोखले हे आपलें बलाबल पाहून प्रसंगीं मागें घेत, प्रसंगीं पुढें जात, गनिमी काव्यानें आपला उद्योग चालवीत. टिळकांचे अंगीं जें धैर्य होतें तें गोखल्यांचे अंगीं नव्हतें. ह्मणूनच टिळकांना जहाल आणि गोखल्यांना मवाळ हीं विशेषणें लोकांकडून मिळालीं. राजद्रोहाच्या वारंटानें पकडल्या दिवशीं टिळकांना स्वस्थ झोंप लागे, आपल्या विरुद्ध कांहीं कोणीं लिहिल्याचें किंवा बोलल्याचें समजल्यावर गोखल्यांना झोंप येत नसे. सभाबंदीचा कायदा पास झाला तेव्हां वीसवीस लोकांच्या सभा आह्मी भरवूं असें टिळकांनीं छातीठोकपणें सांगितलें; आणि देशाच्या शांततेला प्रेस ॲक्ट जरूर आहे असें अधिकाऱ्यांनीं सांगतांच गोखल्यांनीं प्रेस ॲक्टाला संमति दिली. गोखल्यांची दृष्टि सरकाराकडे असे, टिळकांची दृष्टि लोकांकडे असे. टिळकांची भेट रावापासून रंकापर्यंत कोणीहि घेऊं शकत असे, गोखल्यांची भेट घेणें सामान्य माणसास काय पण त्यांच्या भक्तांसहि

मुष्किलीचें पडे. दोघांनींहि राजकीय चळवळ हेंच आपलें कार्यक्षेत्र ठरविलें होतें; तथापि टिळक समाजाशीं फटकून कधीं वागले नाहींत, सरकारशीं फटकून वागले; आणि गोखले सरकारशीं कधीं फटकून वागले नाहींत, समाजाशीं फटकून वागले. टिळक महत्त्वाकांक्षी नव्हते, पण स्वतःसिद्धच पुढारी होते. गोखले महत्त्वाकांक्षी होते, पण टिळकांचें धाडस त्यांचे अंगीं नसल्यामुळें ते सर्वत्र दुसरा नंबर धरून रहात. कै० न्या रानडे, कै० प्रो. आगरकर आणि फेरोजशहा मेहता यांचे उजवे हात अशा नात्यानें गोखले सर्वदा वागत.

गोखले मोठे पुरुष होते, जबर मेहनती होते, महत्त्वाकांक्षी होते, देशभक्त होते, पहिल्या प्रतीचे वक्ते होते, वगैरे त्यांच्या अंगच्या असामान्य गुणांबद्दल वाद नाहीं. परंतु गोखले केव्हांहि टिळक किंवा टिळकांचे मदतगार होऊं शकले नसते. कारण टिळकांचें असामान्य धैर्य त्यांचे अंगीं नव्हतें; आणि टिळकांचें विशाल अंतःकरण त्यांचेपाशीं नव्हतें. हिंदुस्थानांतल्या कोणाहि माणसास टिळक आपलेसे वाटत, मग तो मनुष्य संस्थानिक असो, जहागीरदार असो, मोठा सरकारी हुद्देदार असो, सामान्य मनुष्य असो, अगदीं हलक्यांतला हलका मनुष्य असो, कोणत्याहि जातीचा असो, कोणत्याहि धर्माचा असो, मवाळ असो, जहाल असो, किंवा ज्वलज्जहाल असो. असा विश्वास गोखल्यांच्या बद्दल लोकांना वाटला नाहीं.

टिळकांप्रमाणें गोखल्यांचे अंगीं मुत्सद्दीपणा हा गुण त्यांच्या प्रकारें होता. आणि मुत्सद्दी हा कांहीं ध्येयवादी म्हणजे Idealist नसतो. जशी वेळ येईल तसा वागणारा म्हणजे Opportunist असतो. 'ऑपॉर्चुनिस्ट' म्हणून टिळकांना नांवें ठेवणाऱ्या लोकांनीं गोखलेहि तसेच होते हें विसरूं नये.

पुस्तककालाच्या प्रारंभीं गोखले मुंबई कायदे कौन्सिलचे सभासद होते, मग इंपीरियल कायदे कौन्सिलचे सभासद झाले, त्यांना लॉर्ड कर्झन साहेबांनीं सी. आय. ई. ची पदवी दिली. १९०५ मध्यें ते बनारसच्या कांग्रेसचे अध्यक्ष झाले. याच सुमारास त्यांनीं सर्वंट्स आफ इंडिया सोसायटी स्थापली. पुढेंहि इंपीरियल कौन्सिलचे सभासद, पब्लिक सर्विसेस कमिशनचे सभासद, कांग्रेसचे जनरल सेक्रेटरी वगैरे कामें त्यांनीं केलीं. युरोपांतलें महायुद्ध सुरू झाल्यानंतर हिंदुस्थानाला कांहीं तरी बक्षीस द्यावें अशी वाटाघाट चालली असतां जर्मन ईस्ट आफ्रिका हिंदी लोकांना द्यावी अशी गोखल्यांची शिफारस होती! गोखले यापूर्वीं दक्षिण आफ्रिकेंत जाऊन आले होते. असो. १९१५ सालीं नामदार गोखले अल्पकालच्या दुखण्यानें अकालीं इहलोक सोडून गेले.

रँगलर परांजपे— यांचें संपूर्ण नांव रघुनाथ पुरुषोत्तम परांजपे, बी. एस. सी., एम्. ए., सीनियर रँगलर ( केंब्रिज )— हे प्रो. धोंडो केशव कर्वे यांचे भाचे, कोंकणांतून पुण्यास येऊन फर्ग्यूसन कॉलेजांतून बी. एस. सी. ची परीक्षा पहिल्या वर्गांत पास झाले आणि युनिव्हर्सिटीची सरकारी स्कॉलरशिप मिळवून विलायतेस जाऊन केंब्रिज युनिव्हर्सिटींत गणिताच्या अखेरच्या परीक्षेंत यांनीं पहिला नंबर मिळविला. यांच्या पूर्वीं या परीक्षेंत कोणाहि हिंदी विद्यार्थ्यास पहिला नंबर मिळाला नव्हता. अर्थात् यामुळें यांनीं हिंदुस्थानभर नांव मिळविलें आणि हिंदुस्थानचें नांव वाढविलें. हे १९०१ सालीं परत हिंदुस्थानांत आले आणि १९०२ सालच्या प्रारंभापासून फर्ग्यूसन कालेजाचे प्रिन्सिपाल झाले. हें काम यांनीं १९२० पर्यंत केलें आणि फर्ग्युसन कॉलेज चांगलें भरभराटीस आणलें. यांना आपल्या कॉलेजाचा विलक्षण

अभिमान आहे. विद्यार्थ्यांमध्यें मिळून मिसळून वागण्याची यांना हौस असे. यांना आपल्या विद्वत्तेचा गर्व नाहीं; आपल्यापेक्षां कमी दर्जाच्या माणसाशीं सुद्धां हे प्रेमानें बोलतात. बुद्धिमत्ता, स्वार्थत्याग, देशभक्ति, दृढनिश्चय, दीर्घोद्योग, धैर्य वगैरे गुण यांचे ठिकाणीं आहेत. अशा परिस्थितींत हे राजकीय बाबतींत नेमस्त पक्षाशीं एकरूप कसे झाले हा एक चमत्कार आहे. प्रो. कर्वे हे यांचे मामा, आणि नामदार गोखले फर्ग्युसन कॉलेजाचे सूत्रधार ज्या काळांत होते त्या काळांत यांचें कॉलेजांत शिक्षण झालेलें, हीं या चमत्काराचीं मूळ कारणें; त्यानंतर विलायतेंतल्या वास्तव्यानें इंग्रज लोक आणि हिंदी लोक यांच्यामधला फरक रँगलरांना चांगला दिसून आला असला पाहिजे आणि आमच्यांतले दोष— ज्या दोषांच्या योगानें आम्हीं राज्य घालविलें ते दोष— यांच्या दृष्टीपुढें उभे राहिले असले पाहिजेत. रँगलर टिळक पक्षाला कां मिळाले नाहींत याचीं मला हीं कारणें दिसतात. नेमस्त राजकीय चळवळींशीं देखील त्यांनीं फारसें तादात्म्य प्रारंभीं दाखविलें नाहीं, अलीकडेच दाखविलें आहे. पण आपल्या इतर सर्व व्यवहारांत बाणेदारपणा दाखविला आहे. १९२० च्या स्पेशल कांग्रेसमध्यें शाळांवर बहिष्कार घालण्याचा जेव्हां ठराव पास झाला तेव्हां विद्यार्थ्यांना उद्देशून यांनीं एक लेख प्रसिद्ध करून असल्या शाब्दिक बहिष्काराला विद्यार्थ्यांनीं भूलूं नये, त्यांचें नुकसान होईल, असा इशारा दिला होता. शिवाय वकीलांनीं कोर्टावर बहिष्कार घालावा असाहि एक ठराव त्याच कांग्रेसमध्यें पास झाला, तेव्हां या ठरावाला अनुकूल कोण प्रतिकूल कोण हें नांवानिशीवार टिपून द्यावें अशी सूचना यांनीं अध्यक्ष लाला लजपतराय यांजकडे पाठविली होती. ही सूचना योग्य होती. ही सूचना अंमलांत आली असती तर

बोलण्याप्रमाणें वागणारे कोण आहेत व किती आहेत हें देशांतील लोकांच्या प्रत्ययास आलें असतें. असो; पण या सूचनेवरून रँगलर परांजपे यांची कळकळ दिसून येते.

रँगलर परांजपे हे सामाजिक व्यक्तिस्वातंत्र्याचे पुरस्कर्ते आहेत. नामदार गोखल्यांचे मागें पुण्यांतील नेमस्त पक्षाचें पुढारीपण साहजिकपणें यांचेकडे आलें आहे. धर्मासंबंधानें पाहिल्यास हे नास्तिक आहेत. पण नास्तिक असले तरी यांचे नैतिक आचरणांत कोणाला दोष सांपडणार नाहीं. परंतु कांहीं झालें तरी महाराष्ट्रीय समाज हा राजकीय चळवळीचाच समाज होय. मराठी लोकांना नैतिक चळवळीची अवश्यकता दिसतच नाहीं. आमच्यांतील नीतिमत्ता, निःस्वार्थता आणि दानत गेली ह्मणून आमचें राज्य गेलें, आणि हीं जोंपर्यंत आलीं नाहींत तोंपर्यंत स्वराज्याच्या बाता फुकट आहेत. शीलभ्रष्ट ( void of character ) समाज स्वराज्य मिळवूं शकणार नाहीं आणि मिळालें तरी चालवूं शकणार नाहीं.

रँगलर परांजपे यांचा स्वभाव चांगला आहे असें वर लिहिलें. परंतु यांच्या स्वभावांत कांहीं बाबतींत क्षुद्रपणा आढळून येतो असें लिहिणें प्राप्त आहे. १९०८ सालीं लोकमान्य टिळकांना शिक्षा झाल्याच्या दुसऱ्या दिवशीं वर्गांत शिकविण्यास आल्याबरोबर यांनीं त्यांच्याविषयीं अयोग्य शब्द उच्चारले. तसेंच लोकमान्य टिळक विलायतेहून परत आल्यावर त्यांना मानपत्र देण्याचें ठरलें असतां तें देऊं नये अशा विचारांच्या लोकांनीं जी सत्यशोधकी मंडळींत सभा भरविली त्या सभेंत यांनीं न शोभणारे उद्गार काढले. परंतु दुसऱ्या दिवशीं जर लो. टिळकांच्या मानपत्राला जाहीर सभेंत यांनीं विरोध केला असता तर त्यावरून यांचें धैर्य दिसून आलें असतें, पण तें धैर्य कोठें दिसलें नाहीं. खुद्द

टिळकांना अशा विरोधाचा देखील आनंदच वाटला असता. नामदार गोखल्यांच्या मृत्यूनंतर त्यांचें जें एक लहानसें चरित्र रँगलरांनीं इंग्रजींत लिहिलें त्यामध्येंहि स्वतःच्या स्वभावाचें क्षुद्रत्व त्यांनीं प्रकट केलें आहे.

**कै. हरि नारायण आपटे**— आनंदाश्रम संस्थेचे व्यवस्थापक बऱ्याच प्रसिद्ध कादंबऱ्यांचे लेखक, विद्वान् गृहस्थ आणि मवाळ पक्षांतील एक पुढारी ह्मणून हे प्रसिद्ध आहेत. शिवाय पुण्याच्या म्युनिसिपालिटीचेहि हे पुष्कळ वर्षें सभासद होते व कांहीं वर्षें अध्यक्ष होते. सामाजिक बाबतींत व्यक्तिस्वातंत्र्याचा पुरस्कार करणारे हे होते व हा पुरस्कार त्यांनीं आपल्या सामाजिक कादंबऱ्यांच्या द्वारें बराच केलेला आहे. आजकालच्या गोष्टी, पण लक्षांत कोण घेतो. उषःकाल. केवळ स्वराज्यासाठीं, रूपनगरची राजकन्या, वज्राघात वगैरे यांच्या कादंबऱ्या प्रसिद्ध आहेत. हे लोकमान्य टिळकांचे शत्रु होते अशी कल्पना पुण्यांत कांहीं लोकांची होती. पण मला तसें वाटत नाहीं. राजकीय बाबतींत टिळकांच्या विरुद्ध पक्षाशीं यांचें तादात्म्य होतें ही गोष्ट खरी, पण यांनीं टिळकांचें खाजगी शत्रुत्व केलें असेल असें वाटत नाहीं. यांचे चुलते कै. महादेव चिमणाजी आपटे, आनंदाश्रम संस्थेचे स्थापक, हे टिळकांचे स्नेही होते. आपल्या संस्थेची व्यवस्था आपल्या पुतण्याकडे देऊं नये अशी सल्ला टिळकांनीं कै. माधवराव आपट्यांस दिली होती अशी कोणा तरी माणसानें रा. हरिभाऊंची समजूत करून दिली व या समजुतीनें रा. हरिभाऊंच्या मनांत टिळकांविषयीं बरेच दिवस प्रेम नव्हतें असें म्हणतां येईल. ही समजूत खोटी होती, व टिळक रा. माधवराव आपट्यांच्या जवळ या बाबतींत कांहीं बोलले नव्हते. असो. रा. आपटे टिळकांना मान देत

असत, व त्यांचेकडे प्रसंगीं जात येतहि असत. टिळकांचें कधीं तोंड बघावयाचें नाहीं अशी जी कांहीं पुणेरी मवाळांची अढी होती तिला हरिभाऊ अपवाद होते. १९१९ सालीं हे वारले.

**श्रीमती रमाबाई रानडे**— या कै. न्या. माधवराव रानडे यांच्या पत्नी. पतीच्या मृत्यूनंतर यांनीं नेमस्त राजकारणांत मधून मधून कांहीं भाग घेतला. मोठ्या वयाच्या स्त्रियांना शिकण्याची सोय व्हावी अशासाठीं यांनीं सेवासदन ही संस्था स्थापली व त्या संस्थेसाठीं स्वतःला पूर्णपणें वाहून घेतलें.

**रा. गोपाळ कृष्ण देवधर एम्. ए.**— मुंबईच्या आर्यन एज्युकेशन सोसायटीच्या हायस्कुलाचे हे पूर्वीं प्रिन्सिपाल होते. नामदार गोखल्यांनीं सर्वंट ऑफ इंडिया सोसायटी स्थापल्याबरोबर हे पुण्यास येऊन सोसायटीला मिळाले. ज्ञानप्रकाशाचे संपादक, सेवासदनाचे एक सेक्रेटरी, सहकारी पतपेढ्यांसंबंधीं वगैरे कामें यांनीं केलीं व सोसायटीचीं इतर कामेंहि हे पुष्कळ करतात. महायुद्ध चालू असतां हिंदुस्थानांतल्या कांहीं पत्रकारांना सरकारनें विलायतेस नेलें होतें त्यांत हे एक होते. कोणत्याहि कामाची व्यवस्थित जमवाजमव करण्यांत हे कुशल आहेत, परंतु यांचा स्वभाव गर्विष्ठ आहे, आणि यांच्या बोलण्यांत अतिशयोक्ति अधिक असते.

**रा. नटेश आप्पाजी द्रवीड एम. ए.**— सर्वंट्स ऑफ इंडिया सोसायटीच्या आरंभींच्या सभासदांपैकीं हे एक आहेत. एक वर्षभर फर्ग्यूसन कॉलेजांत प्रोफेसरीचें काम यांनीं केलें. नंतर कांहीं दिवस ज्ञानप्रकाशाचे संपादक ह्मणून यांनीं काम केलें. ज्ञानप्रकाश टिळकांवर खरमरीत टीका करण्यास कधींच कचरला नाहीं. तथापि द्रवीडांच्या कारकीर्दींत टिळकांसंबंधानें आणि टिळकपक्षांतील लोकांसंबंधानें ज्ञानप्रकाशांत जीं मुक्ताफळें बाहेर पडत त्यांची सर करण्यास ग्राम्य शिवी-

गाळच समर्थ होऊं शकेल. इतकी तिखट लेखणी चालविणारा मनुष्य पुण्यांत नको ह्मणूनच कीं काय कोण जाणे, यांची पुढें नागपुरास बदली करण्यांत आली.

रा. वामनराव पटवर्धन— यांचें संपूर्ण नांव अनंत विनायक पटवर्धन बी. ए. हे सर्वंटस ऑफ इंडिया सोसायटीचे सभासद असून ज्ञानप्रकाश पत्राच्या संपादकाचें आणि ज्ञानप्रकाश छापखान्याच्या म्यानेजरचें काम करीत आहेत. स्वभावानें हे एक वास्तविक चांगले गृहस्थ आहेत, परंतु यांच्या बोलण्याच्या पद्धतीवरून हे कोपिष्ठ गृहस्थ असावे असें लोकांना वाटतें. जें काम अंगावर घेतलें तें निरलसपणें आणि कळकळीनें करण्याचा यांचा गुण वाखाणण्यासारखा आहे.

प्रो. चिंतामण गंगाधर भानु बी. ए.— हे फर्ग्यूसन कॉलेजांत लाइफ मेंबर असून इतिहासाचे प्रोफेसर होते. डेक्कन एज्युकेशन सोसायटीकरितां वर्गण्या जमविण्याचें काम यांनीं कांहीं वर्षें केलें. १९०६ मध्यें यांची तेथील नोकरी संपली. पुढें कांहीं काळ मुंबईस इंदुप्रकाश पत्राचे हे संपादक होते. भगवद्गीतेवर यांनीं एक ग्रंथ लिहिला असून इतिहाससंबंधानेंहि कांहीं पुस्तकें लिहिलीं आहेत. अलीकडे हे अंमळनेरच्या तत्त्वज्ञानमंदिराचे मुख्य अध्यापक आहेत.

प्रो. वैजनाथ काशीनाथ राजवाडे एम्. ए. — हे फर्ग्यूसन कॉलेजांत प्रोफेसर होते व हल्लीं सुरत येथील कॉलेजाचे प्रिन्सिपाल आहेत. हे एक विद्वान् गृहस्थ आहेत. राजकीय किंवा इतर चळवळींत फारसे पडले नाहींत. थोडेसे पडले ते गोखलेपक्षाच्या मदतीकरितांच पडले.

प्रो. गोविंद चिमणाजी भाटे एम्. ए.— हे पुण्यांतले एक प्रसिद्ध सुधारक. प्रथम पत्नीच्या मृत्यूनंतर यांनीं ब्राह्मण विधवेशीं पुनर्विवाह केला आणि तिच्या मृत्यूनंतर एका ब्राह्मणेतर विधवेशीं

केला. यामुळें यांना कर्ते सुधारक ह्मणतात. सामाजिक व्यक्ति-स्वातंत्र्याचे हे जितके पुरस्कर्ते आहेत तितके राजकीय स्वातंत्र्याचे आहेत असें दिसत नाहीं. यांनीं कार्लाईल वगैरे इंग्रजी तत्त्वज्ञांचीं चरित्रें मराठींत लिहिलीं आहेत. हल्लीं हे सांगलीच्या वुइलिंगडन कॉलेजाचे प्रिन्सिपाल आहेत. स्वभावानें सरळ आहेत.

**कै. प्रो. हरि गोविंद लिमये** एम्. ए.—हे इतिहासाचे प्रोफेसर होते. हे कांहींसे राजकीय चळवळींत पडत असत. ज्ञानप्रकाशांत कधीं कधीं लिहीतहि असत.

**प्रो. केशव रामचंद्र कानिटकर** बी. एस. सी., एम्. ए.—हेहि प्रो. लिमयांचे प्रमाणें राजकीय चळवळींत पडत असतात.

**प्रो. धोंडो केशव कर्वे** बी. ए.—हिंगणें येथील अनाथ बालिकाश्रमाचे संस्थापक आणि स्त्रियांच्या युनिव्हर्सिटीचे उत्पादक ह्मणून हे प्रसिद्ध आहेत. स्वतः पुनर्विवाह केल्यामुळें हेहि एक कर्ते सुधारक आहेत.

प्रो. **नारायण सखाराम पानसे** बी. ए.—हे फर्ग्यूसन कॉलेजांत संस्कृत भाषेचे प्रोफेसर होते. ती नोकरी झाल्यानंतर यांना पुण्यास ग्वालेर दरबारच्या वकीलाचें काम मिळालें. विनोदी प्रोफेसर ह्मणून हे प्रसिद्ध आहेत.

कै. प्रो. **वासुदेव बळवंत पटवर्धन** बी. ए.—हे एक हंसतमुखी व थट्टेखोर स्वभावाचे प्रोफेसर होते. कांहीं काळ हे सुधारकाचे एडिटर होते. राजकीय चळवळींत पुढें विशेष पडले नाहींत. ना. गोखल्यांचें चरित्र यांनीं मराठींत लिहिलें आहे.

प्रो. **वामन गोविंद काळे** एम्. ए.—फर्ग्यूसन कालेजांत हे इतिहास व अर्थशास्त्र या विषयांचे प्रोफेसर आहेत, व अर्थशास्त्रावर यांनीं दोन इंग्रजी ग्रंथ लिहिले आहेत. हे गोखले पक्षाचे एक कट्टे

अभिमानी असें ह्मणतां येईल. हे १९२० मध्यें कौन्सिल आफ स्टेटचे सभासद निवडून आले.

कै. बॅरिस्टर **काशीनाथ परशुराम गाडगीळ**— यांचेकडे कांहीं काळ पुण्यांतल्या नेमस्त पक्षाचें पुढारीपण होतें.

बॅ. **गोविंदराव गाडगीळ**— हे बॅ. का. प. गाडगीळ यांचे चिरंजीव. गोखले पक्षांतले एक गृहस्थ.

रा. **लक्ष्मण रघुनाथ गोखले** वकील— हे गोखले पक्षांतले एक महत्वाचे गृहस्थ आहेत. डिस्ट्रिक्ट कांग्रेस कमिटी, मद्यपाननिषेधक सभा, डेक्कन सभा, पुणें म्युनिसिपालिटी वगैरे संस्थांमध्यें यांनीं सार्वजनिक कामगिरी केलेली आहे. आपल्या मेहनतीनें आणि व्यवहारचातुर्यानें गरीबींतून श्रीमंत झालेले हे गृहस्थ आहेत. सामाजिक बाबतींत हे सुधारक ह्मणवितात, पण यांची गणना बोलक्या सुधारकांतच केली पाहिजे

रा. **विनायक रामचंद्र जोशी** बी. ए.— यांनीं सुमारें बारा वर्षें सुधारक वर्तमानपत्र चालविलें. हे सुधारक पत्राचे संपादक झाल्यामुळें यांची गणना नेमस्त पक्षांत करणें भाग आहे. सुधारकामुळें यांना आर्थिक नुकसान सोसावें लागलें. हे सुस्वभावी गृहस्थ आहेत.

रा. **रामचंद्र भिकाजी जोशी**— हे सामाजिक सुधारणेचे ह्मणजे व्यक्तिस्वातंत्र्याच्या चवळीचे अभिमानी असे गृहस्थ आहेत. मराठी भाषेवर व विशेषतः मराठी व्याकरणावर यांचा व्यासंग आहे. न्यू इंग्लिश स्कूलमध्यें शिक्षकाचें काम करतात. विधवाविवाहप्रतिबंधनिवारक मंडळीचे हे सेक्रेटरी आहेत.

रा. **नीलकंठ रामचंद्र सहस्रबुद्धे**— हे एक कर्ते सुधारक ह्मणून पुण्यांत प्रसिद्ध आहेत.

**कै. गोविंद वासुदेव कानिटकर** बी. ए, एल. एल. बी.— हे पेनशनर सबजज्ज होते. राजकीय बाबतींत नेमस्त पक्षाचे ह्मटले पाहिजेत. ग्रंथकार ह्मणून यांची प्रसिद्धि विशेष आहे.

दिवाण बहादुर **काशीनाथ रामचंद्र गोडबोले** बी. ए., एम. सी. ई.— हे श्रीमंत पेनशनर गृहस्थ आहेत. हे राजकीय चळवळींत ह्मणण्यासारखे पडत नाहींत, परंतु प्रसंगानुरूप मवाळ पक्ष यांना आपले पुढारी करतो; ह्मणून यांची गणना मवाळ पक्षांत करणें भाग आहे.

**रा. दत्तात्रय हरि भट** बी. ए. हायकोर्ट वकील— हे गोखले पक्षांतले एक गृहस्थ आहेत. विशेषतः आरोग्यमंडळाच्या चिटणीसाचें काम हे उत्साहानें करीत आले आहेत.

याप्रमाणें टिळकपक्षांतल्या व गोखले पक्षांतल्या ठळक मंडळींची माहिती झाली. याखेरीज पुण्यांत कांहीं मंडळी राजकीय चळवळींत फारशीं न पडणारी किंवा एका पक्षाला सर्वस्वीं चिकटून न घेतलेली अशी आहेत. यांच्या संबंधानें थोडक्यांत उल्लेख करतों.

महामहोपाध्याय **वासुदेवशास्त्री अभ्यंकर**— हे थोर विद्वान् गृहस्थ पुण्याच्या संस्कृत पाठशाळेचे मुख्याध्यापक आणि फर्ग्यूसन कॉलेजांतील शास्त्री आहेत.

**कै.** विद्यावाचस्पति **अप्पाशास्त्री राशिवडेकर**— हे गृहस्थ बावडा संस्थानांत राशिवडें गांवचे राहणारे. १९०८ पासून १९१३ पर्यंत चार पांच वर्षे पुण्यास येऊन राहिले होते. संस्कृत भाषेवर यांचें प्रभुत्व विलक्षण होतें. 'संस्कृतचंद्रिका' आणि 'सूनृतवादिनी' यांचे संपादक ह्मणून हे प्रसिद्ध होते. पण कालमाहात्म्यानें यांना योगक्षेमाकरितां 'पूना नेटिव इन्स्टिटयूशन'मध्यें नोकरी धरणें भाग

पडलें. यांचा स्वभाव इतका साधा, इतका सरळ आणि इतका अकृत्रिम होता कीं, तसा जगांत चालणें शक्य नाहीं. सरळ स्वभावाच्या मनुष्याला सरळपणानें जगांत राहतां येईल; पण निदान जगाचें कौटिल्य ओळखण्याचें कौशल्य तरी त्याचे अंगीं पाहिजे. पण हें कौशल्य यांचे अंगीं नव्हतें; जग आपल्याप्रमाणेंच सरळ आहे अशी यांची कल्पना होती. ह्मणूनच कीं काय कोण जाणे, हे देवमाणूस माणसांच्या जगांत नको असें वाटून ईश्वरानें यांना यांच्या ३९ व्या वर्षीं दुसऱ्या जगांत नेलें. अलौकिक बुद्धिमत्ता, गीर्वाणवाणीप्रभुत्व आणि जबर मेहेनत यांच्या जोरावर यांनीं दोन तीन प्रचंड उद्योग हातीं घेतले होते. पण आयुष्य संप ल्यामुळें ते जागच्या जागीं राहिले. चिपळूणकर मंडळीच्या महाभारतापैकीं कांहीं भागांचें भाषांतर यांनीं केलें आहे.

वे. सं. **विष्णु वामनशास्त्री बापट**— सिंध प्रांतांत हैद्राबाद शहरच्या संस्कृत पाठशाळेवर अध्यापक ह्मणून बरेच दिवस काम केल्यानंतर रा. बापटशास्त्री आपल्या आवडत्या कामासाठीं १९१६ सालीं पुण्यास येऊन राहिले. शंकराचार्यांच्या प्रस्थानत्रयभाष्याचें मराठी भाषांतर करवून तें छापवून मराठी वाचकांस देणें हें तें आवडतें काम होय, व हें काम निरपेक्षपणानें आणि निरलसपणानें हे करीत आहेत. सुदैवानें यांना कै. शेट विठ्ठलदास दामोदरदास ठाकरसी या धनिक गृहस्थांनीं छपाईचे कामीं उदारपणें मदत दिली आणि यामुळें छपाईस लागणाऱ्या द्रव्याची काळजी दूर झाली. 'आचार्य' नांवाचें पत्राहि हे कांहीं वर्षें चालवीत होते. उतारवयांतील यांचा निरलसपणा हल्लींच्या काळांत तरुणांना लाजविण्यासारखा आहे.

वे सं. **श्रीधरशास्त्री पाठक**— हेहि, एक मोठे विद्वान्

गृहस्थ आहेत. डेक्कन कॉलेजांत शास्त्री या नात्यानें यांची नेमणूक झाल्यापासून हे पुण्यास राहूं लागले आहेत.

कै. **कृष्णाजी गणेश ओकशास्त्री**— हे न्यू इंग्लिश स्कूलमध्यें संस्कृत शिक्षक होते. यांचा व्यासंग व्याकरणावर होता.

रा. **रंगाचार्य रड्डी**— हे पुण्याच्या फीमेल हायस्कुलांत संस्कृत शिक्षक होते. हे वैष्णव पंथाचे आहेत; आणि शंकराचार्यांच्या अद्वैत मार्गाविषयीं अनादर दाखविणारे आहेत. 'वैष्णव' मासिकांतील यांच्या कांहीं लेखांची भाषा सभ्यपणाला सोडून असते.

प्रो. **श्रीपाद कृष्ण बेलवलकर** एम्. ए., पी. एच. डी.— हे विद्वान् गृहस्थ डेक्कन कॉलेजांत संस्कृत भाषेचे प्रोफेसर आहेत. सरकारी स्कॉलरशिप मिळवून हे अमेरिकेंत प्राच्यविद्येचा आपला अभ्यास वाढविण्यासाठीं गेले. तेथेंच यांना पी. एच डी. ची पदवी मिळाली. प्राच्य विद्येसंबंधी विषयांवर यांनीं लेख व ग्रंथ लिहिले आहेत; आणि हे व प्रो. रा. द. रानडे मिळून "हिंदी तत्त्वज्ञानाचा इतिहास" लिहीत आहेत.

प्रो. **रामचंद्र दत्तात्रय रानडे** एम्. ए.— हे विद्वान् गृहस्थ फर्ग्यूसन कॉलेजांत प्रोफेसर आहेत. यांचा प्राच्य व पाश्चात्य तत्त्वज्ञानाचा व्यासंग जबर आहे आणि तत्संबंधी ग्रंथ व लेख हे लिहीत असतात. प्रो. बेलवलकर व प्रो. रानडे हे दोघेहि अत्यंत सुस्वभावी व शान्त चित्ताचे गृहस्थ आहेत.

कै. प्रो. **पांडुरंग दामोदर गुणे** एम्. ए., पी. एच डी.— हे गृहस्थ विल्सन कॉलेजांतून एम्. ए. झाल्यावर फर्ग्यूसन कॉलेजास येऊन मिळाले. नंतर सरकारी स्कॉलरशिप मिळवून प्राच्यविद्येच्या अभ्यासाकरितां जर्मनींत जाऊन प्रो. गार्बे यांचेजवळ

यांनीं आपला अभ्यास वाढविला. तेथली हवा यांना मानवली नाहीं. परत आल्यावर १९२३ मध्यें हे मरण पावले.

कै. प्रो. विनायक सखाराम घाटे एम्. ए.– हे पुण्याचे एक विद्वान् गृहस्थ परदेशीं जाऊन आले होते. प्रथम डेक्कन कॉलेजांत व नंतर एलफिन्स्टन कॉलेजांत हे प्रोफेसर होते. यांचा देखील अकालीं अंत झाला. यामुळें यांच्या विद्वत्तेचा देशाला अधिक उपयोग झाला नाहीं.

रा. ब. काशीनाथ नारायण साने बी. ए.— पुणें ट्रेनिंग कालेजचे प्रिन्सिपाल, पुणें हायस्कूलचे हेडमास्तर वगैरे हुद्द्यांचीं कामें करून यांनीं पेनशन घेतलें. मराठी इतिहासासंबंधी अनेक बखरी आणि कागदपत्रें यांनीं आपल्या 'काव्येतिहाससंग्रह' मासिकांतून प्रसिद्ध करून त्यांवर ठिकठिकाणीं टीपा देऊन मराठी इतिहाससंशोधनाचा प्रारंभ केला. सरकारी नोकरींत असतांना त्यांनीं हा उद्योग केला याबद्दल हे विशेष आदरास पात्र आहेत. भारत—इतिहास—संशोधक मंडळाच्या स्थापनेपासून ह्मणजे १९१० पासून हे संस्थेचे सभासद आहेत व रा. ब. ग. व्यं. जोशी यांच्या मृत्यूनंतर सदर संस्थेचे अध्यक्ष झाले. अर्थात् सदर संस्थेमधील संशोधनकार्याला यांचें पुष्कळ साहाय्य झालें आहे हें निराळें सांगण्यास नकोच.

सरदार खंडेराव चिंतामण मेहेंदळे बी. ए.— पानपतास ज्या बळवंतराव मेहेंदळ्यांनीं रणांगणावर देह ठेवला आणि ज्यांची पत्नी तेथें सती गेली त्या बळवंतराव मेहेंदळ्यांचे हे वंशज. मेहेंदळे हे पेशव्यांच्या हुजुरातीचे ह्मणजे खास फौजेचे सेनापति. रा. तात्यासाहेब मेहेंदळे हे एक विद्वान् आणि बाणेदार वृत्तीचे गृहस्थ आहेत. भारत-इतिहास-संशोधक मंडळ स्थापण्यामध्यें हे प्रमुख होते. आरंभीं सदर संस्थेच्या सेक्रेटरीचें काम यांनीं स्वतः शिरावर घेऊन संस्थेला चांगली

नांवारूपास आणली. हल्लीं सदर संस्थेचे हे उपाध्यक्ष आहेत.

**सरदार गंगाधर नारायण मुजूमदार**— सरदार घराण्यांतील गृहस्थ असून सार्वजनिक कामांत पडण्याची रा. आबासाहेब मुजूमदार यांची हौस प्रशंसनीय आहे. हे भारत–इतिहास–संशोधक मंडळाचे चिटणीस आहेत. इतिहाससंशोधन, आणि काव्यसंशोधन हे यांचे आवडते विषय आहेत. १९२३ सालच्या निवडणुकींत सरदारांतर्फे हे मुंबईच्या कौन्सिलमध्यें निवडून आले.

**प्रो. दत्तो वामन पोतदार** बी. ए.— हेहि भारत-इतिहास-संशोधक मंडळाचे एक चिटणीस आहेत. काव्य-संशोधन आणि इतिहास-संशोधन हे यांचे आवडते विषय आहेत. मुंबई युनिव्हर्सिटींत मराठी भाषेचा प्रवेश झाल्यापासून हे न्यू पूना कॉलेजांत मराठी भाषेचे प्रोफेसर आहेत. शिवाय महाराष्ट्र-शिक्षण-प्रसारक मंडळाचे तहाहयात सभासद आहेत. यांनीं वाङ्मयसंबंधीं पुस्तकें लिहिलीं आहेत.

**प्रो. विश्वनाथ बळवंत नाईक** एम्. ए.— हे फर्ग्यूसन कॉलेजांत गणिताचे प्रोफेसर आहेत. १९१८ सालीं पुणें येथें लो. टिळक यांचे अध्यक्षतेखालीं भरलेल्या ज्योतिषसंमेलनामध्यें हे स्वागतसभेचे अध्यक्ष होते, व हल्लीं पञ्चांग प्रवर्तन कमिटीचे अध्यक्ष आहेत.

रा. **वासुदेव गोविंद आपटे** बी. ए.— हे कांहीं काळ ज्ञानप्रकाशाचे संपादक होते. आनंद मासिकाचे संपादक आहेत. लहान मुलांकरितां यांनीं अनेक पुस्तकें सोप्या भाषेंत लिहिलीं आहेत. अलीकडे (१९२२) मराठी भाषेचा एक मोठा कोश यांनीं तयार करून छापविला आहे. शिवाय टिळक-महाविद्यालयामध्यें हे प्रोफेसर आहेत. त्सुशिमाच्या लढाईत जपान देशाला रशियन आरमारावर जो अपूर्व

विजय मिळाला त्या वेळीं आनंद व्यक्त करण्याकरितां पुण्यांतील नागरिकांची जी जाहीरसभा (१९०९) भरली होती, त्या सभेच्या हस्तपत्रकावर लो. टिळक, रा. न. चिं. केळकर आणि रा. वा. गो. आपटे अशा तीन सह्या होत्या. नामदार गोखले व इतर तत्पक्षीय मंडळींनीं सह्या करण्याचें नाकारलें होतें.

डा. **नरहर गोपाळ सरदेसाई** एल. एम. एस— हे विद्वान् व शोधक गृहस्थ डाक्टरीचा धंदा संभाळून प्राच्य-विद्यासंशोधनांत मदत करीत असतात. जावा बेटांत आणि त्याशेजारील बाली बेटांत अद्याप जे हिंदु लोक आहेत त्यांची संस्कृति कशी आहे तें प्रत्यक्ष पहाण्यासाठीं हे मुद्दाम दोन्ही बेटांत सफर करून आले. तत्संबंधीं कांहीं लेख यांनीं लिहिले आहेत. यांचा स्वभाव मनमिळाऊ आहे.

डा. **विश्वनाथ चिंतामण गोखले** एल. एम्. एस.—हे एक पुण्यांतले हुशार डॉक्टर आहेत. हे थिऑसफिस्ट आहेत.

डा. **श्रीधर वेंकटेश केतकर** पी. एच. डी.— हे विद्वान् गृहस्थ अमेरिकेंतल्या युनिव्हर्सिटीमध्यें पी. एच. डी. ची पदवी मिळवून आले. कांहीं दिवस कलकत्ता युनिव्हर्सिटीमध्यें लेक्चरर होते. हिंदु जातीसंबंधानें यांनीं एक ग्रंथ लिहिला असून १९१३ मध्यें केसरींत एक लेखमाला लिहिली होती. पण यांचें सर्वांत मोठें कार्य मराठी ज्ञानकोशाचें. मराठीमध्यें ज्ञानकोश हा प्रचंड ग्रंथ संपादन करून छापण्यासाठीं यांनीं एक लिमिटेड कंपनी प्रथमतः नागपुरास स्थापन केली व नंतर तें काम छापण्याच्या वगैरे सोयीसाठीं पुण्यास आणलें. यावरून डॉ. केतकर हे एक चिकाटीनें व हिंमतीनें काम करणारे गृहस्थ आहेत हें सिद्ध होतें. विलायतेस असतांना मिस कोहन नांवाच्या एका गोऱ्या स्त्रीशीं विवाह करण्याचें यांनीं ठरविलें. सदर स्त्रीनें कांहीं वर्षांनीं पुण्यास येऊन एका स्वतंत्र विधीप्रमाणें हिंदुधर्म स्वीकारला

आणि नंतर डॉक्टर केतकरांनीं तिच्याशीं विवाह केला. मिस कोहन यांनीं 'शीलवती' हें नांव धारण केलें आहे.

रा. **वेंकटेश बापूजी केतकर**— हे पेनशनर डेपुटी एज्यु. इन्स्पेक्टर आहेत. हे एक नामांकित गणिती आहेत, व यांनीं गणित-ज्योतिषासंबंधानें ज्योतिर्गणित, ग्रहगणित आणि नक्षत्रविज्ञान हे ग्रंथ संस्कृत भाषेंत लिहिले आहेत. यांनीं मुद्दाम फ्रेंच भाषेचा अभ्यास करून पारीसच्या ज्योतिर्मंडळाचें सभासदत्व मिळविलें. डा. श्री. वें. केतकर हे यांचे मुलगे असावे असा समज होण्याचा संभव आहे. पण त्यांचा व यांचा नात्याचा संबंध कांहीं नाहीं.

कै. **गणेश सखाराम खरे**— हे एक इंजिनियरिंग खात्यांत हुद्द्याचें काम केलेले पेनशनर गृहस्थ होते. हे गणिती आणि शोधक गृहस्थ होते. विशेषतः ज्योतिर्गणिताचा व्यासंग चांगला होता. यांनीं एक दोनशें वर्षांची जंत्री भारत-इतिहास-संशोधक मंडळासाठीं मोठ्या परिश्रमानें तयार करून दिली. गणितासंबंधीं यांनीं कांहीं सूक्ष्म विचारानें लेख लिहून ते निरनिराळ्या देशांतील गणितशास्त्रज्ञांकडे पाठविले. परंतु त्यांच्या प्रसिद्धीची व्यवस्था करण्यापूर्वींच हे १९२२ मध्यें कालवश झाले.

प्रो. **काशीनाथ बापूजी पाठक** बी. ए.— हे विद्वान् व शोधक गृहस्थ डेक्कन कालेजामध्यें संस्कृत भाषेचे प्रोफेसर होते. यांनीं प्राच्य-विद्यासंशोधनासंबंधी अनेक लेख लिहिले आहेत. हे लोकमान्य टिळकांचे लहानपणापासून स्नेही होते व सरकारी नोकरींत असतांना देखील टिळकांचे घरीं वरचेवर जात येत असत.

रा. **विश्वनाथ काशीनाथ राजवाडे** बी. ए.— हे असामान्य विद्वान् व बुद्धिमान् गृहस्थ आहेत. "मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें" या मालिकेंतले ग्रंथ संपादन करून छापण्यास यांनीं प्रारंभ

केला, आणि इतिहाससंशोधनाचें कार्य वाढीस लावलें. 'भारत-इतिहास-संशोधक मंडळ' स्थापण्याचे कामीं हे आरंभापासून होते. इतरांशीं मिळून मिसळून वागण्याचा यांचा स्वभाव नाहीं; आणि यांना स्वतःच्या विद्वत्तेचा फाजील अभिमान आहे. यामुळें यांचें फार दिवस कोणाशीं पटत नाहीं. यांचें कायमचें वास्तव्य कोठें नाहीं, तरी पुण्यांत यांनीं बरेच उद्योग चालविले असल्यामुळें यांचा येथें उल्लेख केला आहे.

कै. काशीनाथ वामन ऊर्फ **भाऊशास्त्री लेले**— हे मूळचे वाईचे राहणारे, कांहीं काळ पुण्यांत येऊन राहिले होते. मोदवृत्त आणि धर्म पत्रांचे संपादक आणि महाभारत, वाल्मीकिरामायण, योगवासिष्ठ, वगैरे ग्रंथांचे भाषांतरकार ह्मणून हे प्रसिद्ध आहेत. टिळकांच्या वेदकालविषयक आणि गीताविषयक विचारांसंबंधानें जरी यांचें भिन्न मत होतें तरी राजकीय बाबतींत टिळकांशीं हे एकरूप होते. यांची बुद्धि कुशाग्र होती आणि वागणूक निःस्पृह होती; तरी राजवाडे-पद्धतीची तुसडेपणाची नसून मिळतें घेणारी होती. १९१५ मध्यें निझामसंस्थानामध्यें हे एकदां गेले होते तेव्हां तेथील अधिकाऱ्यांनीं यांच्या मागें कसा ससेमिरा लावला व यांना कैद्याप्रमाणें कसें वागविलें यासंबंधाची हकीकत यांनीं स्वतः मला १९१६ मध्यें सांगितली व ती त्यांनीं लिहून छापण्याकरितां केसरीकडे पाठविली होती. पण केसरींत प्रसिद्ध झाली नाहीं. संस्थानी कारभाराची तरफदारी करणारांनीं सदर हकीकत वाचण्यासारखी आहे.

रा. ब. एम. के. **कुमठेकर**— क्रार्फर्ड प्रकरणांत पेनशन घेतलेले हे गृहस्थ बरींच वर्षें पुणें म्युनिसिपालिटीचे चीफ आफिसर होते. नंतर कांहीं दिवस सांगलीस कारभारी झाले.

कै. रा. ब. **सीताराम विश्वनाथ पटवर्धन** बी. ए.— वऱ्हाडांत

डायरेक्टरच्या हुद्द्याचें काम केलेले हे गृहस्थ पेनशन घेतल्यावर पुण्यांत कायमचे राहिले होते. पैसा मिळविण्याच्या आणि राखण्याच्या कौशल्यानें हे चांगले श्रीमंत झाले, व निरनिराळ्या संस्थांस यांनीं दानधर्महि इतर श्रीमंतांच्या मानानें तुलना केल्यास बराच केला.

रा. शंकर रामचंद्र भागवत एल. सी. ई.—हे बुद्धिमान् गृहस्थ सरकारी इंजिनियरिंग कॉलेजांत ( कॉलेज ऑफ सायन्स ) प्रोफेसर होते. त्या जागेचा यांनीं राजीनामा दिला. हल्लीं हे पुणें म्युनिसिपालिटीचे चीफ ऑफिसर आहेत. पुण्याच्या नवीन ड्रेनेजमुळें नदीकांठच्या पेठांत ओल कसें वाढत आहे व ती आपत्ति टाळण्यास काय उपाय योजावे यासंबंधी यांनीं प्रमाणयुक्त माहिती मिळवून १९१९ सालीं जाहीर व्याख्यानें दिलीं होतीं. डेक्कन जिमखाना या संस्थेचे हे एक आधारस्तंभ आहेत.

रा. शंकर रामचंद्र राजवाडे बी. ए.— हे हिंदु संस्कृतीचे अभिमानी आणि विद्वान् विद्याव्यासंगी गृहस्थ आहेत. 'गीताभाष्य' नांवाचा गीतेच्या श्लोकांवर एक निबंधवजा मोठा ग्रंथ यांनीं लिहिला आहे. हल्लीं सनातन धर्मावर व्याख्यानमाला देत हे अनेक ठिकाणीं प्रवास करतात.

प्रो. दत्तात्रय रामचंद्र घारपुरे एम्. ए., बी. एस. सी— हे न्यू पूना कॉलेजमध्यें प्रोफेसर होते. १९२० सालीं स्पेशल कांग्रेसनें शाळांवरील बहिष्काराचा ठराव पास केल्यावर यांनीं नोकरी सोडली आणि लवकरच टिळकमहाविद्यालयांत हे प्रोफेसर झाले. हें काम ते अद्याप करीत आहेत.

प्रो. नारायण सीताराम फडके एम. ए.— प्रो. घारपुरे यांचेप्रमाणेंच यांनीं कॉलेजांतील नोकरी सोडली. लो. टिळक वारल्यानंतर एक महिन्यानें लाला लजपतराय यांचे अध्यक्षतेखालीं जी दुःखप्रद-

शोक जाहीर सभा पुण्यास भरली होती त्या सभेंत यांचें "स्फूर्तिदायक भाषण झालें" असा केसरींत रिपोर्ट आला होता. नंतर हे टिळकमहाविद्यालयांत प्रोफेसर होते; पण पुढें यांची स्वत:चीच स्फूर्ति मावळून यांनीं असहकारितेशीं असहकारिता केली.

रा. गजानन नारायण कानिटकर बी. ए.—पुण्याचे अनाथ विद्यार्थिगृहाचे उत्पादक व चिंचवडच्या स्वावलंबन पाठशाळेचे चालक.

रा. वि. गं. केतकर—पुणें अनाथ विद्यार्थिगृह ही संस्था यांनीं परिश्रमपूर्वक चालविली आहे.

रा. विनायकराव सुसकुटे— हे पूर्वीं तळेगांवच्या समर्थ विद्यालयांत शिक्षक होते. अलीकडे मुळशीपेट्याच्या चळवळीला यांनीं वाहून घेतलें आहे. पुण्यांतल्या मोफत वाचनालयांच्या चळवळींतलेहि हे एक पुढारी आहेत.

रा. महादेव गोविंद अभ्यंकर— हे एक सुखवस्तु गृहस्थ असून रामायण व महाभारत ग्रंथांसंबंधीं यांनीं इंग्रजींत व मराठींत निबंध लिहिलेले आहेत.

रा. माधव गोविंद भिडे— हे एक विद्याव्यासंगी गृहस्थ असून यांनीं 'मननामोद' नांवाच्या पुस्तकांत आपले विचार ग्रथित केले आहेत.

रा. दामोदर वैजनाथ आठल्ये बी. ए.— हे एक होतकरू विद्याव्यासंगी गृहस्थ आहेत, यांनीं अलीकडे टिळक व गांधी यांचीं चरित्रें इंग्रजींत लिहिलीं आहेत.

रा. लक्ष्मण गणेशशास्त्री लेले— हे विद्वान् काव्यभक्त नूतन मराठी विद्यालयांत संस्कृत शिक्षक आहेत.

रा. रामचंद्र जनार्दन गोखले बी. ए.— 'आरोग्य आणि व्यायाम' वगैरे ग्रंथांचे कर्ते या नात्यानें हे लोकांस माहीत आहेत.

रा. **परशुरामपंत चिंचाळकर**—"परमार्थविचारमाला" "रहस्यानिरीक्षण" वगैरे पुस्तकांचे कर्ते.

ह. भ. प. **विनायकबोवा साखरे**— हे प्रसिद्ध ज्ञानेश्वरीभक्त नानामहाराज साखरे यांचे चिरंजीव. 'वैदिक आश्रम' नांवाची एक मोठी संस्कृत पाठशाळा यांनीं ब्राह्मण विद्यार्थ्यांकरितां चालविली आहे.

डॉ. **खेडकर**—हिंदु मिशनरी सोसायटीच्या पुण्याच्या शाखेचे हे अध्यक्ष आहेत.

रा. **विठ्ठल रामजी शिंदे**— डिप्रेस्ड क्लासेस मिशन या संस्थेचे संस्थापक व चालक. हें कार्य यांनीं पुष्कळ वर्षें निरपेक्षपणें चालविलें आहे.

रा. **रामचंद्र विनायक पटवर्धन**—बी. ए. एल् एल्. बी. कै. अण्णासाहेब पटवर्धन यांचे हे चिरंजीव. ज्योतिर्गणित आणि संस्कृत वाङ्मय या विषयांचा यांचा व्यासंग चांगला आहे.

रा. **नारायण भवानराव पावगी**— हे एक पेनशनर असून 'भारतीय साम्राज्य' ग्रंथमालेचे कर्ते ह्मणून प्रसिद्ध आहेत. शिवाय वेदासंबंधींचा यांचा व्यासंग असून तत्संबंधी पुस्तकें यांनीं इंग्रजींत व मराठींत लिहिलीं आहेत.

रा. **अण्णा नारायण पावगी**—रा. नाना पावगी यांचे चिरंजीव. हे मराठी ग्रंथसंग्रहालयाचे सेक्रेटरी आहेत.

कै. डा. **गणेश कृष्ण गर्दे** एल. एम. एस— हे एक विद्वान डाक्टर होते. केसरी पत्र सुरू करण्यापूर्वीं जें हस्तपत्रक त्यासंबंधी छापण्यात आलें होतें त्या हस्तपत्रकावर चिपळूणकर, आगरकर, टिळक, आपटे, नामजोशी आणि डॉ. गर्दे या सह्या होत्या. यावरून लोकमान्यांचा व यांचा स्नेहसंबंध जुना होता असें दिसून येईल.

**कै. बाळशास्त्री लागवणकर**— हे एक पुण्यांतले प्रख्यात वैद्य होते.

**जोडा फेंकणारा मनुष्य**—१९०७ सालीं सुरतेस कांग्रेसमध्यें डा. राशबिहारी घोस भाषण करण्यास उभे राहिले असतां त्यांचेवर ज्या माणसानें जोडा फेकला ती व्यक्ति पुण्यांतलीच आहे. हा जोडा कांचेच्या फ्रेमींत बसवून ना. सुरेंद्रनाथ बानर्जी यांनीं आपल्या घरीं ठेवला आहे, अशी हकीकत मागें वर्तमानपत्रांतून प्रसिद्ध झाली होती.

याप्रमाणें मला माहीत असलेल्या व १९०१—१९२० दरम्यानच्या काळांत पुण्यांत वावरलेल्या व्यक्तींचीं नांवें व थोडी माहिती सांगितली. नांवांचा अनुक्रम जसा सुचला तसा दिली आहे. अनुक्रम ठरविण्यांत माझें कांहीं धोरण नाहीं.

---

## भाग सहावा.

# पुण्यांतल्या प्रसिद्ध संस्था.

पुस्तक अंदाजाबाहेर वाढत चाललें ह्मणून हा भाग संक्षेपानें लिहीत आहें.

**डेक्कन एज्युकेशन सोसायटी**— पुण्यांतल्या संस्थांमध्यें सर्वांत उत्तम तऱ्हेनें चाललेली ही संस्था आहे. न्यू इंग्लिश स्कूल आणि फर्ग्यूसन कॉलेज हीं पुण्यांत चालवून सांगलीचें वुइलिंगडन कॉलेज, आणि सातारा व वाई येथें एकेक इंग्रजी शाळा या सोसायटीनें चालविली आहे.

**पुणें शहर म्युनिसिपालिटी**— पुण्यासारख्या सुशिक्षितांच्या शहरीं म्युनिसिपालिटी ही संस्था नमुनेदार असेल अशी कल्पना होणें साहजिक आहे. परंतु ही संस्था अशी नाहीं. बरेच दिवस राजकीय पक्षभेदामुळें म्युनिसिपालिटीचें काम नीट चालत नसावें असें ह्मणण्यास जागा होती. अलीकडे एका पक्षाचें बहुमत झालें आहे; तेव्हां दहा पांच वर्षांत म्युनिसिपालिटी ही संस्था त्यांनीं उत्तम तऱ्हेनें चालवून दाखविली तर त्यांची कर्तबगारी दिसून येईल. या संस्थेसंबंधानें गेल्या वीस वर्षांत पुष्कळ लिहिण्यासारख्या गोष्टी घडून आल्या. त्या विस्तारपूर्वक लिहिल्यास एक स्वतंत्र ग्रंथ होईल. हें काम कोणीं तरी हातीं घेण्यासारखें आहे.

**सर्वंटस आफ इंडिया सोसायटी**—ही संस्था कै. नामदार गोखले यांनीं स्थापली. देशाच्या कल्याणाकरितां आपलें आयुष्य खर्च करणारांना सोसायटीचे नियम मान्य असल्यास एका पद्धतीनें देशसेवा करण्याची सोय या संस्थेनें केली आहे. हल्लीं नामदार व्ही. एस. श्रीनिवासशास्त्री हे या संस्थेचे अध्यक्ष आहेत.

**सार्वजनिक सभा**—ही एक जुनी राजकीय संस्था आहे. पुस्तकाविषयक काळांत कै. अण्णासाहेब पटवर्धन आणि त्यांचे मागून कै. टिळक या संस्थेचे अध्यक्ष होते. १९२० मध्यें या संस्थेनें आपला ज्युबिली उत्सव केला. ही संस्था हल्लीं नांवालाच अस्तित्वांत आहे.

**डेक्कन सभा**—राजकीय मतभेदामुळें सार्वजनिक सभेंतून फुटून निघालेल्या लोकांनीं स्थापलेली ही राजकीय संस्था देखील नांवालाच अस्तित्वांत आहे. सार्वजनिक सभा टिळक पक्षाची आहे, आणि डेक्कन सभा गोखले पक्षाची आहे. हे दोन्ही पक्ष जरूरीच्या प्रसंगीं या संस्थांचा उपयोग करतात.

**आनंदाश्रम**—संस्कृत हस्तलिखित ग्रंथ व पोथ्या सुरक्षित ठेवणें, आणि महत्वाचे ग्रंथ शुद्ध छापणें या उद्देशानें ही संस्था कै. महादेव चिमणाजी आपटे यांनीं स्थापून स्वतःच्या पैशांनीं तिची कायमची व्यवस्था करून ठेवली आहे. शुद्ध आणि स्वच्छ छपाईच्या बाबतींत या संस्थेच्या ग्रंथावलींत दिवसानुदिवस प्रगति होण्याच्या ऐवजीं परागति होत आहे; कारण पूर्वीं छापलेल्या पुस्तकांपेक्षां अलीकडचीं पुस्तकें अस्पष्ट आणि अशुद्ध छपाईचीं निघूं लागलीं आहेत.

**भारत इतिहास संशोधक मंडळ**— हिंदुस्थानाच्या इतिहासाचें संशोधन हें मोठें क्षेत्र या संस्थेनें आपल्या कार्याला आपल्या नांवावरून ठरवून घेतलें. परंतु संस्थेचा कारभार मराठी भाषेपुरताच चालवावयाचा असल्यानें मराठी काव्यें आणि मराठी इतिहास यासंबंधाचेंच संशोधन मुख्यत्वेंकरून चालतें. 'महाराष्ट्र-काव्येतिहाससंशोधक मंडळ' हें नांव या संस्थेला चांगलें शोभलें असतें. अलीकडे संस्थेच्या मालकीची एक मोठी इमारत आणि लायब्ररी आहे. या विषयाची आस्था बाळगणारांना या संस्थेमध्यें पुष्कळ

कार्य करतां येण्यासारखें आहे. दरसाल सभासदांचें संमेलन भरून महत्त्वाचे निबंध वाचण्यांत येतात व त्यांवर चर्चा होते. रा. ब. का. ना. साने हे अध्यक्ष असून प्रो. द. वा पोतदार व श्रीमंत गं. ना. मुजूमदार हे चिटणीस आहेत.

**मराठी ग्रंथसंग्रहालय**—पुण्यास ही संस्था स्थापण्याचा विचार एका गृहस्थाच्या मनांत आला आणि त्यानें आपल्या जवळचीं सुमारें शंभर रुपये किंमतीचीं शंभर पुस्तकें संस्थेकरितां दिलीं आणि रा. रा. द. पराडकर यांना सेक्रेटरी होण्याविषयीं सुचविलें. संस्था १९११ सालीं स्थापन झाली. संस्थेचे नियम मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाच्या धर्तीवर ठरविले होते. व्यवस्थापक मंडळाच्या वरचेवर सभा भरून संस्थेचें काम चालतें अशी समजूत केल्यास ती मात्र चुकीची ठरेल. वर्गणी-दारांची वार्षिक साधारण सभा भरावयास पाहिजे, पण ती देखील भर-विण्याविषयीं कोणी वर्गणीदार प्रयत्न करीत नाहींत. या परिस्थितीचा विचार केला असतां संस्था बरी चालली आहे असें म्हटलें पाहिजे.

**नेटिव जनरल लायब्ररी**—या संस्थेची स्वतःच्या मालकीची इमारत आहे, आणि पुस्तकसंग्रह सुमारें पांच हजार आहे. या संस्थेची स्वतःच्या मालकीची एक इमारत आहे. आणि पुस्तकसंग्रह सुमारें पांच हजार आहे. या संस्थेच्या वर्गणीदारांना आपल्या हक्कांची जाणीव आहे असें दिसतें.

**मोफत वाचनालयें**—पुण्यांत या काळांत मोफत वाचनालयें बरींच स्थापलीं गेलीं. ज्यांना वाचतां येतें, ज्यांना वाचण्याची हौस आहे, आणि ज्यांना वर्तमानपत्रें किंवा पुस्तकें विकत घेऊन किंवा वर्गणी भरून वाचण्याची ऐपत आहे, असेच लोक प्रायः मोफत वाच-नालयांत येतात. अर्थात पुण्यांत या मोफत वाचनालयांचा उप-योग काय तें मला समजत नाहीं. एखादी चळवळ चालू झाली

**कै. बाळशास्त्री लागवणकर**— हे एक पुण्यांतले प्रख्यात वैद्य होते.

**जोडा फेंकणारा मनुष्य**—१९०७ सालीं सुरतेस कांग्रेसमध्यें डा. राशबिहारी बोस भाषण करण्यास उभे राहिले असतां त्यांचेवर ज्या माणसानें जोडा फेकला ती व्यक्ति पुण्यांतलीच आहे. हा जोडा कांचेच्या फ्रेमींत बसवून ना. सुरेंद्रनाथ बानर्जी यांनीं आपल्या घरीं ठेवला आहे, अशी हकीकत मागें वर्तमानपत्रांतून प्रसिद्ध झाली होती.

याप्रमाणें मला माहीत असलेल्या व १९०१—१९२० दरम्यानच्या काळांत पुण्यांत वावरलेल्या व्यक्तींचीं नांवें व थोडी माहिती सांगितली. नांवांचा अनुक्रम जसा सुचला तसा दिला आहे. अनुक्रम ठरविण्यांत माझें कांहीं धोरण नाहीं.

---

## भाग सहावा.

# पुण्यांतल्या प्रसिद्ध संस्था.

पुस्तक अंदाजाबाहेर वाढत चाललें ह्मणून हा भाग संक्षेपानें लिहीत आहें.

**डेक्कन एज्युकेशन सोसायटी**— पुण्यांतल्या संस्थांमध्यें सर्वांत उत्तम तऱ्हेनें चाललेली ही संस्था आहे. न्यू इंग्लिश स्कूल आणि फर्ग्यूसन कॉलेज हीं पुण्यांत चालवून सांगलीचें वुइलिंगडन कॉलेज, आणि सातारा व वाई येथें एकेक इंग्रजी शाळा या सोसायटीनें चालविली आहे.

**पुणें शहर म्युनिसिपालिटी**— पुण्यासारख्या सुशिक्षितांच्या शहरीं म्युनिसिपालिटी ही संस्था नमुनेदार असेल अशी कल्पना होणें साहजिक आहे. परंतु ही संस्था अशी नाहीं. बरेच दिवस राजकीय पक्षभेदामुळें म्युनिसिपालिटीचें काम नीट चालत नसावें असें ह्मणण्यास जागा होती. अलीकडे एका पक्षाचें बहुमत झालें आहे; तेव्हां दहा पांच वर्षांत म्युनिसिपालिटी ही संस्था त्यांनीं उत्तम तऱ्हेनें चालवून दाखविली तर त्यांची कर्तबगारी दिसून येईल. या संस्थेसंबंधानें गेल्या वीस वर्षांत पुष्कळ लिहिण्यासारख्या गोष्टी घडून आल्या. त्या विस्तारपूर्वक लिहिल्यास एक स्वतंत्र ग्रंथ होईल. हें काम कोणीं तरी हातीं घेण्यासारखें आहे.

**सर्व्हंटस आफ इंडिया सोसायटी**—ही संस्था कै. नामदार गोखले यांनीं स्थापली. देशाच्या कल्याणाकरितां आपलें आयुष्य खर्च करणारांना सोसायटीचे नियम मान्य असल्यास एका पद्धतीनें देशसेवा करण्याची सोय या संस्थेनें केली आहे. हल्लीं नामदार व्ही. एस. श्रीनिवासशास्त्री हे या संस्थेचे अध्यक्ष आहेत.

**सार्वजनिक सभा**—ही एक जुनी राजकीय संस्था आहे. पुस्तकविषयक काळांत कै. अण्णासाहेब पटवर्धन आणि त्यांचे मागून कै. टिळक या संस्थेचे अध्यक्ष होते. १९२० मध्यें या संस्थेनें आपला ज्युबिली उत्सव केला. ही संस्था हल्लीं नांवालाच अस्तित्वांत आहे.

**डेक्कन सभा**—राजकीय मतभेदामुळें सार्वजनिक सभेंतून फुटून निघालेल्या लोकांनीं स्थापलेली ही राजकीय संस्था देखील नांवालाच अस्तित्वांत आहे. सार्वजनिक सभा टिळक पक्षाची आहे, आणि डेक्कन सभा गोखले पक्षाची आहे. हे दोन्ही पक्ष जरूरीच्या प्रसंगीं या संस्थांचा उपयोग करतात.

**आनंदाश्रम**—संस्कृत हस्तलिखित ग्रंथ व पोथ्या सुरक्षित ठेवणें, आणि महत्वाचे ग्रंथ शुद्ध छापणें या उद्देशानें ही संस्था कै. महादेव चिमणाजी आपटे यांनीं स्थापून स्वतःच्या पैशांनीं तिची कायमची व्यवस्था करून ठेवली आहे. शुद्ध आणि स्वच्छ छपाईच्या बाबतींत या संस्थेच्या ग्रंथावलींत दिवसानुदिवस प्रगति होण्याच्या ऐवजीं परागति होत आहे; कारण पूर्वीं छापलेल्या पुस्तकांपेक्षां अलीकडचीं पुस्तकें अस्पष्ट आणि अशुद्ध छपाईचीं निघूं लागलीं आहेत.

**भारत इतिहास संशोधक मंडळ**— हिंदुस्थानाच्या इतिहासाचें संशोधन हें मोठें क्षेत्र या संस्थेनें आपल्या कार्याला आपल्या नांवावरून ठरवून घेतलें. परंतु संस्थेचा कारभार मराठी भाषे-पुरताच चालवावयाचा असल्यानें मराठी काव्यें आणि मराठी इतिहास यासंबंधाचेंच संशोधन मुख्यत्वेंकरून चालतें. 'महाराष्ट्र-काव्येतिहाससंशोधक मंडळ' हें नांव या संस्थेला चांगलें शोभलें असतें. अलीकडे संस्थेच्या मालकीची एक मोठी इमारत आणि लायब्ररी आहे. या विषयाची आस्था बाळगणारांना या संस्थेमध्यें पुष्कळ

कार्य करतां येण्यासारखें आहे. दरसाल सभासदांचें संमेलन भरून महत्त्वाचे निबंध वाचण्यांत येतात व त्यांवर चर्चा होते. रा. ब. का. ना. साने हे अध्यक्ष असून प्रो. द. वा पोतदार व श्रीमंत गं. ना. मुज़मदार हे चिटणीस आहेत.

**मराठी-ग्रंथसंग्रहालय**—पुण्यास ही संस्था स्थापण्याचा विचार एका गृहस्थाच्या मनांत आला आणि त्यानें आपल्या जवळचीं सुमारें शंभर रुपये किंमतीचीं शंभर पुस्तकें संस्थेकरितां दिलीं आणि रा. रा. द. पराडकर यांना सेक्रेटरी होण्याविषयीं सुचविलें. संस्था १९११ सालीं स्थापन झाली. संस्थेचे नियम मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाच्या धर्तीवर ठरविले होते. व्यवस्थापक मंडळाच्या वरचेवर सभा भरून संस्थेचें काम चालतें अशी समजूत केल्यास ती मात्र चुकीची ठरेल. वर्गणी-दारांची वार्षिक साधारण सभा भरावयास पाहिजे, पण ती देखील भर-विण्याविषयीं कोणी वर्गणीदार प्रयत्न करीत नाहींत. या परिस्थितीचा विचार केला असतां संस्था बरी चालली आहे असें म्हटलें पाहिजे.

**नेटिव जनरल लायब्ररी**—या संस्थेची स्वतःच्या मालकीची इमारत आहे, आणि पुस्तकसंग्रह सुमारें पांच हजार आहे. या संस्थेची स्वतःच्या मालकीची एक इमारत आहे. आणि पुस्तकसंग्रह सुमारें पांच हजार आहे. या संस्थेच्या वर्गणीदारांना आपल्या हक्कांची जाणीव आहे असें दिसतें.

**मोफत वाचनालयें**—पुण्यांत या काळांत मोफत वाचनालयें बरींच स्थापलीं गेलीं. ज्यांना वाचतां येतें, ज्यांना वाचण्याची हौस आहे, आणि ज्यांना वर्तमानपत्रें किंवा पुस्तकें विकत घेऊन किंवा वर्गणी भरून वाचण्याची ऐपत आहे, असेच लोक प्रायः मोफत वाच-नालयांत येतात. अर्थात पुण्यांत या मोफत वाचनालयांचा उप-योग काय तें मला समजत नाहीं. एखादी चळवळ चालू झाली

ह्मणजे ती निरुपयोगी असली तरी तिच्या विरुद्ध कोणी बोलतां कामा नये अशी पुण्यांत पद्धत आहे. पण पुस्तकलेखकांच्या जवळ पुस्तकें फुकट मागून आणि वर्तमानपत्रकारांच्या जवळ वर्तमानपत्रें फुकट मागून मोफत वाचनालयांत आणून ऐपतदार माणसांना मोफत वाचूं दिल्यानें काय फायदा होणार आहे हें मोफत वाचनालयाच्या चालकांसच माहीत !

**भांडारकर रीसर्च इन्स्टिटयूट**—— डा. भांडारकरांच्या नांवानें ही संस्था प्राच्यविद्यासंशोधनासाठीं १९१६ सालीं स्थापन झाली.

**महाराष्ट्र विद्याप्रसारक मंडळ**— 'नूतन मराठी विद्यालय' नांवाची शाळा मराठी पहिल्या यत्तेपासून या संस्थेनें चालविली असून १९१६ मध्यें 'न्यू पूना कॉलेज' हें कॉलेजहि सुरू केलें. नुसतें 'पूना कॉलेज' ह्मणण्यास कोणती हरकत होती समजत नाहीं. 'न्यू' किंवा 'नूतन' किंवा 'नवीन' शब्द जोडण्याची अमेरिकन पद्धत पुण्यांत निरर्थक स्वरूपांत बरीच दिसते.

**ज्ञानकोश मंडळ** लिमिटेड— मराठी विश्वकोश तयार करून छापण्याकरितां ही कंपनी डा. श्री. व्यं. केतकर यांचे प्रमुखत्वाखालीं पुण्यास चालली आहे.

**सेवासदन**—लहान मोठ्या स्त्रियांच्या शिक्षणाकरितां ही संस्था श्रीमती रमाबाई रानडे यांच्या प्रमुखत्वानें चालू आहे.

**वसंतव्याख्यानमाला**——दरसाल उन्हाळ्याच्या सुट्टीमध्यें दररोज कोणातरी प्रसिद्ध वक्त्याचें व्याख्यान करवून सुमारें महिनाभर व्याख्यानमाला चालविणारी ही पुण्यांतली एक जुनी संस्था आहे. पूर्वीं क्रीडाभुवन नांवाच्या खाजगी जागेंत व्याख्यानें होत असत. आतां शिवाजी मंदिराच्या सार्वजनिक जागेंत होतात.

**गणपतीउत्सव आणि मेळे**—— भाद्रपदांत चतुर्थीपासून चतुर्द-

शीपर्यंत दहा दिवस सार्वजनिक गणपतींपुढें व्याख्यानें आणि मेळ्यां-चीं पदें पुण्यांत दरसाल चालू असतात. मेळ्यांतील पदांतून यथेच्छ तोंडसुख घेण्याची पद्धत आहे. १९१० पासून १९१५ पर्यंत मेळ्यां-तून म्हणावयाचीं पदें सरकारी कमिटीकडे तपासण्याकरितां पाठविलीं पाहिजेत असा निर्बंध होता. तेव्हां पदांतला विषय 'गणरायाला भक्ति-पूर्वक वंदन' एवढाच होता. पण पुनः आतां पूर्वींप्रमाणें स्वातंत्र्य मिळाल्याबरोबर पूर्वींची पद्धत चालू झाली. 'देशाकरितां जागे व्हा' अशीं देशभक्तीचींहि पदें बरींच असतात. आज पंचवीस वर्षें मेळ्यां-च्या पदांच्या द्वारें लोकांस जागे होण्याचा आग्रह चालला आहे, पण पुण्यांतले किती लोक जागे झाले तें नीट समजत नाहीं. कुंभकर्ण बहुधा मूळचा पुण्याचा रहिवासी असावा. असो. पदांइतकें स्वातंत्र्य व्याख्याते घेत नाहींत. व्याख्यानें दहा दिवसांच्या ज्ञानसत्राला शोभण्यासारखीं असतात.

**मद्यपाननिषेधक मंडळ**—मद्यपानाचा प्रसार कमी करण्याच्या उद्देशानें चालविलेली संस्था. रा. ल. र. गोखले व शं. ग. लवाटे हे सेक्रेटरी आहेत.

## परिशिष्ट.

# पेशव्यांचा शनिवार वाडा.

केसरीच्या ता. ९ आगस्ट १९२१ आणि ता. १६ आगस्ट १९२१ या दोन अंकांत पेशव्यांच्या शनिवारवाड्याची माहिती छापली होती. ही माहिती केसरीकारांच्या परवानगीनें येथें दिली आहे—

## शनिवार—वाड्याचा जीर्णोद्धार.

रिकामटेकड्या गणिती लोकांनीं केलेल्या गमतीच्या अनेक हिशेबांपैकीं एक हिशेब असा आहे कीं, पृथ्वीच्या पाठिवर जितकीं माणसें जिवंत आहेत त्यांच्यापेक्षां मेलेल्यांचीच संख्या अधिक भरेल, त्याच प्रकारचा दुसरा एक हिशेब असा आहे कीं, पृथ्वीच्या उघड्या पाठीवर आज जितकें वैभव जागतें आहे त्यापेक्षां तिच्या झांकल्या उदरांत निद्रित वैभव अधिक भरलेलें आहे. हा हिशेब सगळ्या जगासंबंधानें खरा आहे कीं नाहीं हें ठरविविण्याला सगळी पृथ्वी उकरून काढावी लागेल. परंतु निदान एखाद्या ठिकाणीं जेथें हें उकराउकरीचें काम कांहीं मुगाध्यानें बरेंचसें केलें जातें तेथें तरी हें निद्रावश वैभव हटकून सांपडतें यांत शंका नाहीं. हें उकराउकरीचें काम ह्मणजे उंदीरघुशींचेंच काम होय; व या दृष्टीनें सरकारच्या प्राचीनवस्तुसंशोधक खात्याला विनोदानें उंदीरघुशींचें खातें असें नांव कोणीं दिल्यास तें शोभण्यासारखें आहे. साध्या उंदीर घुशी या उकराउकरीनें चांगल्या इमारती उध्वस्त करितात, व या अलौकिक उंदीरघुशी उध्वस्त इमारती फिरून चांगल्या नीटनेटक्या करितात. उंदीरघुशींची ती एक जात स्वार्थी व ही दुसरी परोपकारी इतकाच फरक !

मुंबईसरकारच्या प्राचीनवस्तुसंशोधक खात्यानें पुणें येथील शनिवारवाड्यांत हल्लीं उकरा उकरींचें काम चालविलें आहे, त्यावरून वरील सर्व सिद्धांतांचें समर्थन करितां येण्यासारखें आहे. बरोबर दोन वर्षांपूर्वी या वाड्याच्या तटांच्या आंत काय दिसत होते व तेथेंच आज काय दिसत आहे याची तुलना करून पाहणारास कितीतरी आश्चर्य वाटेल. एका अर्थानें या ठिकाणीं ज्या वस्तूंचें संशोधन घडलें त्या फार प्राचीन किंवा पुरातन आहेत असें नाहीं. कारण सन १७२१ सालीं, म्हणजे आज बरोबर दोनशें वर्षांपूर्वी, या जागेवर मोठ्या खर्चानें उकरून उद्धार करण्यासारखें वैभव कांहींच नव्हतें. तेथें त्या वेळीं फक्त मुळामुठा नदींत जाळें टाकून मासे मारणाऱ्या कोळ्यांचीं खोपटीं होतीं. त्याचप्रमाणें स. १९१९ च्या आगस्ट महिन्यांत या वाड्याकडे डोकावून पाहणाराला इतकेंच दिसलें असतें कीं, ईशान्यकोपऱ्याला कोणीं कांहीं फुलझाडें लावलीं आहेत, उत्तरेस तटाला लागून मातीच्या ढिगावर पोलिसांकरितां खोपटीं बांधलेलीं आहेत, दक्षिणेला जुन्या पायावर न्यायकोर्टाची एक इमारत आहे, व आसपास उंचसखल जागेंत गवत व रानवेली यांचीं झुडपें बनून पाय ठेवण्याला भीति वाटेल असें जंगल माजलेलें आहे. वास्तुदेवतेला श्रीमंतीचा कंटाळा आल्यावर कंगाल भिकाऱ्याचा वेश घेण्यांत फार हौस वाटते असें म्हणतात तसा प्रकार या वाड्यांत झाला होता आणि विधीची विचित्र लीला अशी कीं ज्या जागेवर पूर्वी पेशव्यांचा मुख्य चौक व दिवाणखाना होता त्याच जागेवर मुन्सफकोर्टाचे शौचकूप उभारण्यांत आलेले होते! पण दैवानें किंवा वैराग्यानें आणलेल्या विद्रूपपणाचा असा कळस झाला म्हणूनच जीर्णोद्धाराचें नवें युग सुरू होतें.

शनिवारवाड्याची जागा कोर्टाकरितां दिली त्यापूर्वी ती डेक्कन

एज्युकेशन सोसायटीच्या न्यू इंग्लिश स्कूलला देण्याचें सरकारनें ठरविलें होतें. पण कित्येक राजकारणी इंग्रजांना कुशंका येऊन त्यांनीं ती देणगी माघारी घेतली. न्यू स्कूलवाल्यांच्या हातीं ही जागा जाती तर शनिवारवाड्यांतील सर्व पटांगण हल्लींहून अधिक साफ-व सुर्फीत राहिलें असतें. कारण तेथें मुलांचें खेळण्याचें मैदान बनलें असतें. कोर्टाकडे जागा गेल्यानें तितकीहि साफसुफी राहिली नाहीं. कारण बागबगीचावर खर्च रिकामा कोण करितो ! अलीकडे शनिवारवाड्याच्या उपयोगाची तिसरी एक कल्पना निघाली होती. लॉर्ड रे साहेबांच्या नांवानें पदार्थसंग्रहालय करण्यासाठीं सरकारचे व म्युनिसिपालिटीचे मिळून सुमारें ४० हजार रुपये शिल्लक आहेत. ते खर्चून रेसाहेबांचें स्मारक येथें करावें असाहि विचार चालू होता. हें घडून येतें तर भलत्या ठिकाणीं भलतीच गोष्ट होऊन शिवाय बागेवर निराळा खर्च करावा लागला असता. पण ही कल्पनाहि रहित होऊन या जागेवर एक इटालियन पद्धतीचा नुसता बगीचा करावा अशी योजना पुढें आली. कांहीं वर्षांपूर्वीं लॉर्ड कर्झन यांनीं प्राचीन वस्तुरक्षणाच्या प्रेमानें फुटकळ खर्चाच्या पुष्कळ गोष्टी करविल्या. त्यापैकीं शनिवारवाड्याच्या वांट्याला फक्त एक शिलालेख आला. आंतील जीर्णोद्धार तसाच राहिला. परंतु, भांबुर्डें व पुणें शहर यांच्या दरम्यान नदीवर पूल, पलीकडे नवें रेल्वे स्टेशन व नवें गांवठाण वगैरे बांधण्याची कल्पना निघाल्या-पासून, विशेषतः शनिवारवाड्यालगतच हा पूल बांधावयाचा ठर-ल्यापासून त्या वाड्याचें काय करावें, अर्थात् समोर होणाऱ्या सुधा-रणांचा फायदा घेऊन खुद्द वाड्याचा जीर्णोद्धार कसा करावा, या विचाराकडे सरकारी इंजिनियरांचें लक्ष अधिक वेधलें. इतक्यांत प्राचीनवस्तुसंशोधक व संरक्षक खात्याची दृष्टी इकडे गेली, व

गव्हर्नर सर जॉर्ज लॉइड यांच्याहि मनांत शनिवारवाड्याच्या जीर्णोद्धाराची प्रेरणा झाली. यामुळें इतर सर्व विचार बाजूस राहून वाड्याच्या मैदानांत पसरलेल्या मातीच्या टेंकड्या उकराव्या व त्याखालीं गुदमरून गेलेलें ऐतिहासिक शिल्पवैभव मोकळें करून दर्शनाकरितां सुरक्षित ठेवावें हीच मार्मिक विचारसरणी प्रभावी होऊन खर्चास मंजुरीहि मिळाली. गव्हर्नरसाहेब झाले तरी त्यांनाहि खर्चाच्या कामीं इतरांचा प्रतिबंध होऊं शकतो. पण सर जॉर्ज लॉइड यांनीं या कामीं नेट धरिला; शिवाय लॉर्ड चेम्सफर्ड यांनाहि एक वेळ अभावितपणें आणून वाडा दाखवून त्यांचीहि सहानुभूति त्यांनीं या कामीं मिळविली असें म्हणतात. कसेंहि असो, गव्हर्नरसाहेबांची सहानुभूति व प्रा. व. संशोधक खात्याची आस्था यांच्या संयोगानें दोन वर्षांपूर्वींपासून जीर्णोद्धाराच्या कामास सुरुवात होऊन आज, प्रत्यक्ष न्यायकोर्टाच्या इमारतीखालीं सांपडलेल्या जागेशिवाय इतर सर्व जागेवरील माती निघून जुन्या इमारतींचे अवशेष मोकळे झाले आहेत, आजच्या अर्धवट स्थितींतहि ते जाऊन पाहणारास आनंदाश्चर्य वाटल्याशिवाय राहत नाहीं.

नवीन इमारती बांधण्याला खर्च लागतो. पण जीर्णोद्धारालाहि खर्च लागत नाहीं असें नाहीं. शनिवारवाड्याचेंच उदाहरण घेतलें तर आजपर्यंत त्यांतील नुसती माती उकरून काढावयाची म्हटलें तरी त्याला किती पैसा लागला असेल याची कल्पना, वाड्याच्या चारहि तटांच्या बाहेर तटाइतक्या उंचीचे जे प्रचंड राड्यारोड्यांचे पडलेले ढीग ज्यांनीं पाहिले असतील त्यांना सहज करतां येईल. या कामीं आजपर्यंत झालेला हजारों रुपयांचा खर्च सर जॉर्ज लॉईड यांच्या प्रेरणेनें स्वतः सरकारनेंच सोसला आहे. पण इतरांनाहि या जीर्णोद्धाराचें महत्व वाटल्याशिवाय राहणें शक्य नाहीं.

कोणत्याहि शहरची म्युनिसिपालिटी ह्मटली म्हणजे शहरांतील ऐतिहासिक वस्तूंचें रक्षण करणें हें तिचें एक स्वाभाविक कर्तव्यच आहे. नव्या काय व जुन्या काय कोणत्याहि पद्धतींत ग्रामदेवता ही मानावीच लागते, व हल्लींच्या अश्रद्धाळू काळांतहि शहर म्युनिसिपालिटी ही ग्रामदेवतेचें मूर्त स्वरूपच मानण्यास हरकत नाहीं. पुणें शहर म्युनिसिपालिटीनें कांहीं दिवसांपूर्वी कौन्सिलर मराठे यांच्या सूचनेवरून पुणें शहराच्या इतिहासाला पांचशें रुपयांचें बक्षीस ठेवून तो इतिहास लिहविला. त्याच धोरणानें शनिवारवाड्याच्या जीर्णोद्धाराला तिनें एक महिन्यापूर्वी दोन हजार रुपयांची वर्गणी मोठ्या आनंदानें दिली; व प्रस्तुत कार्याला आणखीहि वर्गणी देण्याला कमिटी माघार घेणार नाहीं असें आम्हांस वाटतें

पण या मोठ्या कार्याच्या खर्चाचा बोजा केवळ सरकार किंवा म्युनिसिपालिटी यांजवरच न पडतां इतिहासप्रिय धनिक लोकांनीं या कार्यास मदत करणें उचित आहे. निदान महाराष्ट्र व उत्तर हिंदुस्थान यांतील मराठे सरदार व संस्थानिक यांनीं या कार्याला सढळ हातानें मदत केली तर त्यांनीं एका अर्थानें आपल्याच जीर्णोद्धाराचें कार्य केल्याचें श्रेय त्यांना लाभेल. कारण हे सरदार संस्थानिक व शनिवार-वाडा यांचा संबंध किती प्राचीन व जिव्हाळ्याचा आहे हें कोणासहि नव्यानें सांगण्याचें कारण नाहीं. या बहुतेकांचें राजकीय व ऐतिहासिक वैभव या वाड्यांत लहानाचें मोठें झालें व सन्मान पावलें. त्यांच्या पूर्वजांनीं सन १७३० पासून पुढील सत्तर वर्षांत ज्या कामगिऱ्या केल्या व महाराष्ट्राच्या इतिहासांत भर घातली त्यांचा परामर्ष येथेंच घेण्यांत आला. त्याची कारवाई येथेंच घडली व त्यांच्या मुत्सद्देगिरीचा विजयहि येथेंच झाला.

लोण घेऊन येणाऱ्या गड्यानें हांक मारली असतां पाठीवाल्याला जसें सक्तीनें तोंड फिरवावें लागतें तसें दैवहि इतिहासाचें तोंड फिरवून जुन्याचा विसर पाडतें; व जी गोष्ट अदृश्य विधि अमूर्त हातांनीं घडवून आणतो तिची साथ करण्याकरितांच कीं काय अग्निप्रलय हेहि अवतरून जुन्या वास्तू जाळून पोळून पाडून नष्ट करून टाकीत असतो. आज हिंदुस्थानांतील लोकांच्या मनांतील वैभवबुद्धीवर पडलेली जळिताची राख जशी स्वदेशाभिमानाच्या सोसाट्याच्या वाऱ्यानें पार उधळून जात आहे आणि त्यांतील महत्वाकांक्षेची रचना दृष्टीस पडूं लागली आहे, त्याचप्रमाणें शनिवारच्या वाड्यांतील मातीचे डोंगर प्राचीन वस्तुसंशोधक खात्याच्या प्रयत्नानें उकरून निघून जुन्या इमारतीचे अवशेष दृष्टिगोचर होऊं लागले आहेत. अशा वेळीं राजेरजवाड्यांनीं व सरदारांनीं मनावर घेतल्यास सयुक्त बलानें त्यांना हें जीर्णोद्धाराचें काम सहज पार पाडतां येईल येईल. हें कार्य वास्तविक सर्व सरकारच्याहि खर्चानें होणें गैर नाहीं, उलट योग्यच आहे. कारण ज्या मराठेशाहीचें पांच कोटींचें राज्य इंग्रज सरकाराला मिळालें तिचें हें लहानसें दगडाविटांचें स्मारक शाबूत ठेवण्यास त्यांनीं जरूर तो सर्व खर्च केला तर तें योग्यच होईल. पण कुटिलराजकारणी दृष्टीनें पाहता कोणी असाहि प्रश्न विचारूं शकेल कीं, प्रतिपक्षाच्या गतवैभवाची तरी आठवण सरकारनें जगाला काय म्हणून करून द्यावी ? पण सुदैवानें ब्रिटिश सरकारच्या राजनीतीच्या विपारी जंगलांत प्राचीन वस्तुसंशोधक बुद्धीची सुवासिक मंजरी एखादे ठिकाणीं तरी फुललेली आढळते, व ती ज्या ठिकाणीं आढळेल तेथें निर्विकार मनानें तिचें चीज करणें हेंच माणुसकीस शोभणारें आहे. या दृष्टीनें पाहतां सर जॉर्ज लॉइड यांच्या इतर अनेक कृत्यांचा आम्हांला

कोणत्याहि शहरची म्युनिसिपालिटी ह्मटली म्हणजे शहरांतील ऐतिहासिक वस्तूंचें रक्षण करणें हें तिचें एक स्वाभाविक कर्तव्यच आहे. नव्या काय व जुन्या काय कोणत्याहि पद्धतींत ग्रामदेवता ही मानावीच लागते, व हल्लींच्या अश्रद्धाळू काळांतहि शहर म्युनिसिपालिटी ही ग्रामदेवतेचें मूर्त स्वरूपच मानण्यास हरकत नाहीं. पुणें शहर म्युनिसिपालिटीनें कांहीं दिवसांपूर्वी कौन्सिलर मराठे यांच्या सूचनेवरून पुणें शहराच्या इतिहासाला पांचशें रुपयांचें बक्षीस ठेवून तो इतिहास लिहविला. त्याच धोरणानें शनिवारवाड्याच्या जीर्णोद्धाराला तिनें एक महिन्यापूर्वी दोन हजार रुपयांची वर्गणी मोठ्या आनंदानें दिली; व प्रस्तुत कार्याला आणखीहि वर्गणी देण्याला कमिटी माघार घेणार नाहीं असें आम्हांस वाटतें

पण या मोठ्या कार्याच्या खर्चाचा बोजा केवळ सरकार किंवा म्युनिसिपालिटी यांजवरच न पडतां इतिहासप्रिय धनिक लोकांनीं या कार्यास मदत करणें उचित आहे. निदान महाराष्ट्र व उत्तर हिंदुस्थान यांतील मराठे सरदार व संस्थानिक यांनीं या कार्याला सढळ हातानें मदत केली तर त्यांनीं एका अर्थानें आपल्याच जीर्णोद्धाराचें कार्य केल्याचें श्रेय त्यांना लाभेल. कारण हे सरदार संस्थानिक व शनिवार-वाडा यांचा संबंध किती प्राचीन व जिव्हाळ्याचा आहे हें कोणासहि नव्यानें सांगण्याचें कारण नाहीं. या बहुतेकांचें राजकीय व ऐतिहासिक वैभव या वाड्यांत लहानाचें मोठें झालें व सन्मान पावलें. त्यांच्या पूर्वजांनीं सन १७२० पासून पुढील सत्तर वर्षांत ज्या कामगिऱ्या केल्या व महाराष्ट्राच्या इतिहासांत भर घातली त्यांचा परामर्ष येथेंच घेण्यांत आला. त्याची कारवाई येथेंच घडली व त्यांच्या मुत्सद्देगिरीचा विजयहि येथेंच झाला.

लोण घेऊन येणाऱ्या गड्यानें हांक मारली असतां पाठीवाल्याला जसें सक्तीनें तोंड फिरवावें लागतें तसें दैवहि इतिहासाचें तोंड फिरवून जुन्याचा विसर पाडतें; व जी गोष्ट अदृश्य विधि अमूर्त हातांनीं घडवून आणतो तिची साथ करण्याकरितांच कीं काय अग्निप्रलय हेहि अवतरून जुन्या वास्तू जाळून पोळून पाडून नष्ट करून टाकीत असतो. आज हिंदुस्थानांतील लोकांच्या मनांतील वैभवबुद्धीवर पडलेली जळिताची राख जशी स्वदेशाभिमानाच्या सोसाट्याच्या वाऱ्यानें पार उधळून जात आहे आणि आंतील महत्वाकांक्षेची रचना दृष्टीस पडूं लागली आहे, त्याचप्रमाणें शनिवारच्या वाड्यांतील मातीचे डोंगर प्राचीन वस्तुसंशोधक खात्याच्या प्रयत्नानें उकरून निघून जुन्या इमारतीचे अवशेष दृष्टिगोचर होऊं लागले आहेत. अशा वेळीं राजेरजवाड्यांनीं व सरदारांनीं मनावर घेतल्यास संयुक्त बलानें त्यांना हें जीर्णोद्धाराचें काम सहज पार पाडतां येईल येईल. हें कार्य वास्तविक सर्व सरकारच्याहि खर्चानें होणें गैर नाहीं, उलट योग्यच आहे. कारण ज्या मराठेशाहीचें पांच कोटींचें राज्य इंग्रज सरकारला मिळालें तिचें हें लहानसें दगडविटांचें स्मारक शाबूत ठेवण्यास त्यांनीं जरूर तो सर्व खर्च केला तर तें योग्यच होईल. पण कुटिलराजकारणी दृष्टीनें पाहतां कोणी असाहि प्रश्न विचारूं शकेल कीं, प्रतिपक्षाच्या गतवैभवाची तरी आठवण सरकारनें जगाला काय म्हणून करून द्यावी ? पण सुदैवानें ब्रिटिश सरकारच्या राजनीतीच्या विषारी जंगलांत प्राचीन वस्तुसंशोधक बुद्धीची सुवासिक मंजरी एखादे ठिकाणीं तरी फुललेली आढळते, व ती ज्या ठिकाणीं आढळेल तेथें निर्विकार मनानें तिचें चीज करणें हेंच माणुसकीस शोभणारें आहे. या दृष्टीनें पाहतां सर जॉर्ज लॉइड यांच्या इतर अनेक कृत्यांचा आम्हांला

निषेध करावासा वाटत असला तरी या एका बाबतींत त्यांनीं जी सुसंस्कृत मनाला योग्य अशी मार्मिक बुद्धि दाखविली तिचें आम्ही आनंदानें अभिनंदनच करतों. पण या जीर्णोद्धाराच्या कामीं केवळ सरकार सर्व खर्च करण्याला तयार असलें तरी तें त्यांनाच करूं देणें हें आमच्या संस्थानिकांना व सरदारांना शोभणार नाहीं. म्हणून त्यांनींहि या कामीं शक्य असेल ती मदत करावी असें कोणासहि वाटेल.

असो ! प्रा. व. संशोधक खात्याकडून जीर्णोद्धाराचें काय काम झालें व त्यानें वाड्याची नवीन माहिती काय मिळाली वगैरे गोष्टींचा पूर्वापार वृत्तांत पुढील लेखांत आम्ही देणार आहों.

—केसरी ९ आगस्ट १९२१.

---

शनिवार—वाड्यासंबंधानें जुन्या कागदपत्रांतून एके ठिकाणीं समग्र दिलेली अशी माहिती मिळत नाहीं. परंतु यत्नपूर्वक अनेक कागदपत्रांतून मिळविल्यास चालचलाऊ माहिती मिळते, ती थोड-क्यांत खालीं देत आहों.

पहिल्या बाजीरावाच्या कारकीर्दीच्या प्रारंभीं पेशव्यांची काय-मची वस्ती पुरंदरास असून पुण्यास ते फक्त जाऊन येऊन राहत. १७२१ सालीं बाजीरावानें बापूजी श्रीपत याजकडे पुण्याच्या सुभे-दारीचें काम सांगितलें. बापूजीचा कारभारी रंभाजी जाधवराव यानें उदमी लोकांना कौल देऊन पुण्यांत अमदानी करविली. नंतर पेशवे व पुरंदरे या उभयतांनीं पुण्यास कायमची वस्ती करण्याचें योजिलें. पैकीं पुरंदऱ्यांकरितां नदीकांठीं अरबांची गढी किल्लेहिसार नांवाची होती ती मोडून मैदान केलें ( सन १७२८ ), व त्यांत पुरंदरे यांचा वाडा बांधला. पुरंदऱ्यांच्या माडीवरून सन्मुख दिसेल

अशा जवळच्या ह्मणजे हल्लींच्या ठिकाणीं पेशव्यांनीं आपला वाडा बांधिला. या ठिकाणीं कसब्याची मावळवेस होती तिच्याजवळ कोळी व कोष्टी लोकांची वस्ती होती त्यांना मंगळवार पेठेंत मोबदला जागा देऊन ही जागा वाड्याकरितां घेतली. वाडा बांधण्यास ता. १० जानेवारी सन १७३० रोजीं सुरुवात झाली. वाडा तयार नसल्यामुळें जुन्या कोटांत मंडप घालून नानासाहेब पेशव्यांचें लग्न केलें. वाड्याची वास्तुशांत ता. २२ जानेवारी सन १७३२ रोजीं झाली. बाजीरावानें बांधलेला वाडा फक्त दुमजली व तीनचौकी होता. त्याला १६११० रुपये खर्च आला होता.

प्रथम १७३१ सालीं वाड्याभोंवतीं कोटाची भिंत बांधण्यास प्रारंभ झाला. पण शाहूमहाराजांना ही गोष्ट पसंत नव्हती. म्हणून काम थांबविलें. सातार्‍याहून पुरंदरे बाजीरावास 'खाजगी पत्रांत सूचनार्थ लिहितात कीं, "हवेलीभोंवतीं बुरूज न घालतां चार दिवाळा मात्र करावी. जुनें काम आहे तें कांहीं फार पक्कें नाहीं. परंतु भयासुर दिसतें. त्यास पांढर्‍या भिंतिचें बाहेरील आंग सारवावे म्हणजे डोळेफोड दिसणार नाहीं." पुढें नानासाहेब पेशव्यांच्या कारकीर्दीत सन १७५५ सालीं कोटाचें काम पुरें झालें. सन १७५२ सालीं दिल्लीदरवाजा बांधला, व १७६० सालीं वाड्याला दगडी बुरुज बांधण्यांत आले. बाहेरच्याप्रमाणें आंतहि नानासाहेब पेशव्यांनीं वाड्याचें काम वाढवून सातमजली केलें. त्यानंतर पुढेंहि अनेक कामें वाड्यांत नवीं झालीं. नाना फडणीसांनीं सवाई माधवरावाकरितां मेघडंबरी बांधली. फडाचा चौक मोठा केला (१७८८). दुसर्‍या बाजीरावानें दादासाहेबांच्या बंगल्याजवळ सात मजली बंगला बांधला. (१७९८). पण अखेर बांधकाम होण्याचे आधींच वाड्यांत आग लागण्यास सुरुवात झाली होती.

या वाड्यांत पेशव्यांची वस्ती पाऊणशें वर्षांहून अधिक झाली नाहीं. दुसरा बाजीराव अखेरपर्यंत या वाड्यांत राहिला नाहीं. त्याचे कारकीर्दींत शुक्रवारचा वाडा बांधल्याचें टिपण पेशव्यांच्या रोजनिशींत सांपडतें; व खडकीच्या लढाईच्या दिवशीं बाजीरावसाहेब ज्या घरांतून अखेरचे बाहेर पडले तो शुक्रवारचा वाडाच असावा. शनिवारवाड्याच्या बरोबर बांधलेलें व अजूनहि नांदतें राहिलेलें एखादुसरें घर पुण्यांत सांपडणें अशक्य नाहीं. पण या वाड्याचें वैभव पाऊणशें वर्षांतच खालावलें ! येऊनजाऊन सवाई माधवरावांचा मुक्काम काय तो या वाड्यांत विशेष पडला. कारण थोरले बाजीराव, नानासाहेब व थोरले माधवराव हे बाहेर मुलूखगिरीवर बरेच दिवस असत.

या पाऊणशें वर्षांत शनिवारवाड्याला तीनदां आग लागली. सवाई-माधवरावांच्या कारकीर्दींत एका लहानशा भागास लागली होती. "शके १७१३ ज्येष्ठ शुद्ध पंचमी (रोजीं) श्रीमंतांचे वाड्यांत कळशी बंगला सातमजली होता त्यास आग लागून जळाला व कोठी जळाली" (७ जून १७९१) असा उल्लेख एका ऐतिहासिक टिपणांत सांपडतो (भा. इ. सं. इतिवृत्त शके १८३६ पृ. ३९१). दुसरी आग सन १८११ सालीं लागली तेव्हां अस्मानी महाल जळला. तिसरी आग सन १८२८ त लागली व तिनें सर्व वाडा जमीनदोस्त झाला. या आगीचें साल सन १८२२ असें सुमारें नऊ वर्षांपूर्वी इतिहाससंशोधकमंडळापुढें वाचलेल्या एका टिपणांत श्रीमंत आबासाहेब मुजुमदार यांनीं ठरविलें होतें व हें टिपण केसरींत तेव्हां प्रसिद्ध झालें होतें. परंतु इतिहाससंशोधनाचेंहि संशोधन व दुरुस्ती होऊं शकते. त्याप्रमाणें श्री. मुजुमदार यांनींच सुमारें चार वर्षांपूर्वी याच मंडळापुढें वाचलेल्या एक टिप-

णांत ती केली आहे. या नवीन माहितीप्रमाणें वाडा जळाल्याची तारीख २१ फेब्रुवारी सन १८२८ ही ठरते. ही तिथी गुरुवार फाल्गुन शुद्ध षष्ठीसह सप्तमी शके १७४९ सर्वजित नाम संवत्सरे अशी आहे.

मुंबई गॅझेटिअरमध्यें गुरुवार फागुन षष्ठी अशी तिथी दिली आहे. परंतु शक दिला नसून सन १८२८ पाहिजे तो १८२७ असा दिला आहे. आग पंधरा दिवस जळत होती असें गॅझेटिअरमध्यें म्हटलें आहे. पण श्रीमंत मुजुमदार यांच्या दप्तरांतील कागदपत्रांवरून आग फक्त दोन दिवस टिकली असें दिसतें. या पत्रांतील एक उतारा खालीलप्रमाणें आहे—"शुद्ध सप्तमी गुरुवारीं थोरला वाडा शनिवारचा येथें अग्नीचा उपद्रव होऊन चौसोपी व आरसेमहाल, गणपतीचा रंगमहाल वगैरे दरोबस्त काम जळालें. मोठा प्रलय झाला. (या गोष्टीला) आठ दिवस झाले. चुकून पांचपन्नास खण राहिले, साहेबांनीं प्रयत्न केला; तथापि उपाय चालला नाहीं. दोन दिवस आगीचा उपद्रव होता." वरील पत्रांत शुद्ध सप्तमी लिहिण्याचें कारण त्या वेळचें पंचांग पाहतां असें दिसतें कीं, या गुरुवारीं सूर्योदयाला षष्ठी होती, पण ती फक्त नऊ साडेनऊ घटका होती. आग दोन प्रहरीं लागली असा याच कागदोपत्रीं दुसरे ठिकाणीं उल्लेख आहे. अर्थात् आग लागण्यापूर्वीं तिथी बदलून षष्ठीची सप्तमी झाली होती. शनिवार-वाड्यावर संगमरवरी स्मरणशिला सरकारनें बसवली आहे. त्यावर सन १८२७ हें आगीचें साल म्हणून दिलें आहे. पण तें चुकीचें असल्यामुळें त्याची दुरुस्ती होणें जरूर आहे. गॅझेटियरमध्यें आरसेमहाल आगींतून बचावला असें दिलें आहे, पण तें चूक आहे. हेंहि वरील उताऱ्यावरून सिद्ध होतें. उतारा ज्यांतून घेतला तें पत्र शनिवारवाड्यापासून दोनशें पावलांच्या आंत राहणाऱ्या मनुष्यानें आगी-

नंतर एका आठवड्यानेंच लिहिलें आहे.

पुण्यांतील पेशव्यांचे बहुतेक वाडे जळाले. शुक्रवार वाडा १८-०३ सालीं बांधला तो १८२० सालीं बहुतेक जळाला. तसेंच बुधवारचा वाडा व विश्रामबाग वाडा १८७८ सालीं एकाच रात्रीं जळाले. पैकीं बुधवारवाडा सर्व जळाला, विश्रामबागेचा मागचा कांहीं भाग शिल्लक राहिला.

शनिवारवाड्याच्या तटाच्या आंतील जागा सुमारें साडेचार पांच एकर भरेल. पेशवाईअखेर ही बहुतेक जागा इमारती, हौद व बगीचे यांनीं व्यापिली होती. पटांगण असें फार थोडें होतें. आंत घोड्याची व हत्तीचीहि पागा होती; परंतु घोडे फेकणें, कवाईत घेणें वगैरे कामें दिल्लीदरवाजा—बाहेरील विस्तीर्ण पटांगणांतच होत असत. वाडा एकंदर सातमजली होता, पण प्रत्येक मजल्याची उंची सरासरी आठनऊ फुटांपेक्षां अधिक होती असें वाटत नाहीं. हल्लीं सरकारी खात्यानें जेवढ्या भागांतलि माती उकरली आहे त्यांत सुमारें पांच चौक, बगीचाचीं कांहीं दालनें आणि पाण्याचे अनेक हौद व कारंजीं हीं उघडकीस आलीं आहेत. दिल्लीदरवाजांतून आंत गेल्यावर नगारखान्याची उंच दगडी भिंत आहे तिच्यावर 'किर्तीमुखाचा दगड' अद्यापि दिसतो. वाड्यांतील मुख्य इमारतीची मध्यरेषा दाखविणारी ती खूण असावी. इमारत कशा घाटाची असावी याची कल्पना हल्लीं उकरून काढलेलें जोतें व आंतील निरनिराळ्या चौकांचीं जोतीं यावरून येते पण उभा वाडा पाहून लिहिलेलें असें सविस्तर वर्णन आढळत नाहीं. सवाई माधवरावांच्या वेळच्या गणपति महालांतील एका दरबाराचें चित्र छापलेलें प्रसिद्ध आहे. त्यावरून थोडीशी कल्पना डोळ्याला येते. बाकीची स्थूल कल्पना नानावाड्यांतील किंवा फड-

णविसाच्या वाड्यांतील छतें, कलमदानें वगैरेवरून येण्यासारखी आहे.

भिंतींचें रंगरोगण किंवा चित्रें यांचे अवशेष कोठें राहिलेले नाहींत. परंतु पाण्याचे हौद, नळाचें काम उछ्वास व सांडपाण्याचा निकालाच्या मोऱ्या या पाहतां त्यांच्या रचनेंत मिजासी इतकेंच उपयुक्ततेकडे व टिकाऊपणाकडे लक्ष दिलेलें दिसून येतें. हल्लीं सर्व शहराकरितां मिळून पाण्याचा पुरवठा एकच असतो. पण जुन्या काळीं मोठमोठ्या राजेरजवाड्यांप्रमाणें मोठमोठे सरदारहि आपापले पाण्याचे खजिने व नळ वगैरे बांधीत. पेशव्यांनीं आपलें पाणी कात्रज येथें तलाव बांधून त्यांतून आणलें. याचें काम सन १७२९ सालीं सुरू झालें व तें १७३७ सालीं पूर्ण झालें. पुढें तेवीस वर्षांनीं मूळचा खापरी नळ काढून दगडी नळ घालण्यांत आला. नाना फडणविसांनीं नऱ्हें येथून खजिना व नळ बांधून त्याचें पाणी सदाशिवपेठेच्या हौदांत आणून सोडलें तें ज्येष्ठ शुद्ध पंचमी १७१३ रोजीं असाहि उल्लेख सांपडतो. पाणीपुरवठ्याच्या कामीं आजच्या इंजिनिअराइतकेंच त्या वेळचे लोक वाकबगार होते असें दिसतें. मुसलमानांचा तर या कामीं हातखंडा होता. दिल्ली, विजापूर, औरंगाबाद, अहमदनगर वगैरे ठिकाणीं जुने पाण्याचे खजिने व हौद यांची नुसती चैन होती. याचा भक्कम पुरावा अद्यापहि मिळतो.

शनिवारवाड्यांत उकरून काढलेल्या जागेंत लहान मोठीं बरींच कारंजीं आहेत. पण त्यांतील दोन विशेष चित्ताकर्षक आहेत. पैकीं मोठें कारंजें वाड्याच्या मागील चौकांत व हल्लींच्या न्यायकचेरीच्या इमारतीच्या वायव्यकोपऱ्याला लागून आहे. तें उत्कृष्ट कमलाकृति असून त्याचा घेर सुमारें ऐंशीं फूट आहे. त्यांत सोळा पाकळ्या असून दर पाकळींत सोळा लहान कारंजीं मिळून १९६

कारंजीं उडत होतीं. एवढें कारंजें किंवा अशा घाटाचें कारंजें हिंदुस्थानांत कोणत्याहि इमारतींत आढळत नाहीं असें सरकारी संशोधक खात्याचें मत दिसतें. टाइम्सच्या बातमीदारानें याचें नुकतेंच वर्णन केलें त्यांत तो म्हणतो कीं, एका रोम शहराखेरीज जगांत इतर कोठेंहि इतक्या तोंड्यांचें कारंजें नाहीं; मग हें कितपत खरें असेल तें असो. वाड्याच्या पूर्वांगास निघालेले हौदहि प्रेक्षणीय आहेत. एका हौदांत चार भिंतींना कोनाडे ठेवलेले असून चार बाजूंनीं पाण्याचे रुंद पातळ प्रवाह पडावे व या कोनाड्यांतून ठेवलेल्या रंगीबेरंगी दिव्यांच्या प्रकाशानें या कृत्रिम धबधब्यावर अंधाऱ्या रात्रीं इंद्रधनुष्याचा देखावा दिसावा अशी योजना असल्याचें कित्येकांना वाटतें. गणेश–दरवाजाजवळील खजिन्यांतून पाणी निघालें म्हणजे तें अनेक नळांनीं हौदांत जाऊन सांडपाण्यासह अखेर पश्चिमअंगास बांधलेल्या पक्क्या नहरांतून नदीला नेऊन मिळविलें होतें, वाड्यांतील बहुतेक नळ तांब्याचे असून ते गंजूं नयेत म्हणून त्यांच्या अंगाबरोबर राळ, त्यावर खादी, त्यावर ताग व त्यावर चुना अशा बंदोबस्तानें ते झांकून जमिनींत गाडलेले आहेत.

शनिवारवाड्याचें वर्णन परकीयांनीं केलेलें क्वचित् आढळतें. एका मुसलमान सरदाराच्या पत्रांत हें वर्णन अवघ्या दोन वाक्यांत केलें आहे तें असें— "बाहेरून पाहतां हा वाडा नरकासारखा दिसतो व आंत स्वर्गासारखा दिसतो." पारसनिसांच्या इतिहाससंग्रहांत साहेब लोकांनीं केलेल्या या वाड्याच्या वर्णनाचे एक दोन उतारे आहेत. सन १७९१ सालीं सर चार्लस मॅलेट यांजबरोबर मेजर प्राइस हा वाडयांत गेला होता. त्याच्या उल्लेखांतून खालील वाक्य घेतलें आहे—"वाड्यांतील दिवाणखाना खूप प्रशस्त व जंगी होता; पण आंत अत्यंत साधेपणा होता. लांकडांतील खोदीव

कामापेक्षां शोभादायक असें त्यांत कांहींएक नव्हतें. सर्व बैठकीवर पांढरीशुभ्र चादर एकजात पसरली होती." १८०३ सालीं लॉर्ड व्हलेनशिया यानें दुसऱ्या बाजीरावाची गांठ शनिवारवाड्यांत घेतली, त्याच्या वर्णनांतून खालील वाक्यें घेतलीं आहेत. "आम्हीं जिन्याच्या तोंडाशीं पालख्यांतून उतरलों. वर चढून गेल्यावर एका लहानशा खोलींतून दरबारच्या दिवाणखान्यांत प्रवेश केला. आम्हीं जाऊन थोडा वेळ उभे राहिल्यावर पेशवे येऊन गादीवर बसले. *** हा वाडा सामान्यरीत्या सुंदर आहे. मात्र तो अत्यंत स्वच्छ दिसतो. दरबारचा दिवाणखाना फार मोठा आहे. लांकडी खांबावर सुंदर नक्षीकाम कोरलेलें आहे." १८१८ सालीं कर्नल फिटझ् क्लॅरेन्स यानें दुय्यम रेसिडेंट मि. कोटस याचेबरोबर जाऊन वाडा पाहिला. या वेळीं पेशव्याची वस्ती वाड्यांतून उठली होती. तो म्हणतो—"*** आंतील चौकाच्या भिंतीवर पौराणिक देवता, हत्ती, घोडेस्वार वगैरेंचीं वेडींवांकडीं बरींच चित्रें काढलेलीं आहेत. वाड्यांतील मोठा चौक नागपूरकर भोंसल्याच्या वाड्याच्या चौकापेक्षां अधिक सुंदर आहे. सर्व वाडा तुळतुळीत दिसतो. बाजीराव विशेष प्रसंगाशिवाय येथें येत नसल्यामुळें अव्यवस्था दिसते. एका सुंदर दालनांत मार्किस वेल्स्लीची उभी तसबीर टांगलेली आहे. दोन मोठे रंगीत ग्लोब (खगोल, भूगोल) जवळच होते. त्यावर लॅटिन अक्षरें लिहिलेलीं असून क्षितिजें दाखविणाऱ्या पट्टया रुप्याच्या होत्या. १७८८ च्या पूर्वीं इंग्लंडच्या राजानें पेशव्यांना हे ग्लोब नजर केले होते. गणपतीच्या दिवाणखान्याचें लांकडी छत गोल आहे. दालन सुमारें ५० फूट लांब व खूप उंच आहे. उंचावर चौफेर गॅलरी आहे. ही इमारत आरसेमय आहे. इंग्रजी बिलोरी झुंबरें पुष्कळ आहेत. सर्व शोभिवंत

वस्तूंना गवसण्या घातल्या होत्या वाड्यांत एक मोठें इंग्रजी घड्याळ होतें तें मात्र बरोबर चाललें होतें ! चित्रांचीं अनेक इंग्रजी पुस्तकें होतीं. जवळच एक खगोल यंत्र मोडून पडलें होतें. त्यांत सूर्यग्रहमाला वगैरे यथाप्रमाण गोलकांनीं दाखविली होती. देशी नक्षीवाल्यांनीं काढलेला एक नकाशा होता. पण बापू गोखल्याजवळ यापेक्षां अधिक चांगला नकाशा असावा, कारण त्या शिवाय इतके दिवस तो आम्हांला झुकांडी देऊन कसा पळू शकतो"?

वरील वर्णनानंतर शंभर वर्षांनीं या वाड्याची राख सावडली जाऊन आज त्याचे नुसते अस्थिरूप पाये लोकांना दिसत आहेत. पण आतां सर्वच मनु पालटला असून जुनी पेशवाई तर गेलीच, पण त्यानंतरच्या इंग्रजी नोकरशाहीचेहि दिवस भरत आले आहेत. अठराव्या शतकाच्या विशींत बांधलेल्या, १९ व्या शतकाच्या विशींत नाश पावलेल्या, व विसाव्या शतकाच्या विशींत पाये उकरून काढलेल्या या वाड्याला एकविसाव्या शतकाच्या विशींत काय दिसणार आहे तें परमेश्वराला माहीत !

—केसरी १६ आगस्ट १९२१

REFBK-0001871

[library stamp] क्र. नं. १८७१

# Sanskrit-English Books.

कठोपनिषत्—With English translation and word for-word meaning, by H. R. Bhagavat. 6 As.

कठोपनिषत्—With English translation by Babu Aurobinda Ghose. 4 As.

स्वप्नवासवदत्तम् of भास. With English translation by H. R. Bhagavat. 12 As.

रघुवंश—Cantos XI-XV. With English translation. [*will be ready in March 1924.*]

**Ashtekar and Co. Poona city**

# संस्कृत पुस्तकें.

गीताभाष्यं शंकराचार्यविरचितम् । किं. दोन रुपये.

ब्रह्मसूत्रभाष्यं ,, ,, तीन रुपये.

गीतासंग्रहः—भगवद्गीता, रामगीता, गणेशगीता, शिवगीता, देवीगीता, कपिलगीता, अष्टावक्रगीता, अवधूतगीता, सूर्यगीता, ब्रह्मगीता वगैरे तेरा गीता. किं. एक रुपया चौदा आणे.

**अष्टेकर कंपनी. पुणें शहर.**

# छापत आहे.

## श्रीशंकराचार्यांचे लहान ग्रंथ.

या पुस्तकामध्यें शंकराचार्यांच्या पुढील ग्रंथांचा समावेश केला आहे— अपरोक्षानुभूति, आत्मबोध, तत्त्वोपदेश, ब्रह्मज्ञानावली-माला, वाक्यवृत्ति, सदाचारानुसंधान, स्वात्मनिरूपण, अद्वैतानुभूति, दशश्लोकी, प्रबोधसुधाकर, प्रश्नोत्तररत्नमालिका, ब्रह्मानुचिंतन, मोहमुद्गर, योगतारावली, शतश्लोकी, स्वात्मप्रकाशिका, सर्ववेदान्त-सिद्धांतसारसंग्रह, विवेकचूडामणि, उपदेशसाहस्री, वेदान्तपर स्तोत्रें, भक्तिपर स्तोत्रें, सनत्सुजातीयभाष्य आणि विष्णुसहस्रनामभाष्य.

टाईप मोठा, कागद जाड ग्लेज, कापडी बांधणी. किंमत चार रुपये.

अष्टेकर कंपनी. पुणें शहर.